मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार

प्रा. अरविंद मंगरूळकर

मूल्य : पांच रुपये

प्रथमावृत्ति
सौर ३१ श्रावण, १८८६
२२ ऑगस्ट, १९६४
नारळीपौर्णिमा

प्रकाशक :
व. ह. गोळे
कार्यवाह, पुणें विद्यापीठ
पुणें–७

मुद्रक :
द. वा. आंबेकर
आर्यभूषण मुद्रणालय
पुणें–४

प्रकाशकाचें निवेदन

पुणें येथे स्थापन झालेल्या कै. नरसिंह चिंतामण केळकर स्मारक निधि-समितीच्या विश्वस्तांतर्फे मिळालेल्या रु. २५,०००–च्या देणगीचा स्वीकार पुणें विद्यापीठाने केला, आणि त्या देणगीच्या व्याजांतून प्रतिवर्षी कै. केळकर यांच्या स्मृतिदिनाच्या सुमारास कै. नरसिंह चिंतामण केळकर स्मारक व्याख्यानमाला घडवून आणण्याचा उपक्रम १९५४ सालीं सुरू झाला. आतापर्यंत या व्याख्यानमालेंत अनुक्रमें प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. बाळाचार्य माधवाचार्य खुपेरकर, श्री. शं. ना. जोशी, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. ह. रा. दिवेकर, प्रा. ब. ग. खापर्डे, प्रा. अरविंद मंगरूळकर, प्रा. द. ब. डिसकळकर आणि प्रा. पांडुरंग पिसुर्लेकर यांचीं व्याख्यानें झालीं आहेत.

प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी १९६१–६२ या वर्षांत 'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार' या विषयावर दिलेलीं सहा व्याख्यानें या व्याख्यानमालेंतील आठवें पुष्प म्हणून आता ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहेत.

१५ ऑक्टोबर, १९६४
पुणें विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणें–७

ब. ह. गोळे,
कार्यवाह

पु र स्का र

प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी पुणें विद्यापीठातर्फे दरसाल होणाऱ्या 'केळकर व्याख्यानमालें'त मराठी व्याकरण या विषयावर सहा व्याख्यानें दिलीं. तीं आता एकत्र करून ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. त्यांनी व्याख्यानासाठी घेतलेला विषय गहन आणि नेहमीच्या परिचित मार्गापासून बराच निराळा आहे. अशा या विदग्ध ग्रंथाला प्रस्तावना लिहिणें हें सोपें काम नाही. तथापि अधिकारपरत्वेंच हें काम माझ्यावर आलें आहे, व तें मी कर्तव्यभावनेने करीत आहें.

'अनन्तपारं खलु शब्दशास्त्रम्' असें म्हटलें आहे; कारण साऱ्या ब्रह्मांडाची उत्पत्ति शब्दापासून झाली आहे, असे वेदान्त सांगतो. हें सारें नादब्रह्म आहे, व त्यांतून अनंतकाळ घेऊन सृष्टिकर्त्यांनी ही सृष्टि निर्माण केली आहे. म्हणून शब्दाचें महत्त्व अतिशय आहे. आणि तें एकदा पटल्यानंतर त्या शब्दामधील साधकबाधक विवेचन, नियमन व नियंत्रण हळूहळू होत जाणें हें क्रमप्राप्त होतें. सामान्यपणें व्याकरणाची भूमिका अनुयायाची असते. म्हणजे भाषा वाढत जाते, व व्याकरण तिनें काबीज केलेला विचारांचा प्रांत संघटित करीत जातें. तथापि ही समजूत प्रा. मंगरूळकरांना सर्वस्वीं मान्य नाही.

पहिल्या व्याख्यानांत त्यांनी स्पष्ट म्हटलें आहे की, भाषा आणि व्याकरण हीं समव्याप्त आहेत. या पहिल्या व्याख्यानांत भाषेचा कालिक भेद, दैशिक भेद, त्याचप्रमाणे भाषाभेदांचे स्तर व ध्वनिविकार इत्यादि विषयांचा परामर्श केलेला आहे. मराठी भाषेच्या प्रगतीचें निदान करून भाषा-व्याकरणसंबंध विस्तारानें चर्चिला आहे. "मध्यंतरींच्या अनेक शतकांत मराठीचें व्याकरणशास्त्र आढळत नाही, याचा अर्थ व्याकरण नव्हतें असा नव्हे," हा त्यांचा सिद्धान्त मान्य होण्यासारखा आहे. भाषा ही अस्तित्वांत आली, म्हणजें न-कळत असे कांही नियम तिच्यांत अंतर्भूत असतातच, व कालांतराने ते स्पष्ट होत जातात. जे प्रयोग वारंवार होतात, ते प्रयोग मग वैयाकरणांना मान्य करावे लागतात. कारण 'वैयाकरणाः प्रयोगशरणाः' हें सूत्र बरोबर आहे. कालांतराने भाषा बदलत जाते. कारण भाषा आणि समाजाचें जीवन यांचा संबंध अभेद्य आहे. मनुष्यप्राणी हा बोलतो; म्हणजे त्यास वाणी आहे, म्हणून त्याला आपल्या मनांतील विचार व्यक्त करितां येतात, आणि अन्यांच्या व्यक्त विचारांवरून त्याच्या मनावर कांही-ना-कांही परिणाम होत असतात. समाजजीवन हें प्रवाही आहे, आणि म्हणून भाषाहि प्रवाही आहे. २५ वर्षांपूर्वी मराठी भाषेची जी ढब होती, ती आज आढळून येत नाही. त्याचप्रमाणे प्रदेशपरत्वें भाषा बदलत जाते. 'दहा कोसांला भाषा बदलते,' अशी

म्हण आहे. आणि त्याचें कारणहि पूर्वीच्या काळीं प्रदेशा-प्रदेशानुसार सामाजिक जीवन थोड्याबहुत प्रमाणांत भिन्नभिन्न होतें, हें आहे. पण सामाजिक जीवन असें सब घोडे बारा टक्के झालें नाही. तथापि प्रदेशागत बोलली जाते ती बोली, आणि व्यवहारांत निश्चितता यावी, विचारांत निश्चितता यावी, म्हणून साऱ्या भाषांच्या इतिहासांत असें आढळून येतें की, एक प्रमाण-भाषा निर्माण होते, व तिचें व्याकरणहि एक प्रमाण-व्याकरण मानिलें जातें. लिपि असलेली बोली व्याकरणाशिवाय असूं शकत नाही. तथापि व्याकरण जें कांही असेल, तें तेवढ्यापुरतेंच मर्यादित असतें.

कालभेद, प्रदेशभेद, स्तरभेद या सर्वांना प्रमाणभाषा एक असल्याने या सर्वांना एका गोत्रांतील म्हणण्यास हरकत नाही. कोकणामध्ये कांही काळापूर्वी जातिविषयक निरनिराळ्या कोकणी भाषेचे प्रकार आढळून येत होते. यालाच स्तरभेद अथवा वर्तुलभेद अशी संज्ञा या पुस्तकांत प्राध्यापकांनी दिली आहे.

प्रा. अरविंद मंगरूळकरांचा सिद्धान्त की, प्रत्येक भाषेला, मग ती बोली असो, व्याकरण हें असलेंच पाहिजे. हें मान्य केलें, तरी त्या सर्व विविध बोलींच्या व्याकरणाचा अभ्यास करणें हें प्रमाणभाषेच्या व्याकरणाच्या अभ्यासाइतकें महत्त्वाचें आहे, हा त्यांचा सिद्धान्त सर्वमान्य होण्यासारखा नाही. प्रमाणभाषेचें व्याकरण विशिष्ट अवस्थेपर्यंत निर्माण होण्यांत या विविध बोलींच्या व्याकरणांचा उपयोग होतो हें खरें; त्यानंतर मात्र प्रमाणभाषेच्या प्रमाण-व्याकरणावर जो परिणाम होतो, तो समाजाच्या बदलत्या जीवनांतील भाषाविषयक अभिव्यक्तीचाच. बोलभाषांचें ज्ञान समाजनिरीक्षकांना, समाजविचारवंतांना जरूर आहे. पण त्या सर्व भाषांच्या व्याकरणाचें ज्ञान जरूर आहे, असें मला वाटत नाही. आजच्या काळांत भाषाविषयक अभिमानाने जीवन प्रसंगीं गांजलें जातें, तें न जावें म्हणून प्रत्येक बोलीचें व्याकरण शिकावें, हा उपाय प्रमुख असा मानतां येणार नाही. याच संबंधांत शुद्ध-अशुद्ध म्हणजे काय याचा विचार या पुस्तकांत केला असून प्रमाणव्याकरणाच्या दृष्टीने जें अशुद्ध असें मनिलें जातें, तें त्या विवक्षित बोलीच्या व्याकरणाप्रमाणे अशुद्ध नाही, अशी विचारसरणी मांडिली आहे.

भाषेच्या अंतर्गत स्वरूपाचें यथावत्, संगतवार वर्णन म्हणजे व्याकरण, ही व्याख्या सामान्यपणें बरोबर आहे. तथापि जीवनाच्या साऱ्या क्षेत्रांतून भाषेचा अर्थ कळण्यासाठी व्याकरण हाच एक वाटाड्या आहे, असें मला वाटत नाही.

दुसऱ्या व्याख्यानांत 'ध्वनिविमर्श' याचें विवेचन केलें आहे. प्रमाणभाषा म्हणजे जी बहुमान्यता पावलेली आहे, हें तिचें एक लक्षण झालें. तथापि केवळ बहुमान्यतेने तिला प्रमाणभाषेचें स्वरूप येतें, असें नाही. अन्य कांही लक्षणें तींत असावीं लागतात. तींत एकविधता असावी लागते. आणि समाज ज्याप्रमाणे प्रवाही असूनसुद्धा स्थिर व नित्य असतो, त्याचप्रमाणे भाषेच्या बाबतींतहि असतें. प्रा. अरविंद मंगरूळकरांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे "प्रवाह प्रतिक्षणीं वाहता आणि म्हणून बदलता असा

आपल्या अनुभवाला येतो, त्याचप्रमाणे ‘ तोच प्रवाह ’, ‘ तीच ही गंगा ’ अशा शाश्वत रितीने आपल्या प्रत्ययाला येतो आणि आपल्या जाणिवेचा भाग बनतो, ” ही गोष्ट खरी आहे. प्रमाणभाषा ही प्रवाहाप्रमाणे वाहती व स्थिर अशा दोनहि स्वरूपांची आहे आणि म्हणून समाजाच्या व्यवहाराच्या सर्व अंगांत व सर्व स्वरूपांत तिला मान्यता असणें अपरिहार्य असतें. किंबहुना, जर नदीला तट नसते, तर तिला ‘ नदी ’ म्हणतां येणार नाही, त्याचप्रमाणे भाषेला व्याकरण नसलें, तर तिला ‘ भाषा ’ म्हणतां येणार नाही. कांहीतरी अफाट, अनिश्चित, अस्थिर असे कांहीतरी तिचें स्वरूप राहील. भाषेचा आणि ध्वनीचा संबंध कसा अविभाज्य आहे, याचा विमर्श या व्याख्यानांत फार चांगल्या तऱ्हेने केलेला आहे. भाषा जी समाजांत जन्माला आली, ती ध्वनींमार्फतच. म्हणजे तिचा दाईपणा ध्वनीने केलेला, आणि त्यामुळे ध्वनींमध्ये जे कमीजास्त बदल होतात, त्यांच्या योगाने त्या-त्या शब्दांतून निरनिराळे अर्थ निर्माण होऊं शकतात, हें स्पष्ट आहे. बासरी एकच, ती वाजविणारा एकच, पण छिद्रांवरती निरनिराळ्या तऱ्हेने बोटें कमीजास्त करून निरनिराळे सूर निघतात, त्याचप्रमाणे जन्मतः ध्वनि एक असला, तरी तो जेव्हा मुखातून बाहेर पडतो, त्या वेळी त्यांतील लहरीलहरीवर शब्दाचा अर्थ नाचत असतो, अगर बदलत असतो. क्षणासारखा क्षण नाही, असें आपण म्हणतों, त्याप्रमाणे ध्वनीसारखा ध्वनि नाही, हेंच खरें. एकदा ध्वनीचें महत्त्व कळल्यानंतर त्यांतून वर्णमाला कशी निर्माण होते, याचें सुंदर व विदग्ध विवेचन या व्याख्यानांत केलें आहे.

तिसरें व्याख्यान ‘ मराठीची वर्णमाला ’. या व्याख्यानांत स्वरांच्या ऱ्हस्वदीर्घत्वाचा विचार केला आहे. रूढ वर्णमाला हिचाहि विचार करून कांही नवे विचार या व्याख्यानांत प्रदर्शित केलेले आहेत. उच्चारशास्त्र हें किती कठीण असूं शकतें, याचा प्रत्यय हें व्याख्यान वाचीत असतांना येतो. ‘ मत्सर ’ हा शब्द रूढीला अनुसरून दाखविल्याप्रमाणे लिहिला जात असला, तरी वस्तुतः उच्चारतः तो ‘ मच्छ़र ’ असा आहे आणि त्याचा अर्थ ‘ द्वेष ’. अर्थात् ‘ मच्छ़र ’ व ‘ मच्छर ’ हे शब्द निराळे लिहिले जावे आणि उच्चाराच्या दृष्टीने त्याखाली टिंबें दिलीं जावीं, हें चिंतनीय आहे. या व्याख्यानांत ‘ ज्ञ ’चा विचार केलेला आहे. त्याप्रमाणे ‘ क्ष ’चा विचार केलेला आहे. आणि त्या दृष्टीने या बाबतींत हिंदी, पंजाबी, राजस्थानी, मराठी इत्यादि भाषांतील या शब्दाबाबत तुलना केलेली आहे. १९५३ सालीं लखनौला हिन्दी भाषेसंबंधी एक तज्ज्ञांची परिषद झाली होती. तींत ज्ञ, ळ, क्ष हीं अक्षरें आता हिन्दी वर्णमालेमध्ये मान्यता पावलेलीं आहेत. निराळ्या शब्दांत हिन्दींतील प्रमाणभाषेंत त्यांना आता स्थान प्राप्त झालेलें आहे. आता हिन्दींत ‘ क्ष ’ लिहितात ‘ क्ष ’ लिहीत नाहीत. जसें-जसें भारतामध्ये यथार्थतया एकस्वरूपी, एकजिनसी समाजजीवन होत जाईल, त्या-त्या प्रमाणांत त्या जीवनाची अभिव्यक्ति करणारी भाषा हिच्यामध्येहि सर्वसमान अशी प्रमाणबद्धता येत जाईल.

चौथें व्याख्यान 'शब्दांचें वर्गीकरण व नामविमर्श' यांसंबंधी आहे. या व्याख्यानांत नाम, सर्वनाम, विशेषण, अव्यय इत्यादिकांचा विचार केलेला आहे, आणि विविध उदाहरणें देऊन प्रा. मंगरूळकरांनी आपलें म्हणणें सहज समजेल या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे. 'गोड'-शब्द इतका गोड आहे की, कोठल्याहि शब्दाला तो जोडला, तरी त्याचा 'गोड'पणा कायम राहतो. जसें : 'गोड आंबा', 'गोड बासुंदी', 'गोड औषध'. विशेष्य व विशेषण यांचा विचार दिलेल्या उदाहरणांमुळे मनोरंजक वाटतो. विशेषनामें सामान्यनामें होतात, आणि प्रसंगीं विशेषनाम हें गुणवाचक असतें. उदाहरणार्थ, 'हा जणू कर्ण आहे,' यांत तुलना कर्णाशीं तितकी नाही, पण ती कर्णाचा जो मुख्य गुण दातृत्व त्याच्याशीं आहे. 'विष्णुशास्त्री हे मराठी भाषेचे शिवाजी आहेत,' यांत त्यांची तुलना शिवाजी या व्यक्तीशीं तितकी नसून शिवाजी ज्या गुणांचा प्रतिनिधि होता, त्यांपैकी एकाशीं आहे. 'लिङ्गभेदेन शब्दभेदः,' हें प्रकरण विशेष सोप्या पद्धतीने लिहिलें असल्याने आकर्षक झालें आहे. याच व्याख्यानांत वचनविचार केलेला असून मराठींत दोनच वचनें आहेत, व अनेकवचनी शब्द कसे बदलतात, हेंहि दाखविलें गेलें आहे. एकच शब्द तीन-लिंगी असूं शकतो, याचें उदाहरण 'पोर' या शब्दाने त्यांनी दर्शविलें आहे, व साधित नामें मर्यादित अर्थाने विशेषणें वस्तुतः बनतात, हा एक सूक्ष्म विचार त्यांनी मांडला आहे. सर्वनामांचा विचार करतांना सामान्यपणें सर्वनामेंहि अलिंग आहेत, अगर इष्टलिंग आहेत, हें उदाहरणें देऊन सांगितलें आहे. या व्याख्यानाचा निष्कर्ष काढतांना त्यांची विचारसरणीहि निश्चितपणें कशी आहे, हें समजून येतें. अर्थात् अनेकांना ती तितकीशी पटणार नाही. तथापि त्यांनी या विषयाची केलेली मांडणी व पृथक्करणपद्धति ही खास अभिनंदनीय आहे.

पांचव्या व्याख्यानांत विशेषण, सर्वनाम, विभक्ति यांचा विचार केला असून सहाव्यांत विभक्ति, धातु यांचा विचार केलेला आहे. पांचव्या व्याख्यानांत चर्चिलेले विषय माझ्या मतें विशेष महत्त्वाचे आहेत. भाषा शिकण्यासाठी दोन महत्त्वाच्या गोष्टी समजल्या जातात. भाषेंतील सर्वनामें, विभक्ति यांचें ज्ञान चांगलें झाल्यास त्या भाषेचें ज्ञान लौकर होतें. उदाहरण द्यावयाचें झाल्यास, एकदा कुंभाराने चौकट निश्चित केली, म्हणजे त्याला विटा पाडणें सोपें जातें. कारण मग त्या चौकटींत त्याला फक्त चिखलच भरावा लागतो. भाषेंतील सर्वनामें व विभक्ति यांचें ज्ञान झालें, म्हणजे भाषेचें स्वरूप सामान्यपणें कळतें व मग जशी शब्दसंपत्ति वाढत जाईल, तसें तद्विषयक भाषेचें ज्ञान विशाल व सखोल होत जातें. सहाव्या व्याख्यानांत विभक्तीचा विचार अधिक केला असून धातुविमर्शविषयक विचारहि मांडले आहेत. कर्ता आणि क्रियापद याला ग्रंथकारांनी दिलेली उपमा 'भाषेचा आंस' ही अगदी उचित व यथार्थ आहे. लहानपणीं 'स, ला, ना, तें' एवढेंच पाठ केलें होतें,

पण त्यामागील तत्त्व पांचव्या व्याख्यानांत स्पष्ट झालें. या दोनहि व्याख्यानांत ग्रंथकर्त्याची व्याकरणाकडे पाहण्याची नवी दृष्टि उघड दिसून येते.

या सहा व्याख्यानांचा हा संग्रह व त्यांतील विचार सामान्य वाचकांना सहज आकलन करतां येणार नाहीत. सामान्य विद्वानांनाहि सुलभतेने आकलन होणार नाहीत. पण व्याकरण-विषयांत व व्युत्पत्ति-विषयांत जे जाणते आहेत त्यांना हीं व्याख्यानें, त्यांतील मांडणी, त्यांतील प्रतिपादन, शैली व त्यांतील प्रमेयें पटतील. कदाचित् कांही पटणार नाहीत. तथापि कालांतराने तेंहि होणें शक्य आहे. एक गोष्ट निश्चित की, या व्याख्यानांच्या कामीं प्रा. मंगरूळकरांनी घेतलेली मेहनत, खर्ची घातलेला वेळ, केलेलें चिंतन हें सर्व अभिनंदनीय आहे. सामान्यपणें त्यांची विचारसरणी तर्कशुद्ध आहे, आणि भाषा उघड-उघड प्रदग्ध आहे. विषय जाड असल्याकारणाने तीहि जाड असणें स्वाभाविक आहे. तथापि वाटते तेवढी जड नाही. महाराष्ट्रांतील विद्वज्जनांना हा ग्रंथ पसंत पडेल.

पुणें विद्यापीठ,
पुणें–७

न. वि. गाडगीळ
कुलगुरु,
पुणें विद्यापीठ

प्र स्ता व ना

पुणें विद्यापीठाच्या वतीने प्रतिवर्षी 'कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला' होत असते. १९६१-६२ या वर्षावधींत माझे मित्र प्रा. अरविंद गंगाधर मंगरूळकर यांनी या मालेंत 'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार' या विषयावर ६ व्याख्यानें दिलीं. तीं व्याख्यानें आता पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत असून त्याला प्रस्तावना लिहिण्याचें अवघड काम माझ्याकडे देण्यांत आलें आहे. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंनी ही प्रस्तावना लिहिण्याचें काम माझ्याकडे देऊन माझा मोठा बहुमान केला आहे, व त्यासाठी मी त्यांचा ऋणी आहें. पण ही जबाबदारी फार मोठी व बिकट आहे, याची जाणीव माझ्या मनांतून केव्हाच नष्ट झालेली नाही. अजूनहि मी माझ्या पात्रतेबद्दल साशंकच आहे. पण या विषयावरचे आपले कांही विचार मांडावयास ही संधि बरी आहे, हें ध्यानीं घेऊन मीं हें काम करावयाचें ठरविलें आहे.

मराठी व्याकरणरचनेची परंपरा फार जुनी नाही. मराठी वाङ्मयाची परंपरा आठशें वर्षांची असली, तरी प्राचीन काळीं या भाषेला व्याकरणाचा संस्कार फारसा कोणीं केला नाही. महानुभाव-पंडितांपैकी भीष्माचार्य या पंडिताने 'नामविभक्ति' व 'पंचवार्तिक' असे व्याकरणासंबंधी दोन ग्रंथ लिहिले होते. कवीश्वर व्यास व आनेराज व्यास यांनीहि व्याकरणावर कांही ग्रंथरचना केल्याचा उल्लेख महानुभाव-वाङ्मयांत सापडतो. पण इतकेंच. यापलीकडे कांही नाही. प्राचीन मराठींतले वामन, श्रीधर, मोरोपंत यांसारखे अनेक ग्रंथकार संस्कृत भाषेचेहि पंडित होते. आणि संस्कृत व्याकरण-शास्त्राचें त्यांनी अध्ययनहि केलें होतें. पण मराठीच्या दुर्दैवाने हा व्याकरणाचा संस्कार मायभाषेवर करावा, असा विचार त्यांच्या किंवा इतर संस्कृत पंडितांच्या मनांत आला नाही. महीपतीने म्हटल्याप्रमाणे 'कलियुगीं अल्पबुद्धि, अल्पमति, गीर्वाणभाषेचा अर्थ निश्चिती, कोणाप्रति उमगेना । यास्तव अवतार घेऊनि संतीं प्राकृतग्रंथ निर्मिले प्रीतीं ॥' अशीच प्राचीन ग्रंथकारांची भूमिका असावी. त्यामुळे व्याकरण-कोशांचें महत्त्व त्यांना वाटलें नसावें. तें कसेंहि असो. संस्कृताचा आदर्श समोर असूनहि त्या काळांत मराठीचें व्याकरण कोणीं रचलें नाही, हा विचार मनांत येऊन पुन्हा-पुन्हा विषण्णता येते, हें खरेंच आहे.

सतराव्या-अठराव्या शतकांत गोव्यांतील पोर्तुगीजांनी मराठीचें व्याकरण रचण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पण खरा मोठा प्रयत्न म्हणजे गेल्या शतकाच्या आरंभीं इंग्रज ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलेला प्रयत्न होय. डॉ. विल्यम केरी, जे. बॅलंटाईन, जे. स्टीव्हन्सन, ई. बर्जेस इत्यादि नांवें या क्षेत्रांत प्रसिद्धच आहेत. पण वरील सर्व मराठीचीं व्याकरणें

इंग्रजींत आहेत. १८४८ सालीं अहमदनगरच्या अमेरिकन मिशनने मात्र मराठीचें व्याकरण मराठींत रचिलें.

या काळापर्यंत भारतांत व महाराष्ट्रांत पाश्चात्त्य विद्येचा प्रसार होऊं लागला होता. आणि मिशनऱ्यांचे प्रयत्नहि नवविद्याविभूषितांच्या डोळ्यांसमोर होते. त्यामुळे व्याकरण-रचनेची प्रेरणा महाराष्ट्र-पंडितांच्या मनांत निर्माण होऊन तिचे फळहि दिसूं लागलें. बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके, गंगाधर रामचंद्र टिळक अशीं नांवें या क्षेत्रांत त्या काळीं दिसूं लागलीं होतीं. या सर्वांमध्ये दादोबा पांडुरंग यांचें नांव अग्रस्थानीं येतें. त्यांचें कार्य एवढें मोठें आहे की, 'मराठी भाषेचे पाणिनि' ही त्यांना दिलेली पदवी सार्थ आहे, हें निर्विवाद होय. त्यानंतर कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले, रा. भि. जोशी, रा. भि. गुंजीकर, मोरो केशव दामले, वि. का. राजवाडे इत्यादि थोर वैयाकरणांनी अनेक प्रकारें व्याकरणचर्चा करून, ग्रंथ लिहून मराठी व्याकरणाची एक मोठी परंपराच निर्माण केली. प्रा. मंगरूळकर यांनी आपल्या या व्याख्यानांतून मराठीच्या व्याकरणाविषयी इतके मौलिक विचार मांडले आहेत की, त्यामुळे त्यांना वरील महनीय परंपरेंत स्थान मिळेल, यांत संदेह नाही.

एखाद्या विषयाचें शास्त्र तयार झालें असलें, तरी त्या विषयाची मूळ वस्तु, त्याचें जें मूलद्रव्य, त्याचें पुनः-पुन्हा अवलोकन करणें, त्याचा वरचेवर मूलगामी स्वतंत्र अभ्यास करणें, त्यांतील मान्य झालेले सिद्धान्त वारंवार तपासून पाहणें याची फार आवश्यकता असते. कारण सर्व शास्त्रें व्याकरणाप्रमाणेच प्रयोगशरण असतात,—निदान असावयास पाहिजेत. स्वीकृत सिद्धान्तांची फेरतपासणी केली नाही, तर कालांतराने प्रत्यक्ष सत्य व शास्त्र यांत फार फेर पडतो व शास्त्र या शब्दाची विटंबना होऊं लागते. भारतांतील पूर्व-काळच्या गणितज्ञांनी ग्रहगोलाचें स्वतः अवलोकन करून ग्रहज्योतिषशास्त्र सिद्ध केलें. पण पुढे ग्रहांच्या अभ्यासांत खंड पडला आणि प्रत्यक्षांतील त्यांचे अस्तोदय, ग्रहणें यांचा व ज्योतिषशास्त्राचा मेळ पडेनासा झाला. लो. टिळकांनी पंचांगशुद्धीची चळवळ करून नवें गणित तयार केलें, तेव्हा आपल्या ज्योतिषशास्त्राची परवड थांबली. धर्मक्षेत्रांतील नियमनें, आपल्या स्मृति पुन्हा-पुन्हा तपासून त्यांत परिवर्तन न केल्यामुळे भारतांत काय अनर्थ घडले, हें सर्वश्रुतच आहे. हा सर्व समाजच त्यामुळे रसातळाला गेला. आक्रमकांचा प्रतिकार करून स्वातंत्र्य टिकविण्याचें सामर्थ्यसुद्धा त्याच्यात राहिलें नाही. युरोपियनांनी आपले धर्मनियम, नीतिनियम यांची अखंड फेरतपासणी करण्याचें धोरण ठेविलें; त्यामुळेच त्यांच्या समाजाची गेल्या चारपांच शतकांत प्रगति झाली, असें आपल्याला दिसतें.

ॲलेक्सिस कॅरेल या थोर पंडिताने 'मॅन द अन्नोन' या आपल्या ग्रंथांत याविषयी फार मार्मिक विवेचन केलें आहे. तो म्हणतो की, आपण अवलोकन, अभ्यास करून कांही शास्त्रीय सिद्धान्त मांडतों, त्या वेळीं शे. ६०।७० किंवा ८० घटना आपल्याला

अनुकूल अशा दिसतात, म्हणूनच आपण ते सिद्धान्त स्वीकारितों. आणि तें युक्तच आहे. पण त्या वेळीं प्रतिकूल अशा, आपल्या नियमांत न बसणाऱ्या अशा, शे. २०।३० घटना असतात, याचा विसर आपण पडूं देतां कामा नये. कारण त्या घटनांचा कालांतराने जास्त शोध घेतां कधी-कधी त्या इतक्या प्रभावी ठरतात की, पूर्वी अनुकूल ठरलेल्या बहुसंख्य घटना वास्तविक अनुकूल नव्हत्याच, कांही बाह्यरूपामुळे त्या तशा दिसल्या, असें आढळून येतें व त्यांच्या अनुकूलत्वामुळे उभारलेला सिद्धान्त कोसळून पडतो. आज मानवी जीवनाच्या अभ्यासांत इतकी प्रगति झालेली असूनहि मानव हा शास्त्राला बव्हंशीं अज्ञातच आहे, असे या पंडिताचें मत आहे. यावरून एकदा स्वीकारिलेले सिद्धान्त वरचेवर पुन्हा तपासून पाहण्याची किती आवश्यकता आहे, हें सहज कळून येईल.

व्याकरणशास्त्रांतहि अशा चिकित्सेचें इतर शास्त्राप्रमाणेच महत्त्व आहे; आणि या विचारानेच प्रा. मंगरूळकर ‘ मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार ’ करण्यास उद्युक्त झाले आहेत. आपल्या या प्रयत्नाचा हेतु सांगताना प्रारंभींच त्यांनी म्हटले आहे की, ‘ आजची रूढ वर्णमाला मराठीला जशीच्या-तशी उपपन्न होते, असे मानणें युक्तिवादाला धरून नाही. कांही बाबतीत ही वर्णमाला ढगळ आहे, तर ज्यांची नोंद घेणें आवश्यक आहे, अशा वर्णांची नोंद तिने घेतलेली नाही. म्हणजे ती द्विधा दूषणीय आहे. ’ (पृ. ७) आणि त्यांचा सर्व प्रबंध वाचला, तर आपल्याला असें आढळून येईल की, व्याकरण-शास्त्रांतील प्रत्येक प्रकरणाची अशी चिकित्सा त्यांना करावयाची होती, म्हणूनच हा उद्योग त्यांनी हातीं घेतला. शब्दांचें वर्गीकरण, विकरण-विभक्ति, आख्यातव्यवस्था या सर्वच बाबतींत मराठीच्या व्याकरणशास्त्रांत बदलत्या भाषेचें प्रतिबिंब दिसत नाही, ही त्यांची तक्रार आहे; आणि ती अगदी सयुक्तिक आहे, हें कोणालाहि मान्य करावेंच लागेल. वर सांगितल्याप्रमाणे भाषेंतले प्रत्यक्ष सत्य हें शास्त्रापासून दूर गेलें आहे. आणि त्याला पुन्हा शास्त्राच्या पकडींत आणून बसविण्याच्या हेतूनेच प्रा. मंगरूळकर हा पुनर्विचार करीत आहेत.

‘ प्रयोगशरणा वैयाकरणाः ’ हें व्याकरणशास्त्रांतलें आद्यतत्त्व प्रा. मंगरूळकरांना पूर्ण मान्य आहे. भाषेचें वास्तव स्वरूप पाहून तिचे नियम ठरविले पाहिजेत. दैनंदिन लोकव्यवहार पाहून व्याकरण रचिलें पाहिजे, भाषेला कोणीहि जाब विचारूं शकणार नाही, तिचा व्यवहारच आपण प्रमाण मानला पाहिजे, असे त्यांनी ठायीं-ठायीं म्हटलें आहे. पाऊणशें वर्षांपूर्वी यासंबंधी लिहितांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी याच आशयाचे उद्गार काढिले आहेत.

१८७४ सालीं ‘ लेखनशुद्धि ’ या विषयावर त्यांनी जो निबंध लिहिला, त्यांत व्याकरणाचा खरा अधिकार काय, याविषयी मोठें मार्मिक विवेचन केलें आहे. ‘ मराठी भाषेमध्ये भाषेंतील रूढ शब्द व रूढ प्रयोग बळेंच फिरविण्याचा आज बरींच वर्षें उद्योग चालू आहे, ’ त्यावर टीका करून वर्णशुद्धि, वाक्यशुद्धि व शब्दशुद्धि यांसंबंधी अनेक

उदाहरणें देऊन शेवटीं निबंधाचा तात्पर्यार्थ सांगतांना शास्त्रीबुवा म्हणतात, ' या अंकांत एकंदर आपणांकडून आम्हीं काय सिद्ध केलें, तें थोडक्यांत सांगतों... भाषेचें म्हणजे पडून गेलेल्या रूढीचें सामर्थ्य केवढें मोठें आहे, व त्यापुढे व्याकरण किती पंगु, हें दाखवून तीस अटकाव करूं जाणें किती वेडेपणाचें आहे, तें दर्शविलें. त्यावरून असें समजावयाचें की, जेथे रूढीचा व व्याकरणाचा विरोध पडतो, तेथे ' शास्त्राद् रूढिर्बलीयसी ' या वचनास अनुसरणें प्रायः उत्तम. तसेंच वर्ण, शब्द किंवा वाक्य हीं कशीं लिहावीं, असा जेथे म्हणून संदेह पडेल, तेथे फारकरून केवळ उच्चारावरच प्रमाण धरून चालावें. हा नियम अत्यंत सयुक्तिक, साधा आणि सोपा असून यामुळे लेखी भाषेंत चोहोंकडे एकदम मेळ बसून जाईल, हें उघड आहे. ' (निबंधमाला : चित्रशाळा-आवृत्ति – १९१७ : पृ. १३६.)

गेल्या शतकांतील बहुतेक सर्व थोर वैयाकरणांनी ह्राच दंडक मानिलेला आहे, असें आपल्याला दिसून येईल. १८६३ सालीं ' दक्षिणा प्रैझ कमिटी 'ने मराठी व्याकरणाच्या ग्रंथासंबंधाने एक जाहिरात दिली. कृष्णशास्त्री चिपळूणकर हे त्या कमिटीचे सेक्रेटरी होते. ही जाहिरात त्यांच्याच सहीने प्रसिद्ध झाली आहे. तींत मराठी व्याकरण कसें असावें, यासंबंधी आपले विचार त्यांनी मांडिले आहेत. ते म्हणतात, ' या ग्रंथांत विषय-प्रतिपादन करण्याची शैली अर्वाचीन युरोपियन व्याकरणासारखी असावी. म्हणजे ग्रंथकर्त्यानें एकदोन उदाहरणांवरून एखादा व्यापक नियम कल्पून त्यावरून इतर उदाहरणांची उपपत्ति करण्यास लागूं नये. तर जीं वास्तविक उदाहरणें असतील, त्यांवरून नियम बांधावे. तसेंच, भाषा कसकशी बदलत गेली, याच धोरणाने ग्रंथकाराने शब्दसिद्धीचे व वाक्यरचनेचे नियम बांधावे... या ग्रंथांतले नियम एकदेशी नसतां होतील तितके व्यापक असावे. ' (महाराष्ट्र-शब्दकोश : प्रस्तावना : पृ. ७.)

कृष्णशास्त्री गोडबोले यांनी वाक्यपृथक्करणाचा विचार करितांना आपलें व्याकरण-शास्त्रासंबधी हेंच धोरण असल्याचें सांगितलें आहे. १८७४ सालीं छापलेल्या आपल्या व्याकरणाच्या द्वितीय आवृत्तींत ते म्हणतात, " प्रस्तुत विषयाचे उपपादनांत विशेषां-वरून सामान्यांचें अनुमान करण्याची रीत योजिली आहे. मराठी भाषेंतील प्रयोग आणि संप्रदाय ताडून पाहिल्याने येणारीं सामान्य अनुमानें किंवा नियम प्रथम देऊन, उदाहरणांनी व प्राचीन कवींच्या लेखांनी त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे. "

या बाबतींत मौजेची गोष्ट अशी की, मराठीचे पाणिनि जे दादोबा त्यांना भाषेचा स्वैरसंचाराचा हा मूलभूत अधिकार फारसा मान्य नाही, असें दिसतें. ते तक्रारीच्या स्वरांत म्हणतात, " जनांच्या रूढीपुढे व लोकांच्या शब्दप्रयोगापुढे बापुड्या वैयाकरणांचें कांहीच चालत नाही. त्यांनी निमूटपणे त्यांचे ते प्रयोग ऐकत असावें, आणि जरी ते धडधडीत त्यांच्या व्याकरणाच्या नियमांस विरुद्ध असले, तरी तीं उदाहरणें मानून अपवादांचीं कोष्टकें वाढवीत जावीं, हेंच त्यांचें काम. " असे खेदोद्गार काढून

दादोबांनी ‘ ती दहीभात जेवली ’, ‘ ते वाट चुकले ’, ‘ तूं दूध प्यालास, ’ हीं उदाहरणें अकर्मक क्रियापदें भूतकाळीं सकर्मक म्हणून वापरलीं, आणि मूळचा कर्तरि प्रयोग मात्र तसाच कायम ठेविला व अशा रितीनें व्याकरणनियमांचा भंग केला, हें दाखविण्यासाठी दिलीं आहेत. अर्थात् दादोबांनी अशी तक्रार केली असली, तरी त्यांनी मूळ व्याकरण रचतांना प्रयोग-शरणवृत्तिच अनेक ठिकाणीं ठेविली होती, हें आपण विसरतां कामा नये. मराठींतील लिंग-विचार सांगतांना, जडवस्तूंच्या बाबतींत स्त्रीलिंग किंवा पुंलिंग ठरविण्यास लोकव्यवहार हेंच प्रमाण, असें त्यांनी स्पष्ट म्हटलें आहे. असो. आजपर्यंत मराठीच्या थोर व्याकरण-कारांनी लोकव्यवहार हेंच प्रमाण मानिलें आहे. आणि प्रा. मंगरूळकर यांनी व्याकरणाचा हा पुनर्विचार करितांना हाच दंडक अखंड डोळ्यासमोर ठेविला आहे. त्यांच्या विवेचनाला महत्त्व प्राप्त झालें आहे, तें त्यामुळेच होय.

प्रयोग, लोकव्यवहार हेंच व्याकरणशास्त्राचें मूळ प्रमाण मानावयाचें, या तत्त्वामुळे मराठी व्याकरण हें संस्कृत किंवा इंग्रजी व्याकरणशास्त्राच्या जाचांतून सोडविलें पाहिजे, असा आग्रह प्रा. मंगरूळकरांनी धरला आहे आणि तो अत्यंत सयुक्तिक आहे, यांत शंकाच नाही. आजपर्यंत मराठीचीं जीं व्याकरणें लिहिलीं गेलीं, तीं बऱ्याच प्रमाणांत संस्कृत व इंग्रजी आदर्श डोळ्यापुढे ठेवून लिहिलीं गेलीं. हे आदर्श ठेवणें अपरिहार्य होतें, पण ते आदर्श ठेवूनहि मराठीच्या स्वतंत्र प्रकृतीकडे लक्ष देऊन तिचे स्वतंत्र नियम ठरवितां आले असते. पण दुर्दैवाने तसें झालें नाही. कांही संस्कृताभिमानी लोक त[r] ‘ त्याचें जन्म झालें ’, ‘ त्याला स्वप्न पडला ’, अशी रचना मराठींत करीत असतात. ‘ यज्ञस्तंभ ’ हा समास मराठींत ‘ यज्ञाचा स्तंभ ’ असा सोडविला, तर पुष्कळांना राग येतो. ‘ यज्ञाकरिता (यज्ञार्थ) स्तंभ ’ असा संस्कृताप्रमाणे सोडविला पाहिजे, असा त्यांच आग्रह असतो. हे असले आग्रह किंवा दुराग्रह संस्कृत व्याकरणाचें मनावर वर्चस्व असल्यामुळे निर्माण होतात, हें उघड आहे. इंग्रजीच्या वर्चस्वामुळेहि मराठीला असाच सासुरवास होतो. कर्माची प्रथमा विभक्ति मानणें हें त्यामुळेच जड जातें. म्हणून म[r] ती अप्रत्यय द्वितीया मानावी, असा विचार मध्यंतरीं रूढ झाला होता. वर्तमान, भूत भविष्य या काळाचे पूर्णवर्तमान, अपूर्णवर्तमान इत्यादि पोटभेद हे इंग्रजीवरूनच आले[ले] आहेत. विशेषणाच्या विशेषणांना क्रियाविशेषणें म्हणावें, ही कल्पना इंग्रजीवरूनच आलेल[ी] आहे. मराठीचा स्वतंत्र विचार करण्याचें तत्त्व न स्वीकारिल्यामुळे हे घोटा[ळे] होतात. प्रा. मंगरूळकरांनी या बाबतींत कटाक्षाने मराठीचा स्वतंत्र विचा[र] करण्याचा आग्रह धरला आहे, ही अतिशय अभिनंदनीय अशी गोष्ट आहे. संबोध[न] ही विभक्ति मराठींत मानूंच नये, असें कांही लोकांचें मत आहे. कारण संस्कृ[त] व्याकरणांत संबोधनाचा अंतर्भाव प्रथमेंत केलेला आहे. मंगरूळकर म्हणतात, ‘ संस्कृतां[त] संबोधनाचा अंतर्भाव प्रथमेंत केला आहे, हें मराठीच्या व्याकरणांत संबोधनविभ[क्ति] गाळण्याचें समर्थन होऊ शकत नाही. तेव्हा संबोधनाचें स्वतंत्रतया परीक्षण केलें पाहिजे आणि मग त्याचें स्थान ठरविलें पाहिजे. ” (पृ. १३५) कांही पंडित मराठींतल्या विभक्ति

प्रत्ययांची व्युत्पत्ति शोधून काढितात, व मग संस्कृत वा प्राकृत या भाषांत त्यांचें मूळ सापडलें की त्या भाषांत त्या प्रत्ययामुळे जी विभक्ति ठरत असेल, तीच मराठींतहि मानावी, असा आग्रह धरितात. याविषयी मंगरूळकर म्हणतात, ' (मराठींतील) वास्तव स्थिति दुर्लक्षून भाषेच्या प्राक्कालीन स्थितीचें समर्थन वा कारण या विषयांत पुढे करणें युक्तिहीन आहे. नाहीपेक्षा ' घरामध्ये ' हे मराठींत सप्तम्यन्त रूप मानण्याचा प्रसंग येईल. कारण ' मध्ये ' हें संस्कृतांत सप्तमीचें रूप आहे. पूर्वजन्मीं एखादा माणूस वानर-योनींत होता, म्हणून आजहि तो वानरच मानावयास हवा, असें म्हणण्यासारखें हें आहे ! ' (पृ. १२०) संस्कृतांत विशेषणांची लिंगवचनविभक्ति विशेष्याप्रमाणे फिरते. ' गहन अरण्यांत ', असें आपण मराठींत म्हणतों. संस्कृतांत ' गहनांत अरण्यांत ' असें म्हणावें लागतें, म्हणजे मराठींत अनेक विशेषणांना विकार होत नाहीत. यामुळे त्यांना अविकारी शब्द किंवा अव्यय म्हणावें, असें प्रा. मंगरूळकरांनी म्हटलें आहे. (पृ. ९०) यांतहि वरील तत्त्वाचाच अवलंब आहे. संस्कृताहून मराठींतील रूढि जर भिन्न असेल, तर तिचा स्वतंत्र विचार करून व्याकरणांत तसा बदल केला पाहिजे.

मराठीच्या प्रकृतीचा स्वतंत्रपणें विचार करण्याचें ठरवून प्रा. मंगरूळकर यांनी प्रथम मराठीच्या रूढ वर्णमालेचा विमर्श केला व त्यासंबंधी अत्यंत मौलिक असे कांही विचार मांडिले. ते म्हणतात, 'आजची मराठीची वर्णमाला तत्त्वतः समाधानकारक नाही. ती प्रायः संस्कृताच्या व्याकरणामधून उचललेली आहे. तींत मराठी भाषेच्या प्रकृतीला स्वतंत्र असें स्थान नाही. ' (पृ. ५६) या प्रकरणांत ऋ, ऌ या स्वरांचे त्यांनी केलेलें विवेचन फारच सूक्ष्म असें आहे. बॅट, बॉल या शब्दांतील स्वर मराठींत आता रूढ झाले आहेत. पण सध्याच्या रूढ वर्णमालेंत त्यांना स्थानच नाही. त्याचप्रमाणे ई, ऊ या दीर्घ स्वरांना स्वतंत्र स्थान विनाकारण दिलेलें आहे. हे सर्व दोष दाखवून मंगरूळकरांनी मराठीची नवी वर्णमाला कशी असली पाहिजे, तें दाखविलें आहे. वर्णांच्या उच्चारस्थानांनुसार वर्णांचा क्रमहि बदलणें कसें आवश्यक आहे, तें सांगून नवीन क्रमहि त्यांनी सूचित केला आहे. (पृ. ६४ व ७७) हें सर्वच विवेचन अगदी मूलगामी व शास्त्रशुद्ध झालें असून तें वाचीत असतांना लेखकाच्या पृथक्करणशक्तीचा पदोपदीं प्रत्यय येत असतो.

वर्णविचार, शब्दविचार व वाक्यविचार हे व्याकरणशास्त्राचे तीन विभाग होत. शब्दविचारांत वर्गीकरण, विकरण (लिंगवचनविभक्ति) व व्युत्पत्ति यांचा अंतर्भाव होतो. आणि वाक्यविचारांत विभक्त्यर्थ, आख्यातार्थ, संयुक्त क्रियापद, प्रयोग व वाक्यपृथक्करण हे समाविष्ट होतात. यांपैकी प्रत्येक विषयाचा प्रा. मंगरूळकरांनी सांगोपांग विचार केलेला नाही. तसा त्यांचा हेतुच नाही. जेथे-जेथे पुनर्विचार करणें हें मराठीच्या स्वतंत्र प्रकृतीच्या दृष्टीने, रूढ व्याकरणांतील अपुरेपणाच्या दृष्टीने किंवा अन्य कांही वैगुण्याच्या दृष्टीने त्यांना अवश्य वाटले, तेथेच फक्त तो विषय त्यांनी विमर्शासाठी

घेतला आहे; व त्या बाबतींत सध्याच्या रूढ व्याकरणशास्त्रापेक्षा निराळे विचार मांडिले आहेत.

वर्णमालेच्या विमर्शांत त्यांना काय पुनर्विचार अवश्य वाटतो, तें वर सांगितलेंच आहे. आता शब्दांचें वर्गीकरण, विकरण, विभक्त्यर्थ, आख्यातार्थ इत्यादि विषयांत त्यांनी कोणते रूढभिन्न विचार मांडले आहेत, ते त्यांनी दिलेल्या कारणांसह थोडक्यांत सांगतों. आणि मग त्यांच्या त्या नवीन सिद्धान्तांचा थोडा परामर्श करून हें प्रास्ताविक विवरण संपवितों.

वर्गीकरणांत प्रथम सव्यय व अव्यय या भेदांचा विचार येतो. (१) त्यांत विशेषणांचा विचार करितांना प्रा. मंगरूळकर म्हणतात की, मराठींत बहुसंख्य विशेषणांना विकार होत नाहीत. तीं विकारासह – विकार न घेणारीं – आहेत. म्हणून त्यांची गणना अव्ययांत करणें सयुक्तिक ठरेल. त्यांची सव्ययांत गणना करणें हें संस्कृताचें दास्य होय. (पृ.९०) (२) त्याचप्रमाणे ज्यांना आपण आज शब्दयोगी अव्ययें म्हणतों, त्यांतल्या अनेकांना, मर्यादित स्वरूपाचें का होईना, विभक्तिकार्य होतें. त्यामुळे या तथाकथित अव्ययांना सव्ययांत, विकारसह गटांत घालावें लागेल. (पृ.९१) (३) नामाचे सामान्यनाम, विशेषनाम हे भेद केवळ कंठाळी स्वरूपाचे आहेत. ते भेद करण्यापासून व्याकरणाला कांही लाभ नाही. (पृ. ९६) (४) सर्वनामांचा मराठींत पृथक् विचार करण्याची आवश्यकता नाही. कारण नाम व सर्वनाम यांचे मराठींत विभक्तिप्रत्यय अभिन्न आहेत. संस्कृतांत सर्वनामांचे पुष्कळ प्रत्यय वेगळे आहेत. म्हणून तेथे त्यांचा स्वतंत्र विचार योग्य असला, तरी मराठींत तो योग्य नाही. (पृ. १०१) (५) अनेक विशेषणें कधी-कधी नामकार्यें करितात. अशा वेळीं शहाणा, सुंदर यांना नामांप्रमाणे वापरलेलीं विशेषणें न म्हणतां नामेंच म्हणावें. (पृ. ११२) (६) विभक्ति या रूपावरून मानाव्या. त्याअन्वयें मराठींत प्रथमा, द्वितीया, तृतीया व संबोधन एवढ्याच विभक्ति ठरतील. इतर विभक्ति मानणें सयुक्तिक होणार नाही. (पृ. १४४) (७) ‘मोड’ हा धातु कधी सकर्मक, व कधी अकर्मक वापरला जातो. त्या वेळीं ते दोन धातु मानावे. एकच धातु एकदा सकर्मक होतो, व एकदा अकर्मक होतो, असें म्हणणें युक्त नाही. (पृ. १४७) मराठींत असे अनेक धातु आहेत. त्यांची अशीच व्यवस्था करावी. (८) विभक्तींप्रमाणेच आख्यातेंहि प्रत्ययावरून मानावीं. (पृ. १५५) (९) संयुक्त क्रियापदाची रूढ कल्पना मराठीच्या व्याकरणांत अकिंचित्कर आहे. (पृ. १५७)

हे व यासारखे आणखी कांही रूढभिन्न विचार प्रा. मंगरूळकरांनी आपल्या व्याख्यानांतून मांडिले आहेत. व्याकरणशास्त्रांत आजपर्यंत वैयाकरणांनी वर्णविचार, शब्दविचार व वाक्यविचार या विषयांत अनेक नवीन-नवीन विचार मांडिले आहेत; व त्यांतून अनेक वादहि निर्माण झाले आहेत. हे वाद निर्माण होण्याचीं कांही कारणें आपण वर पाहिलीं. कोणाच्या मनावर संस्कृत व्याकरणाचें वर्चस्व असतें, कोणाच्या

मनावर इंग्रजीचें. आपण मराठीच्या प्रकृतीचा विचार हाच महत्त्वाचा मानून या दोन्ही प्रकारच्या मतांना त्याज्य मानिलें, व वादाचें एक महत्त्वाचें कारण काढून टाकिलें. पण एवढ्याने भागत नाही. केवळ मराठीचें वास्तव रूप आणि तेंहि सध्याचें रूप पहावयाचें असें ठरविलें, तरी अनेक वादग्रस्त प्रश्न शिल्लक राहतातच. हे वाद कशामुळे निर्माण होतात, हें पाहणें फार मनोरंजक आहे, आणि कोणत्याहि नवीन मताचा परामर्श करितांना तें आवश्यकहि आहे.

'नदीच्या किनाऱ्याने पुष्कळ उद्यानें आहेत,' व 'नदीच्या किनाऱ्याला अनेक वृक्ष आहेत,' हीं वाक्यें पहा. यांत 'किनाऱ्याने' व 'किनाऱ्याला' या शब्दांनी स्थळ दाखविलें आहे. म्हणून त्यांची सप्तमी विभक्ति व्हावी. पण मराठींत तसे मानीत नाहीत. 'ने' हा तृतीयेचा प्रत्यय आहे, म्हणून ती तृतीया, व 'ला' हा चतुर्थीचा म्हणून ती चतुर्थी. येथे व्याकरण प्रत्ययावरून म्हणजे रूपावरून ठरवावें, हें तत्त्व अनुसरलें आहे. 'शिव शिव', 'रामा रामा' हीं मूळचीं नामें आहेत. पण शोकार्थी उद्गारांत तीं केवलप्रयोगी अव्ययें ठरतात. येथे व्याकरण अर्थावरून ठरवावें, हें तत्त्व अनुसरलें आहे. १८४८ सालीं अहमदनगरच्या अमेरिकन मिशनने मराठी व्याकरण तयार केलें, त्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांत विशेषणाचेंच नामविशेषण व क्रियाविशेषण असे भेद केले आहेत. म्हणजे तेथे गुण दाखविण्याचें कार्य फक्त लक्षांत घेतलें आहे. सव्यय, अव्यय हा भेद दुर्लक्षिला आहे. नामाशीं संबंध असणें व क्रियापदाशीं संबंध असणें हा भेदहि लक्षांत घेतलेला नाही. कृष्णशास्त्री गोडबोले हे सर्वनामास शब्दाच्या मुख्य वर्गांत गणीत नाहीत. ते तीन प्रकारचीं प्रातिपदिकें मानतात. (१) नाम – पदार्थबोधक, (२) विशेषण – गुणबोधक व (३) क्रियाविशेषण – क्रियाबोधक. आणि प्रातिपदिकाऐवजी येणारीं तीं सर्वनामें अशी त्यांची व्याख्या असल्यामुळे त्यांनी सर्वनामांचे नामात्मक, विशेषणात्मक व क्रियाविशेषणात्मक असे तीन प्रकार मानले आहेत. त्यामुळे तेथे, तेथून, एथवर, तोपर्यंत हीं सर्व क्रियाविशेषणात्मक सर्वनामें झालीं. प्रातिपदिकाची व्याख्याच गोडबोले यांनी निराळी केली. त्यामुळे त्यांचें सर्वनामाचें व्याकरण बदललें. केवलप्रयोगी अव्यय हें वाक्यरचनेंत सुटें असतें. त्याला वाक्यपृथक्करणांत कोठे स्थान नाही. म्हणून शब्दाची ती निराळी जात मानूंच नये, असें आगरकर म्हणतात. म्हणजे वाक्यरचनेच्या दृष्टीने त्यांनी व्याकरणाकडे पाहिलें आहे. आणि वाक्यरचना हेंच भाषेचें अंतिम उद्दिष्ट असल्यामुळे तीच दृष्टि योग्य, असें कांही वैयाकरण म्हणतातच.

हें सर्व पाहिलें, म्हणजे हे वाद कसे मूलगामी आहेत, हें ध्यानीं येईल. व्याकरण रूपावरून ठरवावें, अर्थावरून ठरवावें, वाक्यरचना प्रधान मानून त्या दृष्टीने निर्णय करावा, असे अनेक पक्ष आहेत. आणि हें अटळ आहे. भाषा हें मानवी जीवनाचें अंग आहे आणि इतर अनेक जीवनांगांप्रमाणे या अंगाचें स्वरूपहि नित्य पालटत असतें. त्यामुळे कांही ठरीव चौकटींत त्याला बसविणें अत्यंत अवघड होऊन बसतें. तसें त्याला बसविण्याच्या प्रयत्नांतूनच अनेक वाद निर्माण होतात.

इंग्लिश कोणास म्हणावें, जर्मन कोणास म्हणावें, असे प्रश्न व्यवहारांत नित्य निर्माण होतात. इंग्लंडमध्ये शेकडों लोक बाहेरून येऊन राहतात. त्यांत जर्मन असतात, रशियन असतात, जपानी असतात, काळे असतात, गोरे-निमगोरे-पिवळे सर्व प्रकारचे असतात. ख्रिश्चन असतात, मुस्लीम असतात, ज्यू असतात, बौद्ध असतात. इंग्लंडमधून शेकडों लोक इतर देशांत जाऊन राहतात, अनेक वर्षें राहतात, अनेक पिढ्या राहतात. आता यांतील इंग्लिश कोण, हें कसें ठरवायचें ? लोकांची ही आवक-जावक अजिबात थांबविली, तर हा प्रश्न संपा होईल. पण मग जीवनच थांबविल्यासारखें होईल. तें शक्य नाही. म्हणून अन्य मार्ग शोधावे लागतात. सहा महिने किंवा वर्षभर जो इंग्लंडचा नागरिक असेल, म्हणजे ज्याची तशी नोंद झाली असेल, त्याला इंग्लिश म्हणावें, असा एक ठोकळ मार्ग कायद्याने, या अडचणीच्या निवारणासाठी, काढिलेला असतो. आणि त्याने व्यवहार सुकर होतो, म्हणून बहुतेक सर्वत्र तोच अवलंबिला जातो. पण त्यांत खरा जीव नाही, हें विशेष प्रसंगीं दिसून येतें. युद्धाच्या प्रसंगीं हा दंडक कुचकामी ठरतो. जो इंग्लिश राष्ट्राचा अभिमान धरील, त्या भूमीसाठी तनमनधन झिजवील, तोच खरा इंग्लिश, असें त्या वेळीं सांगितलें जातें. वास्तविक यालाच खरा अर्थ आहे. पण 'अभिमान धरणें' हें लक्षण इतकें लवचीक आहे, इतकें निसटतें आहे, इतकें अस्पष्ट आहे की, प्रत्यक्ष व्यवहारांत त्यामुळे केवळ अनर्थ होईल. ज्याला इंग्लंडचा अभिमान आहे तो इंग्लिश व त्याला मतदानाचा हक्क आहे असें म्हटलें, तर निवडणुकांचें काय होईल, हें सहज जाणतां येईल. इंग्लंडबाहेरच्या जगांतले दहापांच कोटी तरी मतलबी लोक मतदानास सिद्ध होतील. तेव्हा ती व्याख्या या वेळीं सोडून द्यावी लागते व मनुष्याचें व्याकरण त्याच्या रूपावरून ठरवावें लागतें. पण विशेष प्रसंगीं अनर्थ होऊं नये, म्हणून इंग्लिश राष्ट्राचा अभिमानी तो इंग्लिश, हा खरा अर्थहि ध्यानांत ठेवावा लागतो. मानवाच्या सर्वच व्यवहारांत हें धोरण संभाळावें लागतें. त्यावाचून गत्यंतरच नसतें. पण यामुळेच मत-भेदाला अवसर मिळून वाद निर्माण होतात; आणि त्यांतील बरेचसे बिनतोड असतात. पुढील उदाहरणें पहा. त्यावरून कांही कल्पना येईल :

'गतसालीं महाराष्ट्रांत पाऊस चांगला पडला,' हें वाक्य घेऊं. **गतसालीं** या शब्दाऐवजी **गुदस्ता** हा शब्द वापरला, तरी येथे चालण्यासारखे आहे. पण 'गुदस्ता' हें क्रियाविशेषण आहे. मग **गतसालीं** या शब्दाची जात कोणती ? दोन्ही शब्दांचें कार्य एकच आहे : काळ दाखविणें हें तें कार्य होय. दोहोंचाहि संबंध क्रियापदाशींच आहे. मग **गतसालीं** हें क्रियाविशेषण मानावयाचें काय ? आणि मग 'महाराष्ट्रांत' या शब्दाचें काय ? त्याने स्थळ दाखविलें आहे. मग तेंहि क्रियाविशेषण होईल. आणि मग अशीं अनेक नामें क्रियाविशेषणें होतील. — पण होतील काय, झालींच आहेत ! अखेरीस, मध्ये, दुपारीं, मध्यान्हीस, दिवसा-उजेडीं, थेंबें-थेंबें, अशीं अनेक नामें आज क्रियाविशेषणें म्हणूनच रूढ आहेत. त्याचप्रमाणे विषयीं, संगें, अर्थीं, योगें अशा विभक्तिप्रत्ययान्त अनेक नामांचीं शब्दयोगी अव्ययें म्हणूनच गणना होते. 'विषय' हें नाम आहे व

‘ विषयीं ’ ही त्याची सप्तमी आहे. आता ‘ विषयीं ’ हा शब्द जर अव्यय होय, तर ‘ महाराष्ट्रांत ’ याला अव्यय कां म्हणूं नये, असा प्रश्न येतो.

उभयान्वयी अव्ययें दोन वाक्यें जोडतात. पण हें कार्य जो, जितका, जेव्हा अशीं जीं संबंधी सर्वनामें, विशेषणें व क्रियाविशेषणें त्यांनीहि केलें जातें. पण त्यांना आपण उभयान्वयी अव्ययें म्हणत नाही. याची कारणमीमांसा करितांना मोरो केशव दामले म्हणतात की, सर्वनामें व विशेषणें हीं अव्ययें नाहीत, म्हणून त्यांनी उभयान्वय जरी केला, तरी तीं अव्ययें नव्हत. पण पुष्कळ अव्ययांनाहि विकार होतात (वरचा, खालचा मागाहून इत्यादि) तसेच यांनाहि होतात, असें समजून यांनाहि अव्ययें म्हणण्यास हरकत नाही. दामले म्हणतात, ‘ या शब्दांची वाक्यसंयोग ही प्रकृति नसून विकृति आहे. ’ पण हेंहि कारण समाधानकारक वाटत नाही. ‘ कारण ’, ‘ सबब ’ हीं उभयान्वयी अव्ययें पहा. हीं मूळचीं नामें आहेत; आणि त्यांची प्रकृतिच वस्तुदर्शन ही आहे. पण त्यांचा उपयोग उभयान्वयी अव्ययासारखा होतो, म्हणून सर्व व्याकरणकार त्या सदरांत त्यांची गणना करितात.

शब्दाच्या जाति किती मानाव्या, यासंबंधी तर फारच वाद आहेत. कोणी तीन जाति मानतात : प्रातिपदिकें, धातुशब्द व अव्ययें. आणि प्रातिपदिकांचे नामें, सर्वनामें व विशेषणें असे पोटभेद करतात. येथे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे की, संस्कृतांत प्रातिपदिकांत अव्ययांचाहि अंतर्भाव होतो. दादोबांनी आठ जाति मानिल्या आहेत; आणि ‘ विचारपूर्वक पाहतां आठ जाति मानणेंच युक्त ’, असें म्हटलें आहे. केवलप्रयोगी अव्ययांचा वाक्यपृथक्करणांत कांही उपयोग नाही, म्हणून शब्दाची ती निराळी जात मानूं नये, सात जाति मानाव्या, असें आगरकर म्हणतात. अव्ययांचे चार भेद करणें अशास्त्रीय आहे; तसे संस्कृतांत नाहीत; पण ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांत राजवाड्यांनी ते दिले आहेत. कां ? लौकिकार्थास, उपयुक्ततेस व रूढीस मान देणें त्यांना योग्य वाटलें म्हणून. (पृ. १३५ : अवतरण – शास्त्रीय व्याकरण – दामले. पृ. ८३.)

व्याकरणांतील अनेक वादग्रस्त प्रश्नांसंबंधी वैयाकरणांतच असे तीव्र मतभेद आहेत. प्रत्येकाने आपल्या मताच्या समर्थनार्थ कारणें दिलीं आहेत. पण निर्णय देतांना बहुतेकांनी ‘ असें मानावें ’, ‘ असें मानणें युक्त ’ अशी भाषा वापरली आहे. याचें मर्म अभ्यासकांनी ध्यानांत घ्यावें. इतर जड शास्त्रांत प्रमाणे, पुरावे दिल्यानंतर ‘ असें आहे, ’ असा निर्णय देतात. ‘ असें मानावें, ’ असें म्हणत नाहीत. म्हणजे अखेरीस हा बराचसा प्रश्न ‘ मानण्याचा ’ आहे. आणखी एक विचार अभ्यासकांनी ध्यानांत घ्यावा. सर्वांची समर्थनें एकतत्त्वानुसारी नाहीत; अगदी भिन्नभिन्न अशीं आहेत. कोणी लौकिकार्थाला, रूढीला, उपयुक्ततेला महत्त्व देतात; कोणी शब्दाच्या मूळ प्रकृतीचा विचार करितात; कोणी रूपावरून व कोणी अर्थावरून म्हणजे कार्यावरून व्याकरण ठरवितात, हें वर आलेंच आहे. या सर्वांवरून असें दिसून येतें की, केवळ शास्त्र, केवळ तर्क एवढेंच घेऊन व्याकरणांत

चालणार नाही. किंवा रूप किंवा अर्थ यांपैकी एकाच तत्त्वाचा आग्रह धरून भागणार नाही; इतकेंच नव्हे, तर कोणत्याहि एका तत्त्वाचा आग्रह धरितां येणार नाही. निर्णय करतांना ' असें मानावें, ' या धोरणाचा शेवटीं अवलंब करावाच लागतो. तडजोड, देवाण-घेवाण ही अपरिहार्य आहे. कारण भाषा ही नित्य चल आहे. प्रत्येक लेखक आपापल्या लहरीप्रमाणे ती वाकवितो, आणि व्याकरणकार प्रयोगशरण असतो. हिंदु कोणास म्हणावें, जर्मन म्हणजे नेमका कोण, आक्रमण म्हणजे काय, युद्ध म्हणजे काय, शांतता म्हणजे काय, धर्म म्हणजे काय, मोक्ष म्हणजे काय, हें शेकडों वर्षांच्या चर्चेनंतरहि अजून ठरलेलें नाही. चीनने भारतावर आक्रमण केलें आहे. भारत त्याला तोंड देत आहे. पण अजून हीं दोन राष्ट्रें युध्यमान आहेत, असें मात्र नाही. बहुमताचा कौल म्हणजे काय, हें जगांत कधी कोणाला निश्चित सांगतां येईल, असें वाटत नाही. हिटलर, स्टॅलिन यांच्या सत्तांमागे बहुमताचा कौल होताच. चर्चिल, द गॉल, अॅडेनॉर, एरहार्ड, नेहरू, केनेडी यांच्याहिमागे होता. गोव्याला जो सत्ताधारी पक्ष आहे, त्याच्यामागे बहुमताचा कौल नाही, असें पंडित नेहरूंचें म्हणणें आहे. आणि त्या दृष्टीने पाहतां भारतांत काँग्रेसला हा कौल कधीच मिळालेला नाही, असें प्रतिपक्षी म्हणतात. या सगळ्यांचें कारण असें की, हा मानवी व्यवहार आहे. प्रत्येक मानव, प्रत्येक मानवसमाज हा भिन्नप्रकृति आहे. ती प्रकृतिहि सारखी बदलत असते. आणि तिच्यांत होणारा हा बदल कार्यकारणांनी निश्चित करतां येण्यापलीकडचा आहे. हें सर्व ध्यानांत घेऊनच मानवसंबंधी शास्त्रांकडे पहावें लागतें. व्याकरणशास्त्रहि याला अपवाद नाही.

या संबंधांत मोरो केशव दामले यांनी ' अव्ययांचें विकरण ' या विषयाचें विवेचन करितांना प्रगट केलेले विचार फार उद्बोधक आहेत. ते येथे देतों. म्हणजे प्रा. मंगरूळकर यांनी जीं मतें मांडलीं आहेत, त्यांचा परामर्श करण्यास अवश्य ती पूर्वतयारी पुरी होईल. ते म्हणतात, 'भाषेस बहुधा कोणताच नियम सर्वांशीं लागू पडत नाही. यामुळे भाषेसंबंधाचें कोणतेंहि शास्त्र घ्या. त्यांतील नियमास अपवाद आणि प्रत्यपवाद हे जागोजाग आढळतात. यामुळे भाषाशास्त्रकारांनी मुख्य नियमांवरच जोर देऊन अपवादास नियमांचें बंधन घालण्यास लागणें चुकीचें होय....... ' प्रयोगशरणा वैयाकरणाः ' या म्हणींतहि प्रयोग-शब्दामागे शिष्ट हा शब्द अध्याहृत समजला पाहिजे. आता शिष्टप्रचार तरी कसा ठरवावयाचा, हा एक बिकट प्रश्न आहे. त्याचें निःसंशय व पूर्णपणें समाधानकारक उत्तर देतां येत नाही. म्हणूनच वरील मर्यादा जराशी अव्यक्त व अंधूक आहे, असें म्हटलें पाहिजे...'

व्याकरणशास्त्रांतली ही विचारसरणी ध्यानांत घेऊन आता आपल्याला प्रा. मंगरूळकरांनी जे रूढभिन्न विचार मांडले आहेत, त्यांचा परामर्श करावयाचा आहे. हा परामर्श करितांना वरील विचारसरणीने त्यांनी मांडिलेल्या मतांहून अन्य कोणाचीं मतें तितक्याच समर्थपणें मांडितां येतील हें दाखवावें, एवढाच हेतु आहे. त्यांच्या मतांवर टीका करावी किंवा आक्षेप घ्यावा, असें चुकूनदेखील मनांत नाही. तो माझा अधिकार

नाही. व्याकरणाचा पुनर्विचार होत आहे, तर तो शक्य तो सर्व बाजूंनी, सांगोपांग व्हावा, एवढ्याच हेतूने हे विचार मांडण्यास मी प्रवृत्त झालों आहें. त्यापेक्षाहि प्रबळ विचार असा की, व्याकरणशास्त्र हें त्यांतील शुद्धलेखन या विषयाइतकें केवळ संकेतावर उभारलेलें नसलें, तरी त्यांत ' असें मानावें, ' याचा अवलंब फार करावा लागतो. शुद्धलेखन ही केवळ संकेताची बाब असल्यामुळे तिचा निर्णय बहुमताने जो होईल, तो मान्य करावा असें मला निश्चित वाटतें. त्यांत तत्त्वाचा प्रश्न जवळजवळ नाहीच. व्याकरणाचें तसें नसलें, तरी मूळ द्रव्यांतच इतकी चंचलता आहे की, तर्काचा वा शास्त्रीयतेचा फारसा आग्रह येथेहि न धरतां बहुसंख्य लोक एका बाजूस आणण्यासाठी बरीचशी तडजोड करावी लागली तरी करावी, असें माझें मत झालें आहे. आणि यामुळेच त्या दृष्टीने पुढील विवेचन मी करीत आहें.

प्रथम विभक्तिप्रकरण घेऊं. प्रा. मंगरूळकरांच्या मतें विभक्तिनिश्चय करितांना अर्थ हा निर्णायक ठरवूं नये. म्हणजे विभक्ति या प्रत्ययावरून ठरवाव्या. स्थिर अशा ध्वनीकडे (प्रत्ययाकडे) वैयाकरणाने धाव घ्यावी, अर्थाच्या नादीं लागूं नये, हें योग्य होय, असें ते म्हणतात. अलीकडे हेंच मत बहुतेक वैयाकरणांनी मान्य केलेलें आहे. पण तसें करतांना किती तडजोड करावी लागते, किती ढिलेपणा स्वीकारावा लागतो, तें पहा. पहिली गोष्ट अशी की, प्रत्ययावरून विभक्ति ठरवावयाची, तर प्रथमा विभक्ति मराठींतून गाळून टाकावी लागेल. कारण प्रथमेला प्रत्ययच नाहीत. विभक्ति प्रत्ययावरून मानाव्या, असें आग्रहाने सांगणाऱ्या व्याकरणकारांनाहि प्रथमेला प्रत्यय नाहीत, हें मान्य आहे. तरी ते प्रथमा मानितात. प्रा. मंगरूळकरांनीहि प्रथमेला एकवचनांत प्रत्यय नाहीत, हें मान्य केलें आहे. पण एकविधतेसाठी दोन्ही वचनीं प्रथमेला ' ० ' प्रत्यय **मानावा**, असें म्हटलें आहे. म्हणजे केवढी तडजोड त्यांना व सर्वांनाच स्वीकारावी लागत आहे, तें पहा. षष्ठी विभक्ति मानिली पाहिजे, असें आग्रहाने सांगून दामले यांनी त्यासाठी दहा-बारा कारणें दिलीं आहेत. मंगरूळकरांनी तीं सर्व खोडून काढून षष्ठी मानूं नये, असें म्हटलें आहे. षष्ठीचीं रूपें हीं विशेषणाचें कार्य करितात, षष्ठीचे प्रत्यय हे चरमप्रत्यय नाहीत, हें षष्ठीच्या ठायीं वैलक्षण्य आहे, हें सर्वांना मान्य आहे. पण तेवढा अपवाद समजावा, असें इतर वैयाकरण म्हणतात. पण मंगरूळकरांना हें मान्य नाही. त्यांच्या मतें मराठीने विभक्तीच्या स्वरूपाच्या ठिकाणीं कांही एकविधता सांभाळली आहे, ती षष्ठी विभक्ति मानिल्याने बिचलते. म्हणून षष्ठी विभक्ति मानूं नये. पण त्यांनी स्वतःच प्रथमा मानली आहे, (प्रत्ययाभाव हें तिच्या ठायीं वैलक्षण्य आहे,) आणि संबोधनहि विभक्ति मानली आहे. तिच्या ठायीं वैलक्षण्य आहे, हें त्यांना मान्य आहे. आणि शेवटीं निर्णय देतांना दोन पर्याय देऊन दुसरा पर्याय स्वीकारण्याकडे **माझा कल आहे**, असें त्यांनी म्हटलें आहे. आणखी एक विचार असा की, प्रत्ययावरून विभक्ति मानावयाच्या तर ' स, ला, तें ' या तीन प्रत्ययांसाठी तीन विभक्ति मानाव्या लागतील. कारण ते प्रत्यय भिन्न आहेत. ते प्रत्यय लागून एकाच प्रकारचा अर्थबोध होतो, म्हणून तीन प्रत्ययांसाठी तीन विभक्ति न

मानितां सर्वांची एकच विभक्ति मानावी, असें मंगरूळकर म्हणतात. तें सयुक्तिकच आहे. पण त्यामुळे प्रत्ययावरून विभक्ति ठरवावी, हें तत्त्व तेवढ्यापुरतें लटकें पडतें. या सर्वांवरून असें म्हणावेंसें वाटतें की, ' मानावें ', ' कल पहावा ', ' तडजोड स्वीकारावी ', हें जर पदोपदीं करावें लागतें, तर आहे या आठ विभक्तींच्या रूढ व्यवस्थेस धक्का लावण्याने लाभ काय ? प्रथमा व संबोधन या विभक्ति ज्यांनी मानिल्या त्यांना एखाद्या तत्त्वाचा विशेष आग्रह धरून इतर विभक्त्या गाळून टाकाव्या, असें म्हणण्याचा अधिकार नाही, असें मला वाटतें. द्वितीया व चतुर्थी यांचे प्रत्यय सारखे असले, तरी ' संप्रदान ' हा स्वतंत्र अर्थ चतुर्थीसाठी राखून ठेवून तिचें स्थान कायम करितां येईल. भिन्न प्रत्यय असूनहि अर्थ एक म्हणून विभक्ति एक, असें आपण मान्य करितों. मग प्रत्यय तेच पण अर्थ भिन्न, म्हणून विभक्ति भिन्न, असें मानण्यास हरकत असूं नये. पूर्वीच्या वैयाकरणांनी रूढविलेली व समाजांत सर्वमान्य झालेली परंपरा सबळ कारण असल्यावाचून मोडूं नये, असें मला वाटतें. राजवाडे यांनीसुद्धा अव्ययांचे चार भेद अशास्त्रीय असले, तरी ते मानिले, हें आपण वर पाहिलेंच आहे. हेंच धोरण मला योग्य वाटतें. कारण मुळांत आपलें वस्तुद्रव्य चंचल आहे. आणि परंपरा मानण्याने ऐकमत्य होण्याचा संभव जास्त आहे. शास्त्राचा आग्रह कांटेकोरपणें धरतां आला असता, तर मग वरचें सर्व बोलणें मीं मागे घेतलें असतें. पण तसें शक्य नाही. ' मानावें'चा आश्रय अनेक ठिकाणीं करावा लागतो. म्हणून रूढ व्यवस्था बिघडवूं नये, असें वाटतें. पंचमी, सप्तमी यांविषयी प्रा. मंगरूळकरांनी मांडलेल्या मतांविषयी याच धोरणाने विचार करावा, असें मला वाटतें.

आता विशेषणाचा विचार करूं. विशेषणाचा एक फार मोठा गट अव्यय या सदरांत घालावा लागेल, हें मंगरूळकरांचें म्हणणें सर्वमान्य होईल, असें वाटतें. कारण मराठींत बहुतेक विशेषणांना विशेष्यांप्रमाणे लिंगवचनविभक्ति हे विकार होतच नाहीत. त्यामुळे त्यांना अव्यय मानणें हें युक्तच आहे. पण कांही विशेषणांना हे विकार होतात, व अनेक अव्ययांनाहि ते विकार होतात. म्हणून शेवटी केव्हातरी सव्यय व अव्यय हा भेदच रद्द करावा लागेल की काय, असें वाटतें.

विशेषणासंबंधीचा दुसरा एक महत्त्वाचा विचार मंगरूळकरांनी मांडिला आहे. ' शहाण्याला शब्दाचा मार ', ' जातीच्या सुंदराला कांहीहि शोभसें ', ' जाग्याला जागे कसें करणार ? ' इत्यादि वाक्यांत ' शहाणा ', ' सुंदर ', ' जागा ' हीं त्यांच्या मतें नामें होत. ' मूळ हीं विशेषणें, येथे त्यांचा नामांसारखा उपयोग आहे, ' असें म्हणणें त्यांना युक्त वाटत नाही.

येथे एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो. भाषेंत शब्दांचें अभिसरण नित्य चालू असतें. म्हणजे एका जातीचे शब्द इतर जातींत जात असतात, त्या जातींचे या जातींत येत असतात. म्हणजे त्याचे तसे उपयोग लोक करीत असतात. कारण, सबब, मध्ये, सकाळीं इ. नामांचीं अव्ययें होतात, व वर, खाली इ. अव्ययांना विभक्तिप्रत्यय लागून

त्यांचीं नामें होत असतात. माझ्या मतें जेथे जातिपालट पूर्ण झाला, तेथे त्या शब्दाची गणना अन्य जातींत निश्चितपणें करावी; पण जेथे हा पालट पूर्ण नसेल, तेथे पहिली जात सांगून, या जागीं उपयोग कसा आहे, तें सांगावें. स्पष्टीकरणासाठी कांही उदाहरणें घेऊं. नायक, नर्तक, गायक हे शब्द पहा; आणि तसलेच घातक, बाधक, हिंसक हे शब्द पहा. सर्व शब्द ' अक ' या प्रत्ययानें साधलेले आहेत. त्यांतील पहिले तीन हीं नामें आहेत, व दुसरे तीन हीं विशेषणें आहेत. असें कां व्हावें ? हें सर्व लोकव्यवहारावर अवलंबून आहे. ' त्या घातक्याचें तोंड पाहूं नको, ' यांतल्याप्रमाणे घातक शब्द नामासारखा वापरतां येईल. पण अजून त्याची जात नायक शब्दाप्रमाणे पूर्ण पालटलेली नाही. ' घातक ' असें म्हणतांच, ' कोण घातक ? ' असें मनांत येऊन त्याच्या विशेष्याची अपेक्षा निर्माण होते. ' नायक ', ' गायक ', ' लेखक ' असें म्हणतांच तशी अपेक्षा निर्माण होत नाही. त्या-त्या वस्तुच पुढे उभ्या राहतात. नंदन, रमण म्हणतांच पुत्र, पति अशा वस्तु पुढे येतात. आनंद देणारा, रमविणारा असा अर्थ मनांत येऊन तो कोण, म्हणजे त्याचें विशेष्य काय, अशी अपेक्षा मनांत येत नाही. शहाणा, सुंदर, जागा हे शब्द उच्चारतांच अजून विशेष्याची अपेक्षा निर्माण होते. म्हणून त्यांना नामें न म्हणतां विशेषणें म्हणावें व नामासारखा उपयोग केला आहे, असें सांगावें. असें करण्यापासून शब्दांच्या अभिसरणाची जी भाषेंत प्रक्रिया चालू असते, तिला आपण मान्यता दिल्यासारखें होईल. नाहीतर ' वरचा ', ' खालचा ', ' इतक्यांत ', ' तेव्हापासून ' यांत ' वर ', ' खाली ', ' इतकें ', ' तेव्हा ' हीं सर्व नामें मानावीं लागतील. ' एक महिना पाऊस पडला ', ' तो दोन मैल चालला ' या वाक्यांत महिना, मैल हीं क्रियाविशेषणें मानावीं लागतील. ' ॲज (As) ' या शब्दाचें विवरण करितांना इंग्रजी कोशांत हें मुळांत क्रियाविशेषण असें सांगतात. आणि ' पासिंग इन्टु कन्जंक्शन ', ' समटाइम्स प्रेपोझिशन ' असें पुढे देतात. हीच पद्धत योग्य असें मला वाटतें, कारण भाषेंत अभिसरण नेहमीच चालू राहणार; आणि त्याची दखल घेणें अवश्य आहे. ' शहाणा ' हें नाम असें एकदम म्हणण्यांत ती घेतली जात नाही, असें वाटतें.

सर्वनामांचा विमर्श करितांना नामें व सर्वनामें यांना विभक्तिकार्य एकाच प्रकारचें होत असल्याकारणाने, आणि त्यांचें कार्य सदृश असल्याकारणाने, सर्वनामांचा स्वतंत्र असा वेगळा गट करण्याने लाभ नाही, असे प्रा. मंगरूळकर म्हणतात. पण नाम व सर्वनाम यांच्यांतील एक मूलभूत भेद येथे दुर्लक्षिला जातो, असें वाटतें. सर्वनामांना स्वतःचा अर्थ नाही. कोणत्याहि नामासाठी त्यांचा वापर होऊं शकतो. तसें नामाचें नाही. म्हणजे येथे मूलतःच नाम व सर्वनाम भिन्नजातीय आहेत. नाम हा वस्तूचा वाचक शब्द आहे; सर्वनाम तसा नाही. असें असतांना त्यांचें कार्य एक आहे, असें कसें म्हणतां येईल ? आणि मग केवळ विभक्तिकार्य एकाच प्रकारचें होत आहे, म्हणून सर्वनामांचा समावेश नामांमध्ये करणें युक्त होईलसें वाटत नाही.

आता शेवटीं प्रा. मंगरूळकर यांनी प्रमाणभाषेविषयी मांडिलेल्या विचारांचा परामर्श करून हें विवेचन संपवावयाचें आहे. प्रमाणभाषेविषयी मंगरूळकरांनी मांडिलेले विचार अतिशय उद्बोधक असे आहेत. बोलण्याचा व्यवहार हें भाषेचें सिद्ध स्वरूप आणि ग्रंथांतील तिचा लिखित आविष्कार हें तिचें साधित स्वरूप होय. म्हणजेच बोलण्यांतील भाषा ही उपजीव्य आणि लिखित भाषा ही उपजीवक, हा त्यांचा सिद्धान्त सर्वमान्यच आहे. बोलण्यांतल्या भाषेला महत्त्व असल्यामुळेच एक कालखंड संपला की व्याकरणाचा पुनर्विचार करावा लागतो. मराठींत पूर्वी जे स्वर मान्य केलेले नव्हते, ते आता करावयास पाहिजेत, याचें कारण एकच की, महाराष्ट्रीय लोकांच्या बोलण्यांत ते नवीन स्वर आता रूढ झालेले आहेत. विभक्ति आणि आख्यातें यांचा निर्णय प्रत्ययांवरून करावा, आणि त्या-त्या ठिकाणीं त्यांचा विवक्षित अर्थ सांगावा, अशी व्यवस्था तरी का करावी लागली ? ' उद्या मी मुंबईला येतों ', ' एक वर्षांत तुझे पैसे देऊन टाकतों ', ' एका मिनिटांत आलोंच, ' असे प्रयोग लोक करतात, म्हणून. ' येतों ', ' टाकतों ' हीं वर्तमानकाळीं रूपें होत. ' आलों ' हें भूतकाळीं होय. पण त्यांचा उपयोग भविष्यनिर्देश करण्यासाठी लोक करितात. म्हणून ते प्रयोग प्रमाण मानून व्याकरणांत त्यांची व्यवस्था केली पाहिजे. असें करावयाचें नसेल, तर व्याकरणाचा फेरविचार करण्याची आवश्यकताच राहणार नाही. एकदा दहापांच पंडितांनी जमून व्याकरण लिहून टाकावें, आणि सर्वांनी असेंच बोलावें, असा वटहुकूम काढावा, म्हणजे काम भागेल ! पण भाषेंत हें सर्वथा अशक्य व अयुक्त; असें केल्याने भाषाच खुरटून जाण्याचा संभव; म्हणून बोलण्याची भाषा हीच प्रमाण मानली पाहिजे, हें निर्विवाद होय.

बोलण्याची भाषा हीच प्रमाणभाषा हें मान्य केल्यावर कोणाच्या बोलण्यांतील भाषा प्रमाण मानावयाची असा प्रश्न येतो. त्यावर प्रा. मंगरूळकर म्हणतात की, विधिमंडळें, सरकारी कार्यालयें, विद्यापीठें, महाविद्यालयें, बाजारहाट, रेल्वे स्टेशन, रेडियो, सार्वजनिक कार्यालयें येथे बोलली जाणारी भाषा हीच प्रमाण भाषा होय. ही भाषा बहुमान्य आहे. महाराष्ट्रांत कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी इत्यादि भाषाभेद आहेत. पण त्यांना प्रमाणभाषा म्हणतां येणार नाही. कारण वरील भाषा जशी महाराष्ट्रांत सर्वत्र समजते, तशा त्या भाषा समजत नाहीत. आणि लोकव्यवहार हे तर भाषेचें प्रधान कार्य आहे. भाषेचा अवतारच त्यासाठी आहे. तेव्हा सर्व मराठी जनतेला समजेल, असें जें भाषेचे वर सांगितलेल्या अनेक ठिकाणीं बोललें जाणारें रूप त्यालाच प्रमाणभाषा म्हटलें पाहिजे, यांत शंका नाही.

प्रमाणभाषेविषयीचा यानंतरचा मुद्दा महत्त्वाचा आहे. तो म्हणजे या प्रमाण-भाषेचें जें व्याकरण लिहावयाचें, तें तिच्या सिद्ध स्वरूपाचें कीं साधित स्वरूपाचें ? म्हणजे व्यवहारांत बोलल्या जाणाऱ्या भाषेचें कीं लिखित, ग्रंथगत भाषेचें ? प्रा. मंगरूळकरांचा आग्रह असा दिसतो की, व्याकरण हें बोलण्यांतल्या भाषेचें लिहिलें

पाहिजे. ते म्हणतात की, ' आजपर्यंत मराठी भाषेचीं व्याकरणें जीं लिहिलीं, तीं सर्व प्रायः लिखित-मुद्रित भाषेचीं होतीं. बोलण्यांतल्या भाषेचें व्याकरण रचनेच्या दृष्टीने बव्हंशीं उपेक्षित राहिलें. तेव्हा या भाषेचें व्याकरण पाहणें हें योग्य होय. मराठीच्या व्याकरणाच्या पुनर्विचारांत हा मुद्दा पायाभूत म्हणावा लागेल '.

प्रा. मंगरूळकरांचा हा आग्रह कितपत सयुक्तिक आहे, याची मला जबर शंका आहे. बोलण्यांतल्या भाषेचें व्याकरण कधी कोणाला लिहितां येईल, हें मला शक्यच वाटत नाही. आणि कधी कोणीं महान् प्रयत्न करून तें लिहिलेंच, तर अनर्थालाच कारण होईल, असें वाटतें. विधिमंडळें, सरकारी कार्यालयें, न्यायालयें – बाजारहाट तर सोडूनच द्या, – येथेहि बोलली जाणारी मराठी भाषा आपण ऐकली, तर वाक्यांत कर्ता व क्रियापद असावा लागतात, त्यांचा कांही मेळ असावा लागतो, हा पहिला नियमच रद्द करावा लागेल!

निरनिराळ्या वक्त्यांनी सभेंत केलेल्या भाषणांतून पुढे उतारे देतों. ते वाचकांनी पहावे आणि सिद्ध भाषेचें व्याकरण लिहिणें कितपत शक्य आहे, तें ठरवावें. " डॉक्टर त्या बाबतींत फार दक्ष असतात. केव्हाहि रुग्णालयांत आले, तरी प्रत्येक खाटेजवळ जाऊन, प्रत्येकाची चौकशी करून, आज तुला कसें वाटतें, तुला भूक लागते कीं नाही, काल झोप लागली होती कीं नाही, अन् असें अगदी रोज, बारा महिने! एक दिवस-सुद्धा ते आळस करीत नाहीत. "

" डोंगरमाथ्यावर पाऊस जेव्हा धो धो पडायला लागतो, अन् सगळीकडे झरे वाहूं लागतात, अन् त्या वेळीं सगळीकडे काय शोभा दिसते, म्हणून सांगूं! "

" गीतारहस्यांत – आता गीतारहस्याचाच निर्देश कां, तर या शतकांतला तो सर्वांत श्रेष्ठ ग्रंथ आहे, त्याच्या तोडीचा दुसरा ग्रंथ नाही, – तेव्हा सांगायचं तात्पर्य काय, तर गीतारहस्याचा अभ्यास, म्हणजे त्यांत जो पहिला भाग आहे ना विवेचनाचा, तो म्हणतों आहें मी, प्रत्येकाने पन्नास वेळा वाचला पाहिजे. त्याशिवाय त्याच तें हेंच होणार नाही. "

प्रत्येक श्रोत्याने सभेंत व्याख्यानें ऐकतांना, चांगल्या सुशिक्षित, पढिक वक्त्यांची भाषणें ऐकतांना नीट लक्ष ठेविलें, तर वर दिलेल्या वाक्यांसारखीं शेकडों वाक्यें त्याला सापडतील. हीं वाक्यें अपवादभूत नाहीत. रेडियोवर पुढाऱ्यांचीं भाषणें ध्वनिक्षेपित केलीं जातात, तीं ऐकलीं, तर याविषयी शंकाच राहणार नाही.

या भाषेचें व्याकरण लिहावयाचें, तर प्रत्येक वक्त्याचें निराळें व्याकरण लिहावें लागेल; एवढेंच नव्हे, तर प्रत्येकाच्या भाषणाच्या निरनिराळ्या भागांचें निरनिराळें व्याकरण लिहावें लागेल. कारण प्रारंभींच्या वाक्यांत तो जी रचनापद्धति स्वीकारितो तीच पुढच्या भाषणांत राहते, असें नाही. आणि असें प्रत्येकाचें भिन्न व्याकरण आपण लिहूं लागलों, तर व्याकरण लिहिण्याचा मूळ उद्देशच नष्ट होईल. स्वतः प्रा. मंगरूळकरांनी

व्याकरणाचा हा पुनर्विचार करिताना बोलण्यांतल्या भाषेचें व्याकरण रचावयाचें, अशी प्रतिज्ञा केलेली आहे. पण त्यांनासुद्धा कांही ठिकाणीं तसें शक्य झालेलें नाही. मराठींत कांही क्रियापदांना केवळ वचनविकार होतात; लिंगविकार होत नाहीत; असें म्हणून 'आहे—आहेत' हें उदाहरण त्यांनी दिलें आहे. पण हें लिखित भाषेचें व्याकरण होय. 'ते आहेत व त्या आहेता, आहेती,' असे प्रयोग बोलण्याच्या भाषेंत वाटेल तितके सापडतात. आणि बाजारहाटांत तर निश्चितच सांपडतात. अनेक सुशिक्षितांच्या तोंडींहि हे प्रयोग आहेत. ते लोक लेखनांत अशी रचना करणार नाहीत. कोकणांतून पुण्या-मुंबईस येऊन राहिलेले लोक बोलतांना 'नानांनी **त्याला** लगेच **बोलावली**, नि स्वच्छ **सांगितली** की, हे काही इथे चालाचं नाही', 'वहिनींनी त्याला चहा करुन दिलन्, अन् आपण मुळीच घेतलन् नाही', अशी वाक्यें सर्रास बोलतात. पण लिहितांना मात्र चुकूनहि तसें लिहीत नाहीत.

तेव्हा बोलल्या जाणाऱ्या भाषेचें व्याकरण ही कल्पना शक्यतेच्या कोटींत येईल; असें वाटत नाही. म्हणून आजपर्यंत लिखित-मुद्रित भाषेचेंच व्याकरण लिहिलें गेलें, तेंच योग्य होतें, असें वाटतें. ही लिखित-मुद्रित भाषाहि कालपरत्वें पालटत जाते, हें खरें आहे. आणि ती, लोकव्यवहारांतील बोलण्याची भाषा पालटते, तिच्या अनुषंगानेच पालटते, हेंहि खरें आहे. म्हणूनच प्रत्येक कालखंडांतल्या या सिद्ध भाषेचा, वाग्व्यवहाराचा अभ्यास अत्यंत अवश्य आहे. पण हा अभ्यास करुन त्या कालखंडांतल्या भाषेचें व्याकरण जेव्हा आपण रचितों, त्या वेळीं वाग्व्यवहारांतील जे पालट लिखित भाषेंत रूढ होतील, त्यांचाच फक्त विचार करितां येईल, इतरांचा नाही. ज्ञानदेवांच्या वेळची लिखित भाषा समर्थांच्या वेळच्या लिखित भाषेहून निराळी होती, तशीच त्या वेळची वाग्व्यवहाराची भाषाहि समर्थांच्या वेळच्या वाग्व्यवहाराच्या भाषेपेक्षा निराळी होती. म्हणजे सिद्ध भाषा बदलली, की साधित बदलतेच. आणि या साधित भाषेचेंच व्याकरण लिहिणें योग्य व शक्य आहे. ही साधित भाषा म्हणजे थोर, मान्य अशा ग्रंथांतली भाषा होय. हिलाच शिष्टजनभाषा म्हणण्याची पद्धत आहे. हिच्याबद्दल लिहितांनाच दामले यांनी म्हटले आहे की, 'शिष्ट कोण, हें ठरविणें फार कठीण आहे. म्हणून ही मर्यादा अंधूक व अस्पष्ट आहे.' आता, या शिष्टजनांच्या भाषेचें व्याकरण लिहितांनाहि अपवाद आणि प्रत्यपवाद यांची नोंद करितांना व्याकरणकार हैराण होतो. मग वाग्व्यवहारभाषा आणि तीहि विधिमंडळें, सरकारी कार्यालयें, स्टेशनें, बाजारहाट येथली भाषा व्याकरणासाठी प्रमाण मानिली, तर काय होईल, याची कल्पनाच केलेली बरी. वर म्हटल्याप्रमाणे तें अशक्य कोटींतीलच कर्म आहे. तेव्हा व्याकरण रचण्याच्या दृष्टीने ग्रंथांतील भाषा, लिखित-मुद्रित भाषा हीच प्रमाणभाषा मानली पाहिजे. या भाषेंत सिद्ध भाषेचें, वाग्व्यवहाराचें प्रतिबिंब सारखें पडत असतेंच. म्हणून त्याची दखल घेऊन वारंवार व्याकरणरचना करीत राहिलें, की भाषा एकीकडे व व्याकरण दुसरीकडे असा अनवस्थाप्रसंग येणार नाही. शुद्धलेखनांत ज्याप्रमाणे उच्चारानुसारी लेखन ही कल्पना सोडून द्यावी लागते, त्याप्रमाणेच सिद्ध

भाषेला प्रमाण मानणें ही कल्पना व्याकरणांत सोडून द्यावी लागते. पण शिष्टजनांच्या उच्चारांत वेळोवेळीं होणारे फरक लक्षांत घेऊनच शुद्धलेखनाचे नियम पुनः-पुन्हा बदलावे लागतात, त्याप्रमाणे सिद्ध भाषा डोळ्यापुढे ठेवूनच, तींत होणारे बदल ध्यानीं घेऊनच लिखित-मुद्रित भाषेचें व्याकरण लिहिण्याचें धोरण अवलंबावें लागतें. सिद्ध भाषेला या दृष्टीने प्रमाणभाषा मानणें योग्य आहे. पण तिचेंच व्याकरण लिहावयाचें, या दृष्टीने तिला प्रमाणभाषा मानणें हें अशक्य व अनर्थावह होईल, असें वाटतें.

प्रा. मंगरूळकर यांनी व्याख्यानांच्या प्रारंभीं व शेवटीं आपली भूमिका अनाग्रही अभ्यासकाची आहे, असें प्रांजळपणें सांगितलें आहे. मराठीच्या व्याकरणाची पुनर्रचना करावी, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. तसें करितांना वास्तुकाराला कांही सूचना करावयाच्या असल्यास अवश्य कराव्या, अशी श्रोत्यांना त्यांनी सूचना केली आहे. तशा कांही सूचना करणारा एक श्रोता, हीच माझी भूमिका आहे. नवीन व्याकरणाची रचना करतांना या प्रस्तावनेंत मांडिलेल्या मतांचा आदर करावा, असें त्यांना वाटल्यास त्यांनी तीं विचारांत घ्यावीं; यापलीकडे माझा कसलाच आग्रह नाही. मराठीच्या व्याकरणाची पुनर्रचना करतांना बरीच चिकित्सा होणें अवश्य असें त्यांनाहि वाटत आहे. मलाहि त्या चिकित्सेचें महत्त्व मान्य आहे. म्हणून जरा विस्तार करून ही चिकित्सा मीं केली आहे. यापलीकडे माझा अधिकार कांही नाही. प्रा. मंगरूळकरांसारख्या व्याकरणशास्त्राचें मूलगामी संशोधन करणाऱ्या अभ्यासकाशीं चिकित्सा करावयास मिळाली, यांतच मला धन्यता वाटत आहे. त्यांचीं व्याख्यानें मीं ऐकलीं आहेत, आणि आता वाचलीं आहेत. त्यांवरून मराठीच्या परंपरेला साजेल, असा एक नवा वैयाकरण मराठीला मिळत आहे, – मिळाला आहे, असें मला निश्चित वाटतें. म्हणून व्याकरणरचनेचें हें दुर्घट कार्य त्यांनी शक्य तितक्या लवकर हातीं घेऊन तडीस न्यावें, अशी त्यांना विनंती करून ही प्रस्तावना संपवितों.

दिनांक : ८–८–६४
पुणें–२

पु. ग. सहस्रबुद्धे

पुणें विद्यापीठाच्या वतीने 'कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला' गुंफण्याच्या निमित्ताने १९६१–६२ या वर्षावधींत मीं जीं सहा व्याख्यानें दिलीं, तीं आता प्रकाशित होत आहेत. हीं व्याख्यानें वाचतां-वाचतां त्यांचें स्वरूप उलगडत जाणारें असल्यामुळे त्यांविषयी येथे अधिक कांही सांगण्याची आवश्यकता नाही. एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे की, आपल्या बोलण्यांतल्या मराठी भाषेचें स्वरूप जागरूकपणें समजून घेण्याचा आणि तें निर्धारित करण्याचा त्यांत अल्पस्वल्प प्रयत्न केला आहे. असें करितांना त्याच्याशीं संबद्ध असलेल्या अनेक प्रश्नांची अधिक चिकित्सा केली आहे, अनेकांचें नवीन रितीने पुनर्मंडन केलें आहे, तर कांही नव्यानेच उत्पन्न करून त्यांचें स्वरूप परीक्षिलें आहे. विषय जटिल, सूक्ष्म, कांही अंशीं नवीन आणि व्यापकहि असल्याने हीं सर्व व्याख्यानें साक्षात् वाचून दाखविलीं. मीं त्या वेळीं जो अंदाज घेतला, त्यावरून असें दिसलें की, विषय गुंतागुंतीचा होता, तरी श्रोत्यांना तो कंटाळवाणा तर झाला नाहीच, उलट वेधक वाटला.

मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार करितांना ज्या एका व्यक्तीचें मला विशेष बौद्धिक साहाय्य झालें, ती व्यक्ति म्हणजे सर परशुरामभाऊ महाविद्यालयांतील माझे स्नेही प्रा. कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर. या ग्रंथांतल्या विषयांची त्यांच्याशीं चर्चा-चिकित्सा करितांना विषयग्रहणामधली सूक्ष्मता, प्रमाणप्रमेयपुरःसर मंडन करण्याची पद्धति आणि मूलगामी शास्त्रपूत दृष्टि यांचा जो लाभ झाला, तो स्वतःच्या चिंतनाच्या कामीं मला उपयोगीं पडला. विचारांच्या यथावत् आणि रेखीव अभिव्यक्तीसाठी अशा

चर्चा-चिंतनांतून अनेक नवीन पारिभाषिक संज्ञा निर्माण झाल्या. रूढ संज्ञांनी हवा तो अर्थ कधीकधी येत असला, तरी त्याबरोबर नको तो अथवा अवांतर हि अर्थ आणि समज-अपसमज येत असल्याकारणानें नवीन संज्ञांचा उपयोग मला अनिवार्य वाटला. तथापि त्या संज्ञांचें मर्म लक्षांत येण्यास अडचण पडणार नाही. या कामीं प्रा. अर्जुनवाडकरांच्या झालेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणायित आहें.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी प्रस्तुत सर्व व्याख्यानें समक्ष ऐकून आणि मुद्रित रूपांत वाचून सविस्तर प्रस्तावना लिहिण्याचें मेहनतीचें काम आस्थेनें आणि प्रेमानें केलें. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. त्यांनी आपल्या प्रस्तावनेंत कित्येक मुद्द्यांवर माझ्या प्रतिपादनाविषयी मतभेद व्यक्त केला आहे, ही गोष्ट प्रस्तावना वाचतांनाच स्पष्ट होणारी आहे. याप्रमाणे प्रस्तावना आणि तिच्या पुढचा ग्रंथ यांमध्ये उघड-उघड विरोध आहे. परंतु त्यांचें साहचर्यानें प्रकटन ही गोष्ट, फारशी रूढीनुसार नसली तरी, चमत्कारिक खास नव्हे; कारण मतभेदाचें निरामय स्वातंत्र्य ही शास्त्रचर्चेची एक मूलभूत अट, किंबहुना प्रतिष्ठाच होय.

भाषेच्या घटनेचें स्वरूप पाहतांना लेखकानें जो दृष्टिकोण अवलंबिला असेल, त्यांत पूर्वापरविरोध, विसंगति अथवा मूलभूत न्यून कितपत आहे तें पाहणें हा एक भाग, आणि नवीन अथवा वेगळ्या दृष्टिकोणानें भाषेच्या घडणीचें तें स्वरूप तपासणें हा दुसरा भाग यांतली कोणती पद्धति अवलंबून डॉ. सहस्रबुद्धे यांनी हे मतभेद मांडिले आहेत, त्याची परीक्षा करणें, तसेंच मतभेदांच्या स्थळीं दोन्ही बाजूंचीं गृहीतें, प्रमाणें आणि निष्कर्ष यांची सयुक्तिक जोखण करून तत्त्वनिर्णय करणें हें काम मराठीचें व्याकरण आणि भाषा शास्त्र यांच्या चिकित्सक अभ्यासकांनी स्वतंत्रपणानें करावयाचें आहे; तें काम या ठिकाणीं आणि मीं करणें हें औचित्यावह होणार नाही. व्याकरणाची रचना हा बऱ्याच अंशांनी एक बुद्धिबळाचा डाव आहे. अशा प्रकारच्या कोणत्याहि डावामध्ये कांही खडाकांटा, थोडें न्यूनाधिक्य असणें शक्य आहे. शिवाय, बोलण्यांत असलेल्या कोणत्याहि जिवंत भाषेचें स्वरूप रेखून काढितांना व्यक्त होणारे व्याकरण-कोशादि प्रयत्न हे कधी आमूलाग्र परिपूर्ण अथवा सर्वांगांनी परिसमाप्त असूं शकत नाहीत. कारण अशा भाषेंत सतत नवनवीन रचना, नवनवीन शब्द इत्यादि अनेक वाटांनी झिरपत असतात. त्या सर्वांना एकवटपणानें एकाच वेळीं कवेंत पकडणें हें पाऱ्याला चिमटींत धरण्याप्रमाणे असतें. परंतु असें असलें, तरी शास्त्रमार्गांनी आणि कांही युक्तीनें जसें पाऱ्यालाहि बंदिस्त करून उपयोगास आणितां येतें, तशी भाषेचीहि घडण चिकित्सेनें, विश्लेषणानें, युक्तिवादानें सिद्ध करितां येते. तशी ती कितपत सिद्ध केली, हें पाहणें आवश्यक होय. या आणि अशा प्रकारच्या अन्य प्रयत्नांकडे मी या दृष्टीनें पाहतों.

प्रस्तुत व्याख्यानें समाप्त झाल्यावर डॉ. वासुदेव दामोदर गोखले यांनी कांही शंका उपस्थित करून जी चालना दिली, आणि प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर यांनी मला जें प्रेमपूर्वक उत्तेजन दिलें, त्यांबद्दल त्या उभयतांचा मी कृतज्ञतापूर्वक निर्देश करितों.

प्रस्तुत ग्रंथांतील प्रत्येक व्याख्यानाच्या आरंभीं सविस्तर अशी विषयक्रमणी दिलेली आहे. हेतु हा की, त्यांत कोणकोणत्या पोटविषयांचा विमर्श केलेला आहे, हें कळावें. यांव्यतिरिक्त अन्य तपशिलाचा भाग पाहणें सोयीचें व्हावें, म्हणून श्री. विघ्नहरि देव यांनी सिद्ध केलेली सूचीहि अखेरीस जोडली आहे.

छपाईचें किचकट काम 'आर्यभूषण मुद्रणालया'ने निरलसतेने केलें, याबद्दल त्याचे मुद्रक आणि अन्य कार्यकर्ते यांचा मी आभारी आहें.

'पामीर'
२०५७ सदाशिव, पुणें २.
दिनांक : २२-८-१९६४
नारळी पौर्णिमा

अरविंद मंगरूळकर

पुणें विद्यापीठ

न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमाला

प्रस्तुत पुस्तकांत संगृहीत केलेलीं सर्व व्याख्यानें पुणें येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयांत पुढील दिनांकांस झालीं :

पहिलें व्याख्यान : रविवार, दि. १५-१०-१९६१

अध्यक्ष : पुणें विद्यापीठाचे कुलगुरु महामहोपाध्याय
दत्तो वामन पोतदार

दुसरें व्याख्यान : शनिवार, दि. ३-३-१९६२
तिसरें व्याख्यान : रविवार, दि. ४-३-१९६२
चौथें व्याख्यान : शुक्रवार, दि. २९-६-१९६२
पांचवें व्याख्यान : शनिवार, दि. ३०-६-१९६२
सहावें व्याख्यान : रविवार, दि. १-७-१९६२

अध्यक्ष : डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे

क्र म णी

पहिलें

व्याख्यान

व्याकरणशास्त्राचा विषय : व्याप आणि मर्यादा

पहिलें व्याख्यान

व्याकरणशास्त्राचा विषय : व्याप आणि मर्यादा

१. भाषा आणि व्याकरण

मराठीच्या व्याकरणावरील इंग्रजी आणि संस्कृत यांच्या व्याकरणांचा प्रभाव. आधी भाषा कीं आधी व्याकरण? भाषेमध्ये अंगभूत असलेली नियमव्यवस्था. या नियमव्यवस्थेची अभिव्यक्ति. 'भाषा पूर्वकालीन, व्याकरण उत्तरकालीन,' हें गृहीत दूषणीय. भाषा आणि व्याकरण हीं परस्परसंपृक्त, समव्याप्त. लोकजीवन : भाषा : व्याकरण.

२. भाषेचा कालिक भेद

३. भाषेचा दैशिक भेद

सामाजिक समस्या. भाषाभेदांतील गौणप्रधानभाव अकिंचित्कर. भाषाभेदांतील उपजीव्य-उपजीवकभाव निरर्थक.

४. भाषाभेदाचे स्तर, वर्तुळें

दैशिक भाषाभेद आणि भाषेचे स्तरभेद : उदाहरणें. स्तरभेदविषयक उपपत्ति. या विविध भेदांचे संमिश्र परिणाम. या विविध भेदांचे व्याकरणबंध : उदाहरणें. समाजगटांच्या स्तरभेदांचीं व्याकरणें. कांही अपसमज, आणि अस्वीकार्य गृहीत. 'शुद्धाशुद्धविवेका'चा अर्थ. व्याकरणाच्या क्षेत्राच्या सीमा.

५. ध्वनिविकार

ध्वनिविकारजन्य अर्थभेद आणि अर्थच्छटा : उदाहरणें. ध्वनिविकृतीच्या संबंधानें व्याकरणाची भूमिका. 'हेतुसंशोधनाचा गुप्तपोलीस'. ध्वनिविकाराचें न्याय्य क्षेत्र.

६. गद्यपद्यविमर्श

गद्यपद्यविवेक. पद्याचें स्वरूप. शिलीभूत (fossilised) प्रयोग : उदाहरणें. गद्यामध्ये येणाऱ्या म्हणी. लिखित अथवा मुद्रित गद्य आणि दैनंदिन व्यवहारांतील भाषा.

श्री॰ कुलगुरुमहाशय आणि विद्वज्जन हो,

पुणें विद्यापीठाच्या वतीने प्रतिवर्षी 'कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यान-माला' होत असते. प्रस्तुत व्याख्यानमालेंत इतिहास, वाङ्मय, भाषाशास्त्र, व्याकरण अथवा मराठी भाषा वा मराठ्यांचा इतिहास यांविषयींचें संशोधन यांवर व्याख्यानपुष्पें गुंफण्याची योजना आहे; आणि दिलेल्या विषयावर प्रतिवर्षी निदान सहा व्याख्यानें व्हावयाचीं असतात. हीं व्याख्यानें विद्यापीठाच्या सोयीने आणि निर्णयानुसार यथावकाश प्रकाशितहि होतात. यंदा 'मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार' या विषयावर केळकर स्मारक व्याख्यानमाला गुंफण्यासाठी पुणें विद्यापीठाने माझी निवड केली आहे; आणि व्याख्यानमालेच्या योजनेनुसार मीं सहा व्याख्यानें देण्याचें योजिलें आहे. परंतु त्यांतलें फक्त पहिलेंच व्याख्यान मी आज देणार आहें; उरलेलीं पांच व्याख्यानें मी कालांतराने देणार आहें. पुणें विद्यापीठाने या कामीं माझी जी निवड केली, तीबद्दल प्रथमतः विद्यापीठाचे मी मनःपूर्वक आभार मानितों. तसेंच, ज्या पुण्यश्लोक केळकरांच्या स्मरणार्थ प्रस्तुत व्याख्यानमाला अस्तित्वांत आली आहे, त्यांच्या स्मृतीला आणि त्यांच्या विद्याविषयक आणि वाङ्मयविषयक उपासनेला अभिवादन करून मी विषयाचा उपन्यास करितों.

१. भाषा आणि व्याकरण

प्रस्तुत प्रयत्नाचा हेतु

या व्याख्यानमालेच्या द्वारा मराठीच्या व्याकरणाचें समग्र पुनर्मंडन करण्याचा हेतु नाही, हें प्रथम स्पष्ट केलें पाहिजे. मराठीच्या व्याकरणशास्त्रांच्या रचनांचा आढावा घेतला असतां आपाततः असें दिसतें की, आजपर्यंतच्या कांही थोड्या व्याकरणांवर अल्प प्रमाणाने संस्कृताच्या व्याकरणाची छाप आहे; तर उरलेल्या जवळजवळ सर्व व्याकरणांवर इंग्रजी भाषेच्या व्याकरणरचनेची गाढ छाया पडलेली आहे. या बाबतींतील प्रमाण पाहण्यासाठी बऱ्याच तपशिलाची आणि त्या तपशिलाच्या पृथक्करणाची आवश्यकता आहे. असें पृथक्करण केल्यानंतर संस्कृताच्या आणि इंग्रजीच्या व्याकरणांचा वाटा किती, त्याचें यथावत् चित्र उमटेल. मराठी ही एक प्राकृतोद्भव भाषा आहे. अर्थात् तिचें व्याकरण संस्कृत अथवा इंग्रजी या भाषांमधील व्याकरणकल्पनांपासून योग्य त्या प्रमाणाने निर्मुक्त असावें, अशी अपेक्षा वाजवी होय. मराठी भाषेचे जर कांही खास असे प्रश्न असले, तर ते त्या भाषेच्या व्याकरणाने स्वतंत्रपणें सोडवावे, संस्कृताच्या किंवा इंग्रजीच्या व्याकरणाच्या चौकटींत ते अलेंबलें बसवून दाखविण्याने लाभ नाही. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वी मराठीच्या व्याकरणाचें निबंधन जवळजवळ झालेंच नाही. मराठी भाषेचा इतिहास दीर्घ आणि संपन्न आहे; परंतु त्यांत मराठीच्या व्याकरणग्रंथांचा आढळ प्रायः होऊं नये, हें आश्चर्य होय. त्याचें कारण कांही असो; एवढें खरें की, एकोणिसाव्या शतकामध्ये इंग्रजांचा आणि आपला घनिष्ठ संबंध आल्यानंतर मराठीच्या व्याकरणांच्या रचनेचें जणू एक नवयुगच प्रकटलें; आणि मराठी भाषेचीं पुष्कळ व्याकरणें निर्माण झालीं. त्यांतल्या अनेक व्याकरणांवर इंग्रजीच्या व्याकरणकल्पनांची जी गाढ छाप आढळून येते, तिला कांही अंशीं राजकीय परिस्थितिहि कारणीभूत होती. त्यामुळे मराठीच्या व्याकरणाची रचना ही थोडी संस्कृत आणि बव्हंशीं इंग्रजी या भाषांच्या व्याकरणरचनांनी मर्यादित झालेली आहे. साधा वर्णमालेचा प्रश्न घेतला, तर मराठीच्या बहुतेक व्याकरणग्रंथांत संस्कृत भाषेमधील वर्णमाला जशीच्या-तशी घेतलेली दिसते. आता, या वर्णमालेंतील वर्ण हे तत्कालीन अथवा प्रचलित मराठी भाषेंत आहेत कीं नाहीत, ती वर्णमाला जीवर आधारिलेली होती ती भाषा कोणती, त्या वर्णमालेच्या रचनेचीं मूलतत्त्वें कोणतीं, कालमानानुसार भाषा जर बदलत असेल, तर बदलत्या भाषेचें प्रतिबिंब वर्णमालेमध्ये असावें कीं नसावें, इत्यादि प्रश्नांचा विचार न करितां ती वर्णमाला जशीच्या-तशी मराठी भाषेला उपपन्न होते, असें मानणें हें युक्तिवादाला धरून नाही. त्यामुळे आज रूढ असलेली आणि शाळांमधून शिकविण्यांत येणारी मराठीची वर्णमाला ही युक्तिहीन

आणि अघळपघळ झालेली आहे. कांही बाबतींत ती ढगळ आहे, तर ज्यांची नोंद होणें आवश्यक आहे, अशा वर्णांची नोंद तिनें केलेली नाही, त्यामुळे ती अपुरी आहे. अशा प्रकारें ती द्विधा दूषणीय आहे. वर्णमालेच्या या प्रश्नाप्रमाणे इतरहि अनेक प्रश्न मराठीच्या व्याकरणांत आहेत. त्यांची चिकित्सा होणें,— आणि ती वारंवार होणें,— हें अगत्याचें आहे. अशा चिकित्सेनें अथवा मंथनानें विशिष्ट विषयाबद्दलची जागृति जशी टिकून राहते, तसा कधी-कधी नवा अर्थहि प्रतीत होऊं लागतो. प्रस्तुत व्याख्यान-मालेच्या द्वारा या आणि अशासारख्या कांही प्रश्नांची चर्चा करण्याचें योजिलें आहे. या चर्चेने त्या-त्या प्रश्नांची समग्र उकल होईल कीं नाही, तें सांगवत नाही; निष्कर्ष काढण्याचें कार्य तर मी बव्हंशीं आपणांवरच सोपविणार आहें. मीं नम्रतेने करण्याचें योजिलें आहे तें एवढेंच,— मराठीच्या व्याकरणांतल्या कांही प्रचलित प्रश्नांची चर्चाचिकित्सा. ही चर्चाचिकित्सा करितांना आजवर होऊन गेलेल्या मोठमोठ्या वैयाकरणांच्या विचारांवर आणि त्यांच्या सूक्ष्मदर्शी चिकित्सेवरच मी उभा आहें, हें मी विसरूं शकत नाहीं. म्हणून पूर्ववैयाकरणांच्या या अथवा त्या कल्पनेचा त्याग करावा, असें जरी मीं क्वचित् ध्वनित केलें, अथवा क्वचित् साक्षात् सांगितलें, तरी त्यांच्या त्या कल्पनांप्रमाणेच माझेहि विचार अथवा तर्कवाद तसेच परीक्षणीय आहेत, आणि परीक्षणानंतर त्यांचाहि यथासंभव त्याग अथवा ग्रहण करणें योग्य होणार, याची मला जाणीव आहे.

भा षा - व्या क र ण - सं बं ध

'आधी भाषा, नंतर व्याकरण,' असें विधान करून भाषा-व्याकरणांचें पार्वापर्य कधी-कधी सांगतात. अर्थात् 'भाषा अगोदर उत्पन्न झाली, व्याकरण मागाहून निर्माण झालें; त्यामुळे व्याकरणाने गोवत्सन्यायानें भाषेच्या मागोमाग गेलें पाहिजे,' असा या विधानाचा अभिप्राय असतो. या अभिप्रायानें भाषा आणि व्याकरण यांचा कालानुक्रम ठरविण्याचा हेतु असतो. परंतु तो हेतु वृथा आहे, असें म्हणावें लागेल. व्याकरणाची (= शास्त्राची) साक्षात् अथवा दृश्य रचना मागाहून होते, एवढ्या कारणाने त्याला कालदृष्ट्या गौणत्व अथवा अपरत्व देणें योग्य नाही; कारण अशी रचना होण्यापूर्वी समग्र व्याकरणाचें (= घटनेचें) अथवा तत्संबद्ध कोणत्याहि नियमांचें भाषेच्या शरिरांत मुदलीं अस्तित्व नसतें, असें गृहीत करण्यासारखें आहे. पण हें गृहीत वस्तुस्थितीला सोडून आहे. जगांतील कांही भाषांचीं व्याकरणें आज लिहिलेलीं अथवा रचिलेलीं नसतील, म्हणून काय त्या भाषांच्या ठायीं तीं व्याकरणें अस्तित्वांतच नाहीत? जर मुळांतच त्यांचें अस्तित्व नसेल, तर तीं लिहिलीं अथवा रचिलीं कशीं जातील ? मध्यंतरींच्या अनेक शतकांत मराठीचें व्याकरणशास्त्र आढळत नाही, म्हणून काय त्या दीर्घ कालावधींत मराठीला व्याकरणाचा बंधच नव्हता ? वस्तुस्थिति अशी आहे की, प्रत्येक भाषा ही आपापल्या परीनें आपली नियमव्यवस्था घेऊनच विद्यमान असते. ही व्यवस्था कधी साधी-सोपी असते, तर

कधी गूढ-कठीण असते. ती केव्हा सरळ असते, तर केव्हा गुंतागुंतीची असते. पण मुळांत व्यवस्थाच नाहीं, अशी भाषा असूंच शकत नाहीं. भाषेच्या ठिकाणीं अव्यक्त रूपानें विद्यमान असलेली ही व्यवस्था जेव्हां एखादा सूक्ष्मदर्शी वैयाकरण पाहतो, शोधून काढितो, आणि शास्त्रनिविष्ट करितो, तेव्हा त्या भाषेला व्याकरण मिळालें, असें आपण लौकिक दृष्ट्या म्हणूं लागतों. पण व्याकरणाचें फक्त विधान मागाहून होतें; त्याचें अस्तित्व त्या साक्षात् विधानापूर्वींहि अव्यक्त रूपानें असतें. अर्थात् असें तें व्याकरण सर्वथा नवीन अथवा नवनिर्मित नसतें. अव्यक्त अशा एखाद्या नियमावलीची त्या वैयाकरणानें ती केवळ शब्दरूप अभिव्यक्ति केलेली असते. भाषा आणि व्याकरण (= घटना) यांमध्यें पौर्वापर्य नाहीं; साहचर्य आहे, सामानाधिकरण्य आहे. व्याकरणाची अभिव्यक्ति भाषेच्या सर्व अंगांना जितक्या प्रमाणानें स्पर्श करणारी आणि लाघव-युक्त अशी असेल, तितक्या प्रमाणानें ती करणारा तो वैयाकरण प्रशंसेचा विषय होईल. परंतु तत्पूर्वी भाषेच्या अणुरेणूंमध्येंच ते-ते नियम अव्यक्त स्वरूपांत होते, हें विसरतां येणार नाहीं. न्यूटनच्या पूर्वींहि फळें झाडावरून पडतच होतीं, आणि तीं खालीं तडक जमिनीवरच पडत होतीं. न्यूटनची तारीफ ही की, त्यानें नुसत्या पडत्या फळांचाच नव्हे, तर त्यांवरून सर्व सृष्ट वस्तूंच्या गतींविषयीचा एक बिनचूक व्यापक सिद्धान्त बसविला. भाषा आणि व्याकरण यांचा संबंध असाच आहे. व्याकरण म्हणजे भाषारूप संगीतांतली लय आहे. प्रवाही लयीचे वेगवेगळे विभाग करून भिन्नभिन्न ठेके अथवा ताल आपण निर्माण करितों. व्याकरणशास्त्र म्हणजे भाषेची लय दाखविणाऱ्या ठेक्यासारखें आहे. लय संगीतांत, त्याप्रमाणे व्याकरण हें भाषेंत अंगभूत असतें.

'व्याकरणानें गोवत्सन्यायानें भाषेच्या मागोमाग गेलें पाहिजे,' हेंहि म्हणणें असेंच वृथा आहे. कारण 'भाषेची अवस्था पूर्वकालीन, व्याकरणाची उत्तर-कालीन,' हें त्यांत असलेलें गृहीत दूषणीय आहे. भाषेचा बंध अथवा स्वरूप ज्याप्रमाणें बदलेल, तदनुसार आणि त्या प्रमाणानें व्याकरणाच्याहि नियमांचा बंध बदललेला असणार. कारण ते दोन्ही बंध परस्परसंपृक्त आहेत; समव्याप्त आहेत; समकालीन आहेत. हें ध्यानीं घेतलें, म्हणजे भाषा आणि व्याकरण अशी विभागणी कशी मानवनिर्मित अथवा शास्त्रशासित आहे, तें लक्षांत येण्यासारखें आहे. याच कारणामुळें एकाच भाषेचीं अनेकविध व्याकरणें कशीं असूं शकतात, तेंहि कळतें. अखेरीस, व्याकरण ही भाषेच्या घटनेची विशिष्ट दृष्टिकोणानें पाहिलेली यथार्थ, वास्तव, लाघवयुक्त आणि सुसंगत अभिव्यक्ति आहे. या अभिव्यक्तींतील नियमावली ही अनेक लोक अनेक प्रकारांनी मांडूं शकतील. त्या मंडनांत मुख्य विचार जो करावयाचा, तो दोन गोष्टींचा :

(१) ती निबद्ध नियमावली भाषेच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आहे कीं नाहीं ?

(२) ती लाघवयुक्त आहे कीं नाहीं ?

तशी ती असली, म्हणजे वैयाकरणाचें कार्य समाप्त होतें. सृष्ट वस्तूंशीं वा घटनांशीं पदार्थविज्ञानशास्त्राचा जसा संबंध असतो, जवळजवळ तसाच संबंध भाषेशीं व्याकरणशास्त्राचा असतो.

२. भाषेचा कालिक भेद

भाषा आणि व्याकरण यांची आता सांगितलेली समव्याप्ति आणि परस्परसंपृक्ति लक्षांत घेतली, म्हणजे भाषेच्या कालिक भेदाला अनुसरून व्याकरणाच्याहि कालिक भेदाला मान्यता देणें अनिवार्य ठरतें. अशा प्रकारच्या भेदाची छेदरेषा वा खंडमर्यादा निश्चयाने सांगणें हें कठीण आहे. लोकजीवनाचें प्रतिबिंब भाषेमध्ये पडत असल्याकारणानें लोकजीवन ज्या प्रमाणाने स्थिर राहील, बदलेल, गुंतागुंतीचें होईल, अथवा संकुल होईल, त्या प्रमाणाने व्याकरणहि स्थिर राहील, बदलेल, गुंतागुंतीचें होईल, अथवा संकुल होईल. भाषेच्या जीवनप्रवाहांत जशीं नवीन घटितें येतील, नवीन कल्पना दाखल होतील, तदनुसार भाषेंत अभिनव शब्द येतील, हें उघड आहे.[1] मानवी शरिरांत असलेल्या पेशींमध्ये जशी घडामोड होते, नवें-जुनें होतें, तशी भाषेच्याहि अंगोपांगांत घडामोड होते, नवें-जुनें होतें. कधी-कधी तींत नवीन अव्ययें दाखल होतात; नामांचीं विशेषणें अथवा विशेषणांचीं नामें बनून जातात; नव्या रचना वाट चालू लागतात; आणि असेंच कांही-कांही घडत-मोडत राहतें. अर्थातच त्या भाषेच्या व्याकरणाचाहि बंध मग पालटलेला राहतो. 'ज्ञानदेवी'च्या व्याकरणाचें महत्त्व 'ज्ञानदेवी'पुरतें अथवा 'ज्ञानदेवी'च्या लगतच्या पूर्वोत्तर कालांपुरतें केवढेंहि मोठें असलें, तरी 'ज्ञानदेवी'पासूनचें कालाचें अंतर जसजसें वाढत जातें, तसतसें नंतर-नंतरच्या (अथवा पूर्वीपूर्वीच्या) काळीं प्रचलित असलेल्या भाषांच्या दृष्टीने तें महत्त्व अधिक-उणें-व्यस्त या न्यायानें उणावत जातें, हें उघड आहे. उदाहरणार्थ, 'ज्ञानदेवी'च्या भाषेमध्ये आजच्या मराठींतला तृतीयेच्या अनेकवचनाचा 'नी' हा प्रत्यय नाहीं.[2] तो मागाहून केव्हातरी मराठीमध्ये आला. अर्थात् तो नव्याने आल्यानंतर आणि स्थिरपद झाल्यानंतर त्याची यथायोग्य व्यवस्था करणें हें न्याय्यच होय. तसेंच, 'ज्ञान-देवी'च्या भाषेमध्ये आढळणारा विशेष्य-विशेषणभाव हा प्रचलित मराठी भाषेमधील

१. येथे जातां-जातां हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे की, शब्दकोश हा व्याकरणाचा विषय नाही. (कोशांतील) शब्द भाषेमध्ये येऊन वावरूं लागतात, तेथे व्याकरणाचें क्षेत्र सुरू होतें.

२. 'जे भगवद्गीता ह्मणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रसंसिजे । जे सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ॥' (ज्ञानदेवी, १·५५). या ओवींतील दुसऱ्या चरणांत 'ब्रह्मेश' (= ब्रम्हदेव आणि शंकर) + नीं असा प्रकृतिप्रत्ययविभाग नसून तो 'ब्रह्मेशान' (= ब्रम्हदेव आणि 'ईशान' म्हणजे शंकर) + ईं असा आहे.

विशेष्य-विशेषणभावापेक्षा भिन्न आहे. उदाहरणार्थ, 'जैसें शारदियेचिये चंद्रकले। माझि अमृतकण कोवले। ते वेंचिति मनें मौआलें। चकोरतलगे॥' (ज्ञानदेवी, १·५६) यांतील 'मौआलें मनें' हा तृतीयांत विशेष्य-विशेषणभाव पहा. किंवा, 'तूं आपुलेनि स्नेहपल्लवें। मातें पांगुरवीसि सदैवें।' (ज्ञानदेवी, १२·१७) यांतील 'आपुलेनि स्नेहपल्लवें' हा तृतीयांत विशेष्य-विशेषणभाव पहा. अथवा, 'अमृताचां सागरिं। जे लाभे सामर्थ्याची थोरी। ते चि दे अमृतलहरी। चुळिं घेतलेयां॥' (ज्ञानदेवी, १२·२६) यांतील 'अमृताचां सागरिं' हा सप्तम्यंत विशेष्य-विशेषणभाव पहा. या भेदाची नोंद करणें हें आवश्यक आहे; आणि तदनुसार मराठीच्या व्याकरणाच्या रचनेंत त्याची व्यवस्था करणें हेंहि उजू आहे. एका परीने व्यापक अर्थाने हाहि मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार आहे. विशेष एवढाच की, 'ज्ञानदेवी'ची मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा यांमध्ये कित्येक शतकांचा कालावधि लोटलेला आहे.

३. भाषेचा दैशिक भाषाभेद

प्रदीर्घ कालावधि लोटलेला असला, तर भाषेच्या कालिक भेदाची दखल घेणें हें सहजच शक्य होतें; कारण हा असा भेद ठळकपणें आणि ठिकठिकाणीं जाणवत राहतो. परंतु भाषेच्या दैशिक भेदाची जाणीव ही त्या भेदाच्या समकालीनत्वामुळे वेगळे प्रश्न उत्पन्न करिते. कधी-कधी या प्रश्नांना कारणावाचून कंगोरे येतात, आणि ते रुतूं-खुपूं लागतात. अर्थात् त्यांमधून सामाजिक समस्या जन्म घेतात. दैशिक भाषाभेद कधी-कधी मुळांत नसलेला उच्चनीचपणा आभासित करितो; कधी-कधी तो त्या-त्या भाषिकांमध्ये परस्परसंकोच उत्पन्न करितो; कधी-कधी परस्परांत तिरस्कार निर्माण करितो. कधी-कधी अशा भाषाभेदाने रागलोभ खिजतात. अशा प्रकारचा भाषाविषयक समस्यांचा विचार येथे अभिप्रेत नाही. मात्र भाषा जर विस्तीर्ण भूप्रदेशामध्ये व्यवहारांत असली, तर दैशिक भाषाभेद हे नाहीतसे होणें शक्य नाही. भाषाशास्त्रज्ञाच्या निर्लेप दृष्टीने पाहतां, सर्व दैशिक भाषाभेद हे समान पातळीवर असतात. भाषाभेदविषयक विशेषांची नोंद करून तदनुसार त्यांचे उचित वर्ग केले, आणि त्यांचे परस्परसंबंध दर्शविले, म्हणजे भाषाशास्त्रज्ञ त्यांपलीकडे जाऊन त्यांचा गौणप्रधान-भाव दाखवीत नाही. तसें करण्याचें तादृश कारण नाही. 'अमूक-एक भाषा प्रधान, आणि तदितर भाषा गौण, अथवा तदवलंबी,' हा विचार अकिंचित्कर आहे. अशा भिन्नभिन्न भाषांचा कांही तत्त्वांना अनुसरून एखादा वर्ग कल्पिणें हें वेगळें; आणि त्या भाषांचा गौणप्रधानभाव सांगणें हें वेगळें. त्यामुळे एखादी मध्यवर्तिनी अथवा केंद्रस्थ भाषा ही उपजीव्य (= आश्रयभूत), आणि तदितर भाषा उपजीवक (= आश्रित), हा व्यवहार भाषाशास्त्रज्ञाच्या दृष्टीने निरर्थक म्हणावा लागेल. कोल्हापूर, कोकण, पुणें, खानदेश आणि विदर्भ येथील भाषांमध्ये असा उपजीव्य-उपजीवकभाव नांदतो, असें कोणत्या तत्त्वांना अनुसरून सांगतां येईल? या सर्व भाषाभेदांचा प्राकृताशीं अथवा संस्कृताशीं संबंध

दाखविण्याने कांही असा उपजीव्य-उपजीवकभाव सिद्ध होणार नाही. लोकजीवनामध्ये हे भाषाभेद ज्या प्रमाणाने व्यवहारांत आहेत, त्या प्रमाणाने त्यांचें-त्यांचें भौगोलिक अथवा प्रादेशिक महत्त्व दृष्टीआड करितां येणार नाही, हें स्पष्ट आहे. अर्थातच हे भाषाभेद त्यांच्या-त्यांच्या पुरते समान महत्त्वाचे होत. त्यामुळे त्यांचीं व्याकरणेंहि समान पातळीवरचीं म्हणावीं लागतील. पुणेरी मराठीचें व्याकरण आणि कोकणी वा वैदर्भी मराठीचें व्याकरण हीं परस्परांपासून कांही भाषाविशेषांपुरतीं वेगळीं असलीं, तरी व्याकरण या दृष्टीने त्यांचें महत्त्व समान आहे.

हें सर्व सांगतांना मी ' भाषा आणि तिच्या बोली ' असे शब्द टाळीत आहें, हें आपणां चाणाक्ष श्रोत्यांच्या लक्षांत आलें असेल. असें करण्याचें कारण हें आहे की, ' भाषा आणि बोली ' या शब्दांना आज जो उपजीव्य-उपजीवकभावाचा अर्थ चिकटलेला आहे, तो शास्त्रतः समर्थनीय नाही, हें आपल्या लक्षांत आणून द्यावें. एखाद्या भाषेची समृद्धि अथवा तिच्या समृद्धीचा अभाव यांनी हा संबंध जोखतां येणार नाही. एखाद्या भाषेच्या व्याकरणाची संकुलता अथवा अशा संकुलतेचा अभाव यांच्याहि आधाराने हा उपजीव्य-उपजीवकभाव तोलतां येणार नाही. तेव्हा हा संबंध कल्पित असल्यामुळे त्याचा आधार न घेतां अथवा निर्देश न करितां अशा भाषाभेदांचें विवेचन करणें अथवा व्याकरण रचणें हें शक्य आहे,— नव्हे, योग्य आहे.

४. भाषाभेदाचे स्तर, वर्तुळें

स्तरभेद : उपपत्ति

समकालीन असलेले भाषेचे असे दैशिक भेद सर्वदृष्ट आणि सर्वमान्य आहेत; कारण ते-ते भेद स्थानपरत्वें अनुभवाला येतात, जाणिवेंत प्रविष्ट होतात. परंतु भाषा-भेदाचा आणखी एक प्रकार आहे, आणि तो थोडा सूक्ष्म आहे. लोकजीवनामधील वेगवेगळे व्यवसाय, भिन्नभिन्न संपर्क, इत्यादि कारणांमुळे दैशिक भाषाभेदांबरोबर एकाच प्रकारच्या भाषाभेदामध्येहि वेगवेगळ्या स्तरांना अनुलक्षून अथवा वर्तुळांना अनुसरून आणखी-आणखी फरक पडत जातो. सूक्ष्मदर्शी जाणकाराला हे बारीक-बारीक फरक कळूं शकतात आणि जाणवतातहि. त्यांना आपण ' स्तरभेद ' म्हणूं या. हे स्तरानुसारी अथवा वर्तुलानुसारी फरक म्हणजे दैशिक भाषाभेद नव्हत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. दैशिक भाषाभेद हे सहज कळतात, बिनचूक जाणवतात. खानदेशी भाषाभेदामध्ये ' ळ ' या मूर्धन्य वर्णाऐवजी ' य ' हा तालव्य वर्ण येऊं लागला, अथवा दुसऱ्या एखाद्या भाषाभेदामध्ये ' ळ ' याच्या जागीं ' ल ' हा दन्त्यवर्ण येऊं लागला, म्हणजे आपल्याला परिचित असलेल्या वर्णमालेच्या दृष्टीने आपल्याला कांही व्यावहारिक-मानसिक स्वरूपाची देवाण-घेवाण करावी लागते. अशी व्यावहारिक-मानसिक देवाण-घेवाण ही केवळ वर्णमालेपुरती मर्यादित न राहतां

ती जेव्हा कांही पदांमध्ये, कांही रूपांमध्ये, कांही प्रत्ययांमध्ये, कांही रचनांमध्ये पसरत जाते, आणि त्या भाषाभेदाच्या व्यापकतर क्षेत्रामध्ये प्रविष्ट होते, तेव्हा तो भाषाभेद आपल्याला परिचित असलेल्या भाषाभेदाच्या अपेक्षेने भिन्न म्हणून जाणवणें हें अपरिहार्य होतें. परंतु भाषेचे स्तरानुसारी अथवा वर्तुलानुसारी भेद हे वेगळ्या स्वरूपाचे असतात. दैशिक भाषाभेद हे विस्तीर्ण भूप्रदेशावर पसरलेले असतात; तर स्तरभेद वा वर्तुलभेद हे एखाद्या लाकडाचा उभा छेद घेतल्यावर त्या छेदांत त्या लाकडाच्या पोताचीं जीं आकारबद्ध पण बहुविध वर्तुळें दिसतात, तसे असतात. दैशिक भाषाभेद हे सलग, अनेक, समकालीन आणि समपृष्ठ असतील, तर स्तरभेद वा वर्तुलभेद हे एकाच भाषाभेदाचे आणि एकावर एक असे असतील. या विधानांतील ‘ पृष्ठ ’, ‘ स्तर ’, ‘ वर्तुल ’, ‘ एकावर एक ’ हे शब्द आणि त्यांतील कल्पना केवळ समजुतीच्या सोयीसाठी योजिलेल्या आहेत; त्यायोगें उच्चनीचभाव अथवा दूरादूरभाव व्यक्तविण्याचा उद्देश नाही. लहान मूल जेव्हा भाषा शिकूं लागतें, तेव्हा ‘ आण ’, ‘ बोल ’, ‘ पड ’, ‘ सर ’, ‘ चाल ’, ‘ टाक ’ या धातूंच्या ‘ आणला ’, ‘ बोलला ’, ‘ पडला ’, ‘ सरला ’, ‘ चालला ’, ‘ टाकला ’ या रूपांच्या धर्तीने ‘ कर ’, ‘ मर ’ याहि धातूंचीं ‘ करला ’, ‘ मरला ’ अशीं रूपें करितें. वयोमानाच्या ज्या स्तरावर तें मूल असतें, तो स्तर लक्षांत घेतां त्याने जणू निरपवाद म्हणून अपेक्षित केलेलीं ‘ करला ’, ‘ मरला ’ हीं रूपें आपण तात्पुरतीं संभाळून घेतों. पण ‘ केला ’, ‘ मेला ’ या अपवादात्मक रूपांची जाणीव होतांच तें मूल आपण होऊन ‘ करला ’, ‘ मरला ’ हीं रूपें सोडून देतें. वयोमानस्तराच्या शिकाऊ अवस्थेंत अशीं अनेक रूपें आणि रचना टाकून देऊन मूल हें एकविध स्तरावर येतें, तेव्हा भाषाशिक्षणाची त्याची अवस्था जणू पूर्ण होते. एखाद्या मुलाच्या अशा शिकाऊ अवस्थेंतल्याहि भाषेचें व्याकरण रचितां येणार नाही, असें नाही. किंबहुना, अशा प्रकारें अनेक मुलांच्या भाषांचीं व्याकरणें रचून त्यांतील समानता पाहणें हेंहि उद्बोधक ठरण्यासारखें आहे. एकाच भाषाभेदामधील स्त्रियांच्या भाषेचाहि स्तर असाच लक्षणीय म्हणतां येईल; आणि व्यावसायिकादि इतर भाषास्तरांचेंहि स्वरूप अशाच प्रकारें ध्यानीं येईल. भाषाभेदांचा अंगभूत फरक आणि एखाद्या विशिष्ट भाषाभेदामधील स्तरांचा वा वर्तुलांचा फरक यांतील वेगळेपणा ध्यानीं घेणें हें अगत्याचें आहे, असें वाटतें. कारण त्यायोगें भाषाभेदाचें अंगभूत स्वरूप आणि एखाद्याच विशिष्ट भाषाभेदा-मधील स्तराचें अथवा वर्तुलाचें व्याकरण यांमधील रेखीवपणा बाळगण्यास साहाय्य होईल, आणि संभ्रमाचा संभव कमी होईल.

भाषेचे त्रिविध भेद

भाषेचे तीन प्रकारचे भेद आतापर्यंत आपण पाहिले :

(१) कालिक भेद, अर्थात् प्रदीर्घ कालावधींतील खंडांना अनुलक्षून असलेले एखाद्या भाषेचे कालसापेक्ष स्वरूपभेद;

(२) दैशिक भेद, अर्थात् विशाल भूमीवरील खंडांना अनुलक्षून केलेले एखाद्या भाषेचे भेद;

(३) स्तरभेद अथवा वर्तुलभेद, म्हणजे एखाद्या विशिष्ट भाषाभेदामधील व्यवसाय, संपर्क, वय इत्यादिकांना अनुलक्षून असलेले फरक.

या भेदविषयक संबंधांत आणखी कांही आनुषंगिक गोष्टी लक्षांत घ्यावयास पाहिजेत :

(१) भाषेच्या गतिशील स्वभावामुळे आता सांगितलेले त्रिविध भेद हे आपापल्या मर्यादा नीटनेटक्या रितीनें आखून घेऊन त्या-त्या आखबंद मर्यादांमध्येच कार्य करितात, असें नव्हे. त्यांच्या सीमा कधी-कधी एकमेकींमध्ये मिसळून जातात. असें झालें, म्हणजे कांही संमिश्र परिणाम दिसून येतात, आणि मग त्या दृष्ट परिणामांचें प्रतिबिंब व्याकरणबंधांतहि पडणें अपरिहार्य होतें.

(२) कालिक भेद ही भाषेची कालानुबंधी अशी दीर्घ प्रवाहधारा होय. परंतु प्रत्येक कालिक भेदामध्ये तत्कालीन असा दैशिक भाषाभेद पुन्हा विद्यमान असतो. उदाहरणार्थ, ' ज्ञानदेवी ' ही ज्या भाषाभेदामध्ये रचिली, तोच आणि तेवढा एकच भाषाभेद यादवकालीं सर्व मराठी भाषादेशाला व्यापून होता, आणि तदितर दुसरा कोणताहि भाषाभेद अपरांतापासून मराठवाड्याच्या पूर्वतम प्रदेशापर्यंत वा विदर्भाच्या उत्तरटोकापासून कारवार-गोमंतकाच्या दक्षिणतम टोकापर्यंत नव्हता, असें मानणें बरोबर नाही. यादवकालीं अथवा ' ज्ञानदेवी'च्याहि काळीं अनेक दैशिक भाषाभेद वावरत होते. आणि त्यांतील प्रत्येक दैशिक भाषाभेदाचा कालिकहि भेद संभवतो. ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, चिपळूणकर, राजवाडे यांना अनुलक्षून कालानुबंधी भाषाभेदांचा विचार करितांना त्या प्रत्येकाच्या काळीं दैशिक भाषाभेदहि विद्यमान होते, हें मान्य केलें पाहिजे.

(३) प्रत्येक विशिष्ट भाषाभेदामध्ये पुन्हा स्तरभेद, वर्तुलभेद असतात.

दैशिक भाषाभेद आणि स्तरभेद : विवेचन

भाषेच्या कालिक, दैशिक आणि स्तर-वर्तुलविषयक भेदांचे हे परस्परसंबंध लक्षांत घेतले असतां विशिष्ट भाषावर्गाचें स्वरूप पुष्कळ व्यामिश्र (complex) होतें. भाषेच्या या व्यामिश्र स्वरूपामध्ये भाषेची गतिशीलता आणि परिस्थितिसापेक्षता दाखल केली, म्हणजे भाषा ही मानवी संस्कृतीमधील केवढी गुंतागुंतीची घटना आहे, याची कांहीशी स्थूल कल्पना येईल.

हें विवेचन करण्याचें कारण असें की, मराठी भाषेच्या व्याकरणाचा विचार करितांना आपण कोणत्या भाषेला अनुलक्षून बोलतों अथवा लिहितों, तें शक्य तितकें स्पष्ट

व्हावें. कालिक भेदांना अनुसरून आपण बोलत असूं, तेव्हाची भूमिका दैशिक भाषाभेदांच्या व्याकरणांना उपयोगीं पडणार नाही. दैशिक भाषाभेदांतहि कालिक भेद असतात, हें नुकतेंच सांगितलें. सर्वसाधारणपणें कालिक आणि दैशिक भाषाभेदांच्या व्याकरणांचा फरक सहज मान्य होतो. परंतु दैशिक भाषाभेद हे समकालीन असतात, त्यामुळे त्यांच्या व्याकरणांच्या कक्षा कधी-कधी एकमेकींना छेदून जातात. म्हणून या व्याकरणांचा भेद चटकन् मान्य करणें कांहींना जड जातें. तथापि सावधान विचारवंतांना दैशिक भाषाभेदाचे व्याकरणबंध अलग-अलग राखणें कठीण जात नाही. मात्र स्तरभेद आणि वर्तुलभेद यांचा जेव्हा एखाद्या भाषेच्या व्याकरणामध्ये संबंध येतो, तेव्हा अधिक गुंतागुंत होते. ज्या दैशिक भाषाभेदांच्या दृष्टिकोणांतून विचार करावयाचा, त्याला आपण 'लक्ष्यभूत भाषाभेद' म्हणूं. या लक्ष्यभूत भाषाभेदामध्ये स्तरभेद आणि वर्तुलभेद असतात. लक्ष्यभूत भाषाभेदाशीं हे स्तरभेद समकालीन असतात. अर्थात् लक्ष्यभूत भाषाभेद आणि त्याचा स्तरभेद यांचीं क्षेत्रें कधी-कधी एकमेकांना छेदून जातात. असें झालें, म्हणजे लक्ष्यभूत भाषाभेद आणि त्याचा स्तरभेद यांचा योगविभाग कसा करावयाचा, आणि त्या दोहोंच्या व्याकरणांचा फरक रेखीवपणाने कसा संभाळावयाचा ?

हा प्रश्न समजून घेण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊं. समजा, मराठीच्या एका भाषाभेदामध्ये दोन स्तरभेद आहेत : एक 'क्ष' स्तरभेद आणि दुसरा 'य' स्तरभेद. 'क्ष' या स्तरभेदामध्ये 'कर' या धातूचें 'करूनशान' आणि 'य' या स्तरभेदामध्ये त्याच अर्थी आणि त्याच धातूचें 'करून' असें रूप प्रचलित आहे. दोन्ही रूपें 'कर' या धातूचीं पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययें आहेत. पहिल्या रूपांत '-ऊनशान' आणि दुसऱ्या रूपांत '-ऊन' हा प्रत्यय लागलेला आहे. दोन्हीं रूपें त्या-त्या स्तरभेदामध्ये सार्वत्रिक व्यवहारांत आहेत. अर्थात् त्यांचा वावर अमान्य करणें शक्य नाही. तेव्हा त्या दोन्ही रूपांचीं लक्ष्यभूत भाषाभेदाच्या व्याकरणांत व्यवस्था करणें प्राप्त आहे. पण ही व्यवस्था कशी करितां येईल? त्यासाठी आपण कांहीं प्रश्न विचारूं आणि त्यांचीं उत्तरें पाहूं :

(१) हीं रूपें समकालीन आहेत काय ?
— होय.

(२) तीं एकाच लक्ष्यभूत भाषाभेदांतलीं आहेत काय ?
— होय ?

(३) त्यांचे प्रत्यय एकच आहेत काय ?
— नाहीत.

(४) तीं रूपें वैकल्पिक आहेत काय ?
— नाहीत.

(५) त्यांचा अर्थ एकच आहे काय ?
—होय.

(६) आणि तरी तीं रूपें वैकल्पिक नाहीत ?
—नाहीत.

(७) कां ?
—कारण त्यांच्या वापराचीं क्षेत्रें परस्परांपासून भिन्न आहेत.

(८) क्षेत्रें नुसतीं भिन्नच आहेत काय ?
—नाहीत; तीं क्षेत्रें परस्परांपासून व्यावृत्तहि आहेत.

(९) म्हणजे काय ?
—म्हणजे असें की, ज्या स्तरभेदामध्ये 'करूनशान' हें रूप योजितात, त्या स्तरभेदांत 'करून' हें रूप योजीत नाहीत; तसेंच, 'करून' हें रूप ज्या स्तरभेदामध्ये योजितात, त्यांत 'करूनशान' हें रूप योजीत नाहीत.

(१०) मग 'करून' या रूपानें 'करूनशान' हें रूप बाधित केलें, आणि 'करून' हें एकच रूप शिल्लक ठेविलें तर ?
—नाही. तें कोण बाधित करूं शकणार ? यांतलें कोणतेंच रूप दुसऱ्या रूपाला बाधित करूं शकणार नाही. दोन्हीं रूपें त्या-त्या भाषाभेदाच्या स्तरामध्ये रूढ आहेत : क्ष-क्षेत्रामध्ये 'करूनशान' आणि य-क्षेत्रामध्ये 'करून'. जीवशास्त्रामध्ये एखादा अभिनव जीवनमुना (biological specimen) मिळाला, तर शास्त्रज्ञाला जीवशास्त्रांत त्याचा हिशेब द्यावा लागतो, त्याची व्यवस्था करावी लागते. त्याला माहीत असलेल्या त्या वेळच्या शास्त्रव्यवस्थेंत तो जीवशास्त्रीय नमुना बसत नाही, म्हणून तो त्याला बाजूस टाकितां येणार नाही. त्याचप्रमाणे 'करूनशान' आणि 'करून' हीं दोन्हीं रूपें जिवंत आहेत. त्या रूपांच्या जिवंतपणाच्या पुराव्यावरून व्याकरणशास्त्रालाच नियम घडवावा लागेल. असें केलें, म्हणजे दोहोंची व्यवस्था त्या भाषाभेदाच्या घटनेंत झाली, असें होईल ?

(११) 'भाषाभेदाच्या घटनेंत'?
—नाही, नाही. चुकलों. 'स्तरभेदाच्या घटनेंत'.

(१२) कां ?
—कारण पुन्हा तेंच. 'क्ष' आणि 'य' हे दोन्ही स्तरभेद आणि त्यांचीं क्षेत्रें हीं परस्परांपासून व्यावृत्त आहेत, म्हणून.

(१३) म्हणजे 'क्ष' आणि 'य' या दोन स्तरभेदांच्या क्षेत्रांचीं अलग व्याकरणें रचावयाचीं ?
—होय. असें करणें अनिवार्य तर आहेच,—

(१४) ' अनिवार्य ' कां ?

— कां की, त्यावाचून दोन्ही रूपांची भाषेच्या घटनेच्या दृष्टीने व्यवस्था होणार नाही; आणि त्यांची व्यवस्था न करणें हें न्याय्य नाही. तेव्हा क्ष-य या स्तरभेदांचीं अलग व्याकरणें रचणें अनिवार्य तर आहेच, पण उपयुक्त आणि इष्ट आहे.

दिलेल्या या प्रश्नोत्तरमालिकेने हें आपल्या लक्षांत येईल की, दैशिक भाषाभेदांचीं — म्हणजे कोकणी, वैदर्भी, अहिराणी यांसारख्या भाषाभेदांचीं — अनेकविध व्याकरणें रचणें हें मराठीच्या दृष्टीने इष्ट, उद्बोधक आणि हितावह आहे. (या भाषाभेदांत वाङ्मय आणि त्याची संपन्नता कमी आहे कीं जास्त आहे, हा प्रश्न गैरलागू आहे.) कारण अशीं व्याकरणें रचण्याने परस्परांमधील भाषाविषयक समजूत चांगली होण्याला साहाय्य होणार आहे. पण या भाषाभेदांचे जे आणखी स्तरभेद आहेत, त्यांच्याहि बहुविध व्याकरणांची रचना व्हावयाला पाहिजे. त्यामुळे आपलें विविध-स्तरविषयक ज्ञान अधिक स्पष्ट, व्यापक आणि प्रसन्न होण्याला फार साहाय्य होणार आहे. म्हणून मातंग, कोळी, रामोशी, कातकरी, वारली, ठाकर अशा मराठी भाषेमधील कितीतरी समाजगणांच्या स्तरभेदांचीं व्याकरणें निर्माण होणें हें अगत्याचें आहे. असें झालें, म्हणजे आपण शहरी लोक जी भाषा बोलतों, तीवरहि विविध दिशांनी कवडासे पडतील.

आपण आता थोडें मागे फिरूं. कालिक भेद, दैशिक भाषाभेद आणि स्तरभेद यांचे परस्परसंबंध कसे व्यामिश्र (Complex) होतात, यांचें विवेचन मागे केलें. या विवेचनाची आवृत्ति गणितांतल्यासारखीं प्रतीकें योजून पुन्हा करून पाहूं. हेतु हा की, विवेचन असंदिग्ध व्हावें.

' भ ' म्हणजे भाषा :

(१) भ$_{१}$, भ$_{२}$, भ$_{३}$ … … … कालिक भेद.

(२) भ$_{१}$: क, ख, ग … … … दैशिक भेद.

दैशिक भेदांची कालिक परंपरा : क$_{१}$, क$_{२}$, क$_{३}$ …
ख$_{१}$, ख$_{२}$, ख$_{३}$ …
ग$_{१}$, ग$_{२}$, ग$_{३}$ …

भ$_{२}$: क′, ख′, ग′ … … … दैशिक भेद.

दैशिक भेदांची कालिक परंपरा : क′$_{१}$, क′$_{२}$, क′$_{३}$ …
ख′$_{१}$, ख′$_{२}$, ख′$_{३}$ …
ग′$_{१}$, ग′$_{२}$, ग′$_{३}$ …

(३) क : क-य, क-र, क-ल, क-व, …
ख : ख-य, ख-र, ख-ल, ख-व, …
ग : ग-य, ग-र, ग-ल, ग-व, …
} स्त र भे द

‘ शुद्धाशुद्ध ’ - विवेक

लिखित अथवा लेखनार्ह भाषेचेंच व्याकरण रचणें योग्य, किंवा जींतली वाङ्मय-रचना मान्यता पावलेली आहे, अशा भाषेचेंच व्याकरण काय-तें उपयुक्त, हा एक अपसमज आहे, आणि तो ज़ितक्या लवकर नाहीसा होईल, तितकें तें शास्त्राला उपकारक होणार आहे, हें आतापर्यंतच्या विवेचनानें स्पष्ट झालें असेल. मराठी भाषेची समृद्धि ही जशी विपुल आणि विविध अशा वाङ्मयरचनेनें होईल, तशी ती बहुस्पर्शी भाषाभेद-ज्ञानानेंहि होणार आहे. हें भाषाभेदांचें ज्ञान केवळ ते-ते भाषाभेद शिकल्यानें होणार नाही, तर त्यांच्या घटनेचें, शब्दकोशाचें, आणि स्वरूपाचें यथार्थ ज्ञान झाल्यानें होईल. कारण त्यामुळे भाषाभेदांच्या समग्र वर्गाची संकलित, संबद्ध आणि एकजिनसी जाणकारी येईल, आणि आजमितीला अधूनमधून सुसरीप्रमाणे डोकें काढणारा अलिप्त तुटकपणाहि लोपेल.

भाषेच्या कोणत्या स्तरभेदाचें व्याकरण आपण रचीत आहों, अथवा त्याचा विचार करीत आहों, हा विषय एखाद्या ध्रुवाप्रमाणे जर आपण ध्यानीं बाळगिला नाही, तर संभ्रमांच्या आवर्तांत पडण्याचा धोका आहे. आपण अधूनमधून असें बोललेलें ऐकितों, अथवा लिहिलेलें वाचितों की, ‘ पानी ’ हा शब्द ‘ पानीय ’ या संस्कृत मुळापासून निघालेला असल्यामुळे ‘ पानी ’ हाच शब्द शुद्ध आहे; ‘ पाणी ’ हा शब्द शुद्ध नव्हे. कारण त्यांत न-ण-चा व्यत्यास प्रत्ययाला येतो. आता, अशा प्रकारच्या प्रतिपादनांत अनेक हेत्वाभास सुप्त अवस्थेंत असतात, आणि विवाद्य व अस्वीकार्य आणि गृहीतहि असतें. त्यांतलें गृहीत असें की, संस्कृताच्या मूळ स्वरूपाला आपण जितके जवळ जाऊं, तितके आपण ‘ शुद्ध ’ भाषा बोलूं. अर्थात् या गृहीतांतील शुद्धाशुद्धविवेक जरी तूर्त बाजूस ठेविला, तरी ‘ संस्कृताच्या मूळ स्वरूपाच्या जवळ जाणें ’ म्हणजे काय ? असें ‘ समीपगमन ’ विशिष्ट शब्दाच्याच बाबतींत, अथवा रूपाच्याच बाबतींत इष्ट कीं सर्वच बाबतींत इष्ट ? मग वाक्यरचनाहि संस्कृतच अथवा संस्कृतानुसारीच करावयाची काय ? अर्थात् भाषेच्या घड्याळाचे काटे मागे फिरवून भूतकालाच्या उदरांत जावयाचें काय ? मधली प्राकृताचीहि पायरी सोडून द्यावयाची काय ? — आणि हें सर्व करण्याचें प्रयोजन काय ? शुद्ध बोलण्यासाठी ? आणि अशुद्ध बोलणें टाळण्यासाठी ? ‘ शुद्ध ’ म्हणजे काय ? ‘ अशुद्ध ’ म्हणजे काय ? — या आणि अशासारख्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें मिळणें शक्य नाही. व्याकरणाच्या बंधानें शुद्धाशुद्धविवेक परीक्षिणें हें तर कुंडबदरन्यायाप्रमाणे[1] अन्योन्याश्रयात्मक आहे. भाषेचें स्वरूप आणि तिची घटना यांमधून प्रथम व्याकरणाची नियमावली काढावयाची, आणि त्याच नियमावलीच्या आधारानें फिरून भाषेचें ‘ शुद्धाशुद्धत्व ’ तपासावयाचें, हा कोठला न्याय ? आणि कोणता युक्तिवाद ? व्याकरण म्हणजे

१. पाण्याचें कुंड कोठे ? — तर बोरीजवळ; आणि बोर कोठे ? — तर पाण्याच्या कुंडाजवळ, असा अयुक्तिक अन्योन्याश्रय दाखविणारा न्याय.

कांही असा कायदा नव्हे, की ज्यामुळे एखाद्या भाषावर्गामधला भाषिक 'अमूक-एक **असें** बोलला,' आणि 'तमूक-एक **तसें** बोलला नाही,' म्हणून दंडनीय ठरावा! अशी भूमिका पतकरिली, तर कोण दंडनीय ठरणार नाही, तें सांगणें कठीण होईल, असें वाटतें. वस्तुस्थिति अशी आहे की, एखादा महान् वैयाकरण भाषेचेंच स्वरूप परीक्षून त्या स्वरूपाच्या अंतर्गत घडामोडींचे नियमरूप निष्कर्ष काढितो. हे निष्कर्ष म्हणजे भाषेच्याच स्वरूपाचें अंगठींतल्या खड्यांत पडावें, तसें संक्षिप्त प्रतिबिंब असतें. अर्थात् या आटवून काढिलेल्या नियमावलीमध्ये ती समग्र भाषा, तरंगत्या वटपत्रावरील बाल-मुकुंदाच्या ठायीं सृष्टि निगूढ असावी तशी, नांदते. ती भाषा त्या नियमावलींत आपल्या नियम-विकल्प-अपवाद-प्रत्यपवादांसह विद्यमान असते; तिचें आमूलाग्र स्वरूप तींत पाहणाऱ्याला दिसतें. अशी स्थिति असल्यामुळे एखाद्याने त्या नियमावलीचें उल्लंघन करणें म्हणजे भाषेच्याच स्वरूपाची पायमल्ली करण्यासारखें आहे. अशी पायमल्ली अर्थातच अस्वीकारार्ह ठरते. हीं उल्लंघनें म्हणजे भाषेच्या अंगावर येणारीं अथवा आलेलीं टेंगळें होत. म्हणून तीं बसविलीं पाहिजेत. अशा प्रकारच्या उल्लंघनरूप टेंगळांना अशुद्ध अथवा प्रामादिक म्हणणें हें वेगळें, आणि 'पानी', 'करूनशान' अशासारखीं स्तर-सापेक्षतेने रूढ आणि म्हणून स्वीकारार्ह बनलेलीं जीं रूपें त्यांना 'अशुद्ध' म्हणणें वेगळें, हें आवर्जून लक्षांत घेतलें पाहिजे. 'गोपी खेळतो', 'कृष्णाची चेंडू यमुनेची डोहाचा बुडालो', 'यंदा पुण्याते फार मोठी पूर आल्या,' हीं वाक्यें अशुद्ध म्हणावयाचीं, तीं अशासाठी की, आपल्याला परिचित असलेल्या मराठी भाषेच्या स्वरूपाचा या वाक्यांत आणि त्यांच्या रचनांत पत्ता नाही. मराठी भाषेची घटना आणि या वाक्यांचें स्वरूप यांमध्ये गैरमेळ आहे. त्यामुळे या प्रत्येक वाक्याचा अर्थ जरी आपल्याला कमीअधिक प्रयत्नाने कळत असला, तरी तीं वाक्यें स्वीकार्य ठरत नाहीत. कारण कोणताच मराठी भाषिक अशीं वाक्यें उच्चारीत नाही; आणि कोणीं उच्चारिल्यास तीं स्वीकार्य मानीत नाही. अर्थात् आत्ता दिलेलीं वाक्यें हीं अथवा अशासारखीं मराठी भाषिकांना अस्वीकारार्ह ठरणारीं वाक्यें हीं अशुद्ध वाक्यें होत. पण 'पानी', 'करूनशान' अशासारखे प्रयोग हे अशुद्ध नव्हेत; त्यांना मराठीच्या विशिष्ट स्तरामध्ये स्थान असल्यामुळे ते स्वीकार्य होत.

क्षेत्रभेदाने अधिकारभेद

आपण दुसरें एक विधान आता विचारार्थ घेऊं. तें असें —

'आज आमच्या घरीं एक वांझेचा धिप्पाड मुलगा आला होता. त्याने नुकतेंच मृगजलामध्ये स्नान केलेलें होतें; आपल्या मस्तकामध्ये लाल-गुलाबी आकाशपुष्पांचा एक सुंदरसा तुरा खोवून दिलेला होता; आणि सशाच्या शिंगाचें एक भलें-मोठें धनुष्य त्याने हातांत घेतलेलें होतें.'

अर्थदृष्ट्या पाहतां या वाक्यांच्या अर्थाचा वास्तवाशीं अथवा व्यवहाराशीं मेळ घालणें सर्वथा अशक्य आहे. एखाद्याला हीं वाक्यें म्हणजे प्रमत्ताचें प्रलपितहि वाटेल. परंतु भाषा, वाक्यरचना, व्याकरणनियम या दृष्टींनी पाहतां तीं बिनखोड आहेत. तीं मराठीच्या विशिष्ट स्तरभेदामध्ये नांदणारीं, आणि म्हणून मराठीच्या स्वरूपाशीं सुमेळ साधणारीं, स्वीकारार्ह ठरतात. 'The man jumps over the moon,' हें इंग्रजी भाषेमधीलहि वाक्य असेंच त्या भाषेच्या दृष्टीने स्वीकारार्ह आहे. परंतु 'I goes' अथवा 'He go' हीं वाक्यें अस्वीकार्य आणि म्हणून प्रामादिक ठरतात. या द्विविध उदाहरणांनी व्याकरणाचें क्षेत्र कसें सीमित होतें, तें कळतें. भाषेच्या अंतर्गत स्वरूपाचें यथावत्, संगतवार वर्णन म्हणजे व्याकरण, असें म्हटल्यानंतर त्याच्या पलीकडे व्याकरणाचें क्षेत्र ताणतां येणार नाही, असें वाटतें. कारण त्याच्या पलीकडे अर्थविमर्शशास्त्राचें, काव्य-शास्त्राचें क्षेत्र अथवा अन्य शास्त्रांचीं क्षेत्रें सुरू होतील. क्षेत्रभेदाने अधिकारभेद मानणें हें उचित होय. उदाहरणार्थ, तुकारामबोवा जेव्हा विठ्ठलाला उद्देशून 'विठाबाई' असा शब्द योजितात, तेव्हा वैयाकरणाने त्यांत लिंगभेदाची चूक काढणें हें आपल्या अधिकार-क्षेत्राचें अतिक्रमण करणें होय. कारण तुकारामबोवा 'विठाबाई' हा शब्दप्रयोग ज्या विशिष्ट भावनात्मक-कल्पनात्मक पातळीला अनुलक्षून करितात, तींत शब्दाच्या पुंलिंगाचें स्त्रीलिंगांत केलेलें रूपांतर हें सहेतुक आहे. त्यांतला हेतु सफल होणें याचा अर्थ तुकारामबोवांनी विठ्ठलाविषयी जी भावनात्मक-कल्पनात्मक पातळी स्वतःच्या ठिकाणीं बाळगिलेली होती, त्या पातळीवर श्रोत्यांना अथवा वाचकांना नेणें हा होय. श्रोते अथवा वाचक जेव्हा त्या पातळीवर जातात, तेव्हा त्यांच्या ठायीं आपापल्या अनुभवानुरूप विशिष्ट रसवृत्ति निर्माण होते, आणि तुकारामबोवांचा अभिप्राय आणि श्रोत्यांची वृत्ति यांमध्ये जणू समेची वाहवा पडते ! अर्थात् 'विठ्ठल-विठाबाई' हें लिंगांतर सफल होतें. लिंगांतराच्या या साफल्यामध्ये लिंगभेदाचा दोष नुसता गौणच नव्हे, तर उपेक्षणीय ठरतो. किंबहुना, तो दोष दोषहि ठरत नाही; उलट गुणच ठरतो.

५. ध्व नि वि का र

बोलतांना योजिलेला ध्वनिविकार – आवाजाचा संकोचविकास – हा भाषेंत कधी-कधी अर्थभेदवाहक असल्याचें प्रतीतीला येतें. असा अर्थभेद उत्पन्न करणारा ध्वनिविकार हा व्याकरणाचा विषय होतो कीं नाही, असा एक प्रश्न येतो. उदाहरणार्थ, हें वाक्य पहा :

'तुझा काका आज जेवण करून परीक्षेला गेला.'

निर्लिप्त उदासीनपणाने हें वाक्य उच्चारिलें असतां या वाक्याचा जो अर्थ प्रतीतीला येतो, त्याहून वेगळाच अर्थ त्यांतील एखाद्या पदाचा वा अनेक पदांचा ध्वनिविकृतीने उच्चार केला असतां प्रत्ययाला येतो. जसें :

(१) '**तुझा** काका आज जेवण करून परीक्षेला गेला.'
(२) 'तुझा **काका** आज जेवण करून परीक्षेला गेला.'
(३) 'तुझा काका **आज** जेवण करून परीक्षेला गेला.'
(४) 'तुझा काका आज **जेवण** करून परीक्षेला गेला.'
(५) 'तुझा काका आज जेवण करून **परीक्षेला** गेला.'
(६) 'तुझा काका आज जेवण करून परीक्षेला **गेला.**'
(७) 'तुझा काका आज जेवण करून परीक्षेला गेला?'

हीं सातहि वाक्यें पदशः विचार करितां एकरूप आहेत. अर्थात् त्यांचे अर्थ पदशः पाहतां एकच असावयास हवे. परंतु या वाक्यांमधील या अथवा त्या पदावर आपण ध्वनिविकृतीने भर देऊं, तदनुसार त्यांचा अर्थ पालटतो, हें उघड आहे. वाक्यांमधील जाड ठशांतील पदें जशीं-जशीं ध्वनिविकृत होतील, तस-तसे त्यांचे अर्थ बदलतील. एवढेंच काय, पण ही ध्वनिविकृति जशी उणी-उधिक जोरदार असेल, तसा-तसा अर्थाच्या उण्या-अधिक सांद्रपणाचाहि अनुभव येईल. शिवाय, यांतील कोणत्याहि वाक्यांत एकाधिक पदावर ध्वनिविकृति योजिली असतां अधिक संमिश्र अर्थच्छटा उत्पन्न होतील. याहि संमिश्र अर्थच्छटांत ध्वनिविकृतीनुसार कमी-अधिक सांद्रता संभवेल. शिवाय, हे सर्व अर्थ अथवा त्यांच्या छटा संदर्भ, बोलणारी व्यक्ति, तिची मनोवृत्ति, तिचा हेतु, भावना, विषय इत्यादि कितीतरी घटकांवर अवलंबून राहणार. आणि पहावीं, तर पदें तींच, त्यांची रचना तीच, त्यांचें व्याकरणहि तेंच. अशा परिस्थितींत व्याकरणाची भूमिका कोणती असावी? आणि त्या भूमिकेचें स्पष्टीकरण कसें करितां येईल?

मला असें वाटतें की, असल्या प्रकारच्या अर्थभेदवाहक ध्वनिविकृतीचा पाठलाग करणें हें व्याकरणाच्या कक्षेपलीकडचें आहे; आणि म्हणून व्याकरणाने ध्वनिविकृतीचें पृथक्करण अथवा विवेचन करण्याची जोखीम घेणें योग्य नाही. ध्वनिविकृतीचें विश्लेषण हा एक स्वतंत्र विषय होऊं शकतो, हें मान्य करण्याला हरकत नाही; परंतु त्याचा समावेश व्याकरणांत करून व्याकरणशास्त्राचा अधिकार त्याच्या रीतसर क्षेत्राच्या पलीकडे चालविणें सयुक्तिक नाही. वाक्यांमधील पदें, प्रत्यय, घटक इत्यादिकांचा विचार केल्या-नंतर त्यांच्या पलीकडे व्याकरणाचें क्षेत्र ताणतां येणार नाही. ध्वनिविकृतीने होणाऱ्या अर्थभेदांमध्ये वाक्याचा संदर्भ, बोलणारी व्यक्ति, तिचा हेतु अशा अनेक घटकांचा कधी-कधी सुटा, तर कधी-कधी समकालींच संबंध असतो. या घटकांचा पाठलाग करणें हें व्याकरणाला शक्य नाही. कलेच्या पाठीमागे लागलेल्या 'हेतुसंशोधनाच्या गुप्त-पोलिसा'चा मागे एकदा तात्यासाहेब केळकरांनी उल्लेख केला होता, त्याची या प्रसंगाने आठवण होते. ध्वनिविकृतिजन्य अर्थभेद आणि त्यांचें पृथक्करण जर व्याकरणाने आपल्या शिरावर घेतलें, तर ध्वनिविकृतीच्या पाठीमागे त्याला 'हेतुसंशोधनाचा गुप्तपोलीस' लावून द्यावा लागेल. त्यालाहि मोठीशी हरकत आहे, असें नाही; परंतु व्याकरणाचें

मुदलीं हें कार्य नाही, हें लक्षांत घेतलें पाहिजे. शिवाय, तो गुप्तपोलीस हेतुसंशोधनांतच रमून जाण्याचा अथवा हरवून जाण्याचा संभव आहे. आणि समजा, त्या गुप्तपोलिसाला एकच हेतु वा भावना न सांपडतां अनेक हेतु वा भावना समकालीं गवसले, तर त्यांची विभक्त व्यवस्था कशी करणार ? आणि विभक्त व्यवस्था न करितां सामायिक व्यवस्था केली, तर पृथक्करणाची योजना कशी करणार ? तात्पर्य, ध्वनिविकृतिजन्य अर्थभेदाचें पृथक्करण हें व्याकरणांत दाखल न करणें हें युक्त होईल, असें वाटतें. वाटल्यास असें पृथक्करण अर्थविमर्शशास्त्रांत घालावें. संस्कृतांत ध्वनिविकृतीच्या विचाराचा समावेश काव्यशास्त्रांत केला आहे; आणि तें उजू आहे. ध्वनिविकार हा ‘ आंगिक ’, ‘ वाचिक ’, ‘ आहार्य ’ आणि ‘ सात्त्विक ’ या चतुर्विध अभिनयांतील ‘ वाचिक ’ अभिनयाचा भाग आहे. अर्थात् तो नाट्यशास्त्राच्याहि कक्षेंत येईल. ‘ भावबंधन ’ नाटकामधील “ माझं नांव घनश्याम ! ” या घनश्यामाच्या वाक्याचे चिंतामणराव कोल्हटकर तालमीच्या वेळीं अनेक अर्थ वठवून दाखवीत असत, हें जाणकारांना माहीत आहे. तेव्हा याहि कारणासाठी ध्वनिविकार आणि त्याचा विमर्श हे व्याकरणाच्या क्षेत्राबाहेर ठेवणें योग्य होईल.

६. गद्यपद्यविमर्श

व्याकरणाच्या रचनेच्या वेळीं भाषेच्या कोणत्या स्तरभेदाचें व्याकरण अभिप्रेत आहे, हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. याचा विचार पूर्वी येऊन गेलेला आहे. परंतु भाषेच्या स्तरभेदाचा निश्चय झाल्यावरहि गद्यपद्याचा विवेक करणें आवश्यक ठरतें. तसेंच, लिखित अथवा मुद्रित भाषास्तरभेद आणि दैनंदिन व्यवहारांत अथवा बोलण्यांत असलेला भाषेचा स्तरभेद यांचाहि विवेक करावा लागतो. कोणत्याहि एका काळच्या पद्याचें समग्र व्याकरण लिहिणें हें दुर्घट आहे. कारण पद्यामध्ये येणारे अनेक प्रयोग, प्रत्यय, रचना, रूपें हीं अशीं असतात की, तीं प्राचीन कालापासून पद्यामध्ये मात्र रूढ झालेलीं आणि टिकून राहिलेलीं असतात. पद्यामध्ये शैलीच्या अथवा काव्याच्या मुद्द्यावर शिलीभूत (fossilised) प्रयोगहि येतात. पद्याचें क्षेत्र हें बहुशः शैलीनें प्रभावित झालेलें असतें. त्यामुळे पद्याच्या क्षेत्रामधील अनेक प्रयोग हे प्रचलित भाषेच्या स्तर-भेदापासून कालदृष्ट्या दूरान्वित असतात. पद्यांतील शब्दांचे, पदांचे उच्चारहि भिन्न असतात; कारण पद्य हें छंदोरचनाविषयक नियमांच्या क्षेत्रामध्ये येतें. क्षेत्रभेदानुसार अधिकारभेद कसा मानावा लागतो, याचें विवेचन यापूर्वी येऊन गेलेलें आहे. अर्थात् गद्य आणि पद्य यांमध्ये अंतर पडतें. हें अंतर आपल्याला भाषेच्या घटनेच्या दृष्टीनें लक्षांत घ्यावयाचें आहे, हें या स्थळीं लक्षांत ठेविलें पाहिजे. पद्यांतल्या समग्र भाषेचें शिलीभवन (fossilisation) झालेलें असतें, असें नव्हे; परंतु पद्यभाषेमध्ये शिलीभूत प्रयोग वारंवार येतात. या प्रयोगांचा तत्कालीन प्रचलित भाषेशीं दूरान्वयानेंच संबंध असल्यामुळे प्रचलित भाषेच्या व्याकरणनियमांच्या बंधांत ते-ते प्रयोग अथवा तीं-तीं रूपं

चपखल बसत नाहीत, कष्टानेच बसवावीं लागतात, आणि कधी-कधी मुळीच बसत नाहीत. संस्कृतांतल्याप्रमाणे पद्य हें जेव्हा गद्याच्या कक्षेशीं समव्याप्त होतें, तेव्हा कांही प्रश्न उत्पन्न होत नाही; परंतु अशी स्थिति विरळ म्हणावी लागेल. निदान उच्चाराच्या बाबतींत तरी पद्य हें गद्याहून वेगळें पडतें, मग तें पद्य 'मुक्त' म्हटलेल्या छंदांत का असेना. उदाहरणार्थ, तृतीयेच्या एकवचनाचा 'एं' हा प्रत्यय अथवा तृतीयेच्या अनेकवचनाचे 'ईं', 'हीं' हे प्रत्यय गद्यांत फारकरून येत नाहीत; पण त्यांचा पद्यामधील प्रयोग विपुल आहे. गद्याशीं बरीच घासून जाणारी भाषा ज्यांत आहे, असा पुढील साधासरळ 'फटका' वाचिला, तरी त्यांतहि फटकलेले प्रयोग आणि उच्चारांचा भेद सहज प्रत्ययाला येईल :

विकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको।
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको।
चल सालसपण धरुनि निखालस बोला खोट्या बोलुं नको।
अंगिं नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको।

जो फटका गद्याला इतका जवळ आहेसें वाटतें, त्याचें गद्य रूपांतर शब्दशः असें होईल :

विकट वाटेची वहिवाट नसावी. धोपट मार्ग सोडूं नको(स). आपला संसारामधिं ऐस. उगाच भटकत फिरूं नको(स). सालसपण धरून चल. खोटा बोल निखालस बोलूं नको(स). अंगिं सदा नम्रता असावी. कुणावर राग धरूं नको.

उच्चार, आघात, ऱ्हस्वदीर्घ, रूपें इत्यादि कितीतरी बाबतींत हें गद्य रूपांतर मूळ 'फटक्या'पासून कसें दूर फटकलेलें आहे, तें ध्यानीं यावें, म्हणून पदांना अधोरेखा योजिल्या आहेत. अधोरेखित पदें पद्याहून भिन्न असलेल्या प्रचलित भाषेंतील आहेत; आणि अनधोरेखित पदें मूळ फटका आणि प्रचलित भाषा यांमधील मेळ अथवा साधारण ऐक्य दर्शविणारीं आहेत. या फटक्यांतील पद्यांग आणि गद्यांग यांचें प्रमाण सहज पाहिलें, तर असें दिसेल की, एकंदर ३१ पदांपैकी केवळ १२ पदांत पद्यांगाचा गद्यांगाशीं कांही मेळ होतो; उरलेल्या १९ पदांमध्ये उच्चार, आघात, रूपें, रचना या बाबतींत गद्यांग आणि पद्यांग हीं वेगळीं पडतात. पद्यामध्ये गद्याचे मूळचे आघात तर फार बदलतात.[1] पद्यांत 'करून', 'करुन', 'करुनि', 'करुनी', 'करूनि', 'करुनियां', 'करुनीयां', 'करूनियां', 'करूनीयां' अशीं विविध रूपें योजिलीं जातात. गद्यांत मात्र यांतलें 'करून' एवढें एकच रूप योजितात. अर्थात् गद्यपद्यांच्या एकवट व्याकरणांत यांतील सर्वच्या-सर्व ९ रूपांची व्यवस्था करावी लागेल; तर गद्यांत प्रयुक्त असें त्यांतील रूप

१. वस्तुतः, पद्य हें लघुगुरुविवेकाने नियमित होतें; आघातांनी नव्हे. परंतु येथे गद्य-पद्यांतील फरक दाखविण्यासाठी स्थूल मानाने पद्याला अनुलक्षून आघातांचा निर्देश केला आहे.

केवळ एकच असतें. प्रचलित अनेक व्याकरणांत पद्यांतील सर्व रूपादिकांचा निवाडा केलेला नसतो. परंतु कांहीं विभक्तिप्रत्ययादि कार्यें मात्र दिलेलीं असतात. अर्थातच हें योग्य नव्हे. त्यापेक्षा केवळ गद्याचें स्वतंत्र व्याकरण रचणें हें श्रेयस्कर होय. कारण त्याने गद्यभाषेचें निखळ स्वरूप ध्यानीं येईल. पद्याच्या भाषेच्या व्याकरणरचनेंत वेगळ्या अडचणी कशा असतात, त्याचा निर्देश मागे केलाच आहे.

गद्याच्या भाषेचा विचार करितांना असें दिसेल की, म्हणींमध्येंहि पुष्कळदा शिलीभूत रूपें येतात; अथवा शब्दांचीं जुनीं रूपें तगून राहतात. अशा वेळीं त्या रूपांचें व्याकरण गद्यांतील रूपांच्या व्याकरणाशीं मेळ साधीत नाही. उदाहरणार्थ, ' राजा बोले, दळ हाले, ' या म्हणीमध्यें ' बोले ', ' हाले ' हीं क्रियापदांचीं टिकून राहिलेलीं जुनीं रूपें होत. बोलण्याच्या भाषेंत आपण त्यांचा वापर करीत नाहीं. ' लेकी बोले, सुने लागे, ' या म्हणींतलीं तर सर्वच्या-सर्व पदें जुनीं आहेत; त्यांतलें एकहि पद आज आपण त्या स्वरूपानें योजीत नाहीं. म्हणींमधलीं अशा प्रकारचीं पुष्कळ रूपें पद्यांतील रूपांच्या पातळीवर जातात. बोलण्यामध्येंहि ' जाणे ', ' म्हणे ' इत्यादि रूपें अशींच आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या रूपांचा विचार आपल्या दैनंदिन भाषेच्या व्याकरणांत करावयाचा कीं काय, हें प्रथम ठरविलें पाहिजे. करावयाचा असल्यास त्यापोटी उत्पन्न होणाऱ्या अडचणींचा परिहार कसा करावयाचा, त्याचाहि निश्चय केला पाहिजे. लिखित अथवा मुद्रित गद्य आणि बोलण्यामधील दैनंदिन व्यवहाराची भाषा यांहिमधील भेदांचा अशा भूमिकेने विचार करणें सयुक्तिक होईल. अशा प्रकारची सयुक्तिक भूमिका व्याकरणाच्या रचनेला अधिक रेखीवपणा आणि निश्चितपणा आणण्यास साहाय्यकारी ठरेल.

श्री. कुलगुरुमहाशय, आणि विद्वज्जन हो,

मराठीच्या व्याकरणाची रचना करितांना ज्या कांहीं विषयांचा विचार आणि चिकित्सा करणें अगत्याचें आहे, असें मला वाटत आलें आहे, त्या विषयांचा मीं आतापर्यंत उपन्यास केला. ज्या भूमिकेने हा उपन्यास मीं केला, ती स्वीकारिल्यावर व्याकरणांतील तपशिलाचा भाग कसा दिसेल, याचें यापुढे संक्षेपानें चित्र रेखाटावयाचें आहे. मी काढणार असलेलें हें चित्र तैलरंगांतील तर असणार नाहीच, पण जलरंगांतहि तें रेखाटण्याची उभारी मी धरूं शकत नाहीं. नुसत्या पेन्सिलीने काढिलेला तो एक स्थूल आराखडा असणार आहे. त्या आराखड्यांत फार तर कांहीं आकृति दिसेल. मराठी भाषेचा आणि वाङ्मयाचा आजचा काळ हा नवजीवनाचा आहे, अशी आपणां सर्वांनाच जाणीव होत आहे. मराठीला आज अनेक दिशांनी जोरदार धुमारे फुटत आहेत. ज्ञानदेवांनी असें म्हटलें आहे, —

ना तरि उद्यानीं माधवी घडे तैं वनशोभेची खाणि उघडे
आदिलापासौनी अपाडें जिया परीं ज्ञानदेवी, १·४३.

मराठीच्या उद्यानांत वसंतऋतूचे वारे वाहूं लागले आहेत; आणि 'वनशोभेची खाणि उघडणार,' याची आपल्याला ग्वाही पटत आहे. पुढे 'उघडावयाच्या वनशोभेच्या खाणीं'त प्रस्तुत प्रयत्नाला गवताच्या एखाद्या पंद्याचें स्वरूप आलें, तरी तें पुरेसें होईल, असें मला वाटतें. मराठी भाषेचा जो कोणी महावैयाकरण पुढे येणार आहे, त्याच्या स्वागताची सिद्धता चालली असतां आपल्याला त्या सिद्धतेंत नुसती बैठक घालण्याची तयारी करण्याचा जरी मान मिळाला, तरी त्यानें मी स्वतःला धन्य समजेन. खरा मान आहे, तो त्या महावैयाकरणाचा; बैठक घालूं जाणाऱ्याचा नाही.

दुसरें

व्याख्यान

ध्वनि विमर्श

दुसरें व्याख्यान

ध्वनिविमर्श

१. भाषा-व्याकरण-संबंध

भाषा आणि व्याकरण यांचा ग्राह्यगृहीतभाव. त्यावरून भाषा-व्याकरणाचें परस्परसंपृक्त, समव्याप्त स्वरूप.

२. भाषेचें स्वरूप : सिद्ध आणि साधित

बोलण्यांतील भाषा आणि तिचा लिखित-मुद्रित आविष्कार. उपजीव्योपजीवकभाव. ध्वनि-रेखा-संकेत. भाषेचें प्रयोजनापेक्ष स्वरूप. भाषेची पारस्परिक आकलनीयता. या आकलनीयतेंतील कमींत-कमी अडचणी म्हणजे अधिकांत-अधिक मान्यता.

३. प्रमाणभाषा

प्रमाणभाषेच्या 'बहुमान्यते'चें स्वरूप. प्रमाणभाषा आणि भाषाभेद. प्रमाण-भाषेच्या आकलनीयतेचें क्षेत्र.

४. भाषा-ध्वनि-संबंध

भाषेच्या द्विविध कोटि. त्यांमध्ये मानवनिर्मित आणि श्रवणविषयभूत ध्वनि. ध्वनि हें भाषेचें उपादानकारण. ध्वनींचें अनंतत्व आणि अ-द्वितीयत्व. भाषाविष्काराचें पृथगात्म व्यक्तित्व. ध्वनींच्या वर्गीकरणाची आवश्यकता. ध्वनींच्या वर्गीकरणाची भूमिका.

५. वर्णमाला

अक्षरमाला आणि वर्णमाला. अक्षरें आणि वर्णमाला यांतील प्रतिसंवाद (correspondence) : उदाहरणें. ध्वनींचे अंत्यावयवविभाग म्हणजे वर्ण. वर्णमालेची सममानता (symmetry) आणि व्यवस्था (order). उदाहरणें. यजमानभूत वर्णमाला आणि पाहुणे वर्ण. पाहुणे वर्ण कुटुंबीय कसे बनतात तें. या संदर्भांत मराठीचा कौल : उदाहरणें-अॅ-ऑ-वर्ण. आणखी उदाहरणें : 'बॅट'-मधील अंत्य 'ट'. खटपट, टिळक रोड, लोणावळें, खंडाळा, कल्याण, टिळक. वर्णांचें पंक्तिपावनत्व. भाषांमधील देवघेवीचा प्रश्न. तत्सम, तद्भव, देश्य अशा विभागणीचा पुनर्विचार. अशी विभागणी अनावश्यक, अकिंचित्कर. भाषा म्हणजे मोत्याच्या शिंपल्यांतलें कालव.

१. भाषा-व्याकरण-संबंध

मित्र हो,

भाषा आणि व्याकरण यांच्या परस्परांशीं असलेल्या संबंधांचा यथार्थ विचार कोणत्या भूमिकेनें करावयाला पाहिजे, त्याचें विवेचन यापूर्वीच्या पहिल्या व्याख्यानांत केलें.[१] या संदर्भांत आणखी एक पुढील मुद्दा लक्षांत घेणें हें योग्य होईल. एखाद्या भाषेच्या व्याकरणाची रचना करितांना अथवा तिच्या व्याकरणाचें विवेचन करितांना ती व्याकरणाची रचना अथवा तें व्याकरणाचें विवेचन हेंहि पुन्हा भाषेच्याच आश्रयानें करावें लागतें; आणि तीहि भाषा व्याकरणांतच बांधिलेली असते. म्हणजे त्या भाषेचें व्याकरण आपण एका परीनें गृहीत करितों, आणि पुन्हा त्याच व्याकरणाची रचना अथवा विवेचन करूं जातों. शास्त्रतः पाहतां ही अन्योन्याश्रित अशी अनवस्था म्हणावी लागेल. उदाहरणार्थ, पाणिनीनें ज्या संस्कृत भाषेचें व्याकरण रचण्याच्या उद्देशानें 'अष्टाध्यायी' रचिली, तीच संस्कृत भाषा ही 'अष्टाध्यायी'चीहि भाषा आहे; आणि त्या भाषेचें व्याकरण पुन्हा खुद्द 'अष्टाध्यायी'च्या भाषेमध्ये गृहीत आहे. ज्या मराठी भाषेच्या व्याकरणाचा पुनर्विचार करण्यासाठी या व्याख्यानमालेच्या द्वारा मी प्रवृत्त झालों आहें, ती मराठी भाषा आणि तींत समव्याप्त रितीनें अंतर्भूत असलेलें व्याकरण मी या वेळीं गृहीत करीत आहें, हें उघड आहे. गंगापूजनासाठी गंगाजलाचाच उपयोग करावा, तसें हें आहे. परंतु ही परिस्थिति अथवा तींतला हा कोलदांडा अनिवार्य आहे. भाषा आणि व्याकरण यांच्यामध्ये जी समव्याप्त आणि परस्परसंपृक्त अशी अवस्था असते, तीमुळे भाषेवाचून निवळ व्याकरणाचें विवेचन करणें हें अशक्य आहे. कारण व्याकरणालाहि भाषा म्हणून असतेच. या पेचारूयून बाहेर पडण्याचा एक मार्ग आहे; पण तो कल्पनागत आहे. तो मार्ग असा कल्पितां येईल की, व्याकरणाच्या विवेचनासाठी, अर्थात् बोधासाठी, भाषा हें माध्यम न वापरतां रंग, गति, स्वर अशांसारखें भाषेचा मुदलीं संपर्क नसलेलें एखादें माध्यम वापरणें. असें एखादें माध्यम जर वापरतां आलें, तर रचनाविषय झालेल्या व्याकरणाचा कांहीहि अंश गृहीत न करितां आपल्याला त्याचें निर्लिप्त विवेचन करितां येईल. कारण रंग, गति, स्वर यांच्या निर्भेळ स्वरूपामध्ये भाषेचा मुळीच स्पर्श नाही. परंतु अशा प्रकारचें माध्यम वापरणें ही जरी आदर्श अवस्था असली, तरी ती आपल्या आटोक्याबाहेरची आहे.

याला आणखी एक लहानसा फाटा फुटण्यासारखा आहे : तो हा की, ज्या भाषेचें व्याकरण रचावयाचें असेल, तीवाचून अन्य एखादी भाषा व्याकरणाच्या विवेचनासाठी घेणें; अर्थात् मराठीचें व्याकरण मराठीव्यतिरिक्त अन्य एखाद्या भाषेंत रचणें.

१. पहा : पृष्ठें ७–९.

समजा, मराठीच्या व्याकरणाची रचना ही इंग्रजी भाषेच्या द्वारा जर केली, तर रचना-विषय असलेलें व्याकरण आणि त्या व्याकरणाची बोधभाषा हीं एकमेकांपासून भिन्न झाल्यामुळे ज्या भाषेचें व्याकरण रचावयाला प्रवृत्त व्हावयाचें, तिचेंच व्याकरण पुन्हा अगोदर गृहीत करावयाचें, ही अनवस्था टळेल हें खरें, पण मग दुसऱ्या भाषेचें, अर्थात् येथे इंग्रजीचें, व्याकरण या स्थितींत गृहीत करावें लागतेंच. तात्पर्य, भाषेचें मूलभूत स्वरूप हें शब्दमय असल्याकारणाने तिचें व्याकरण रचितांना जोपर्यंत शब्द अपरिहार्य आहे, तोवर आतापर्यंत विवेचिलेला पेचदेखील अनिवार्य राहणार. भाषेचें व्याकरण हें ग्राह्य असेल, तर त्याच व्याकरणांत ग्रथित झालेली भाषा गृहीत असते; आणि भाषेचें स्वरूप ग्राह्य असेल, तर त्याच भाषेचें व्याकरण हें गृहीत असतें. भाषाव्याकरणसंबंधांतील हा ग्राह्य-गृहीतभाव पुढील आलेखनाने आणखी स्पष्ट होण्याला साहाय्य होईल. या आलेखनांत १ (अ) आणि १ (आ) यांमध्ये भाषाव्याकरणांतला अन्योन्याश्रित ग्राह्यगृहीतभाव दर्शविला आहे. २ यांत व्याकरणासाठी अन्यभाषा आणि तिचें गृहीत व्याकरण दाखविलें आहे; आणि ३-मध्ये व्याकरणरचनेसाठी आदर्श (पण अशक्य) स्थिति रेखली आहे.

भाषा-व्याकरण-संबंध : ग्राह्य-गृहीतभाव

१. ज्या भाषेचें व्याकरण, तीच भाषा व्याकरणांत गृहीत.

(अ) मराठी भाषेंत मराठी भाषेचें व्याकरण गृहीत.

भा ←——→ व्याकरण ←——→ षा

(ग्राह्य) (मराठी) (गृहीत) (मराठीचें) (ग्राह्य) मराठी

(आ) मराठीच्या व्याकरणासाठी मराठी भाषा गृहीत.

व्याक ←——→ भाषा ←——→ रण

(ग्राह्य) (मराठीचें) (गृहीत) (मराठी) (ग्राह्य) (मराठीचें)

२. ज्या भाषेचें व्याकरण, तीहून व्याकरणाची वेगळी भाषा.

उदाहरणार्थ, मराठीच्या व्याकरणासाठी इंग्रजीचें व्याकरण गृहीत.

व्याकरण (मराठीचें) (ग्राह्य) ——→ अन्यभाषा (इंग्रजी) (ग्राह्य)

व्याकरण (इंग्रजीचें) (गृहीत) ——→ व्याकरण (मराठीचें)

३. आदर्श (पण अशक्य) अवस्था. व्याकरणासाठी व्याकरणबाह्य माध्यम गृहीत.

व्याकरण ——————→ रंग, अथवा गति, अथवा स्वर, इत्यादि.
(मराठीचें) (भाषेव्यतिरिक्त अन्य माध्यमें)
(ग्राह्य) (गृहीत)

ज्या वस्तूचें स्वरूप समजून घ्यावयाचें असतें, तीच वस्तु अथवा तिचा कांही अंश पुन्हा ज्ञानांत गृहीत करणें हें योग्य नाही. असें जरी असलें, तरी शास्त्रचर्चेत असे प्रसंग कधीकधी येतात. मानसशास्त्राच्या विवेचनांत मनाचें ज्ञान करून घेतांना पुन्हा मनाच्याच साधनाने तें करून घेतों. त्याचप्रमाणे ‘ काल ’ (Time) या तत्त्वांत बंदिस्त राहून कालतत्त्वाचा विचार करणें, दिक् (Space) या तत्त्वांत निगडित राहून दिक्तत्त्वाचें विवेचन करूं जाणें, अथवा कार्यकारणभावाच्या (Causation) निर्धारणामध्ये कार्यकारणभाव गृहीत करणें अशासारख्या कैच्या मानवी बुद्धीला पडलेल्या आहेत. भाषा आणि व्याकरण यांच्या संबंधाची उकल करितांना मर्यादित अर्थानें असाच प्रसंग येतो. वैशेषिकांच्या भाषेने बोलावयाचें झालें, तर भाषा आणि व्याकरण हें युग्म ‘ अयुतसिद्ध ’ आहे. म्हणजे भाषा आणि व्याकरण हीं परस्परांपासून विभक्त करितां येणार नाहीत, कारण तीं नित्य अविभक्त अवस्थेमध्येच एकवटलेलीं अशीं उपलब्ध आहेत; तसेंच, भाषा आणि व्याकरण हीं परस्परांशीं जोडूं पाहणें हेंहि वृथा आहे. कारण जीं नित्य अविभक्त आहेत, तीं जोडणार कशीं ? तात्पर्य, भाषा आणि व्याकरण यांच्या संबंधांत संयोग-विभागाची कल्पना सर्वथा आगंतुक आणि अनुपपन्न आहे.

आत्तापर्यंत ज्याचा विचार केला, तो मुद्दा केवळ तात्त्विक स्वरूपाचा आहे हें खरें, आणि सर्वसाधारण स्वरूपाच्या व्यवहारांत त्या मुद्द्यांत अंतर्भूत असलेल्या पेचाची बाधा होत नाही हेंहि खरें, पण भाषा आणि तिचें व्याकरण यांच्या परस्परसंपृक्त आणि समव्याप्त स्वरूपाविषयी (interpenetrated co-extensiveness) यापूर्वीच्या पहिल्या व्याख्यानांत मीं जें विवेचन केलें,[1] त्याची अधिक उकल करण्याच्या दृष्टीने हा मुद्दा उपयुक्त ठरेल, आणि या संबंधांतला एक वेगळा पैलू कळेल.

२. भाषेचें स्वरूप : सिद्ध आणि साधित


व्याकरणाचा विचार करितांना आपण कोणत्या भाषेच्या व्याकरणाचा परामर्श करीत आहों, याची स्पष्ट कल्पना असली पाहिजे, हें उघड आहे. भाषा अथवा भाषाभेद यांचा तात्त्विक भूमिकेने सुसंगत विचार करणें हें व्याकरणाचें मूलभूत प्रयोजन असल्याकारणाने व्याकरणविचारांत कोणतीहि भाषा वा भाषाभेद जरी उपस्थित होण्यासारखा असला, तरी व्यवहाराच्या दृष्टीनें कांही मर्यादा आखून घेणें हें अगत्याचें ठरतें. भाषेचीं

१. पहा : पृष्ठें ७–९.

प्रयोजनें दैनंदिन व्यवहारामध्ये अनेकविध असलीं, तरी तिचें मूलभूत स्वरूप परस्परांशीं बोलण्याच्या व्यवहारामध्येंच प्रकट होतें. हा बोलण्याचा व्यवहार हें भाषेचें सिद्ध स्वरूप होय. त्याच भाषेचा जेव्हा लेखनामध्ये वा ग्रंथामध्ये आविष्कार होतो, तेव्हा तिचें स्वरूप यथासंभव पालटतें. तें तिचें साधित स्वरूप म्हणतां येईल. उदाहरणार्थ, आत्ता या वेळीं मी जो कांही विषय स्वतःच्या लेखनामधून आपल्याला वाचून दाखवीत आहें, आणि आपण श्रोते तो ऐकत आहां, त्यांत माझी बोलण्यांतली भाषा, त्या माझ्या बोलण्यांतून प्रतिबिंबित झालेला पण कांहीसा पालटलेला[१] असा तिचा आविष्कार आणि आपली त्या आविष्काराला असलेली भाषास्वरूपविषयक मान्यता एवढ्या गोष्टींचा समावेश आहे. तथापि जें लेखन मी आपल्याला वाचून दाखवीत आहें, तें कांही सर्व-तंत्रस्वतंत्र नाही; तर तें माझ्या बोलण्यांतल्या भाषेवरच अवलंबून आहे. ती माझी भाषा उपजीव्य आणि मी या क्षणीं वाचून दाखवीत असलेलें रेखात्मक लेखन हें उपजीवक, असा त्यांचा उपजीव्योपजीवकभाव आहे. बोलण्यांतली भाषा ही श्रुतीचा विषय आहे, तर तिचा लिखित-मुद्रित आविष्कार हा दृश्य आणि केवळ कल्पनागत स्थितींत श्राव्य असा असतो. कारण ज्या वेळीं आपण एखादें पुस्तक मनांतल्या मनांत वाचीत असतों, त्याहि वेळीं त्यांतल्या लिपीचीं प्रतीकें हीं ज्या मूलध्वनींचें प्रतिनिधित्व करीत असतात, ते मूलध्वनि आपण कल्पनेने मनाशीं उद्भावित करीत असतों. हे उद्भावित केलेले मूलध्वनि अव्यक्त, मनोगत असतात, आणि रूढ संकेतांच्या बळाने आपण ते जाणतों. कल्पनेने उद्भावित केलेले हे मूलध्वनि जेव्हा आपल्या मुखाच्या द्वारा व्यक्त होतात, त्या वेळीं त्यांचें मूळचें श्रुतिगोचर स्वरूप फिरून मूर्त होतें, साकार होतें. यालाच आपण 'पुस्तक मोठ्याने वाचणें' असें लौकिकांत म्हणतों. भाषेचें हें लेखनाच्या पर्यायाने मिळालेलें स्वरूप होय. आणि या पर्यायगत स्वरूपासाठी मूलध्वनि आणि त्यांचें प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध रेखा यांच्यामधील संकेतांचें ज्ञान अपरिहार्य आहे. ध्वनि-रेखा-संकेत हा भाषा आणि लेखन यांतला दुवा आहे. हा दुवा लुप्त झाला, म्हणजे लिपि ही निवळ आपल्या रेखामय कलेवराच्या स्वरूपांत उरते. मग लिपि ही केवळ लिपि म्हणून राहते, आणि गिरबिडलेल्या रेघा एवढेंच तिचें स्वरूप उरतें. कारण त्या रेखां-मधलें ध्वनिरूप चैतन्य लुप्त झालेलें असतें. मोहन-जो-दाडोची उत्खननांतली लिपि आज या अचेतन अवस्थेमध्ये आहे. आणि ती दुर्बोध आहे, याचा अर्थ हा की, तींतल्या रेखांचे आज लुप्त झालेले मूळचे संकेतनिष्ठ ध्वनि आपल्याला गवसलेले नाहीत. ते जेव्हा गवसतील, तेव्हा ती लिपि पुन्हा सचेतन होईल, पुन्हा आपल्याशीं बोलूं लागेल.

१. 'कांहीसा पालटलेला' असें जें येथे म्हटलें आहे, त्याचें कारण असें की, प्रस्तुत विषयाला अनुसरून साहजिकच कांही परिभाषा कांही विशिष्ट प्रयोजनासाठी योजावी लागत आहे. त्यामुळे या माझ्या बोलण्यांत नित्याच्या बोलण्याहून थोडासा वेगळेपणा आपल्याला जाणवणें अपरिहार्य आहे. परिभाषा म्हणजे विषयावलंबी असा मर्यादित भाषिक संकेत.

पण हेंहि पूर्णांशाने बरोबर नाही. ती लिपि ज्यांचें प्रतिनिधित्व करिते, ते नुसते ध्वनि गवसल्यानें अर्थबोधाचा शेवटचा कार्यभाग होईल, असें नाही. ध्वनि गवसल्यानंतर ते ध्वनि आणि अर्थ यांच्यामध्ये जो संकेत आहे, जो ध्वनिप्रतिसंवादी असा संकेत आहे, तोहि माहीत झाला पाहिजे. तो माहीत झाला, म्हणजे मग त्या लिपीमध्ये गोठून राहिलेले ध्वनि मोकळे होतील, आणि ध्वनिसंकेतित अशा अर्थाच्या बोधाचा मार्ग प्रकाशित होईल. तात्पर्य, लिपि ही अर्थाशीं साक्षात् संबद्ध नसते, तर ध्वनींच्या द्वारा म्हणजे परंपरेने संबद्ध असते. हा संबंध असा दाखवितां येईल :



अशा प्रकारें भाषेचीं दोन स्वरूपें आपल्याला युक्तिवादपूर्वक सांगतां येण्यासारखीं आहेत. तिचें सिद्ध स्वरूप हें बोलण्यामध्ये ऐकूं येतें, आणि साधित असें पर्यायी स्वरूप लेखनांत दिसून येतें. भाषेच्या या साधित स्वरूपाचीं अनेकविध प्रयोजनें सांगतां येतील. हीं प्रयोजनें लोकचरितामध्ये महत्त्वाचींहि असतील. भाषेच्या या साधित स्वरूपामुळे, अर्थात् लिखित-मुद्रित आविष्कारामुळे, तिच्या मूळच्या सिद्ध स्वरूपाला साहाय्य होत असेल, अथवा समर्थन लाभत असेल; पण तिचें सिद्ध स्वरूप बोलण्यामध्ये आहे, हें कधीहि नाकारतां येणार नाही, आणि विसरतांहि नये. लिखित-मुद्रित भाषेचा परामर्श हा कितीहि महत्त्वाचा असला, तरी तें भाषेचें सर्वस्व नव्हे, आणि तें तिचें जीवन नव्हे. लिखित-मुद्रित भाषा ही मुळांत 'वाङ्मय' म्हणजे 'वाग्रूप' अशीच होती. तिचा रेखात्मक आविष्कार हा उघड-उघडच उत्तरकालीन आहे. त्यांत भाषेची समृद्धि अथवा संपन्नता एक वेळ दिसेल, परंतु या समृद्धीचा अथवा संपन्नतेचा मूलस्रोत 'भाषे'मध्ये अर्थात् 'बोलण्या'मध्ये आहे. या दृष्टीनें 'भाषा' या शब्दाचा उगम जो 'भाष्' म्हणजे 'बोलणें' या धातूमध्ये आहे, तो लक्षणीय आणि समर्पक म्हटला पाहिजे. प्रयोजनाला अनुलक्षून आणि जीवनानुभवाच्या उण्या-अधिक मर्यादांना अनुसरून बोलण्यांतल्या भाषेचें[1] स्वरूप लिखित भाषेच्या[1] स्वरूपापेक्षा कमी-अधिक मर्यादित होईल, हा प्रश्न वेगळा. पण तसें पाहतां लिखितहि भाषेचें स्वरूप प्रयोजनापेक्ष आणि कमी-अधिक मर्यादित होतेंच. भाषा ही बोलण्यांतली असो, अथवा लिहिण्यांतील असो, तिचें स्वरूप प्रयोजनापेक्ष असतें. न्यायालयामध्ये जन्मभर कारकुनी करणारा एखादा गृहस्थ आणि केवळ गृहकर्मामध्ये व्यग्र असलेली त्याची साध्यासुध्या वळणाची बायको

१. खरें म्हणजे 'बोलण्यांतली भाषा' हा शब्दप्रयोगच पुनरुक्तीने दूषित आहे; आणि 'लिखित भाषा' हा शब्दप्रयोग असंगतीने दूषित आहे. कारण जी 'लिखित' म्हणजे 'लिहिलेली' आहे, ती 'भाषा' (< √भाष्) म्हणजे 'बोलली जाणारी' कशी ?

यांच्या जीवनानुभवांना अनुसरून आणि त्या-त्या वेळच्या प्रयोजनांना अनुलक्षून त्यांच्या बोलण्यांतल्या भाषांना मर्यादा पडतात, हें जसें खरें; त्याचप्रमाणे आत्मचरित्र लिहिणारा एखादा श्रेष्ठ साहित्यिक आणि पदार्थविज्ञानशास्त्र अथवा जीवशास्त्र यांवर पुस्तक लिहूं जाणारा एखादा थोर शास्त्रज्ञ यांच्या लिखित भाषेमध्ये त्यांच्या-त्यांच्या प्रयोजनांना आणि जीवनानुभवांना अनुलक्षून फरक वा मर्यादा पडतात, आणि पडणार, हें उघड आहे. बोलण्यामधली भाषा ही बरीच मर्यादित असते, पण लिखित-मुद्रित भाषा कमी मर्यादित असते, अशा प्रकारचा युक्तिवाद कोणीं केला, तर त्या युक्तिवादाला फारसें बळ बांधितां येणार नाही. कारण मर्यादा ही दोन्हीकडे असते. तेव्हा वाङ्मयाचा व्याप, पसारा फार मोठा, उलट दैनंदिन व्यवहारामधली भाषा ही फार मर्यादित आणि अल्पक्षेत्र, असें म्हणणें हें योग्य नाही. शिवाय, आत्ता सांगितल्याप्रमाणे बोलण्यांतली भाषा हा मूळ झरा असल्याकारणानें, आणि त्या-त्या वेळचें विशिष्ट प्रयोजन हें पालटत अथवा व्यभिचरित होत असल्याकारणानें, त्या बोलण्यांतल्या भाषेचा आणि तिच्या व्याकरणाचा विचार हा येथे प्रधान आहे. या विषयांत आणखी एक आगंतुक कारण असें सांगतां येण्यासारखें आहे की, आजपर्यंत मराठी भाषेचीं व्याकरणें जीं लिहिलीं, तीं सर्व प्रायः लिखित-मुद्रित भाषेचीं होतीं; बोलण्यांतल्या भाषेचें स्वरूप व्याकरणरचनेच्या दृष्टीनें बव्हंशीं उपेक्षित राहिलें. तेव्हा या भाषेचें व्याकरण पाहणें हें योग्य होय. मराठीच्या व्याकरणाच्या पुनर्विचारांत हा मुद्दा पायाभूत म्हणावा लागेल.

पण एकच भाषा बोलणाऱ्या लोकांच्या समाजामध्येहि अनेक थर असतात, संघ असतात, भाषाभेद असतात, आणि व्यक्तीगणिक बारीकसारीक फरक असतात. अशा स्थितींत कोणती भाषा या स्थळीं विचारांत घ्यावयाची, असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. परंतु हा प्रश्न साधारणतः दर्शवितात तेवढा बिकट नाही, आणि त्यांतला युक्तिवादहि सबळ नाही.[1] भाषा ही नित्य बदलती असते, हें खरें; तींतला बदल हा खगोलांतल्या ज्योतिर्गोलांमधल्या अंतराप्रमाणे दीर्घ कालानंतर आपल्या लक्षांत येतो, हेंहि प्रसिद्ध आहे; भाषा ही व्यक्तीगणिक वेगळी असते, हें खरें; एकाच व्यक्तीचीहि भाषा त्या व्यक्तीच्या बाळपणांत, किशोरावस्थेंत, पोरवयांत, कुमारस्थितींत, तारुण्यांत, पक्वदशेंत, वार्धक्यामध्ये पालटते, हेंहि खरें; पण तरीहि भाषेची स्थूल एकविधता ही समाजबोधाचा (communication) जो दैनंदिन व्यवहार चालतो, त्यांत आपल्या प्रत्ययाला येते, आणि आपल्या जाणिवेचा भाग बनते. नदीच्या प्रवाहांत हात बुडविला असतांना तो प्रवाह प्रतिक्षणीं वाहता आणि म्हणून बदलता असा आपल्या अनुभवाला येतो, त्याचप्रमाणे 'तोच हा प्रवाह', 'तीच ही गंगा', असाहि शाश्वत रितीनें आपल्या प्रत्ययाला येतो, आणि आपल्या जाणिवेचा भाग बनतो. क्वचित् ती नदी आग्नेयवाहिनीची ईशान्य-वाहिनी जरी झाली, तरी 'तीच ती नदी', हें आपण जाणतों. भाषेचें असेंच आहे.

१. हाच प्रश्न शुद्ध-लेखनाच्याहि संदर्भांत येतो.

खगोलस्थ ज्योतिर्गोल खरें पाहतां दररोजच आपलीं स्थानें पालटतात, आणि तीं लक्षावधि मैलांनी पालटतात. कधीकधी खगोलांत धूमकेतुहि आपले चमत्कारिक पिसारे फिरवून जातात. कधीकधी चांदण्या निखळून पडतात. कधीकधी तेजोमेघांमधून नव्या सूर्यमालांचीं तेजस्वी बाळें जन्माला येतात. पण केवढ्याहि अवाढव्य घडामोडी झाल्या, तरी खगोल कांही बदलत नाही. भाषेमध्येहि रूढ असलेले ध्वनि हळूहळू बदलतात. कधीकधी धूमकेतूंप्रमाणे आगंतुक ध्वनि येऊन दाखल होतात. कांही ध्वनि निखळणाऱ्या चांदण्यांप्रमाणे लुप्त होतात. मूळच्या वर्णमालेंत नवीन वर्णांची उपमाला नव्या सूर्यमालांप्रमाणे जन्माला येते. पण असें कांही झालें, तरी खगोल जसा अविचल, स्थिर असतो, तसा भाषेचाहि प्रवाह चिरंतनचा वाहत असतो. गंगेला यमुनाशोणादि नद्या मिळाल्या आणि त्यांनी तिला समृद्ध केलें, तरी ती गंगा गंगाच राहते. नदीप्रमाणे प्रत्येक भाषा ही एकाच वेळीं धनकोहि असते, आणि ऋणकोहि असते. आपल्या आणि माझ्या संबंधाने बोलावयाचें म्हणजे मी जी भाषा बोलतों, ती जशी खास माझी आहे, तशीच ती आपल्याला कळते, आपणांला आकलनक्षम म्हणून जाणवते, यासाठी ती आपलीहि आहे. नहून, आपण येथे आलां नसतां. अर्थात् या क्षणीं ती आपणां सर्वांची भाषा आहे. भाषेचा व्यवहार हा समाजबोधार्थ (communication) आहे, आणि म्हणून तो सामाजिक असतो. अर्थात् अशा वेळीं कोणतीहि भाषा केवळ एका व्यक्तीची अशी राहत नाही, राहूं शकत नाही. माझ्या बोलण्यांतल्या भाषेवर जशी माझी अथवा माझ्या व्यक्तित्वाची मुद्रा असणार, त्याप्रमाणे ज्या अर्थी आणि जोपर्यंत तीवर श्रोत्यांच्या आकलनक्षमतेची मुद्रा आहे, त्या अर्थी आणि तोपर्यंत ती त्यांचीहि भाषा जरूर होते. मनुष्य हा एकाच वेळीं जसा पुत्र असतो आणि पिताहि असतो, त्याप्रमाणे. इतक्याहिवर एखादा वादी असा वाद घालूं शकेल :

वादी. काय हो, भाषेचा स्वामी कोण असतो ?

मी. जो त्या भाषेचा प्रयोग करूं शकतो तो.

वादी. पण एकटा-एक मनुष्य भाषेचा प्रयोग कसा-काय करूं शकेल ?

मी. बरोबर आहे तुमचें म्हणणें. भाषा हा सामाजिक व्यवहार आहे. अर्थात् त्या भाषेचें जो आकलन करूं शकतो, तोहि त्या भाषेचा स्वामी होतो.

वादी. म्हणजे भाषेच्या स्वामित्वाविषयी तुम्हीं दोन निकष सांगितले.

मी. होय. सांगितले.

वादी. आता, मला तुम्हांला असें विचारावयाचें आहे की, हे दोन्ही निकष समुच्चयाने उपपन्न होतात कीं विकल्पाने उपपन्न होतात ?

मी. समुच्चयाने. साधारणपणें समुच्चयाने.

वादी. काय हो, ‘ साधारणपणें ’ असें म्हणतांना निसटून जाण्यासाठी तुम्ही आपल्या अंगाला तेल लावून बोलतां काय ?

मी. नाही. तुम्हांला शंका येणें साहजिक आहे, पण तसें नाही. मीं ‘ साधारणपणें समुच्चयाने ’ असें म्हटलें, तें मुद्दाम म्हटलें.

वादी. कां बरें ?

मी. असें पहा की, मी बोलत असतांना मराठी भाषा जाणूं शकणारा पण बोलूं मात्र न शकणारा असा एखादा फ्रेंच, इंग्रज अथवा गुजराती श्रोता असला, तर त्याच्या बाबतींत भाषेच्या स्वामित्वाविषयीचे मीं सांगितलेले दोन्ही निकष समुच्चयाने लागू होणार नाहीत. त्याच्या बाबतींत फक्त एकच निकष लागू पडेल, तो आकलनाचा.

वादी. आणि तुमच्यासारख्यांच्या बाबतींत दोन्ही निकष लागू पडतील. असेंच ना ?

मी. होय. पण आत्ता मीं जीं सांगितलीं, तशीं उदाहरणें सरसीमेवरचीं आहेत, आणि त्यांच्यामुळे मूळचे निकष कांही बाधित होत नाहीत. आपल्यापैकी पुष्कळांना हिंदी कळतें, गुजराती कळतें, पण आपण त्या भाषा सराईतपणाने कदाचित् बोलूं शकत नसूं. अशा वेळीं एकच निकष लागू पडेल, नाही का ?

वादी. माझा मुलगा वयाने लहान आहे, पण तो भगवद्गीतेचा एक अध्याय सफाईने पाठ म्हणतो. त्याचा उलगडा तुम्ही या संदर्भांत कसा कराल ?

मी. वादग्रस्त सरसीमेच्या उदाहरणासारखेंच हें आहे. माझ्या दृष्टीने पाहतां अशा प्रकारें गीतेचा अध्याय पाठ म्हणणाऱ्या लहान मुलांच्या बाबतींत भाषेच्या स्वामित्वाचे मीं आत्ता सांगितलेले दोन्ही निकष लागू पडत नाहीत.

वादी. कां बरें ?

मी. कारण त्याला ती भाषा कळतहि नाही, आणि स्वतंत्रपणें तिचा प्रयोगहि करितां येत नाही. ती नुसती पोपटपंची असते. पोपटपंचीलाहि विशिष्ट वयांत कांही स्थान आहे, हा प्रश्न वेगळा.

वादी. आत्ता तुम्हीं ‘ भाषेचा प्रयोग ’ असे शब्द योजिले. मला असें सांगा की, ‘ भाषेचा प्रयोग ’ म्हणजे काय ?

मी. शब्दार्थांच्या संकेतांचें ज्ञान बाळगून शब्दांचें उच्चारण करणें म्हणजे ‘ भाषेचा प्रयोग ’ असें मी समजतों.

वादी. अस्सें. म्हणजे याचा अर्थ असा की, गीतेचा अध्याय निवळ पाठ म्हणणारा अल्पवयस्क मुलगा हा अर्थसंकेतज्ञानपूर्वक शब्दोच्चारण करीत नाही, म्हणून त्याच्या बाबतींत भाषेच्या स्वामित्वाविषयीचे दोन्ही निकष लागू पडत नाहीत. असेंच ना ?

मी. होय. बरोबर आहे. आणखी एक पूरक गोष्ट मला सांगावयाची आहे.

वादी. कोणती ?

मी. मी ज्या वेळीं बोलतों, त्या वेळीं भाषेचें स्वरूप व्यष्टिरूप असतें. पण माझी भाषा जेव्हा आकलनाच्या क्षेत्रांत येते, तेव्हा तिचें स्वरूप समष्टिरूप होतें. जें व्यष्टीचें, तें समष्टीचें होतें, असें आपण या बाबतींत म्हणूं या. या व्यष्टिसमष्टिन्यायानें भाषेचें सामाजिक स्वरूप विवेचितां येईल.

वादी. बरें. आता मला या संबंधांत आणखी बारीक असे कांही प्रश्न विचारावयाचे आहेत.

मी. जरूर विचारा.

वादी. तुम्ही कोणाची भाषा बोलत आहां ?

मी. अर्थात् माझी.

वादी. ' माझी ' म्हणजे काय ? — जरा सांगाल ?

मी. ' माझी ' म्हणजे असें की, ज्या कुटुंबांत, ज्या रहाळांत, ज्या शाळेंत, ज्या कॉलेजांत मी वाढलों-खेळलों, त्या कुटुंबाचे, त्या रहाळाचे, त्या शाळेचे, त्या कॉलेजाचे अनेक जीवनरस माझ्या व्यक्तित्वांत आले, मुरले; आणि ते माझ्या वर्तनांत जसे-कसे उतरले असतील, तसे ते माझ्या भाषेंतहि उतरले.

वादी. अहो, हें तुमचें झालें. पण माझें कुटुंब वेगळें, माझा परिसर निराळा, माझी शाळा भिन्न, माझें कॉलेज अन्य, त्यामुळे त्यांचे जीवनरस माझ्या भाषेंत आलेले असणार. म्हणजे माझी भाषा वेगळी बनणार.

मी. हें कांही खोटें नाही.

वादी. नाही ?

मी. नाही. आणि यांत आश्चर्यहि वाटायला नको. सृष्टींतली प्रत्येक घटना, प्रत्येक व्यक्ति, प्रत्येक आवाज, प्रत्येक रूप, प्रत्येक वस्तु अ-द्वितीय असते. तशी प्रत्येकाची भाषाहि अ-द्वितीय असते. कारण ती खास त्याची असते.

इतिहासाची पुनरुक्ति जशी कधी होत नसते, तशी भाषेचीहि पुनरुक्ति होत नसते. तरी या अनंत अनेकत्वांतलें एकत्व मात्र जाणवत असतें. ‘अविभक्तं विभक्तेषु’ असा तो प्रत्यय असतो. तर्कशास्त्रांत जातिसामान्य असतें, त्याप्रमाणे.

वादी. प्रत्येकाची भाषा जर अशी ‘अ-द्वितीय’ असेल, तर बोलणें खुंटलें !

मी. अहो, ‘बोलणें खुंटणार’ नाही.

वादी. कां ?

मी. कारण मग तुम्हांला आपल्या बायकोशींदेखील बोलतां येणार नाही !

वादी. तेंच तर मी म्हणतों. कारण ही भूमिका मान्य केली, तर मला तुमची भाषा समजत नाही, असें म्हणावें लागेल.

मी. पण हा वेळपर्यंत तुम्हीं तर मला प्रश्न केले, उत्तरांची अपेक्षा बाळगिली, आणि त्या उत्तरांवर प्रतिप्रश्न केले. ज्याला भाषा समजत नाही, तो असें करीत नाही, करणार नाही. ‘आत्म्याचें अस्तित्व नाही,’ असा वाद घालणाऱ्याला शंकराचार्यांनी ‘(आत्मनश्च प्रत्याख्यातुमशक्यत्वात्) य एव निराकर्ता तस्यैव आत्मत्वात्[१]’ असें उत्तर केलें आहे. म्हणजे ‘आत्मा आहे, असें मी मानीत नाहीं,’ असें जो म्हणतो, तो ‘मी’ हाच आत्म्याचें अस्तित्व मान्य करून बोलत असतो. तसेंच याहि विषयांत आहे.

या वादविवादावरून भाषेचें मूलभूत एकरसात्मक स्वरूप आणि तींत दिसणारें अनेकत्व यांची कांहीशी कल्पना येईल. भाषेंतलें अनेकत्व हें तात्त्विक स्वरूपाचें, तर एकत्व हें व्यावहारिक पातळीवरचें असतें. प्रयोगदृष्ट्या भाषा जरी वैयक्तिक असली, तरी आकलनदृष्ट्या ती सामाजिक आहे.

बोलणारा मनुष्य हा भाषेचा उपयोग ती इतरांना समजावी म्हणून करीत असतो. ज्याला मराठी भाषेचा गंधहि नाही, अशा माणसाशीं मराठीमध्ये बोलण्याचा वेडेपणा शहाणा मनुष्य तरी खचीत करणार नाही. अर्थात् ज्याला आपली भाषा समजते, तो ती आपली भाषा आकलनाचें वहन म्हणून मान्य करीत असतो. बोलणाऱ्याची इच्छा आणि ऐकणाऱ्याची ही मान्यता यांनी भाषेचा व्यवहार सिद्ध होतो; आणि ही मान्यता हें या संबंधांत आणि प्रश्नांत खरें आणि महत्त्वाचें असें उत्तर आहे. भाषेच्या आकलनांत अडचणी आणि खळखळ उत्पन्न होऊन जेव्हा त्यांत अनिवार्य प्रतिबंध निर्माण होऊं लागतात, तेव्हा या मान्यतेचें प्रमाण आपसूकच उणावत जातें, आणि कधीकधी ती

१. ब्रह्मसूत्रभाष्य, १·१·४ (निर्णयसागरप्रत, मूलमात्र) : पृ. २०.

मान्यता नष्ट होते. ती नष्ट होतांच भाषेचा व्यवहारहि थांबतो. कारण भाषेचा व्यवहार हा कधीच एकपक्षी असत नाही; तो दुपक्षीच असणार. तेव्हा भाषेच्या आकलनाच्या बाबतींतल्या कमींत-कमी अडचणी म्हणजे अधिकांत-अधिक मान्यता, असा अर्थ आहे. उदाहरणार्थ, आता या प्रसंगीं मी जें हें भाषण आपल्याला वाचून दाखवीत आहें, त्याकडे आकलनीयतेच्या दृष्टीनें पाहतां आपणां श्रोत्यांची अधिकांत-अधिक मान्यता आहे, असें म्हणणें गैर होणार नाही. ही मान्यता अर्थातच भाषेच्या स्वरूपासंबंधीची असणार; ती भाषा जो विषय, जो आशय, जे विचार, जो तपशील, जे मुद्दे इत्यादि वाहून आणीत असेल, त्यांच्या मान्यतेचा यांत संबंध नाही, हें उघड आहे. म्हणजेच भाषेची आकलनीयता आणि त्या भाषेंतल्या विषयाची अथवा विचाराची आकलनीयता समीकृत असतातच, असें नाही.

३. प्रमाणभाषा

ज्या मराठी भाषेच्या व्याकरणाच्या पुनर्विचाराला आपण प्रवृत्त झालों आहों, ती ही आपण मान्य केलेली भाषा होय. या वेळीं आपणां उभयतांनी ती कांही विचार-विमर्शासाठी प्रमाण मानिलेली आहे, म्हणून तिला वाटल्यास आपण ‘ प्रमाणभाषा ’ म्हणूं या. गमतीखातर दुसऱ्याहि एका अर्थानें तिला ‘ प्रमाणभाषा ’ म्हणतां येईल; कारण या भाषेच्या द्वारा प्रमाणांचा विचार होत आहे. या भाषेला याव्यतिरिक्त आणखी एखादें नांव दिलें, तरी चिंता नाही. हिला ‘ प्रमाणभाषा ’ म्हटल्यानें इतर भाषा ‘ अ-प्रमाण ’ होत नाहीत. हिला ‘ पुणेरी ’ असें देशवाचक नांव दिल्यानें इतर कोणत्याहि भाषांवर आक्षेप येत नाही. हिला ‘ शिष्टांची भाषा ’ असें संबोधिल्यानें इतर भाषा अशिष्टांच्या ठरत नाहीत. किंवा, ही ‘ सुशिक्षितांची भाषा ’ असें सुचविल्यानें अल्पशिक्षितांच्या वा अशिक्षितांच्या भाषेविषयी कांहीहि लागट विधान सूचित होत नाही. परंतु सोयीसाठी आणि इतरहि कांही विचार लक्षांत घेऊन या भाषेला ‘ प्रमाणभाषा ’ असें म्हणणें हें योग्य होईल.

प्रत्येक प्रदेशामध्ये इतर भाषाभेदांव्यतिरिक्त सर्वसाधारण प्रकारच्या आणि सर्व-मान्य अशा दैनंदिन व्यवहारासाठी एखादी भाषा असते. आपल्या प्रदेशांत, अर्थात् महाराष्ट्रांत, कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी इत्यादि अनेक भाषाभेद आपल्याला आढळतात. ते ठिकठिकाणीं यथोचित प्रमाणानें रूढहि आहेत. त्यांव्यतिरिक्त ज्या प्रमाण-भाषेचा मीं निर्देश केला, ती प्रमाणभाषाहि व्यवहारांत आहे; आणि ती बहुमान्य आहे. ‘ बहुमान्य ’ म्हणावयाचें, तें अशामुळे की, विधिमंडळें, सरकारी कार्यालयें, विद्यापीठें, महाविद्यालयें, माध्यमिक प्रशाला, मराठी शाळा, रंगभूमि, सभासंमेलनें, बाजारहाट, रेल्वे स्टेशनें, रेडियो, सार्वजनीन कार्यालयें इत्यादि कितीतरी विचारविनिमयाच्या ठिकाणीं ती रूढ आहे. शिवाय, साधित स्वरूपांत — म्हणजे वाङ्मय, सरकारी पत्रव्यवहार

अहवाल, सर्वसाधारण पुस्तकें इत्यादिकांमध्ये — या प्रमाणभाषेचें स्वरूप पुन्हा प्रतिबिंबित होतें, तें वेगळेंच. अशा प्रकारें प्रमाणभाषेचा व्याप आपल्याला कळून येतो; आणि म्हणूनच तिला ' बहुमान्य ' असें म्हटलें.

प्रमाणभाषा ज्या-ज्या ठिकाणीं आहे, जेथे-जेथे विचारविनिमयाच्या कामीं वहन म्हणून ती वापरली जाते, तेथे-तेथे ती सर्वत्र एकविध आहे, अथवा असली पाहिजे, असा आग्रह असण्याचें कारण नाही. तींत ठायीं-ठायीं लहान-लहान भेद असतील, सूक्ष्म बाबतींत तिचें स्वरूप थोडें पालटत असेल, कांही वर्ण क्वचित् इकडचे तिकडे होत असतील, तरी तिची स्थूल एकविधता ही खचीत आपल्या प्रत्ययाला येते. तिचें साधारणपणें सर्व भाषाविभागांत आकलन होऊं शकतें. मात्र हें विधान कोकणी, खानदेशी इत्यादि भाषाभेदांच्या बाबतींत करितां येणार नाही. अर्थात् प्रमाणभाषा ही कोकणी, खानदेशी इत्यादि भाषाभेदांशीं समव्याप्त असणार नाही. कारण वर्णमाला, प्रत्यय, वाक्यरचना अशा अनेक पायाभूत विषयांत ती वेगळी असते; आणि त्यामुळे प्रमाणभाषा आणि हे भाषाभेद यांच्या भाषाविषयक स्वरूपामध्ये, व्याकरणामध्ये अधिकाधिक फरक पडत जातो. हा फरक जों-जों अधिक, तों-तों दोन भाषकांच्या पारस्परिक मान्यतेचा प्रश्न बिकट होत जातो. या भाषाभेदांच्या तौलनिक विचारामध्ये एक लक्षणीय मुद्दा असा की, कोकणी आणि खानदेशी यांसारखे भाषाभेद हे एकमेकांपासून जितके आणि जसे दूर आहेत, तसे प्रमाणभाषा आणि कोकणी-खानदेशी एकमेकांपासून दूरस्थ नाहीत. म्हणजे असें की, कोकणी बोलणाऱ्या मनुष्याला खानदेशी समजणार नाही, आणि खानदेशींत व्यवहार करणाऱ्याला कोकणी भाषा आकळणार नाही; पण या दोघांनाहि प्रमाणभाषा कळल्यावाचून राहणार नाही. प्रमाणभाषेच्या आकलनीयतेचें क्षेत्र अशा रितीने मोठें असतें. नुसतें मोठेंच नाहीं, तर एक प्रकारें मूलगामी असतें.

४. भा षा - ध्व नि - सं बं ध

जिच्या व्याकरणाचा विचार येथे करावयाचा आहे, ती मराठीची प्रमाणभाषा होय. तिच्या स्वरूपाचें स्थूल वर्णन आत्तापर्यंत केलें. यापुढे मराठीच्या या प्रमाणभाषेच्या घटनेची चिकित्सा करावयाची आहे. ही चिकित्सा करितांना मराठीचें[1] बोलण्यामधलें जें स्वरूप दिसतें, तें लक्ष्यभूत आहे. बोलण्यामधली भाषा ही अर्थातच मराठी जनांच्या उच्चारांत ऐकूं येणार. हे उच्चार ध्वनिरूप असतात. ध्वनींचा संबंध जसा माणसाच्या मुखाशीं अथवा कंठाशीं आहे, तसाच तो त्याच्या श्रवणाशींहि आहे. ध्वनीची निर्मिति आणि त्याचें ग्रहण — अर्थात् त्याची जाणीव — या उच्चारात्मक भाषेच्या कोटि होत. या दोन कोटींमध्ये भाषेचें क्षेत्र नांदतें, आणि त्यांत भाषेचा व्यवहार चालतो.

१. अर्थात् मराठीच्या प्रमाणभाषेचें. येथून पुढे प्रमाणभाषाविषयक निर्देश साक्षात् जरी केला नाही, तरी तो तसा यथासंभव आहे, असें समजावयाचें.

ध्वनिनिर्मितीची प्रक्रिया हा एक फार मोठा स्वतंत्र विषय आहे; परंतु या स्थळीं त्याची चर्चा अभिप्रेत नाही. एवढें खरें की, ध्वनि निर्माण करण्याच्या बाबतींत माणसाच्या अंगीं असलेली शक्ति ही अमर्याद नसली, तरी ती फार मोठी, विविध आणि विपुल आहे. मुख-कंठांव्यतिरिक्तहि मनुष्याला टाळ्या वाजवून, चुटक्या वाजवून, पायांनी थयथयाट करून ध्वनि निर्माण करितां येतात, आणि कधीकधी त्यांयोगे कांही अर्थहि सूचित होतो, व्यक्त होतो; पण या क्रियांची, आणि त्या क्रियांनी उत्पन्न होणाऱ्या ध्वनींची 'भाषा' या संज्ञेने गणना करीत नाहीत. मुख-कंठांमधील शारीर यंत्रांच्या द्वारा जे ध्वनि निर्माण होतात, आणि कानांनी ग्रहण करितां येतात, त्यांचाच भाषेमध्ये समावेश होतो. कानांनी ज्यांचें ग्रहण होऊं शकत नाही, असेहि अत्यधिक अथवा अत्यल्प आंदोलनसंख्येचे ध्वनि सृष्टीमध्ये असतात. परंतु अशा अश्राव्य ध्वनींशी, तसेंच पशुपक्ष्यादि तिर्यग्योनिजातांच्या ध्वनींशीं आपल्याला कर्तव्य नाही. मानवनिर्मित आणि श्रवणविषयभूत अशाच ध्वनींशीं आपला संबंध आहे. हे ध्वनि म्हणजे भाषेचें उपादानकारण होय. घट जसा मृत्तिकारूप असतो, पट जसा तंतुरूप असतो, इन्द्रधनुष्य जसें जल-प्रकाशरूप असतें, त्याप्रमाणे भाषा ही ध्वनिरूप असते. ध्वनि आणि भाषा केवळ समव्याप्त असतात. भाषा जेव्हा आपल्या प्रत्ययाला येते, तेव्हा ती ध्वनींच्याच रूपाने येते. म्हणून ध्वनिविरहित भाषेची आपण कल्पना करूं शकत नाही.

परंतु ध्वनि हे अनंत आहेत, असंख्य आहेत. ध्वनीचें उच्चारण ही एक वस्तुगत घटना आहे. तशी ती वास्तव घटना असल्यामुळे ती अ-द्वितीय आहे. 'अ-द्वितीय' अशा अर्थाने की, कोणताहि ध्वनि एकाने एका वेळीं जसा उच्चारिला असेल, तसा तंतोतंत त्यालाच दुसऱ्या वेळीं, अथवा दुसऱ्याला कोणत्याहि वेळीं उच्चारितां येत नाही. कारण ध्वनि हा कंठामधून उत्पन्न होऊन मुखाच्या व मुखामधल्या विशिष्ट अशा त्या-त्या अवयवांच्या हालचालींनी व्यक्त होत असल्याकारणाने, आणि ध्वनिनिर्मितीची ही परिस्थिति आणि हालचालींना लागणारा उणा-अधिक प्रयत्न हा प्रत्येक वेळीं बदलता असल्यामुळे, आपाततः समान दिसणाऱ्याहि दोन ध्वनींत तत्त्वतः फरक पडतो. या फरकामुळे त्या ध्वनींना व्यक्तित्व येतें. 'ग-व-त' हा शब्द आपण उच्चारिला, तर त्यांत तीन अ-कार आपल्याला ऐकूं येतात. हे तिन्ही अ-कार उच्चारतः एकमेकांपासून वेगळे आहेत, हें सर्वांना माहीत आहे. पण हें ज्याला उत्तम प्रकारें माहीत आहे, अशा एखाद्या श्रेष्ठ ध्वनिशास्त्रज्ञालादेखील पुन्हा 'ग-व-त' हा शब्द उच्चारितांना ते तिन्ही अ-कार त्याच पूर्वींच्या उच्चारप्रयत्नाने पुन्हा उच्चारितां येणार नाहीत, हें जरी चमत्कारिक वाटत असलें, तरी खरें आहे. तसें करितांना व-मधल्या अ-काराचें अनुकृष्टत्व कधी जास्त होईल, कधी कमी होईल; अ-काराची उच्चारसमयींची आंदोलनसंख्या कधी उणी होईल, कधी अधिक भरेल; कधी त्यावर भर येईल, कधी कमी भर येईल; आणि 'ग-व-त' या शब्दांतल्या तीन व्यंजनांच्या उच्चारप्रयत्नामुळे पुन्हा जवळच्या स्वरांच्या उच्चारांमध्ये उच्चारसहकृत फरक पडत राहतील, तें वेगळेंच. असेंच ग्, व् आणि त् या

व्यंजनांच्याहि उच्चारांमध्ये घडणार. निदान 'ग-व-त' या शब्दांतील स्वर आणि व्यंजनें हीं परस्परांपासून वेगळीं असल्यामुळे हा फरक पडतो, असें म्हणण्याला अवसर आहे; पण 'का-का' यासारखा शब्द जरी घेतला, तरी त्यांतहि पहिल्या ध्वनीच्या वेळीं मुखामध्ये ज्या ठिकाणीं जिभेच्या पश्चार्धाचा तालुभागाला स्पर्श होत असेल, नेमका त्याच ठिकाणीं तो स्पर्श दुसऱ्याहि ध्वनीच्या वेळीं होईल, आणि तितक्याच वेगानें, जोरानें, भरानें, दीर्घत्वानें होईल, असें म्हणवत नाही. आपण जरी आपल्या आईपासून भाषा शिकत असलों, तरी या अर्थानें आपली भाषा आईच्या भाषेहून वेगळी असते. तें अनुकरण असतें, एकरूपत्व नव्हे. गायनांत ज्याप्रमाणे तंतुवादनकारानें केलेली गायकाची साथ ही कधी यथार्थतेनें साथसंगत म्हणून असूं शकत नाही, तर तो गायनाचा निवळ पाठलाग असतो, त्याप्रमाणे भाषेचें हें अनुकरण असतें. अर्थातच गायक आणि वादक या दोघांच्याहि आविष्काराला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आपोआप येतें, मग त्या वेळीं वादक हा दुय्यम स्थानाचा का असेना. दोन व्यक्तींच्या भाषाविष्कारालाहि असेंच पृथगात्म व्यक्तित्व असतें.

ध्वनींचें हें भाषेंतील अनंतत्व लक्षांत घेतां ध्वनींचें वर्गीकरण वैयाकरणाला आवश्यक ठरतें, अपरिहार्य ठरतें. सृष्टीमध्ये जरी अगणित कीटक असले, तरी त्यांच्या शरीररचनेला अथवा अन्य कांही वैशिष्ट्यांना अनुसरून जीवशास्त्रज्ञ त्यांचें वर्गीकरण करितो, आणि मग चिकित्सेला आरंभ करितो, त्याप्रमाणे ध्वनींचें वर्गीकरण करणें प्राप्त ठरतें. हें वर्गीकरण अर्थातच कल्पनागत असतें, आणि तें कांही सुसूत्र, संक्षिप्त व्यवस्था संभाळीत असल्याकारणानें तें शास्त्रानुसारी असतें, असें आपण म्हणतों. हें वर्गीकरण ध्यानीं घेऊन कांही कीटक जन्माला येत नसतात. कीटक ही एक वास्तव घटना आहे, आणि त्यांचें वर्गीकरण ही काल्पनिक पण शास्त्रबद्ध अशी सोय आहे. तशीच ध्वनि ही वास्तव घटना आहे; ध्वनींचें सुव्यवस्थ वर्गीकरण ही वैयाकरणाची कल्पना आहे. मात्र कल्पना आहे, म्हणून तिचें महत्त्व लहान नाही, हें लक्षांत घेतलें पाहिजे. बिंदु आणि रेषा या गणितज्ञाच्या कल्पना असल्या, तरी त्या कल्पनांचें महत्त्व प्रत्येक गणितज्ञ जाणतो.

ध्वनींचें वर्गीकरण कोणत्या भूमिकेनें करितां येईल, हें पाहण्यासाठी ध्वनींच्या निर्मितीकडे थोडें लक्ष दिलें, म्हणजे पुरें. असें लक्ष दिलें असतां जें आपल्या ध्यानीं येतें, त्याच भूमिकेनें ध्वनींचें वर्गीकरण केलें, म्हणजे तो मार्ग अचूक ठरेल. ध्वनि हा कंठामधल्या स्वरयंत्राच्या द्वारा अथवा कधीकधी तें स्वरयंत्र स्तब्ध असतांहि निर्माण होतो. कधीकधी नासिकोच्चाराचाहि त्यांत अंश येतो. या निर्मितीच्या समयीं मुखामधली जिव्हा आणि मुखाचे इतरहि अवयव महत्त्वाचें कार्य करीत असतात. हें सर्व ध्यानीं घेऊन ध्वनीच्या उच्चारणासाठी, अर्थात् अभिव्यक्तीसाठी, स्थान आणि प्रयत्न या दोन घटकांचा विचार करावा लागतो. या घटकांच्या आधारानें ध्वनींचें वर्गीकरण करितात; आणि असें वर्गीकरण निष्पन्न झालें, म्हणजे त्याला 'वर्णमाला' म्हणतात.

५. व र्ण मा ला

वर्णमाला सिद्ध करण्यापूर्वी भाषाव्यवहारांत जे शब्द असतात, त्या शब्दांच्या ध्वनींकडे सूक्ष्मपणें कान द्यावा लागतो. असें करितांना रेखात्मक लिपीमध्ये गोठून राहिलेले शब्द घेऊन चालणार नाही. कारण लिपि ही रूढिनिष्ठ असते, आणि अशा रूढिनिष्ठ लिपीच्या ज्ञानाने भाषेचें समग्र आणि यथावत् ज्ञान होणार नाही. या संदर्भात अक्षरमाला आणि वर्णमाला यांमध्ये भेद करणें हें योग्य ठरेल. अक्षरें आणि वर्ण हे नेहमीच १ : १ अशा प्रतिसंवादामध्ये (correspondence) नांदत असतात, असें नाही. असा १ : १ प्रतिसंवाद ज्या वेळीं होतो, त्या वेळीं भाषेमध्ये जितके वर्ण तितकीं अक्षरें दिसतात. पण लेखनांत अक्षर-वर्णांचा प्रतिसंवाद एक तर दिसत तरी नाही, किंवा दिसला, तरी त्याची अधिक फोड करून घ्यावी लागते. उदाहरणार्थ, बंगाली भाषेच्या लेखनांत '**स**', '**श**' आणि '**ष**' असे तीन रेखाकार असले, तरी त्यांचा ध्वनि (वर्ण) एकविधच आहे, आणि तो तालव्य ऊष्मा आहे.[1] तसेंच, '**न**' आणि '**ण**' असे दोन लेखाकार असले, तरी त्यांचा ध्वनि (वर्ण) एकच आहे, आणि तो दंत्य अनुनासिक आहे.[2] म्हणजे एका ध्वनीचे (वर्णाचे) तीन लेखाकार अथवा दोन लेखाकार अनुक्रमाने दिसतात.[3] मराठी भाषेंत तालव्य '**च**' आणि दंतमूलीय '**च**' असे दोन स्वतंत्र ध्वनि (वर्ण) आहेत, परंतु या दोन्ही ध्वनींचा (वर्णांचा) लेखाकार एकच आहे, आणि तो '**च**' असा आहे. अर्थात् भाषेमधील ध्वनि (वर्ण) आणि ते व्यक्त करणारे लेखनांतले रेखाकार यांमध्ये १ : १ असा प्रतिसंवाद (correspondence) या विषयांत दिसत नाही. वेगळ्या संदर्भात आणखी कांही उदाहरणें आपण घेऊं. '**का–का**' या शब्दांत अक्षरें दिसतात तीं दोन, पण वर्ण आहेत ते '**क्–आ–क्–आ**' असे चार. '**झ–गा**' यांतहि दोन अक्षरें दिसतात, पण त्यांत वर्ण '**ज्–ह्–अ–ग्–आ**' असे पांच आहेत. '**ग–व–त**' या शब्दांत अक्षरें तीन, पण वर्ण '**ग्–अ–व्–अ–त्**' असे पांच आहेत. '**सं-बं-ध**' या शब्दांत तीन अक्षरें दिसतात, पण त्यांत वर्ण एकंदर '**स्–अ–म्–ब्–अ–न्–द्–ह्–अ**' असे नऊ आहेत.[4]

१. उदाहरणार्थ, 'सुदूर', 'अभिसार', 'मास', 'पाषाण' इत्यादि शब्दांच्या लेखनांत जरी 'स', 'ष' असले, तरी त्यांचा उच्चार 'श' असा आहे; जसें 'शुदूर', 'ओभिशार', 'माश', 'पाशान', इत्यादि.

२. उदाहरणार्थ, 'पाषाण', 'मरण' या शब्दांतील लेखनांत 'ण' असला, तरी त्याचा उच्चार 'न' असा आहे; जसें : 'पाशान', 'मोरोन'.

३. अर्थात् श, ष, स = श (उच्चारतः); ण, न = न (उच्चारतः).

४. या दृष्टीने विचार करितां रूढ रोमन लिपि ही शब्दांतले वर्ण कसे पृथक् करून सावयव दाखवूं शकते, आणि म्हणून सोयीस्कर वाटते, तें लक्षणीय आहे; उदाहरणार्थ, Kaka (= काका) (चार वर्ण); jhaga (= झगा) (पांच वर्ण); gavat (= गवत) (पांच वर्ण); sambandha (= संबंध) (नऊ वर्ण); इत्यादि.

देवनागरी लिपीच्या रूढ लेखनांत ध्वनिव्यंजक वर्ण हे रेखाकारांत एका आड एक असे लपून राहतात,[१] आणि त्यामुळे त्या रेखाकारांत वर्णांचें असें मिश्रण होतें की, त्यांतले ते वर्ण ओळखूं येत नाहीतसे होतात; आणि मग लेखनावरून भाषेंतल्या ध्वनींचा अथवा वर्णांचा मागोवा घेणें हें कठीण होतें.[२]

या विवेचनानें हें दिसून आलें असेल की, वर्ण हे निरवयव असतात. त्यांचे विभाग करितां येत नाहीत. अर्थात् ते विभागक्षम नसतात. शब्द हे ज्या ध्वनींचे बनलेले असतात, त्या ध्वनींचे अंत्यावयव म्हणजे वर्ण. वैशेषिकांच्या परमाणुवादानुसार वस्तुजाताचे अंत्यावयव म्हणजे जसे परमाणु, तसे शब्दसृष्टीचे अंत्यावयव म्हणजे वर्ण होत. भाषेच्या विश्लेषणासाठी वर्णकल्पना केवळ उपयुक्तच नव्हे, तर मूलभूत आणि आवश्यक आहे. पण ती अमूर्त आहे. ध्वनि हे मूर्त, तर त्यांचें यथायोग्य आणि आवश्यक तेवढें वर्गीकरण करणारी वर्णकल्पना ही अमूर्त आहे. भाषेंत आपण प्रत्यक्षतः वापरतों ते ध्वनि; वर्ण नव्हेत. मात्र ते-ते ध्वनि विशिष्ट पद्धतीनें वर्गीकृत झालेले असतात. ध्वनींच्या वर्गीकरणाचेंहि शास्त्र आहे, आणि त्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेंत कोणते ध्वनि शब्दांमध्ये आदि-मध्य-अवसानीं कोठे येतात, त्यांचें विभजन कसें होतें, परस्परव्यावृत्ति कोणत्या स्थितींत घडते, इत्यादि कितीतरी विषयांचा विचार येतो. या विषयविमर्शाची परिणति शेवटीं लक्ष्यभूत भाषेची वर्णमाला सिद्ध करण्यामध्ये होते. कोणत्याहि भाषेची वर्णमाला या दृष्टीनें पाहिली, तर ती प्रायः सममान (symmetrical) आणि व्यवस्थित (ordered) असते. ज्या उच्चारस्थानांच्या द्वारा वर्ण निर्माण होतात, तीं लक्षांत घेतां वर्णमालेचें चित्र नेहमी सममान आणि आखबंद होण्याकडे झुकतें, असें दिसेल. संस्कृत भाषेची वर्णमाला पाहिली, तर तींतलीं वर्गीय व्यंजनें कशीं आखीव-रेखीव स्थानीं बसलेलीं आहेत, तें पाहण्यासारखें आहे. पण संस्कृत ही 'देववाणी', म्हणून कांहीं ही 'देव-व्यवस्था' घडलेली नाही! तर कोणत्याहि भाषेंतल्या प्रयुक्त अशा ध्वनींचें वर्गीकरण केल्यावर वर्णमालेचें असेंच आखबंद आणि सममान चित्र मिळतें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सातपुड्याच्या कुशींत विसावणाऱ्या ज्या एखाद्या भिल्लपल्लींत केवळ पंचवीस-तीसच उंबरा आहे, आणि त्या भिलवाडींत स्वतंत्र अशी

१. 'क्ष' आणि 'ज्ञ' या दोन रूढ लेखाकारांत अनुक्रमें 'क्-ष्-अ' आणि 'द्-न्-य्-अ' हे वर्ण कसे तिरोहित आहेत, तें पहा. क्ष-मधले ध्वनि जे क्-ष्-अ, ते बदलले नसले, तरी ज्ञ-मधले ध्वनि जे मूळचे ज्-ञ्-अ असे होते, ते द्-न्-य्-अ असे पालटलेले आहेत, हें स्पष्ट आहे. पण दोहोंचेहि लेखाकार मात्र पूर्वी होते, तसेच लेखनांत (थोड्याबहुत वैयक्तिक फरकानें) टिकून राहिले आहेत. हें लक्षांत घेऊनच यापूर्वी (पृष्ठ ४३ पहा) 'लिपि ही रूढिनिष्ठ असते', असें म्हटलें आहे.

२. वर्णांचें लेखनांतलें हें मिश्रण म्हणजे बाराखडीची कल्पना. पण 'बाराखडी' म्हणजे तरी काय? बाराखडीची कल्पना आणि तिची उपयोगिता अथवा अनुपयोगिता तपासून पाहणें हें मनोरंजक असलें, तरी अकिंचित्कर असल्याकारणानें येथे तें अनावश्यक म्हणून सोडून दिलें आहे.

भाषा व्यवहारांत आहे, तेथेदेखील त्या भाषेची वर्णमाला अशीच सम्मान आणि दोरीबंद होण्याकडे झुकलेली असते. अशा भाषेने एखादे वेळीं जर परकीय शब्द आपल्यांत सामावून घेतले, आणि त्या परकीय शब्दांतले वर्ण त्या मूळच्या भाषेंत नसले, तर ते परकीय वर्ण मूळच्या भाषेंतल्या वर्णमालेशीं स्वतःला मिळतें-जुळतें करून घेतात, आणि या यजमानाच्या नव्या घरांत गुण्यागोविंदाने नांदू पाहतात. घरीं पाहुणा आला, आणि तो फार दिवस रहायचा झाला, म्हणजे त्याला यजमानाच्या घराशीं, त्यांतल्या चालीरितींशीं, वेष-परिवेषाशीं, व्यवस्थेशीं, मुलांबाळांशीं अगदी इमानदारीने समरस व्हावें लागतें. तान्ह्या-पारव्या मुलांबाळांशीं तर त्याला तोंडांतल्या तोंडांत जीभ लटकावून बोबडेंसुद्धा बोलावें लागतें. कारण त्याने असें केलें नाही, तर तो नकोसा होऊन जाईल, अप्रिय होईल, आणि त्याचें वास्तव्य उभयपक्षीं सुखास पडणार नाही. उलटपक्षीं, यजमानदेखील अतिथीला तसाच जिव्हाळा लावितो. यजमान कोठे जेवावयाला जायचा झाला, तर तो आपल्या बरोबरीने पाहुण्याचाहि मान राखून त्यालाहि घेऊन जातो, आणि जीव लावितो. कोणीं विचारिलें, तर 'हा माझा दूरचा भाऊ आहे,' असें मिथ्या-प्रिय बोलतो. अशा लोभस वातावरणांत कालगतीने पाहुण्याचें पाहुणेपण हरवतें, आणि तो यजमानाचा कुटुंबीय बनून जातो. मराठीने असें पुष्कळ पाहुण्यांना स्निग्ध कुटुंबीय करून सोडिलें आहे. आंतर भारतीचा हा अगदी निकोप असा आविष्कार आहे.

आता अशा संदर्भांत मराठीचा कौल आपण पाहूं.

महाराष्ट्रांत पुष्कळ विदेशी खेळ येऊन रुजले आहेत. त्यांत हॉकी, फुटबॉल, क्रिकेट असे कितीतरी खेळ आहेत. क्रिकेटचा खेळ तर आळीआळीं चाललेला आपल्याला दिसून येतो. त्याची चर्चा पोरांपासून थोरांपर्यंत चालते; आणि त्याविषयीचें वाङ्मयदेखील मराठींत कांही कमी नाही. पण तो आपला मुद्दा नाही. मुद्दा आहे तो हा की, क्रिकेटच्या खेळाने कितीतरी दर्यापार शब्द मराठींत आणून सोडिलेले आहेत. या शब्दांतले 'बॅट' आणि 'बॉल' हे शब्द घ्या, आणि त्यांतले वर्ण काळजीने पहा. या शब्दांमध्ये अनुक्रमें आद्य स्थानीं 'ॲ' आणि 'ऑ' हे वर्ण आपल्याला ऐकूं येतात. आता, मराठीच्या रूढ वर्णमालेमध्ये कांही 'ॲ' आणि 'ऑ' हे वर्ण नाहीत. मग काय त्यांना आपण मराठीच्या घराबाहेर वळचणीखाली तापत-भिजवीत-कुडकुडत उभे करणार आहों ? आणि समजा, करणार असलों, तर तें कां म्हणून ? क्रिकेटची टेस्ट मॅच (– पुन्हा असाच वळचणीखाली उभा केलेला ॲ-वर्ण !) आली, म्हणजे तुम्ही-आम्ही कसे वेडेपिसे होतों, तें पहा; कशा पैजा लावितों, तें पहा ! त्या मॅचने तुमच्या कामाच्या दिवसाचा आणि मनाचा बहुतेक भाग त्या वेळीं व्यापिलेला असतो. तुम्ही ऑफिसांतून (– पुन्हा असाच वळचणीखाली उभा केलेला ऑ-वर्ण !) घरीं आलां की, आल्या-आल्या कोटसुद्धा काढावयाच्या आधी आपल्या मुलाला 'किती झाला रे स्कोअर ?' म्हणून दारांतूनच विचारितां; आणि त्याने तो लवकर सांगितला नाही, तर त्याच्यावर तावदारतां ! तुमचें

तें तावदारणेंदेखील क्रिकेटवरच्या प्रेमाचेंच चिन्ह असतें. इतकें असतांनादेखील 'बॅट' आणि 'बॉल' यांतल्या अॅ-ऑ-वर्णांना जर तुम्ही आपल्या मराठीच्या वर्णमालेच्या पंक्तींत बसूं देणार नसलां, आणि त्यांना पंक्तिपावन करून घेणार नसलां, तर तें योग्य होईल काय, याचा विचार केला पाहिजे. बरें, 'बॅट', 'बॉल' यांसारख्या शब्दांना दत्तक देण्याघेण्याचाहि प्रश्न नाही. त्यांना प्रत्यय लागतात, शब्दयोगी अव्ययें लागतात, त्यांचीं सामान्यरूपें होतात. त्यांनी मराठी माणसांशीं असे विवाहसंबंधहि केलेले आहेत ! अशा स्थितींत अॅ-ऑ या वर्णांची मराठीच्या घरांत काय व्यवस्था करणार ? अॅ-ऑ हे वर्ण म्हणजे कांहीं देवांच्या पंक्तींत बसून, चोरून अमृत पिणारे राहु-केतु नव्हेत ! ते साखसुरत, उजागरीनें आलेले आहेत; तुमच्या-आमच्या मान्यतेनें आलेले आहेत.

आणखी एका महत्त्वाच्या विषयाचा याच संदर्भात उपन्यास करणें हें योग्य होईल.

'बॅट' हाच शब्द घ्या, आणि त्याचा अंत्य वर्ण पहा. त्यांतल्या अंत्य ट-चा उच्चार करितांना आपण आपलें जिव्हाग्र प्रतिवेष्टित करून, म्हणजे तें कंठाकडच्या बाजूला वरून आंत वळवून घेऊन, त्याचा तालुशिराला अर्थात् मूर्ध्याला स्फुटित होईल, असा स्पर्श करितों. वस्तुस्थिति अशी आहे की, अशा उच्चाराचा, अर्थात् मूर्धन्य, वर्ण इंग्रजींत मुदलींच नाही.[1] 'बॅट' यांतल्या अंत्य ट-चा उच्चार इंग्रजींत दंतमूलीय (alveolar) आहे. मराठींत वस्तुस्थिति थोडी वेगळी आहे. मराठींत दंतमूलीय व्यंजनांचा एक वर्ग आहे, पण त्यांतलीं व्यंजनें हीं दंतमूलीय अल्पोष्म (affricates) व्यंजनें आहेत; जसें : 'च़मच़ा', 'ज़हाज़' यांतलीं आद्यंतींचीं 'च़' आणि 'ज़' हीं व्यंजनें. मराठींत दंतमूलीय व्यंजनांचा ट′–ठ′–ड′...हा वर्ग नाही.[2] इंग्रजींत जसा प्रतिवेष्टित-जिव्हाग्रमूर्धस्पर्शयुक्त व्यंजनांचा ट–ठ–ड...हा वर्ग नाही, तसा मराठींत दंतमूलीय व्यंजनांचा ट′–ठ′–ड′...हा वर्ग नाही. परंतु मराठी जनांचें क्रिकेटवर आणि त्यांतल्या 'बॅटी'वर तर प्रेम बसलेलें आहे ! अशा स्थितींत काय करावयाचें ?

पुष्कळ भाषांना अशा देवघेवीच्या परिस्थितीला तोंड द्यावें लागतें, आणि तींतून तोड काढावी लागते. कधीकधी तडजोड करावी लागते. बहुधा ही तोड वा तडजोड ज्या भाषेंत परकीय शब्द येतात, त्या भाषेच्या पक्षाला अनुकूल होईल, अशा स्वरूपाची असते; आणि तें योग्यच म्हटलें पाहिजे. 'बॅट' या शब्दाच्या प्रकरणीं इंग्रजींत जो

१. खरें पाहतां, ट–ठ–ड–ढ–ण या व्यंजनांचा वर्ग हा आर्यभारतीय भाषांचा एखाददुसरा अपवाद वगळतां एक लक्षणीय विशेष आहे. प्रतिवेष्टितजिव्हाग्रमूर्धस्पर्शयुक्त व्यंजनांचा हा वर्ग जगांतल्या इतर फारच थोड्या भाषांमध्ये असल्यास असेल.

२. हा वर्ग आपण ट′, ठ′, ड′,... अशा चिन्हांनी दाखवूं.

दंतमूलीय 'ट्' [1] आहे, त्याचा मराठीने मूर्धन्य [2] 'ट' करून टाकिला, आणि पांच [3] वर्गीय व्यंजनमालांच्या संख्येंत नवीन दंतमूलीय अशा व्यंजनमालेची भर घालण्याचें टाळिलें. नुसतें टाळिलें एवढें नव्हे, तर आपली वर्णमाला एवढ्यापुरती अनुपहत, शाबूत ठेविली. इंग्रजींतले शब्द मराठींत येतील, तेव्हा वर्णमालेंत भलतीसलती उलाढाल, घालमेल होऊं नये, म्हणून मराठीनें आपल्या परीनें जशी दखल घेतली, तशीच दखल इंग्रजीनेहि मराठींतले किंवा अन्य भारतीय भाषांमधले शब्द घेतांना स्वतःच्या बाबतींत घेतली आहे; आणि त्या भाषेच्या दृष्टीनें पाहतां तें मराठीइतकेंच रीतसर आहे. 'टिळक रोड' यांतल्या आद्य ट-चा उच्चार मराठींत जरी मूर्धन्य असला, तरी इंग्रजींत तो दंतमूलीय आहे. ळ-चा उच्चार इंग्रजींत 'ल' असा दंत्य आहे; कारण इंग्रजींत ळ-वर्ण नाही. बरें, 'रोड' यांतल्या अंत्य ड-चा उच्चार इंग्रजींत जरी दंतमूलीय असला, तरी मराठीनें तो मूर्धन्य ट-वर्गीय करून टाकिला आहे. '**लोणावळें**', '**खंडाळा**', '**कल्याण**' इत्यादि मराठींतल्या कितीतरी शब्दांचे इंग्रजींतले उच्चार इंग्रजींतल्या वर्णमालेच्या अपेक्षेने यथासंभव कसे पालटतात, तें लक्षांत घेण्यासारखें आहे. मराठीमधले शब्द हिंदी भाषेंत जातांनाहि असेंच घडतें. मराठींतल्या 'टिळका'चा हिंदींत 'ट्लिक' होतो; कारण हिंदींत ट-वर्गीय व्यंजनें जरी असलीं, तरी ळ-वर्ण अस्तित्वांत नाही. ही वर्णविकृति नव्हे, तर परभाषेंतल्या शब्दांच्या संदर्भांत आपल्या भाषेंतल्या मूळच्या वर्णमालेची सममानता (symmetry) आणि व्यवस्था (order) तोलून धरण्याचा हा प्रश्न आहे. तात्पर्य, (१) भाषा ही कधीकधी नवीन वर्ण बाहेरून आपल्या वर्णमालेमध्ये दाखल करून घेते, तर (२) कधीकधी अशा बाह्य वर्णांवर स्वतःचे संस्कार करून त्यांना आपल्या वर्णमालेंत एकरूप अथवा एकरस करून टाकिते. असे दाखल करून घेतलेले आणि एकरूप करून घेतलेले वर्ण कधी वेगळे म्हणून ओळखूं येतात, तर कधी तसे जाणवत नाहीत. उदाहरणार्थ, ॲ-ऑ हे वर्ण आपल्या मराठी वर्णमालेंत परकीय असा वेगळा वेष करून येऊन बसल्यामुळे आपल्याला सहज ओळखूं येतात, पण 'बॅट' यांतला अंत्य 'ट' किंवा 'मोटार', 'टेलिफोन' इत्यादिकांमध्ये ऐकूं येणारा ट-वर्ण हा तसा सहजासहजीं निराळा म्हणून कांही जाणवत नाही. हा 'ट' मुळांत दंतमूलीय आहे, मूर्धन्य नाही, असें आपल्याला सांगूनदेखील कदाचित् खरें वाटणार नाही, आणि खरें वाटलें तरी '— मग असेल !' असें म्हणून आपण त्याकडे काणाडोळा करूं, किंवा तें कानाआड

१. दंतमूलीय 'ट' दर्शविण्याला आर्यभारतीय भाषांत आणि मराठींतहि स्वतंत्र लेखाकार नाही. पण तो दर्शवावयाचा झाल्यास 'ट्'... अशा प्रकारें दाखवितां येईल.

२. अर्थात् प्रतिवेष्टितजिव्हाग्रमूर्धस्पर्शयुक्त.

३. मराठींतल्या वर्गीय व्यंजनमालांची रूढ असलेली संख्या गृहीत करून येथे 'पांच वर्गीय व्यंजन-मालां'चा निर्देश केलेला आहे. तथापि या वर्गीय व्यंजनमालांची संख्या पांच आहे कीं तींत कांही उणें-अधिक करणें योग्य ठरेल, हा अधिक चिकित्सेचा विषय आहे. ही चिकित्सा आपण यापुढच्या, म्हणजे तिसऱ्या, व्याख्यानांत करूं.

टाकूं. ‘ थर्मा(र्मा)मीटर ’, ‘ थिऑसफी ’, ‘ बाथ रूम ’, ‘ थर्मास ’ इत्यादि मूळच्या इंग्रजी पण आता मराठी झालेल्या शब्दांमधल्या थ-वर्णाचीहि स्थिति अशीच आहे. या शब्दांतला थ-वर्ण हा आपल्याला वाटतो, तसा अघोष प्राणित दंत्य नसून तो अघोष दंतस्थ (= दंतांतरस्थ) (interdental) ऊष्मवर्ण आहे, हें आपल्याला फारच क्वचित् माहीत असतें. म्हणजे ‘ बाथ ’ यांतल्या अंत्य थ-चा उच्चार दोन्ही दंतपंक्तींमध्ये ज़िभेचा शेंडा घालून हवा रेटून करावयाचा असतो. यासाठी त्याला दंतस्थ किंवा दंतांतरस्थ ऊष्मवर्ण असें म्हटलें. पण हें माहीत नसलें, म्हणून आपलें कांही विघडत नाही. आपल्या मराठीच्या वर्णमालेंत असा दंतस्थ (= दंतांतरस्थ) ऊष्मवर्ण मुळीच नाही. त्यामुळे आपण अशा दंतस्थाचा सरळ दंत्य वर्ण करून घेतलेला आहे. ‘ क़ाग़ज़ ’ हा मूळचा यावनी शब्द आणि त्याचा उच्चार पहा. त्यांतल्या ‘ क़ ’ आणि ‘ ग़ ’ या दोन्ही वर्णांचें आपण पार रूपांतर करून टाकिलेलें आहे. त्या यावनी शब्दांत मुळांत ‘ क़ ’ आणि ‘ ग़ ’ हे अधःकंठ्य वर्ण आहेत. पण मराठीच्या वर्णमालेला ते सर्वस्वीं अपरिचित असल्यामुळे मराठी जनांनी त्यांचे अनुकूल असे कंठ्य वर्ण करून सोडिले. ‘ ग़रीब ’ या शब्दांतल्या आद्य ग़-चीहि स्थिति मराठींत अशीच झालेली आहे. आपल्याला हेंहि ठाऊक आहे की, मराठींतला आजचा अल्पोष्म दंतमूलीय व्यंजनांचा वर्ग[1] हा मराठीने कोठूनतरी[2] बाहेरून घेतलेला आहे. मुळांत संस्कृतांत आणि प्राकृतांत केवळ तालव्य व्यंजनांचा वर्ग आहे. पण आज हीं अल्पोष्म दंतमूलीय व्यंजनें मराठीच्या रंध्रारंध्रांत जाऊन विसावलेलीं आहेत. शिवाय, ते वर्ण ‘ बॅट ’, ‘ बॉल ’ यांतल्या ॲ-ऑ-वर्णांप्रमाणे विशिष्टच शब्दांत आढळून येतात, असेंहि नाही; तर ते अल्पोष्म दंतमूलीय वर्ण तथाकथित[3] तत्सम, तद्भव, देश्य अशा कोठल्याहि शब्दांत उमटतात.

१. जसें : ‘चमचा’, ‘जहाज’ इत्यादि शब्दांत आद्यंतीं ऐकूं येणारा.

२. हा अल्पोष्म दंतमूलीय व्यंजनांचा वर्ग मराठी भाषेंत नेमका कोठून आला, तें निश्चित सांगतां येत नाही. झुल ब्लोक यांनी ‘मराठी भाषेचा विकास’ या आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे : ‘ ... आर्यभारतीय भाषांत एकट्या मराठींतच हे विशिष्ट उच्चार आहेत; पण तिला जोडूनच पूर्व प्रांतांत असलेल्या विजातीय भाषांत हे उच्चार मराठीप्रमाणेच आहेत. त्या भाषा म्हणजे तेलगू आणि कोइ ह्या द्राविडी भाषा आणि कुर्कु ही कोलारी भाषा अशा होत. (पहा – Linguistic Survey of India – मुंडा आणि द्राविडी भाषा, पृ. १६९, ४७८, ५८६).’ डॉ. वा. गो. परांजपे यांनी केलेलें भाषांतर : पृष्ठ १३८.

३. येथे ‘तथाकथित’ असें म्हटलें आहे, याचें कारण असें की, तत्सम, तद्भव आणि देश्य ही भाषेमधली विभागणी समर्थनीय वाटत नाही. शब्दभेद हा उच्चारावलंबी असतो. त्यामुळे ‘तद्भव’ शब्दांत जसा संस्कृताहून स्पष्ट उच्चारभेद (जसें : सर्प → साप) प्रत्ययाला येतो, तसाच तो तत्सम शब्दांतहि प्रत्ययाला येतो, मग त्याचें प्रमाण किती का अल्प असेना. (जसें : देव → देव्, कर → कऽर, रस → रऽस्) तेव्हा ‘देव्’ आणि ‘साप’ हे दोन्ही प्रकारचे शब्द ‘तद्भव’ मानणें प्राप्त आहे; आणि तें योग्य आहे. बरें, झाड, पोट याहि शब्दांना मुळें नसतील, असें नाही;

असें वर्णांतर[1] भाषेंत ज्या वेळीं होतें, अथवा होऊं पाहतें, त्या वेळीं रूढ वर्ण-मालेच्या अनुसंदर्भानें जे ध्वनि तींत असतात, त्यांच्या स्थानसमीपतेचें तत्त्व प्रभावी ठरतें, असें दिसतें. मोत्याच्या शिंपल्यांत बाहेरून वाळूचा कण गेला, म्हणजे शिंपल्यांतलें कालव तो कण आपल्याला खुपूं नये, म्हणून ज्याप्रमाणे आपल्या जीवनरसाचे त्यावर लेपांवर लेप देतें, आणि त्याचें मोतीं बनवून त्याला आपल्या छोट्याशा शिंपघरांत आत्मसात् करून टाकितें, त्याप्रमाणे भाषेच्या वर्णमालेची परभाषेंतल्या शब्दांमधल्या वर्णांविषयी प्रवृत्ति असते.

मित्र हो,

आत्तापर्यंत आपण मराठीच्या प्रमाणभाषेचें स्वरूप न्याहळिलें. प्रमाणभाषेची बहुमान्यता, तिच्या आकलनीयतेचें क्षेत्र, भाषाध्वनिसंबंध, वर्णमालेचें स्वरूप, तिची समसानता आणि व्यवस्था अशा अनेक विषयांचा ऊहापोह केला. आता उद्याच्या व्याख्यानांत आपण मराठीच्या वर्णमालेची चिकित्सा करूं.

तीं संस्कृतांतील नसतील, इतकेंच. अशा स्थितींत करावयाचेच असले, तर 'संस्कृत' (= तत्सम) आणि 'संस्कृतेतर' (= तत्समेतर) असे दोनच वर्ग कल्पितां येतील. आणि त्यांतहि तथाकथित 'संस्कृत' शब्द हे त्यांच्या संस्कृतांतील मूळच्या उच्चारांहून भेद पावलेले, ही भूमिका आहेच. अशा स्थितींत संस्कृताहून ज्यांचा उच्चार भिन्न आहे, अशा शब्दांना संस्कृत म्हणत राहणें हें कितपत योग्य आहे, हा प्रश्नच आहे. उदाहरणार्थ, गति → गत, रीति → रीत, सर्प → साप हे सर्वच शब्द मराठींत सर्रास वापरले जात असतां त्यांचे (१) गति, रीति, सर्प, इ. आणि (२) गत, रीत, साप, इ. असे दोन वर्ग कल्पावयाचे, आणि 'पोट' याहिसारखे शब्द तितक्याच प्राचुर्याने वापरले जात असतांना त्यांचें मूळ विशिष्ट भाषेंत, – अर्थात् संस्कृतांत, – नाही, म्हणून त्यांचा वेगळा वर्ग कल्पावयाचा, हें पटणारें नाही. शिवाय, याने फलनिष्पत्ति कांहीं नाही. तत्समादि विभागणी ही संस्कृतापुरतीच कां, याचाहि यांत खुलासा नाही. तात्पर्य, ही विभागणी अनावश्यक आणि अकिंचित्कर आहे.

१. खरें म्हणजे 'असा वर्णादेश'.

तिसरें

व्याख्यान

मराठीची वर्णमाला

तिसरें व्याख्यान

मराठीची वर्णमाला

१. वर्णांची द्विविध विभागणी

स्वर म्हणजे काय? मराठी भाषेची रूढ वर्णमाला.

२. स्वरमाला

स्वराच्या ऱ्हस्वदीर्घत्वाचा विचार. ऋ-ऌ या स्वरांचें परीक्षण. ऋ-ऌ वर्णांच्या स्वरत्वाचा विचार. ऋ-ऌ वर्णांविषयी एक तोड. तिचा दुहेरी लाभ. व्यावहारिक दृष्टि. ए, ऐ, ओ, औ यांचा विचार. स्वरमालेच्या अनुक्रमाचा पुनर्विचार. स्वरमालेचा पाश्चात्त्य आणि पौरस्त्य अनुक्रम.

३. व्यंजनमाला

रूढ वर्गीय व्यंजनमाला. अघोष-सघोष ' ह '. वर्गीय व्यंजनमालेंतलीं द्वितीय-चतुर्थ व्यंजनें. अनुनासिक व्यंजनांचा विचार. ञ-वर्ण. ञ = यँ? ञ ≠ यँ. ड-ढ-वर्णांचे ' प्रवाहस्थ ' आणि ' उत्प्रवाह ' उच्चार. ड-ढ-वर्णांचा ताडित उच्चार कां होतो, तें. ण-वर्णहि द्विविध. अनुवर्णांसह पुनर्मंडित ट-वर्गीय व्यंजनमाला. च-वर्गीय व्यंजन-मालेचा विचार. फ-चा द्विविध उच्चार. नवीन व्यंजनक्रम. वर्गीय व्यंजनमालेचें उच्चारस्थानानुसार कोष्ठक.

४. अंतःस्थ, ऊष्म, मूर्धन्य ळ हे वर्ण आणि ज्ञ

ज्ञ-चा विचार. ज्ञ-चा द्विविध उच्चार. ष-वर्णाचा विचार. अंतःस्थ वर्णांच्या अनुक्रमाचा पुनर्विचार. फलनिष्पत्ति.

१. वर्णांची द्विविध विभागणी

मित्र हो,

मागील व्याख्यानामध्ये आपण ज्या विषयांची चर्चा केली, त्यांत भाषा आणि व्याकरण यांचा संबंध, भाषेचें सिद्ध आणि साधित स्वरूप, ध्वनि-रेखा-संकेत, प्रमाण-भाषेचें स्वरूप, तिच्या आकलनीयतेचें क्षेत्र, ध्वनींच्या वर्गीकरणाची आवश्यकता, वर्णकल्पना, वर्णमालेची सममानता आणि व्यवस्था इत्यादि अनेक मुद्द्यांचा ऊहापोह केला. भाषेच्या दृष्टीने वर्णमालेची कल्पना कशी मूलभूत आणि आवश्यक आहे, तें आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून आपल्या लक्षांत आलें असेल. आज आपल्याला मराठी भाषेच्या वर्णमालेचा पुनर्विचार करावयाचा आहे.

वर्णांची विभागणी ही स्वर आणि व्यंजनें अशी करितात. स्वर आणि व्यंजनें असा द्विविध विभाग व्यावहारिक दृष्टीने उपयुक्त होतो, हें जरी खरें असलें, तरी शुद्ध तात्त्विक भूमिकेला अनुसरून स्वर-व्यंजनांचा विभाग हा लक्ष्मणरेषा काढून निश्चितपणाने दाखवून देणें हें सोपें नाही. कारण भाषेमध्ये स्वर हे कधीकधी व्यंजनांसारखे वागतात. अर्थात् स्वर आणि व्यंजनें अशी विभागणी शुद्ध तात्त्विक भूमिकेची न ठरतां ती कार्यकारी स्वरूपाची होते, आणि मग ओघानेच तिचें तात्त्विक अधिष्ठान तेवढ्यापुरतें डळमळतें. पण एवढें सांगतां येण्यासारखें आहे की, ध्वनीच्या निर्मितीच्या वेळीं मुखप्रदेशांत आणि कंठदेशीं जेव्हा कमींत-कमी प्रतिबंध होतो, तेव्हा निर्माण झालेल्या ध्वनीला स्वर म्हणतात. ध्वनिनिर्मितींतला हा प्रतिबंध सापेक्ष स्वरूपाचा असतो. त्यामुळे तो प्रतिबंध जसजसा वाढत जाईल, तसतसा स्वर हा व्यंजनाच्या रूपाकडे झुकूं पाहील. या संदर्भात 'इ' आणि 'य', 'उ' आणि 'व' यांचे उच्चार पाहिले असतां हें लक्षांत येण्यासारखें आहे. उच्चारण हें प्रवाही असणें, अर्थात् तें यथेच्छ लांबवितां येण्यासारखें असणें हेंहि स्वराचें लक्षण आहे. सर्व स्वर घोषयुक्त[१] असतात.

मराठी भाषेची म्हणून जी वर्णमाला रूढ आहे, तींत प्रथम स्वरमालिका येते; नंतर पांच उपमालांचे पदर जींत आहेत, अशी वर्गीय व्यंजनांची माला उपस्थित होते; पुढे

१. 'घोषयुक्त' म्हणजे 'नादयुक्त'. मुखावाटे श्वास बाहेर येतांना गळ्यांतलें स्वरयंत्र कंपित करून तो श्वास जेव्हा बाहेर पडतो, आणि मग मुखाच्या यथापेक्ष क्रियानुक्रियांनी जेव्हा उच्चारण होतें, तेव्हा तशा प्रकारच्या उच्चाराला 'घोषयुक्त' अथवा 'सघोष' म्हणतात. स्वरयंत्र कंपित न होतां, अर्थात् तें स्तब्ध राहून, जेव्हा उच्चारण होतें, तेव्हा त्याला 'अघोष' म्हणतात. उच्चारण हें सघोष आहे कीं अघोष आहे, हें गळ्यांतल्या स्वरयंत्राच्या जागेवर बाहेरूनसुद्धा हात ठेवून कोणालाहि सहज पडताळून पाहतां येतें.

चार अंतःस्थ व्यंजनांचा गट दिसतो; त्याच्या पाठीमागे तीन ऊष्मवर्ण आढळतात; आणि सरते शेवटीं ‘ ह ’, ‘ ळ ’, ‘ क्ष ’ आणि ‘ ज्ञ ’ हे अवर्गीकृत वर्ण दृष्टीस पडतात. ही रूढ वर्णमाला अशी :

स्व र मा ला	अ आ इ ई उ ऊ ऋ (ॠ[१]) ऌ (ॡ[१]) ए ऐ ओ औ (ं[१]) (ाः[१]).
वर्गीय व्यंजनें[२]	(क-वर्ग) क ख ग घ ङ (कंठ्य)
	(च-वर्ग) च छ ज झ ञ (तालव्य)
	(ट-वर्ग) ट ठ ड ढ ण (मूर्धन्य)
	(त-वर्ग) त थ द ध न (दंत्य)
	(प-वर्ग) प फ ब भ म (ओष्ठ्य)
अंतःस्थ व्यंजनें	य र ल व
ऊष्म व्यंजनें	श ष स ह
मूर्धन्य व्यंजन	ळ
संयुक्त व्यंजनें	(क्ष[३]) (ज्ञ[३])

मराठीच्या दृष्टीने पाहतां ही रूढ वर्णमाला कांहीशी ठीक असली, तरी ती तत्त्वतः समाधानकारक नाही. कारण ती प्रायः संस्कृताच्या व्याकरणामधून उचलिलेली आहे. त्यामुळे तींत मराठी भाषेच्या प्रकृतीला स्वतंत्र असें स्थान दिसत नाही.

२. स्व र मा ला

स्वरमालेच्या बाबतींत विचार करितां प्रथम असें म्हटलें पाहिजे की, मराठी भाषेच्या प्रकृतींत दीर्घ स्वर हा वर्ण म्हणून मानण्याची आवश्यकता नाहीं. मराठींत ऱ्हस्वदीर्घत्व हें अर्थभेदकारक नाही. त्यामुळे तें अकिंचित्कर आहे. शब्दामध्ये ज्या स्थानीं — अर्थात् आदि-मध्य-अवसानीं — एखादा स्वर येईल, तें स्थान लक्षांत घेऊन त्याचें ऱ्हस्वत्व अथवा दीर्घत्व निर्धारितां येतें. म्हणजेच स्वराचें ऱ्हस्वदीर्घत्व हें अनुमेय आहे; निर्धारणक्षम आहे. शिवाय, दीर्घत्व हा स्वराचा धर्म आहे. ऱ्हस्व स्वराच्या उच्चारणाला जेवढा काळ लागतो, त्यामध्येच वाढ करून[४] स्वराचें दीर्घत्व मिळतें.

१. कांही वैयाकरण हे स्वर वगळतात. आता अनुस्वार आणि विसर्ग हें स्वर नव्हेत, हा प्रश्न वेगळा ! ऋ-ऌ-चेंहि स्वरत्व कसें संशयित आहे, त्याची चर्चा पुढे पृ. ५९ – ६० येथे केली आहे.

२. सोयीसाठी येथे आणि पुढेहि व्यंजनें स्वरान्त दाखविलीं आहेत. वस्तुतः, तीं क् ख्...अशीं दिलीं पाहिजेत.

३. कांही वैयाकरण हीं व्यंजनें देत नाहीत.

४. स्वरांचें उच्चारण हें प्रवाही असतें, हें यापूर्वी (पृ. ५५) सांगितलें आहे.

अर्थात् तें सापेक्ष आहे. ऱ्हस्व स्वराच्या उच्चारणाचा काळ १ मिति (unit) मानिला, तर प्रमाणतः दीर्घ स्वराच्या उच्चारणाचा काळ २ मिति (units) मानितां येईल. पण याव्यतिरिक्त एखाद्याला दूर अंतरावरून हाक मारितांना या दीर्घत्वांतहि आणखी वाढ होते. ‘ मिलिंदा ऽऽऽ’, ‘ हिमानी ऽऽऽ’, ‘ दिलीऽऽप ’, ‘ बेवी ऽऽऽ’, ‘ मेघना ऽऽऽऽ’, इत्यादि संबोधनांमध्ये अंत्य अथवा उपांत्य दीर्घ स्वरांच्याहि उच्चारणांमध्ये भरपूर वाढ झालेली आपल्याला दिसते.[1] शेताच्या मेरेवरून साद घालितांना या दीर्घोच्चारणामध्ये प्रमाणाबाहेर, म्हणजे हाक मारणाऱ्याच्या उच्छ्वासमानाइतकी, वाढ झालेली आपल्याला ऐकूं येते. आणखी एक मुद्दा असा की, अर्थानुरोधानें शब्दांत अनिश्चित अथवा अनियत ठिकाणीं दीर्घत्व अथवा अतिदीर्घत्व ऐकूं येतें. अचानकपणें दुभत्यांतलें झुरळ पातळावर चढलें, म्हणजे गृहिणी बावरून जाऊन एकदम ‘ **ईऽऽऽ!** ’ करून ओरडते ! हें ई-चें दीर्घत्व अतिदीर्घ असतें. पण अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. जसें : ‘ मीं त्याची **खूऽऽप** खरड काढिली ’, ‘ देवा रेऽऽऽ देवा ! **तुलाऽच** डोळे ! ’ (एकच प्याला), ‘ व्याख्यानाला **बरोऽऽऽब्बर** साडेसहा वाजतां या ’, ‘ गेल्या महापुरांत लोकांचे **अतीऽऽऽशय** हाल झाले ’, ‘ पोर माझी ती ! कामाने **फाऽऽर** दमून गेली ’ इत्यादि. पण हें अतिदीर्घत्व आत्तापर्यंतच्या उदाहरणांत दीर्घ स्वराच्या ठिकाणीं दिसलें. कधीकधी हें दीर्घत्व ‘ अ ’ याहि स्वराला आढळून येतें, आणि त्या वेळीं ‘ अ-चा दीर्घ आ ’ हा रूढ नियमहि[2] गडगडतो. उदाहरणार्थ, ‘ **सुमऽऽन** ’, ‘ **माधऽऽव** ’, ‘ **केशऽऽव** ’ इत्यादि संबोधनांतल्या उपांत्य अ-कडे जरा कान द्या, म्हणजे ऱ्हस्वदीर्घत्वाच्या आपल्या रूढ कल्पनांचें पुनर्मंडन करणें कसें आवश्यक आहे, तें दिसेल. ‘ देवा रेऽऽऽ देवा ! ’ या आत्ताच घेतलेल्या ‘एकच प्याल्यां’तल्या उदाहरणांत ‘ देवा रेऽऽऽ...’ यांतल्या ‘ देवा’मधल्या ए-चें आणि आ-चें कसें ऱ्हस्वत्व झालें आहे, पहा. आपल्या उच्चारांत ‘ ए ’, ‘ ओ ’ याहि स्वरांचें ऱ्हस्वदीर्घत्व ऐकू येतें. ‘ **एऽक** ’, ‘ **ओऽक** ’ यांतले ‘ ए ’ आणि ‘ ओ ’ हे प्रथम ऐका, आणि मग ‘ **एकाला** ’, ‘ **ओकांना** ’ या पदांतल्या त्याच आद्य ए-ओ-कडे कान द्या, म्हणजे हें सहज जाणवेल की, पहिल्या गटांतले ए-ओ उच्चारांत बरेच लांब आहेत, तर दुसऱ्या गटांतले ए-ओ आखूड आहेत. ‘ **आड** ’ यांतला आद्य ‘ आ ’ जितका दीर्घोच्चारित आहे, तितका कांही ‘ **आडांत** ’ यांतला आद्य ‘ आ ’ दीर्घोच्चार नाही. ऱ्हस्वदीर्घांच्या या जागा पदांतल्या अथवा शब्दांतल्या त्यांच्या स्थानांना अनुसरून निर्धारित करितां येतात.

आत्ताच सांगितलें की, ‘ आ ’ हा अ-चा दीर्घ स्वर नाही. ‘ अ ’ आणि ‘ आ ’ हे स्वर पृथक् आणि स्वतंत्र आहेत. त्या दोहोंचीं उच्चारस्थानें परस्परांपासून वेगळीं आहेत.

१. संस्कृत व्याकरणांत याला ‘ ८ लुत्व ’ म्हटलें आहे.

२. वस्तुतः, ‘ आ ’ हा अ-चा दीर्घ स्वर नाही; ‘ अ ’ आणि ‘ आ ’ हे स्वतंत्र स्वर आहेत.

त्यांचा उच्चार करितांना जो मुखविवार होतो, त्यांत, म्हणजे तोंडाच्या उघडण्यांत, फरक आहे, अ-च्या उच्चाराच्या वेळीं जिव्हेचें तालुभागापासूनचें अंतर कमी असतें, आ-च्या उच्चाराच्या वेळीं तें अंतर जास्त होतें. भाषेंतल्या ध्वनींचें वर्णांमध्यें वर्गीकरण करितात, तेव्हा ते ध्वनि शब्दांच्या कोणत्या स्थानीं ऐकूं येतात, आदि-मध्य-अवसानीं आढळतात कीं काय, तसे ते कोणत्याहि परिस्थितींत अव्यभिचारीपणानें असतात काय, इत्यादि गोष्टी परीक्षून पहाव्या लागतात. हें सर्व जमेला धरितां असें दिसतें की, 'अ' आणि 'आ' हे स्वर शब्दाच्या आदि-मध्य-अवसानीं कोठेहि येऊं शकतात. या सर्व विवेचनाचा अनुसार करितां (दीर्घ) 'ई' आणि दीर्घ 'ऊ' यांच्या विभक्त गणनेची स्वरमालेंत आवश्यकता नाही. (दीर्घ) 'ॠ' हा मराठींत अस्तित्वांतच नाही.[1] (दीर्घ) 'ॡ' हा स्वर तर निव्वळ काल्पनिकच आहे. 'ऌ-पूर्वीच्या प्रत्येक स्वराला जर दीर्घता आहे, तर ही दीर्घतारूपी सहचरी बिचाऱ्या ऌ-ला कां असूं नये? ऌ-वर ब्रह्मचर्य कां लादावें?' याच एका उदार (पण अनावश्यक) न्यायबुद्धीनें (दीर्घ) 'ॡ' स्वरांच्या पंक्तींत आणिलेला दिसतो! तेव्हा रूढ वर्णमालेचा पुनर्विचार करितांना अ-पासून (दीर्घ) ॡ-पर्यंतच्या स्वरांपैकी केवळ

अ आ इ उ ऋ ऌ[2]

इतके स्वर उरतील.

ऋ-ऌ : परीक्षण

परंतु यांतहि 'ऋ' आणि 'ऌ' या स्वरांची अधिक परीक्षा केली पाहिजे. 'ऌ' हा स्वर मराठींत स्वतंत्र रीत्या तर मुळीच येत नाही. मराठींतल्या 'क्लृप्ति' या एकाच शब्दांत काय-तो तो आढळतो.[3] तेव्हा 'क्लृप्ति' या एका शब्दाची 'ऌ' या स्वरापुरती नोंद करूनदेखील निर्वाह होण्यासारखा आहे. मराठींतल्या केवळ एकाच शब्दांत 'ऌ' हा स्वर सापडतो, म्हणून त्या स्वराला वर्णमालेंत स्वतंत्र असें स्थान देण्याचें प्रयोजन नाही. तसें करणें म्हणजे नाल गवसला, म्हणून घोडा विकत घेण्यासारखें आहे! 'ऌ' हा स्वर फक्त एकाच शब्दांत असल्याकारणानें तेवढ्यासाठी त्याचा वर्णमालेंत समावेश करणें काय, किंवा तेवढ्या एका शब्दाची तशी नोंद करणें काय, दोन्ही फलतः एकच. 'ऋ' हा स्वर स्वतंत्र रीत्या फारकरून शब्दाच्या आद्यस्थानीं येतो. जसें ऋषि, ऋण इत्यादि.

१. संस्कृतांतहि (दीर्घ) 'ॠ' विरळ आहे. तृजन्त शब्दांच्या कांही रूपांत मात्र तो अव्यभिचारी आहे. मराठींत 'अमृत', 'सुकृत', 'ऋण' यांमधल्या ऋ-चा तसा उच्चार असल्यास त्याचा स्वतंत्र विचार करणें शक्य आहे.

२. याचा कांही परंपरांत '<u>लृ+ऋ</u>' (= लृऋ) असाहि उच्चार आढळतो. अधोरेखेसाठी पृ. ५९-वरील तळटीप पहा.

३. संस्कृतांतदेखील त्याचा प्रचार अगदी थोडा आहे.

पण यांव्यतिरिक्त इतर पुष्कळ शब्दांत तो व्यंजनानुयोगी असा आदि-मध्य-स्थानीं येतो. जसें : दृष्टिकोण, कृति, कृत्य, मृदु, कृपा, मृत, घृत, अमृत, सुकृत, मातृपद, विस्तृत, प्रसृत इत्यादि.[1]

याहिवर प्रश्न असा की, 'ऋ' आणि 'ऌ' यांना स्वर कां मानावयाचें? ध्वनीच्या निर्मितीच्या वेळीं मुखप्रदेशांत आणि कंठदेशीं जेव्हा कमींत-कमी प्रतिबंध होतो, तेव्हा निर्माण झालेल्या ध्वनीला स्वर म्हणतात, असें विवरण यापूर्वी[2] केलें आहे. तें लक्षांत घेतां 'ऋ' आणि 'ऌ' यांच्या उच्चारांच्या वेळीं कशी परिस्थिति असते, तें पाहण्यासारखें आहे. ऋ-ऌ यांच्या उच्चारांत जिव्हेचा पश्चार्ध आकसून किंचित् जाडसर होतो, आणि तिच्या अशा आकसलेल्या अवस्थेंत जिव्हाग्राचा मूर्ध्याला ईषत्स्पर्श आणि दंतमूलाला स्पर्श अनुक्रमाने[3] होतो. अर्थात् उच्चारणांत प्रतिबंध येतो; आणि त्यांचें उच्चारण प्रवाही स्वरूपाचें राहूं शकत नाही. ही स्थिति ऋ-ऌ यांना स्वरसंज्ञा देण्याला अनुकूल नाही. त्यामुळे ऋ-ऌ हे स्वर न ठरतां व्यंजनें ठरूं लागतात; आणि त्यामुळे 'ऋ' आणि 'ऌ' हे स्वरमालेंतून भ्रष्ट होऊन व्यंजनमालेंत अनुस्यूत होऊं लागतील.

या ऋ-ऌ-च्या संदर्भांत पुढील एक तोड सुचवावीशी वाटते. ती अशी : व्यंजनमालेंत 'र' आणि 'ल' हीं व्यंजनें समाविष्ट केलीं पाहिजेत, हें उघड आहे. तीं व्यंजनें मानिल्यावर स्वरमालेमध्यें एक अधिक तालव्य स्वर इ-वर्णापुढे मानावा. हा जो इ-वर्णोतर तालव्य स्वर मानावयाचा, त्याचा उच्चार करितांना जिव्हा ही तालु-प्रदेशाच्या पुरोभागाला लगटून ठेवावयाची, आणि जिव्हेचा पश्चार्ध आकसलेला आणि किंचित् जाडसर करावयाचा. हा उच्चार 'इॅ' या खुणेने दर्शवितां येईल. यायोगें 'ऋ' आणि 'ऌ' हे दोन स्वर न मानितां निर्वाह होण्यासारखा आहे. ऋ-ऌ-च्या उच्चाराच्या समयीं 'र' आणि 'ल' या व्यंजनांशीं या इॅ-वर्णाचा योग केला, म्हणजे अनुक्रमाने 'ऋ' आणि 'ऌ' हे उच्चार सिद्ध होतील. अर्थात्

ऋ = रइॅ[4] (उच्चारतः);
ऌ = लइॅ[4] (उच्चारतः).

असें मानण्यांत एक आनुषंगिक असा दुहेरी लाभ आहे. तो हा की, ज्यांना पारंपरिक

१. कांही चांगले-चांगले सुशिक्षित असे संस्कृत-मराठीचे शिक्षक आणि प्राध्यापकदेखील 'रुशी' (= ऋषि), 'रूण' (= ऋण), 'द्रुष्टिकोन' (= दृष्टिकोण), 'क्रुति' (= कृति), 'क्रुत्य' (= कृत्य), 'म्रुदू' (= मृदु), 'क्रुपा' (= कृपा), म्रूत (= मृत), घ्रूत (= घृत), 'अम्रूत' (= अमृत), 'सुक्रूत' (= सुकृत), 'मात्रुपद', (= मातृपद) विस्त्रूत (= विस्तृत), प्रस्रूत (= प्रसृत) इत्यादि उच्चार करितांना आढळतात. पण तो उच्चारांतला केवळ गहाळपणा आहे. उच्चार हे लहान मुलांनीच शिकावे असें नाही; मोठ्यांनीहि शिकावे.

२. पृष्ठ ५५ पहा.

३. अर्थात्, ऋ-च्या वेळीं मूर्ध्याला आणि ऌ-च्या वेळीं दंतमूलाला.

४. अधोरेखा ही वर्णांचें अविभाज्यत्व दर्शविते.

रितीला अनुसरून ऋ-ऌ हे स्वर मानावयाचे आहेत, त्यांना इॅ-वर्णामुळे ऋ-ऌ हीं व्यंजनें नसून हे स्वर आहेत, हें जाणवेल; आणि नुकत्याच दिलेल्या कारणांमुळे[1] ज्यांना ऋ-ऌ-चें स्वरत्व पतकरावयाचें नाही, त्यांना रइॅ आणि लइॅ यांमधल्या र-ल-कडे पाहून त्यांच्या व्यंजनत्वाची साक्ष पटेल. पण या दुहेरी कल्पनेचा लाभ गृहीत करूनसुद्धा असें म्हणावेंसें वाटतें की, ऋ-ऌ-संबंधीच्या प्रस्तुत विषयाचा या पक्षीं अथवा त्या पक्षीं कौल देऊन ठाम निर्णय करणें हें सोपें नाही. कांही विद्वानांच्या मतें 'ऋ' आणि 'ऌ' हे वर्ण मराठी भाषेंत अस्तित्वांतच नाहीत. अर्थात् या मतानुसार ऋ-ऌ-च्या समस्येचा छेदच उडून जातो. परंतु असें स्पष्ट जाणवतें की, प्रमाणभाषा बोलणाऱ्या सहस्रावधि लोकांच्या भाषेंत तो सहज ऐकूं येतो.[2] त्यामुळे त्याचें अस्तित्व मुदलींच नाकारणें हें शक्य नाही, आणि सयुक्तिकहि नाही. म्हणून मराठींतल्या ऋ-ऌ-च्या अभावाविषयी जें मत निर्देशिलेलें आहे, त्याचा स्वीकार करितां येत नाही. ऋ-ऌ-च्या अस्तित्वामुळे मराठीच्या वर्णमालेचा प्रश्न जटिल आणि कूट होतो खरा, पण प्रश्न जटिल-कूट कसाहि झाला, तरी त्याचें यथावत् स्वरूप न्याहळणें हें प्राप्त आहे. याच भूमिकेला अनुसरून त्याचा परामर्श केला आहे.

या संदर्भांत एक व्यावहारिक दृष्टीचा विचार सुचतो. ऋ-ऌ-चें निवळ स्वतंत्र अस्तित्व नाकारणें हें एक वेळ शक्य होईल. किंबहुना, 'ऌ' हा स्वर स्वतंत्र रीत्या मराठींत मुळीच येत नाही, आणि व्यंजनानुयोगी असा तो येतो, तोहि 'क्ऌप्ति' या एकमेव शब्दांत येतो. तेव्हा ऌ-चें अस्तित्व मानितांना तेवढ्या एका शब्दाची नोंद केली म्हणजे निर्वाह होईल.[3] पण ऋ-ची गोष्ट जरा वेगळी आहे. तो स्वतंत्र रितीनें थोड्याच शब्दांत येतो, हें खरें, आणि त्याहि वेळीं तो शब्दाच्या आद्यस्थानीं येतो. मात्र व्यंजनानुयोगी अशा अवस्थेंत तो पुष्कळच शब्दांमध्ये येतो; आणि तेथे त्याचा वेगळा उच्चारहि जाणवतो. असें असतां तो उच्चार कानाआड टाकणें अथवा त्याची व्यवस्था न लावणें हें कसें समर्थनीय म्हणतां येईल? शास्त्रविचारांत वास्तव स्थितीला बगल देणें अथवा तिचा अपलाप करणें हें योग्य नव्हे.

दुसरें असें की, 'ऋ' मानण्यामुळे ज्या सहस्रावधि जनांच्या दैनंदिन भाषेंत तो नांदत आहे, त्यांच्या भाषेच्या वर्णमालेची उपपत्ति लागेल; आणि ज्यांच्या भाषेंत तो मुळीच नाहीं[4], त्यांच्या भाषेला धक्का लागणार नाही. फार तर एक अनुपयुक्त वर्ण वर्णमालेंत आला, एवढेंच होईल. पण त्यानें बिघाड नाही. तो न मानण्यानें मात्र वर्णमालेची

१. पृष्ठ ५९ पहा.

२. 'कृति', 'दृष्टि', 'कृत्य', 'अमृत' इत्यादि शतावधि शब्द या संदर्भांत लक्षांत घेतले पाहिजेत. पृष्ठ ५९ पहा.

३. पृष्ठ ५८ पहा.

४. पण हें वस्तुस्थितीला धरून नाही, हें सांगितलेंच.

अनुपपत्ति आणि वास्तवाचा अपलाप या आपत्ति येतील. त्यांच्या परिहारासाठी ऋ-चें अस्तित्व वास्तवाला अनुसरून मानणें आणि त्याची कांही सोपपत्तिक व्यवस्था करणें सयुक्तिक आहे.

स्वरलक्षण समग्रतया लागू पडत नसतां ऋ-वर्णाला जें स्वरत्व दिलेलें आहे, तें त्याच्या शब्दांतर्गत वा पदांतर्गत कार्यकारी स्वरूपामुळे असेल काय, अशी एक शंका येते. 'अमृत', 'सुकृत' यांसारख्या शब्दांमध्ये ऋ-पूर्वीच्या अक्षरावर आघात येत नाही. अर्थात् परिणामतः 'अ', 'सु' हे गुरु होत नाहीत. हें लक्षण स्वराचें आहे.

अमित (= अ-म्-इ-त्-अ), सुकेत (= स्-उ-क्-ए-त्-अ)

या शब्दांत ज्याप्रमाणे 'अ' आणि 'सु' यांवर आघात येत नाही, त्याप्रमाणे

अमृत (= अ-म्-ऋ-त्-अ), सुकृत (= स्-उ-क्-ऋ-त्-अ)

याहि शब्दांत 'अ' आणि 'सु' यांवर आघात येत नाही. कारण वरील उदाहरणांमध्ये 'इ' आणि 'ऋ' व 'ए' आणि 'ऋ' हे समकक्ष आहेत.[1] भाषेंतील ऋ-वर्णाच्या या व्यवहारामुळे त्याला स्वरकक्षा प्राप्त झाली असेल काय, अशी एक शंका येते. मराठींत कवीकधी 'अमृत', 'सुकृत' यांसारख्या शब्दांत आद्याक्षरावर (अर्थात् = ऋ-पूर्वी) उच्चारांत आघात ऐकूं येतो. वस्तुतः, तो प्रामादिक आहे. ऋ-वर्णाचें स्वरत्व आणि तत्पूर्वीचा आघात या गोष्टी अनुपपन्न आणि असंगत आहेत.[2] मात्र अशा शब्दांत ऋ-वर्णापूर्वी आघात देण्याची प्रवृत्ति जर सार्वत्रिक रीत्या रूढ झाली, आणि ऋ-वर्णा-विषयी यापूर्वी[3] केलेलें विवेचन जर जमेला धरिलें, तर ऋ-चा स्वरमालिकेंतून होणारा संभाव्य भ्रंश अटळ म्हणावा लागेल.

ए, ऐ, ओ, औ

ए, ऐ, ओ, औ हे पारंपरिक रीत्या संयुक्त स्वर मानिले जातात. परंतु उच्चाराचें स्थान आणि उच्चाराचा प्रयत्न हे पाहतां 'ए' आणि 'ओ' हे शुद्ध आणि स्वतंत्र

१. अशीच स्थिति 'चक्लृपे' (संस्कृत : परोक्षभूत. तृ. पु. ए. व.) यांताहि आहे. 'चक्लृपे' यांत आद्याक्षरावर आघात नाही. अर्थात् 'क्लृ' हें संयुक्त व्यंजन नाही. असतें, तर आद्याक्षरावर आघात आला असता. 'लृ' हा स्वर गणण्याला हें कारण असेल काय, अशी शंका येते.

२. पूर्वाक्षरावर आघात न येणें हें स्वरत्वनिर्धारणाचें गमक संस्कृतांत निरपवाद म्हणून चालेल. परंतु मराठींतली याविषयीची स्थिति वेगळी आणि परस्परसंक्रांत (overlapping) आहे. त्यामुळे पूर्वाक्षरावर आघात येतो, तेव्हाची स्थिति सापवाद होते. जसें : पुण्याला, पुण्ण्याला; दऱ्या, दर्या; अशीं अनेक उदाहरणें पाहतां मराठीला या बाबतींत कांही वेगळा मार्ग काढावा लागेल, असें वाटतें.

३. पृष्ठ ५९ पहा.

स्वर आहेत. त्यांच्या उच्चारांचीं स्थानें पृथक् आहेत, आणि शब्दांतलें त्यांचें आदि-मध्य-अवसानाचें स्थान निर्धारणक्षम नसतें. त्यामुळे 'ए' आणि 'ओ' हे स्वतंत्र स्वर होत. परंतु 'ऐ' आणि 'औ' हे स्वर मानण्याची आवश्यकता नाही. त्यांचा समावेश 'अइ' आणि 'अउ' यांमध्ये होईल. उच्चारतः, 'अ' व 'इ' यांचा जोडून केलेला उच्चाराविष्कार म्हणजे 'ऐ'; तसेंच, अउ = औ.[1] अइ = ऐ आणि अउ = औ या सदृश उच्चारांमुळे प्राचीन संस्कृत वाङ्मयांत कांही संभ्रमात्मक पाठहि प्रवृत्त झालेले आहेत. उदाहरणार्थ, ऐतरेय-ब्राह्मणांत[2] 'स इरावती' याच्या स्थानीं 'सैरावती' असा पाठ शक्य आहे. यावरून असें दिसेल की, 'अइ' यांना 'ऐ'-पासून वेगळें ठेविणें तसेंच 'अउ' यांना 'औ'-पासून निराळें ठेविणें हें शक्य नाही. मराठींत तर त्याची आवश्यकता नाही. 'ऐ' आणि 'औ' हे केवळ पृथक् असे लेखाकार आहेत. उच्चारतः, त्यांना अनुक्रमें अइ-पासून आणि अउ-पासून स्वतंत्र अस्तित्व नाही. शिवाय, या व्यवस्थेमुळे स्वरमालिकेंतले दोन अनावश्यक स्वरवर्ण कमी होऊन लाघव साधतें, तें वेगळेंच. अनुस्वार आणि विसर्ग हे स्वर नसून व्यंजनें आहेत.

स्वरमालिकेचें विवेचन येथे जवळजवळ समाप्त होतें. प्रस्तुत विवेचनानुसार मराठीची स्वरमाला अशी होईल :

अ आ इ उ ऋ[3] ॲ ओ (एकूण ७).

पण या स्वरमालेंत आणखी भर टाकिली पाहिजे. पृ. ४५–४६ येथे 'बॅट', 'बॉल' या उदाहरणांच्या अनुसंदर्भांत 'ॲ', 'ऑ' या वर्णांचें विवेचन केलें आहे. तें विवेचन जर जमेला धरिलें,—आणि तें तसें मान्य केलें पाहिजे,—तर 'ए' याच्या पुढे 'ॲ' आणि 'ओ' याच्या नंतर 'ऑ' हे शुद्ध स्वर घेतले पाहिजेत. 'ॲ' आणि 'ऑ' यांचीं उच्चारस्थानें पृथक् आहेत, आणि स्वतंत्र आहेत. तसेंच, ते स्वर आजच्या मराठींत बहुप्रयुक्त आहेत. तेव्हा पुनर्मंडित स्वर-मालिका अशी होईल :

अ आ इ उ ऋ[3] ए ॲ ओ ऑ (एकूण ९).

१. 'ऐ' आणि 'औ' हे गाळल्याने एतद्विषयक संधि-विचारावर जो परिणाम होईल, त्याची वेगळी दखल घ्यावी लागेल. जसें : वन + ओषधि = वनौषधि; ∴ अ, आ + ओ = अउ (औ); ∴ ओ → उ.

२. ७·१३·४.

३. याचें सविस्तर विवेचन वर केलें आहे, तें ध्यानीं घ्यावें. असें पुन्हा सांगण्याचें कारण हें की, ऋ-वर्णाचा स्वरमालेमध्ये जो समावेश करावयाचा, तो कांहीसा दृष्टिकोणावर अवलंबून राहील. संगतवारपणाच्या दृष्टीने माझा कल ऋ-वर्ण हा व्यंजन आणि स्वर यांचा संयोग (जसें : र्+इँ) मानण्याकडे आहे.

स्वरमालेचा अनुक्रम

आपल्या वर्णमालेचा जो अनुक्रम आहे, तो उच्चाराच्या स्पर्शस्थानानुसार असल्या-कारणाने तिची रचना पद्धतशीर आहे, असा आपण अभिमान वाहतों; आणि तो यथार्थहि आहे. पण त्याला मर्यादा आहे. हा अभिमान व्यंजनमालेच्या रचनेच्या बाबतींत सार्थ आहे. व्यंजनमाला देतांना प्रथम वर्गीय व्यंजनें, नंतर अंतःस्थ व्यंजनें, मग ऊष्मव्यंजनें आणि शेवटीं 'ळ' हें मूर्धन्य व्यंजन, हा अनुक्रम कांही धोरण दर्शवितो, हें तर खरेंच, पण वर्गीय व्यंजनांच्याहि रचनेंत उच्चारांतल्या स्पर्शस्थानांचा विशिष्ट क्रम संभाळलेला आहे, हें विशेष. क-वर्गीय व्यंजनांपासून प-वर्गीय व्यंजनांपर्यंत कंठापासून ओष्ठांपर्यंतचा स्पर्शक्रम स्पष्ट आहे. त्यांत अनुनासिक व्यंजनांचीं स्थानें यथाक्रम आहेत. त्यामुळे सर्व व्यंजनमालेंत क्रमाचें सूत्र स्पष्ट जाणवतें.

परंतु असा क्रम आपल्याला स्वरमालिकेंत दिसत नाही. नुकतीच पृष्ठ ६२-वर जी स्वरमाला दिली, ती रूढ क्रमाला अनुसरून दिली. पण त्या स्वरांचे उच्चार करितांना मुखांतर्भागाची जी हालचाल होते, तिच्याविषयीचें रूढ स्वरमालेंत कांही सुसूत्र धोरण दिसत नाही. .स्वरांच्या रचनेंत स्वैर व्यत्यास अथवा उत्सूत्रता वाटते. व्यंजनें हीं कंठस्पर्शस्थानाला आरंभ करून सांगितलेलीं असल्यामुळे स्वरांचीहि क्रमरचना तशी असणें इष्ट आहे. पण अशी रचना रूढ स्वरमालेमध्ये प्रतिबिंबित नाही; आणि हिच्या उलटहि रचना — म्हणजे ओठांकडून कंठाकडे अशी — प्रतिबिंबित झालेली दिसत नाही. मराठी भाषकांचा 'अ' वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचा उच्चार मुखमध्यस्थ असा, पण कंठाकडे झुकणारा आहे.[1] पण उ-चा उच्चार सर्वांत मागें, म्हणजे कंठाला जवळ आहे. त्यानंतर, अर्थात् त्याच्या खाली, 'ओ'; मग त्याच्या खाली 'ऑ'. त्याच्या आसपास पुढे पण वर 'ऋ'; त्याखाली 'अ'; मग त्याच्या खाली 'आ'. सर्वांत पुढच्या भागांत सर्वांत वर 'इ'; मग खाली 'ए' आणि त्याच्या खाली 'ॲ'. म्हणजे स्वरमालेच्या उच्चारस्थानानुसार कंठाकडून ओठांकडे स्थूल अनुक्रम असा :

(१) उ ओ ऑ, ऋ अ आ, इ ए ॲ (एकूण ९).

किंवा ओठांकडून कंठाकडे[2] क्रम असा :

(२) इ ए ॲ, ऋ अ आ, उ ओ ऑ (एकूण ९).

आत्ता दिलेला हा स्वरमालेचा नवीन क्रम स्थूल स्वरूपाचा आहे. 'स्थूल' म्हणण्याचें कारण असें की, स्वरांच्या उच्चारांत मुखांतर्भागांतल्या बहुविध हालचाली

१. सारस्वतांच्या भाषेंत तर तो याहिपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. तो आणखी मागे जातो; आणि तो वेगळा असल्याचें सूक्ष्मदर्शी श्रोत्याला लगेच जाणवतें.

२. पाश्चात्त्य पद्धतीनुसार ओठांकडून कंठाकडे, असा क्रम स्वर आणि व्यंजनें या दोहोंच्याहि बाबतींत देतात.

एकाच वेळीं समाविष्ट आहेत. तोंडाची उघडझाप, ज़िव्हेची विविध हालचाल, तिची तालु-भागापासून उणी-अधिक उंची, तोंडाची कमी-अधिक गोलाई, ओठांचा मोठा अथवा बारीक चंबू अशा कितीतरी सूक्ष्म क्रियानुक्रिया स्वरांच्या उच्चारणांमध्यें असतात. त्यामुळे या सर्व क्रियानुक्रियांचा क्रम एकाच वेळीं एकच माप लावून सांगणें कठीण आहे. स्वरोच्चारांतल्या या क्रिया कशा व्यक्त होतात, तें समोर आरसा धरून पाहणें किती मनोरंजक आणि उद्बोधक आहे, तें प्रत्यक्ष प्रयोग केल्यावाचून स्पष्टपणें प्रतीत होणार नाही. क्षणभर मीच आरसा आहें, अशी कल्पना केली, तर या स्वरमालेच्या नवीन उच्चारक्रमांत आपल्या मुखाची संभाव्य क्रियानुक्रिया कशी घडते, तें पाहण्यासारखें आहे. पाश्चात्त्य पद्धतीनुसार क्रम असा :

(१) इ ए ॲ, ऋ अ आ, उ ओ ऑ (एकूण ९).

पौरस्त्य पद्धतीनुसार हा उच्चारक्रम असा :

(२) उ ओ ऑ, ऋ अ आ, इ ए ॲ (एकूण ९).

हें सहज आपल्या लक्षांत येईल की, या स्वरमालेंतल्या पहिल्या तीन स्वरांचा[1] एक गट होतो, तो 'इ', 'ए', 'ॲ' या स्वरांचा. त्यांच्या उच्चाराच्या वेळीं तालु-भागाच्या पूर्वार्धापासून ज़िव्हेचें अंतर क्रमाक्रमानें वाढत जाऊन तोंडहि उघडत जातें. 'ऋ' हा वर्ण थोडा स्वतंत्र, पण वर, मुखमध्यस्थ आहे. शेवटच्या पांच स्वरांचा एक गट होतो, तो 'आ', 'अ', 'ऑ', 'ओ', 'उ' यांचा. या गटामधल्या स्वरांच्या उच्चाराच्या वेळीं तोंड हें क्रमाक्रमानें मिटत जातें व शेवटीं ओठांचा बारीक चंबू होतो; आणि ज़िव्हेच्या पश्चार्धाची उंची क्रमानें तालुभागाकडे त्याच वेळीं वाढत जाते. हें सर्व विवेचिण्याचें कारण असें की, व्यंजनमालेचा जो वास्तव रचनाक्रम आहे, त्याच्या तुलनेनें स्वरमालेचा रूढ अनुक्रम कसा उत्सूत्र आहे, हें यथार्थपणें लक्षांत यावें.

स्वरमालिकेच्या क्रमरचनेचा विचार करितांना उच्चारांतले इतर अंश गृहीत करूनसुद्धा क्रम ठरवितां येईल. उदाहरणार्थ, ऑ, ओ, उ हा स्वरांचा गट कंठ्यमात्र म्हणतां येईल; पण त्याच वेळीं त्यांतली ओष्ठ्यता ही उत्तरोत्तर वाढत जाते, असें दिसेल. म्हणजे हा गट कंठ्यमात्र आणि वर्धिष्णु ओष्ठ्यतेचा आहे. ऋ, अ, आ यांचा गट मुख-मध्यस्थ उच्चाराचा आहे, आणि त्यांच्या उच्चाराच्या वेळचा मुखविवार उत्तरोत्तर वाढत जातो. म्हणजे हा गट मुखमध्यस्थ आणि वर्धिष्णु विवाराचा आहे. तिसरा गट ॲ, ए, इ यांचा. हा गट वर्धिष्णु तालव्यतेचा आहे. स्वरांच्या या तिन्ही गटांमध्यें वर्धिष्णुत्व हें समान आहे. वर्धिष्णुत्वाचा हा अंश समान मानून त्यांचा आलेख असा होईल :

१. अर्थात् — पाश्चात्त्य पद्धतीनुसार.

व र्धि ष्णु

(१) ओष्ठ्यत्व — ऑ ओ उ — कंठ्यमात्र
(२) मुखविवार — ई अ आ — मुखमध्यस्थ
(३) तालव्यत्व — अॅ ए इ — अनोष्ठ्यत्व

या आलेखाकडे पाहिलें असतां स्वरवर्णमालेच्या ज्या सममानतेचा (symmetry) आणि व्यवस्थेचा (order) पूर्वी निर्देश केला होता,[१] ती सममानता आणि व्यवस्था सहज ध्यानीं येईल.

मुखांतर्भागांतलीं स्वरमालेचीं स्थानें स्थूल मानाने अशा प्रकारें विवेचून दाखवितां येतील :

स्व र स्था नें

उंची[२]	पुरोगामी[३]	मध्यगामी[३]	पश्चाद्गामी[३]
उच्च[२]	इ	ई (ऋ)[४]	उ
मध्य[२]	ए	अ	ओ
नीच[२]	अॅ	आ	ऑ

३. व्यं ज न मा ला

स्वरमालेच्या आणि तिच्या क्रमरचनेच्या चिकित्सेनंतर व्यंजनमाला आणि तिची क्रमरचना यांचा विचार यापुढे करावयाचा आहे.

१. पृ. ४४ पहा.

२. जिव्हेचें तालुभागापासून जें उभें अंतर त्याला अनुलक्षून 'उच्च', 'मध्य', 'नीच' या संज्ञा योजिल्या आहेत. जसें : 'उच्च' म्हणजे जिव्हेची उंची सर्वांत अधिक, अर्थात् अंतर सर्वांत कमी; इत्यादि.

३. जिव्हा तालुभागाच्या ज्या प्रदेशाकडे आडवी झुकते, त्याला अनुलक्षून 'पुरोगामी' इत्यादि संज्ञा योजिल्या आहेत. 'पुरोगामी' म्हणजे जिव्हा तालुभागाकडे येते; इत्यादि.

४. पृ. ६२-वरील तळटीप ३ पहा.

व्यंजनमालेच्या चिकित्सेंत प्रथमतः वर्गीय व्यंजनांच्या ज्या पांच उपमाला उपस्थित होतात, त्या क-पासून म-पर्यंत होत.[१] या व्यंजनांच्या वर्गांतलीं पहिलीं दोन व्यंजनें अघोष[२] होत. अर्थात् क-ख, च-छ, ट-ठ, त-थ, प-फ हीं व्यंजनें अघोष;[२] आणि उरलेलीं व्यंजनें सघोष.[२] या सघोष व्यंजनांपैकी प्रत्येक वर्गांतलें शेवटचें व्यंजन अनुनासिक होय. अर्थात् 'ङ', 'ञ', 'ण', 'न' आणि 'म' हीं अनुनासिक व्यंजनें. विसर्ग हा कंठ्य वर्ण असून तो अघोष 'ह' होय. त्याच्या व्यतिरिक्त सघोष 'ह' हाहि वर्ण मराठींत आहे.

वर्गीय व्यंजनमालेचें रूढ वर्णन आत्ता केल्याप्रमाणे आहे. पण याची अधिक चिकित्सा केली पाहिजे.

द्विविध ह-वर्ण

वर्गीय व्यंजनांपैकी द्वितीय-चतुर्थ व्यंजनें हीं प्राणयुक्त, अर्थात् ह-कारयुक्त आहेत. म्हणजे

क् + ह = ख;	च् + ह = छ;
ट् + ह = ठ;	त् + ह = थ;
प् + ह = फ;	ग् + ह = घ;
ज् + ह = झ;	ड् + ह = ढ;
द् + ह = ध;	ब् + ह = भ.

'ह'-वर्ण दोन प्रकारचा आहे : अघोष[२] (= नादहीन) आणि सघोष[२] (= नादयुक्त). 'दुःख' या शब्दांत ऐकूं येणारा ख-पूर्वीचा विसर्ग म्हणजे अघोष 'ह' आहे. तसेंच, 'कःपदार्थ' यांतलाहि प-पूर्वीचा विसर्ग अघोष 'ह' आहे. हाच अघोष 'ह' आपल्याला ख, छ, ठ, थ, फ या वर्णांमध्ये दिसतो. त्यांच्या लगतपूर्वीचे क, च, ट, त, प हे वर्ण अघोष आहेत. मात्र घ, झ, ढ, ध, भ या वर्णांतील 'ह'-वर्ण सघोष आहे; कारण त्याच्या लगतपूर्वीचे ग्, ज्, ड्, द्, ब् हे वर्ण सघोष आहेत.

अघोष आणि सघोष असा दोन प्रकारचा 'ह'-वर्ण मराठी भाषेंत अस्तित्वांत आहे, आणि विपुल प्रयोगांतहि आहे. अघोष हा श्वासात्मक 'ह' आहे. सघोष 'ह' हा कंठ्य आहे. या द्विविध 'ह'चें स्वतंत्र स्वरूप लक्षांत घेतां तो वर्णमालेमध्ये वर्ण म्हणून मानणें योग्य होईल. हा द्विविध 'ह'-वर्ण मानण्याचा लाभ असा की, वर्गीय व्यंजनांच्या उपमालांतलीं

१. पृष्ठ ५६ पहा.

२. पृष्ठ ५५-वरील तळटीप १ पहा.

द्वितीय-चतुर्थ व्यंजनें स्वतंत्र रीत्या मानण्याची मग आवश्यकता नाही. अर्थात् ख, छ, ठ, थ, फ आणि घ, झ, ढ, ध, भ हीं व्यंजनें स्वतंत्र मानावयास नकोत. तीं मानिलीं नाहीत, म्हणजे आत्ता विवेचिल्याप्रमाणे त्यांचें स्वरूप असें सांगतां येईल :

क्ह[1] = ख (अघोष);	च्ह[1] = छ (अघोष);
ट्ह[1] = ठ (अघोष);	त्ह[1] = थ (अघोष);
प्ह[1] = फ (अघोष);	ग्ह[1] = घ (सघोष);
ज्ह[1] = झ (सघोष);	ड्ह[1] = ढ (सघोष);
द्ह[1] = ध (सघोष);	ब्ह[1] = भ (सघोष).

यांतल्या पहिल्या पांच वर्णांतील 'ह' अघोष आहे; आणि शेवटच्या पांच वर्णांतील 'ह' सघोष आहे. लेखनाचा प्रश्न जरी गौण असला, तरी अघोष 'ह' आणि सघोष 'ह' यांतला भेद व्यक्तच करावयाचा झाल्यास तो भेद सघोष 'ह'-वर्णाखाली (पोकळ) शून्य देऊन 'ह̥' असा व्यक्त करितां येईल. अघोष 'ह'-वर्णाखाली कांहींहि चिन्ह देण्याची आवश्यकता नाही. यायोगें क, च, ट, त, प (सर्व अघोष) आणि ग, ज, ड, द, ब (सर्व सघोष) एवढ्या वर्णांनी कार्य होईल. ङ, ञ, ण, न, म हीं अनुनासिक व्यंजनें यथापूर्व (सघोष) राहतील.

या अघोष-सघोष 'ह'-वर्णासंबंधी आणखी एक मुद्दा सांगण्यासारखा आहे. तो हा की, 'क्ह' यामुळे अथवा 'ग्ह' यामुळे संयुक्त व्यंजन सिद्ध होत नाही. हें आवर्जून सांगण्याचें कारण असें की, त्यांचा दृश्य लेखाकार आपल्याला चकवून संयुक्त व्यंजनांची अकारण भ्रांति निर्माण करील, तशी भ्रांति आपल्या ठिकाणीं होऊं नये. अशी भ्रांति होऊं नये, याचसाठी 'क्ह', 'ग्ह' इत्यादि वर्ण अधोरेखित केलेले आहेत, आणि ही अधोरेखा त्या-त्या वर्णाचें अविभाज्यत्व दर्शविते, असें वारंवार म्हटलें आहे. दुसरें असें की, मराठी भाषेंत या अघोष-सघोष 'ह'-वर्णाचा दुसऱ्या व्यंजनाशीं योग घडून संयुक्त व्यंजन तयार होत नाही, असें पुष्कळदा दिसतें. वय्हा (= वह्या[2]), सय्हा (= सह्या[2]), वऱ्हाड, कुऱ्हाड, वल्हें, नव्हे, पन्हें, कण्हेर इत्यादि कितीतरी शब्दांमध्यें आपल्याला सघोष 'ह'-वर्ण ऐकूं येतो, आणि तेथे तीं संयुक्त व्यंजनें होत नाहीत. त्यांत -य्हा, -ऱ्हा, -ल्हें, -व्हे, -न्हें इत्यादिकांपूर्वी उच्चारांत आघात येत नाही, हें लक्षणीय आहे. तत्त्वतः, 'ध' (= द्ह)

१. अधोरेखा वर्णाचें अविभाज्यत्व दर्शविते.
नाही तरी रोमन लिपींत हे वर्ण 'kh' (अघोष),... 'gh' (सघोष) असे दाखवितात, त्या वेळीं त्यांची अंतर्गत मूलघटना उघड होते.

२. कंसगत लेखन हें रूढ लेखन आहे.

आणि ‘ न्ह ’ यांत फरक नाही. दोन्ही दंत्यवर्गीय प्राणयुक्त सघोष वर्ण आहेत. आत्ता दिलेल्या उदाहरणांत ‘ ह ’ सर्वत्र सघोष आहे आणि तत्पूर्वीचाहि वर्ण सघोष आहे.

संयुक्त आणि असंयुक्त व्यंजनासंबंधीचा सोदाहरण समग्र विचार करणें हें उद्बोधक असलें, तरी तो विचार येथे करणें शक्य नाही. संयुक्त व्यंजनापूर्वीच्या अक्षरावर जो आघात येतो, त्याच्या अनुरोधाने विचार करावयाचा झाला, तर संयुक्त व्यंजनांची द्विविध विभागणी करितां येईल : पूर्वाक्षरावर आघात न घेणारीं संयुक्त व्यंजनें, आणि पूर्वाक्षरावर आघात घेणारीं संयुक्त व्यंजनें. या द्विविध विभागणीची स्थूल कल्पना पुढील आलेखाने येईल :

व्यंजनें

- **(१) असंयुक्त व्यंजनें**
  क, क्ह (= ख), द्ह (= ध)
  न्ह, ल्ह, इत्यादि. जसें : पन्हें, वल्हें, उन्हाळा
- **(२) संयुक्त व्यंजनें**
  - **(अ) पूर्वाक्षरीं आघात न घेणारीं**
    दऱ्या, वड्या, कव्यार
  - **(आ) पूर्वाक्षरीं आघात घेणारीं**
    दर्या, चिन्ह, ब्रम्ह, सुर्वे

वरील आलेखामध्ये

(१) हीं असंयुक्त व्यंजनें आहेत. अर्थात् तीं साधीं व्यंजनें समजावयाचीं. जसें : क, ख (= क्ह) हीं साधीं व्यंजनें होत. यांत फरक इतकाच की, ख (= क्ह) हें प्राणित व्यंजन आहे. ख = (क्ह) हें जसें प्राणित व्यंजन आहे, तसेंच ध (= द्ह) हेंहि प्राणित व्यंजन आहे, आणि न्ह, ल्ह इत्यादिहि प्राणित व्यंजनें आहेत.

(२) यांत संयुक्त व्यंजनें आहेत. या संयुक्त व्यंजनांत दोन प्रकार आहेत : (अ) पूर्वाक्षरीं आघात न घेणारीं; जसें : दऱ्या, वड्या इत्यादि; आणि (आ) पूर्वाक्षरीं आघात घेणारीं; जसें : दर्या, चिन्ह इत्यादि. यांत लक्षणीय हें की, ‘ पन्हें ’ आणि ‘ चिन्ह ’ यांसारख्या शब्दांत पहिल्यांत संयोगाचा अभाव आहे, तर दुसऱ्यांत संयोगाचें अस्तित्व आहे. वरवर पाहतां ‘ न्हें ’ आणि ‘ न्ह ’ याची घटना सदृश वाटते; परंतु उच्चारतः, पहिलें (न्हें) पूर्वाक्षरीं आघात आणीत नाही, तर दुसरें (न्ह) पूर्वाक्षरीं आघात आणितें. या आघातावलंबी विचाराचें क्षेत्र ज्यांत ह-कार (ऊष्मा) येईल, त्याच्यापुरतेंच मर्यादित मानावें.

अनुनासिक व्यंजनें

वर्गीय अनुनासिक व्यंजनांचा विचार करितांना कांही गोष्टी लक्षांत ठेविणें अगत्याचें ठरेल. मराठीच्या उच्चारक्षेत्रांत ङ, **ण, न, म** हीं चार अनुनासिक व्यंजनें स्वतंत्र रीत्या शब्दांत ऐकूं येतात, असें आढळेल. ण-वर्ण हा शब्दाच्या आद्यस्थानीं कधी येत नाही;[1] पण मध्यस्थानीं अथवा अन्तस्थानीं तो पुष्कळ येतो. ण-वर्णाप्रमाणेच ङ-वर्णहि शब्दाच्या आद्यस्थानीं येत नाही.[1] न-म-वर्ण मात्र शब्दाच्या आदि-मध्य-अवसानीं कोठेहि येतात. ङ-वर्ण शब्दाच्या मध्यस्थानीं येतो, तेव्हा तो आपल्या पुढे लगत असलेल्या आपल्या वर्गातल्या व्यंजनाचा योग होऊन येतो. जसें : टांगा (= टाङ्गा), गंगा (= गङ्गा) इत्यादि. शब्दाच्या अंतीं तो येतो, तेव्हा ङ-वर्ण स्वतंत्र रीत्याहि कधी ऐकूं येतो. जसें : 'भांग', 'सांग' अशा ठिकाणीं तो 'भाङ', 'साङ' असा ऐकूं येतो. मात्र पुढे स्वर यावयाचा झाल्यास त्या स्वरापूर्वी सवर्गीय सघोषवर्ण (ग) व्यक्त होतो. जसें : 'भांगांत' (= भाङ्गआंत), 'सांगून' (= साङ्गूऊन) इत्यादि. अर्थात् शब्दांतीं निभृत वर्ण असेल, त्या वेळीं ग-वर्णाचें श्रवण असत्प्राय होतें. मराठींतलें ङ-वर्णाचें स्वरूप अशा प्रकारें सोपाधिक आहे. याची सोदाहरण अधिक चिकित्सा फलप्रद ठरेल; परंतु येथे तो आपला विषय नाही, म्हणून आवरता घेऊं.

ञ-वर्ण हा स्वतंत्रपणें मराठींत कधी येत नाही. तो आपल्या वर्गातल्या व्यंजनाचा योग घेऊन येतांना आढळतो. जसें : चंची (= चञ्चई), पंचा (= पञ्चआ), अंजीर (= अञ्जईर), खंजीर (= खञ्जईर) इत्यादि. अर्थात् 'ञ'-वर्ण निर्धारणक्षम आहे, अनुमेय आहे; कारण त्याचें प्रकट होणें हें त्याच्या पुढे लगत येणाऱ्या सवर्गीय व्यंजनाशीं निगडित आहे. अशा सोपाधिक वर्णाचा दर्जा दुय्यम असतो. त्याला 'अनुवर्ण' अथवा 'उपवर्ण' म्हणतां येईल.[1] परंतु ञ-वर्णाच्या बाबतींत थोडी अडचण

१. कांही लोक 'ण-कार', 'ङ-कार' हीं उदाहरणें देऊं पाहतील. पण हीं उदाहरणें केवळ पारिभाषिक क्षेत्रांतलीं होत. तीं विशिष्ट संदर्भांत येतात. तीं भाषेंतलीं उदाहरणें नव्हत. तीं घ्यावयाचीं म्हटलें की 'ञ-कार', 'ळ-कार' हींहि उदाहरणें होतील; आणि मग कोणताहि वर्ण भाषेंत आद्यस्थानीं येतो, असें म्हणावें लागेल. पण ही उदाहरणांची निवळ ओढाताण होय. अशा ओढाताणीनें भाषेच्या स्वरूपाचा यथावत् बोध होणार नाही. भेंड्यांच्या स्पर्धांमध्ये पद्याच्या शेवटीं ण-कार, ळ-कार आले, म्हणजे प्रतिस्पर्ध्यांची कशी तिरपीट उडून जाते, आणि तो त्या वेळीं कसें एखादें निराळें अक्षर मागतो, तें अनुभवाचें आहे! एवढेंच नव्हे, तर त्याचा स्पर्धकहि तें निराळें अक्षर कसें लगेच देतो, तेंहि आपल्याला माहीत आहे. कारण तशी आपत्ति आपल्याहि बाबतींत संभाव्य आहे, हें तोहि जाणतो! तात्पर्य, पद्यासारख्या कृत्रिम रचनेंतहि 'ण-कार', 'ळ-कार' इत्यादि उदाहरणें घेतां येणार नाहीत, मग साध्या-सरळ 'भाषे'ची गोष्ट तर काय सांगावी?

२. पुढे पृष्ठ ७१ यावरील चर्चा पहा.

आहे. तो अनुनासिक वर्ण आहे. ज्या अनुनासिक मुख्य वर्णाचा अनुचर[१] वर्ण म्हणून त्याला बसवावयाचें, तो त्याशीं सवर्गीय असा उपलब्ध नसल्यामुळे ञ-वर्णाला स्वतंत्र स्थान द्यावें लागतें. ञ-वर्णाचा भाषेंतला प्रयोग कमी नाही, परंतु त्याचें शब्दामधलें स्थान आत्ता वर्णन केल्याप्रमाणे अनुमेय आणि सांगतां येण्यासारखें आहे.

'ञ'-वर्ण आणि अनुनासिक 'य' (=यँ; जसें : यँवू रे गडी !) हे एकरूप आहेत काय, असा एक प्रश्न विचारितां येण्याजोगा आहे; पण त्याचें उत्तर सोपें नाही. 'ञ' आणि 'यँ' हे आपाततः एकरूप वाटतात. मात्र ते सरूप आहेत; एकरूप नव्हेत. 'यँ' याच्या उच्चाराला तालुभागांत जेवढा प्रतिबंध होतो, त्यापेक्षा ञ-वर्णाच्या उच्चाराला अधिक प्रतिबंध होतो. दोन्ही नासिक्यवर्ण आहेत, हें खरें. दुसरें असें की, त्यांच्या उच्चारांच्या स्थानांत फरक आहे. ञ-वर्णाचा उच्चार करितांना ज़िव्हामध्याचा तालुमध्याला स्पर्श होत जातो; तर 'यँ' याच्या उच्चाराच्या वेळीं ज़िव्हेचा पूर्वभाग तालुभागाच्या पुढच्या बाजूला बराच लगटून जातो, आणि तो झटकन् मागे ओढिला जातो; त्याचा पूर्ण स्पर्श होत नाही. शिवाय 'यँ' हा स्वतंत्रतया येतो; 'ञ' हा स्वतंत्रतया येत नाही. तो सोपाधिक आहे. हा फरक लक्षांत घेतला, तर ञ-वर्ण म्हणजे य-चें नासिक्यत्व नव्हे, हें दिसेल. म्हणून ञ ≠ यँ, हें मान्य व्हावें, असें वाटतें. मराठींतले जे हे पांच वर्गीय अनुनासिक वर्ण आहेत, ते कोणकोणत्या परिस्थितींत भाषेंत कसकसे येतात, याची अधिक चिकित्सा होणें हें आवश्यक आहे, असें मात्र वाटतें. या ठिकाणीं तशी चिकित्सा करण्याला एक तर अवसर नाही, आणि त्या चिकित्सेची आपल्या मुख्य विषयाला तादृश आवश्यकता नाही.

ट-वर्ग

ट-वर्गीय वर्णांची उपमाला हा आर्यभारतीय भाषांचा एक लक्षणीय विशेष असल्याचें यापूर्वी सांगितलेंच आहे.[२] परंतु या वर्णांमध्ये ड-ढ-वर्णांचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. हें वैशिष्ट्य कोणतें आणि तें कसें जाणवतें, तें पाहण्यासाठी आपण दोन शब्दमाला घेऊं : एक ड-वर्णासाठी, आणि दुसरी ढ-वर्णासाठी.

(१) **डफ, मंडई, सडक** (ड-वर्णासाठी)

(२) **ढोर, पांढरा, कढई** (ढ-वर्णासाठी)

या दोन शब्दमालांतल्या ड-ढ-वर्णांच्या उच्चारांकडे जर नीट कान दिला, तर असें दिसेल

१. पुढे पृष्ठ ७१ यावरील चर्चा पहा.

२. पृ. ४६, तळटीप १ पहा.

की, त्यांत दोन प्रकारचे उच्चार आहेत, आणि तीन प्रकारची परिस्थिति अंतर्भूत आहे. 'डफ' आणि 'ढोर' या शब्दांत ड-ढ-वर्ण आद्यस्थानीं आहेत. 'मंडई' आणि 'पांढरा' या शब्दांत ड-ढ-वर्णांचा लगतपूर्वीच्या ण्-वर्णाशीं संयोग आहे. ('पांढरा' यांत तर ढ-वर्णाचा त्याच्या पुढील लगतच्या र-वर्णाशींसुद्धा संयोग आहे; जसें : 'पाण्ढ्रा'.) आणि 'सडक', 'कढई' या शब्दांमध्ये ड-ढ-वर्णांच्या आगेमागे लागून स्वर आहे; अर्थात् यांत ड-ढ-वर्ण हे स्वरमध्यपतित (intervocalic) असे आहेत. उच्चार बारकाईने ऐकिले, तर असें जाणवेल की, (१) 'डफ', 'मंडई' या शब्दांतल्या ड-वर्णाचा आणि (२) 'ढोर', 'पांढरा' या शब्दांमधल्या ढ-वर्णाचा उच्चार एकविध आहे. एवढेंच नव्हे, तर तो 'ट', 'ठ' आणि 'ण' यांच्या उच्चारांशीं स्वरूपाबाबत मिळता-जुळता, संवादी आहे. म्हणजेच (१) आणि (२) यांतील ड-ढ-वर्णांचा उच्चार 'ट', 'ठ' आणि 'ण' यांच्या 'प्रवाहांतला' आहे. परंतु ड-ढ--वर्णांचा हा 'प्रवाहस्थ' उच्चार आणि 'सडक', 'कढई' या शब्दांतल्या स्वरांतर्गत ड-ढ-वर्णांचा उच्चार यांत स्वरूपतः फरक आहे. सघोष-अघोष असे कसेहि असले, तरी 'ट', 'ठ', 'ड' (जसें : 'डफ', 'मंडई'), 'ढ' (जसें : 'ढोर', 'पांढरा') आणि 'ण' यांचे उच्चार एकविध प्रवाहांतले आहेत. परंतु 'सडक', 'कढई' यांतल्या स्वरांतर्गत ड-ढ-वर्णांचे उच्चार वेगळे आहेत. पहिले उच्चार जर 'प्रवाहस्थ' आहेत असें म्हटलें, तर हे उच्चार 'उत्प्रवाह' (म्हणजे 'प्रवाहांतून फुटलेले, फटकलेले') आहेत, असें आपण म्हणूं या. ट-वर्गीय व्यंजनांचे 'प्रवाहस्थ' उच्चार जसे एकविध आहेत, तसे ड-ढ-वर्णांचे 'उत्प्रवाह' उच्चारहि एकविध आहेत. प्रवाहस्थ उच्चारांच्या वेळीं जिव्हाग्र प्रतिवेष्टित करून त्याचा आपण मूर्ध्याला कांहीसा जोरदार, स्फुटित स्पर्श करितों. हा उच्चार स्पष्टस्पृष्ट असतो; तर उत्प्रवाह उच्चारांच्या वेळीं आपण जिव्हाग्र जरी प्रतिवेष्टित करीत असलों, तरी त्याचा मूर्ध्याला होणारा स्पर्श स्पष्ट, स्फुटित, रेटून केलेला अथवा जोरदार नसतो; तो मृदु, ईषत्स्पृष्ट आणि ताडित (flapped) असा असतो. याचें कारण असें की, ज्यांचे उच्चार उत्प्रवाह आहेत, ते ड-ढ-वर्ण स्वरमध्यपतित आहेत; आणि ज्यांचे उच्चार प्रवाहस्थ आहेत, ते ड-ढ-वर्ण स्वरमध्यपतित नाहीत. तेव्हा उत्प्रवाहोच्चार ड-ढ-वर्ण हे भिन्न मानिले पाहिजेत. मात्र ते निर्धारणक्षम, अनुमेय आहेत; कारण अमूक-एका परिस्थितींत त्यांचा उच्चार अमूक-एक आहे, हें निखालस सांगतां येतें. अर्थात् हे ड-ढ-वर्ण दुय्यम दर्ज्याचे आहेत; आणि ते प्रवाहस्थोच्चार असलेल्या ड-ढ-वर्णांचे अनुचर आहेत. ते दुय्यम दर्ज्याचे, म्हणून त्यांना आपण 'उपवर्ण' म्हणूं या. किंवा, ते सेवकाप्रमाणे वागणारे, म्हणून त्यांना आपण 'अनुवर्ण' म्हणूं या. ते उपजीवक आहेत, आणि त्यांचे मूलवर्ण हे उपजीव्य आहेत. सप्तर्षिचक्रामधल्या वसिष्ठाच्या चांदणीशेजारीं जशी अरुंधतीची चांदणी लगटून लुकलुकत असते, त्याप्रमाणे 'उपवर्ण' अथवा 'अनुवर्ण' हे मूलवर्णांच्या अपेक्षेने वागत असतात.

अशा स्थितींत ट-वर्गीय व्यंजनमाला अशी होईल :

ट, ठ, ड(ड़[1]), ढ(ढ़[1]), ण.

या संदर्भांत आणखी चिकित्सा करितां येण्यासारखी आहे. ती करितांना 'स्वर-मध्यपतित ड-ढ-वर्णांचा असा मृदु, ताडित उच्चार कां होतो ?' असा प्रश्न आपण विचारूं; आणि त्याचें उत्तर पाहण्यासाठी आपण 'डफ', 'मंडई' या शब्दांकडे पुन्हा वळूं. 'डफ' यांत 'ड' हा आद्यस्थानीं असल्याकारणानें त्याच्या उच्चारासाठी प्रतिवेष्टितजिव्हाग्राची सिद्धता अगोदरच झालेली असते. त्यामुळे 'डफ' यांतल्या आद्य ड-वर्णाचा उच्चार स्पष्टस्पृष्ट, स्फुटित, जोरदार आणि रेटलेला असा होऊं शकतो. — पण 'मंडई' या शब्दाच्या बाबतींत ही उपपत्ति कशी लावणार ? मला वाटतें की, 'मंडई' याहि शब्दाच्या बाबतींत ही उपपत्ति जुळेल. 'मंडई' या शब्दांत ड-वर आघात आहे. त्यामुळे 'मंडई' या शब्दाचे अवयव 'मण्-डई' असे पडतात. हे अवयव जर आपण लक्षांत घेतले, तर ड-वर्ण हा याहि शब्दांत उच्चारतः द्वितीय अवयवाच्या आद्यस्थानीं येतो, असें दिसेल; आणि मग 'डफ' याला लागणारा नियम आणि 'मण्-डई' याला लागणारा नियम एकरूपच होतो. हाच नियम 'ढोर' आणि 'पांढरा' याहि शब्दांना लागू पडेल. कारण 'पांढरा' याचेहि 'पाण्-ढ्रा' असे अवयव पडतात; आणि त्यांत ढ-वर्ण हा उच्चारतः द्वितीय अवयवाच्या आद्यस्थानीं येतो. 'कबड्-डी', 'शड्-डू', 'दाण्-डगा', 'लाण्-डगा' 'बण्-ड' इत्यादिहि शब्दांत हा नियम दिसेल.

याच्या उलट 'सडक' या शब्दांत ड-वर्णापूर्वीच्या लगतच्या 'अ' या स्वराचा उच्चार प्रथम पूर्ण होऊन जातो; आणि ड-वर्णाच्या नंतरच्या अनुकृष्ट (अर्थात्‌ – लांबट) अ-चा आधार क-वर्ण घेतो. त्यामुळे एकटा राहिलेला ड-वर्ण हा घसरता अथवा निसटता उच्चारिला जातो. 'कडी' अथवा 'कढी' यांतहि ड-ढ-वर्णांपूर्वीच्या लगतच्या अ-वर्णाचा उच्चार प्रथम पुरा होऊन जातो; आणि ड-ढ-वर्णांच्या नंतरचा लगतचा ई-वर्ण दीर्घ अंत्यश्रुत असल्यानें स्वतंत्र राहतो. त्यामुळे लगतच्या पूर्वीच्या आणि नंतरच्या स्वराचा आधार न मिळाल्याने येथलेहि ड-ढ-वर्ण निसरते, अर्थात्‌ ताडित उच्चारिले जातात.

उच्चाराचा हाच नियम ण-वर्णाच्याहि बाबतींत लागू पडतो. ण-वर्ण हा शब्दाच्या आद्यस्थानीं येत नाही, पण मध्य-अवसानीं तो पुष्कळ शब्दांत येतो, हें यापूर्वी[2]

१. स्वरमध्यपतित ड-ढ-वर्णांचा मृदु, ताडित उच्चार दर्शविण्यासाठी हिंदी अथवा बंगाली भाषेंतल्याप्रमाणे ड-ढ-वर्णांखाली टिंब देणें योग्य होईल.

२. पृष्ठ ६९, तळटीप १ पहा.

सांगितलेंच आहे. तो जेव्हा मध्यस्थानीं येतो, तेव्हा जर तो स्वरमध्यपतित असेल, तर त्याचाहि उच्चार ड-ढ-वर्णांच्या अशा परिस्थितींतल्या उच्चारांप्रमाणे ईषत्स्पृष्ट आणि ताडित असा होतो. परंतु ण-वर्ण हा जर मध्यस्थानीं संयोगस्थ असेल, अथवा शब्दाच्या अंतीं असेल, तर त्याचा उच्चार ट-वर्गीय व्यंजनांच्या प्रवाहस्थ[1] उच्चाराप्रमाणे होतो. (१) 'अण्णा', 'लोणचें', 'दणका', 'मणका', 'मरण', 'लसूण' इत्यादि शब्दांतल्या संयोगस्थ वा शब्दांतींच्या ण-वर्णाचा उच्चार प्रवाहस्थ[1] आहे; आणि (२) 'कणीक', 'टणक', 'पाणी', 'लोणी', 'सणक' यांतल्या ण-वर्णाचा उच्चार उत्प्रवाह[1] आहे. या दोन प्रकारच्या उच्चारांतला फरक सहज जाणवेल. (१) यांतल्या ण-चा उच्चार प्रवाहस्थ अर्थात् स्पष्टस्पृष्ट आहे; तर (२) यांतल्या ण-चा उच्चार ईषत्स्पृष्ट आणि ताडित आहे. तेव्हा ण-वर्णहि द्विविध मानणें योग्य होईल : एक प्रवाहस्थ ण-वर्ण आणि दुसरा त्याचा 'उपवर्ण' किंवा 'अनुवर्ण' असलेला 'ण़'. अर्थात् शेवटीं ट-वर्गीय व्यंजनमाला अशी होईल :

ट, ठ[2], ड(ड़), ढ[2](ढ़), ण(ण़).

इतक्या विवेचनानंतर आतां असेंहि लक्षांत येईल की, या व्यंजनमालेंतले पहिले दोन वर्ण अघोष आहेत, आणि शेवटचे तीन वर्ण सघोष आहेत; आणि उपवर्ण अथवा अनुवर्ण दिसतात, ते सघोष वर्णांनाच दिसतात. म्हणजे ताडितोच्चार उपवर्णासंबंधीचा नियम या परिस्थितीला अनुलक्षून लाघवानें सांगतां येईल, तो असा : ट-वर्गीय व्यंजन-मालेंतील सघोष वर्ण स्वरमध्यपतित असतील, तेव्हा ते ताडितोच्चार असतात. ट-वर्गीय व्यंजनांच्या प्रवाहस्थ आणि उत्प्रवाह उच्चारांचा उलगडा अशा रितीनें व्यवस्थितपणें करितां येईल.

च - व र्ग

मराठी भाषेंत च-वर्गीय व्यंजनांचे उच्चार दोन स्थानांचे आहेत : एक तालव्य आणि दुसरा दंतमूलीय अथवा दंत्य.[3] यांतील तालव्य उच्चार हे संस्कृत-प्राकृताच्या द्वारा आलेले आहेत. तालव्य उच्चारांव्यतिरिक्त जे दंतमूलीय उच्चार आहेत, ते लक्षणीय आहेत. तालव्य ञ-वर्णाचें विवेचन यापूर्वी आपण केलें आहे. दंतमूलीय च-वर्गीय वर्ण हे शब्दांत आदि-मध्य-अवसानीं कोठेहि सर्वसाधारणपणें येतात. फक्त इ-वर्णापूर्वी त्यांचा नित्य तालव्य वर्ण होतो, कारण इ-वर्ण स्वतःच तालव्य आहे. ए-वर्णापूर्वीहि पुष्कळदा

१. पृष्ठ ७१ पहा.

२. याच्या विचारांत पृ. ६६, ६७ येथे केलेलें विवेचन लक्षांत घ्यावें.

३. यांना 'दंतमूलीय' असें म्हणणें योग्य होईल, कारण त्यांच्या उच्चारांत जिव्हाग्र वरच्या दंतपंक्तीच्या मुळाला स्पर्श करितें.

दंतमूलीयाचा तालव्य वर्ण होतो. अशा प्रकारच्या परिस्थितीमुळे दंतमूलीय च-वर्गीय व्यंजनाची माला मानणें हें योग्य आहे.

मराठीच्या रूढ लेखनांत दंतमूलीयांचा तालव्यांहून भेद दाखविण्यास कांही साधन नाही; परंतु दंतमूलीय व्यंजनांखाली (हिंदींतल्याप्रमाणे) टिंब देऊन हा भेद दाखविणें शक्य आणि सयुक्तिक आहे. जसें : च़मच़ा, ज़हाज़, झ़गा, च़ंची इत्यादि. तालव्य काय, किंवा दंतमूलीय काय, दोन्ही प्रकारच्या ध्वनींत ऊष्मध्वनीचा अंतर्भाव आहे. तालव्यांत तालव्य ऊष्मध्वनीचा, अर्थात् श-चा, आणि दंतमूलीयांत दंतमूलीय ऊष्मध्वनीचा, अर्थात् स-चा. परंतु या वर्णांतली ध्वनिचिकित्सा येथे अप्रस्तुत म्हणून आपण बाजूस ठेवूं.

दंतमूलीय वर्णांची माला 'च़', 'ज़', 'झ़[1]', 'ञ़' अशी सांगतात. हींत 'छ़' देत नाहीत. त्याचें कारण असें की, मराठींत 'छ़'-वर्ण स्वतंत्र रीत्या येत नाही. छ-वर्ण जेव्हा स्वतंत्र रीत्या येतो, तेव्हा तो तालव्य असतो. जसें : छान, छडी, छटा. परंतु 'उत्सव', 'वत्सला', 'उत्साह' इत्यादि शब्दांत आपण मधलें अक्षर 'त्स' असें लिहीत असलों, तरी स्वरूपतः आणि उच्चारतः तें 'उच़्छ़व', 'वच़्छ़ला', 'उच़्छ़ाह' असें नाही काय ? 'च़्छ़' हें संयुक्त व्यंजन अघोष आहे; आणि त्याच्या दुसऱ्या भागांत — अर्थात् 'छ़' यांत — अल्प ऊष्मा आहे. विश्लेषित स्थितींत

त्स (लिखित-मुद्रित) = च़्छ़ (उच्चारतः)

= च़् + च़् + ह.

∴ छ़ = च़् + ह.

आता छ़-वर्ण हा स्वतंत्र रीत्या येत नाही हें खरें; तो संयोगस्थ असाच असतो हेंहि खरें; तसेंच, तो आपल्या दंतमूलीय अघोष सवर्गीयांशींच (अर्थात् च़-शींच) संयुक्त असतो हेंहि खरें; पण म्हणून तो वर्णमालेंत मानावयाचा नाही असें म्हटलें, तर हाच आक्षेप तालव्य ञ-वर्णाला आणि दंतमूलीय ञ़-वर्णालाहि लागू पडेल. कारण तेहि स्वतंत्र रीत्या येत नाहीत; संयोगांतच येतात. पण ते तर आपण मानितों.[2] दुसरी गोष्ट अशी की, 'च़्छ़' या संयोगांतला च़ हा पहिला वर्ण आपण मानिलेलाच आहे. कारण तो मानावाच लागतो. अर्थात् या संयोगांतील घटकभूत असा दुसरा छ़-वर्ण मानणें युक्त आहे. या संदर्भांत पुढील दोन भिन्नार्थक शब्द लक्षणीय आहेत :

१. या संदर्भांत पृ. ६६, ६७ येथे केलेली चर्चा लक्षांत घ्यावी. अर्थात् झ़ = ज़्ह. म्हणजे पूर्वोक्त युक्तिवादानुसार ही व्यंजनमाला च़, ज़, ञ़ अशी होईल.

२. पृ. ६९, ७० पहा.

मत्सर (लिखित-मुद्रित) = मच़्छ़र (उच्चारतः, दंतमूलीय) = 'द्वेष';
मच्छर (लिखित-मुद्रित) = मच्छर (उच्चारतः, तालव्य) = 'डास'.

'च्छ' या वर्णसंयोगाच्या तालव्य आणि दंतमूलीय उच्चारभेदामुळे या उदाहरणांत अर्थभेद निष्पन्न झालेला दिसेल. यांतील युक्तिवाद संकलितपणें ध्यानीं घेतां 'छ़' हा दंतमूलीय वर्ण स्वतंत्रतया मानून 'च़', ('छ़') 'ज़', ('झ़') 'ञ़' ही एक वर्गीय उपमाला पूर्ण करणें सयुक्तिक होईल.

दंतमूलीय अनुनासिक 'ञ़' आणि तालव्य अनुनासिक 'ञ' हे उच्चारस्थानभेदामुळे भिन्न आहेत, हें स्पष्ट आहे. परंतु दंतमूलीय अनुनासिक 'ञ़' आणि दंत्य अनुनासिक 'न' हेहि भिन्न आहेत. 'ञ़' आणि 'ञ' यांचीं उच्चारस्थानें जशीं भिन्न आहेत, तशींच 'ञ़' आणि 'न' यांचींहि उच्चारस्थानें निकटवर्तित्वामुळे सदृश वाटलीं, तरी वास्तवांत भिन्न आहेत.

(१)	पंच़	आणि	पंत
	संच़	आणि	संत
(२)	पंज़ा	आणि	पंदा
	सांज़	आणि	सांद

या शब्दांचीं युग्में उच्चारून पाहिलीं, म्हणजे 'ञ़' (दंतमूलीय) आणि 'न' (दंत्य) हीं अनुनासिकें कशीं भिन्न आहेत, तें लगेच लक्षांत येईल. इतकेंच की, 'ञ़' (दंतमूलीय) हें अनुनासिक 'ञ' (तालव्य) या अनुनासिकाप्रमाणे सवर्गीय व्यंजनांशीं होणाऱ्या त्यांच्या संयोगांतच व्यक्त होतें. तात्पर्य, 'ञ' आणि 'ञ़' हे उच्चारतः एकमेकांपासून वेगळे आहेत, पण शब्दामध्ये ते ज्या प्रकारें व्यक्त होतात, त्या त्यांच्या प्रकारांत सादृश्य आहे. उलट, 'ञ़' आणि 'न' यांच्या उच्चारस्थानांत जवळपणा आहे, पण शब्दामध्ये ते ज्या प्रकारें व्यक्त होतात, त्या त्यांच्या प्रकारांत भिन्नता आहे. कां की, 'ञ़' हा सवर्गीयांशीं होणाऱ्या संयोगांतच दिसेल, तर 'न' हा शब्दाच्या आदिमध्यावसानीं असा कोठेहि दिसेल. सारतः,

ञ ञ़
१. उच्चारस्थानतः भिन्न; पण
२. शब्दांतील त्यांच्या अभिव्यक्तिप्रकारांत सदृश.
(कारण दोन्ही सवर्गीयसंयोगांतच व्यक्त होणारे.)

ञ़ न
१. उच्चारस्थानतः निकटवर्ती; पण
२. शब्दांतील त्यांच्या अभिव्यक्तिप्रकारांत भिन्न.
(कारण **ञ़** केवळ सवर्गीयसंयोगांतच, तर **न** कोठेहि येणारा.)

या सर्व युक्तिवादाच्या संकलित बलापेक्षेने दंतमूलीय व्यंजनांची

च़ (छ़) ज़ (झ़) ञ़

ही उपमाला पूर्ण करणें हें सयुक्तिक आहे.

यावर कोणी असा प्रश्न करील की, 'च', '(छ)', 'ज', ('झ'), 'ञ' ही तालव्य व्यंजनांची माला मानिल्यानंतर पुन्हा 'च़', '(छ़)', 'ज़', '(झ़)', 'ञ़' ही दंतमूलीय व्यंजनांची स्वतंत्र माला मानण्याची काय आवश्यकता आहे? अशी ती मानण्यापेक्षा दुसऱ्या मालेंतले, अर्थात् दंतमूलीय मालेंतले, वर्ण हे पहिल्या मालेंतल्या, म्हणजे तालव्य मालेंतल्या, वर्णांचे अनुवर्ण मानून व्यवहार कां करूं नये? या प्रश्नाला उत्तर असें आहे की, 'या दोन्ही मालांमधल्या वर्णांचीं उच्चारस्थानें पृथक् आहेत, आणि त्यांतल्या वर्णांचें शब्दांतलें स्थान हें निर्धारणक्षम अथवा अनुमेय नाही.' या उत्तरामधलें तत्त्व जमेला धरिलें, तर या दोन उपमालांना स्वतंत्र स्थानें दिलीं पाहिजेत, हें पटेल.

फ-वर्ण

वर्गीय व्यंजनांविषयीची ही चर्चा समाप्त करण्यापूर्वी प-वर्गातल्या फ-वर्णाच्या उच्चाराविषयी[1] थोडें सांगितलें पाहिजे. प-वर्गीय व्यंजनांचा उच्चार ओष्ठ्य आहे. म्हणजे तो ओठावर ओठ टेकून केला जातो; पण 'कॉफी', 'फारसी', 'साफ', 'माफ' इत्यादि कितीतरी शब्द असे आहेत की, त्यांतल्या फ-चा उच्चार हा केवलौष्ठ्य नसून दंत्यौष्ठ्य होतो. अर्थात् त्यांत पुढचे दांत हे अधरोष्ठावर टेकतात, आणि अल्पोष्म उच्चार होतो.[2] मात्र 'फार', 'फास' इत्यादि शब्दांतला फ-चा उच्चार दंत्यौष्ठ्य नसून केवलौष्ठ्य आहे, हें आवर्जून सांगितलें पाहिजे.

नवीन व्यंजनक्रम

आत्तापर्यंत आपण जी चर्चा-चिकित्सा केली, तिच्या अनुरोधानें पाहतां क-पासून म-पर्यंतचीं वर्गीय व्यंजनें आणि त्यांचा उच्चारस्थानानुसार यथोचित क्रम सांगण्यापूर्वी आणखी एक मुद्दा सांगितला पाहिजे. हा मुद्दा क्रमाला अनुलक्षून सांगावयाचा आहे. आपल्या वर्गीय व्यंजनमालेचा रूढ क्रम **क, च, ट, त, प,** असा आहे. त्यांत दंतमूलीय च़-वर्गाची आपल्याला भर टाकावी लागेल; आणि हा दंतमूलीय च़-वर्ग तालव्य च-वर्गा-नंतर येईल. पण स्पर्शस्थानानुसार क्रमवार पाहतां ट-वर्ग हा तालव्य-वर्गाच्याहि आधी आला पाहिजे. म्हणजे हा क्रम

१. वर्णत्वाविषयी नव्हे. कारण त्याची चर्चा येऊन गेली आहे. पृ. ६६, ६७ पहा.

२. फ-चा हा दंत्यौष्ठ्य उच्चार फ-खाली टिंब देऊन 'फ़' असा दाखवितां येईल.

क ट च च़ त प

असा व्हावयाला पाहिजे. या नवीन क्रमाचें कोष्ठक असें —

उच्चारस्थानें	व्यंजनें		
	अघोष	सघोष	
कंठ्य	क ह[1] (विसर्ग)	ग	ङ (अनुनासिक) ह[1]
मूर्धन्य	ट	ड (ड़)	ण (ण़) (अनुनासिक)
तालव्य	च	ज	ञ (अनुनासिक)
दंतमूलीय	च़	ज़	ञ़ (अनुनासिक)
दंत्य	त	द	न (अनुनासिक)
ओष्ठ्य	प	ब	म (अनुनासिक)

४. अन्तःस्थ, ऊष्म, ळ हे वर्ण आणि ज्ञ

आता यापुढे '**य**', '**र**', '**ल**', '**व**' हीं अंतःस्थ व्यंजनें, '**श**', '**ष**', '**स**' हीं ऊष्मव्यंजनें आणि '**ळ**' हें मूर्धन्य व्यंजन यांची परीक्षा करावयाची आहे. परंतु त्यापूर्वी '**क्ष**' आणि '**ज्ञ**' यांविषयीचा निर्णय कसा करितां येईल, तें पाहूं. 'क्ष' आणि 'ज्ञ' हीं स्पष्टच संयुक्त व्यंजनें आहेत. क्ष = क् + ष, आणि ज्ञ = द् + न् + य. जेथे-जेथे स्वतंत्र लेखाकार असतो, तेथे-तेथे स्वतंत्र एक ध्वनि असतो, असें नाही. त्यामुळे 'क्ष' आणि 'ज्ञ' हे स्वतंत्र अविभाज्य वर्ण नसून तीं संयुक्त व्यंजनें आहेत, हें पटण्यासारखें आहे. यांतल्या 'क्ष'-बद्दल वाद होण्याचा संभव नाही. पण 'ज्ञ'-ची स्थिति जरा वेगळी आहे. परंपरेला अनुसरून पाहतां ज्ञ = ज् + ञ. परंतु 'ज्ञ'-च्या आपल्या उच्चारांत आज 'ज्' मुळीच उरलेला नाही. मूळच्या ञ-वर्णाचें नासिक्यत्व हें 'न'-मध्ये, आणि उच्चारप्रयत्न हा 'य'-मध्ये दाखल झालेला आहे. कांही असलें, तरी ज्ञ = द्न्य, ही वस्तुस्थिति आहे, आणि ती नाकारण्याने कांहीच लाभ नाही. येऊन-जाऊन विशिष्ट

१. हीं व्यंजनें वर्गीय व्यंजनमालांतलीं नाहीत; पण त्यांची चर्चा आवश्यक असल्यामुळे ती यापूर्वी (पृ. ६६, ६७) येऊन गेली आहे, म्हणून त्यांचा येथे यथास्थान समावेश केलेला आहे.

परिस्थितींत 'ज्ञ'-चा पूर्ववर्णाशीं जो संधि होतो, (जसें : तत् + ज्ञ = तज्ज्ञ) त्या वेळीं कांहीं अडचण उत्पन्न होण्याचा संभव. परंतु एक तर येथल्या संधीची कांहीं वेगळी व्यवस्था करणें शक्य होईल, आणि दुसरें म्हणजे 'तज्ज्ञ' हा शब्द 'तज्ञ' असा बहुधा ऐकूं येतो. तेव्हा अशा एखाद-दुसऱ्या शब्दामधल्या संधीसाठी 'द्न्य' याचा अपलाप करणें आणि ज्ञ = ज्ञ आहे, असें सर्वथा अनुभवाविरुद्ध म्हणत राहणें हें सयुक्तिक नाही, आणि समर्थनीय नाही.

हिंदी, पंजाबी इत्यादि कांहीं उत्तरभारतीय भाषांमध्ये 'ज्ञ'-चा उच्चार 'ग्य' असा होतो. 'ज्ञ'-च्या 'ग्य' अशा उच्चारांत नासिक्योच्चार राहिलेला नाही. मराठींतहि 'ज्ञानबा' याचा उच्चार 'ग्यानबा' असा झालेला आहे. पण त्या वेळीं आद्य 'ज्ञा' हा 'ग्या' असा लिहितात, 'ज्ञा' असा नाही. 'ज्ञानबा' लिहून 'ग्यानबा' असा उच्चार कोणी करीत नाहीत. ही समंजसता ज्ञ = द्न्य, हें मान्य करण्यांत परिणत होणें योग्य होईल.

राजस्थानींत ज्ञ-चा उच्चार 'ज्य' असा ऐकूं येतो. म्हणजे राजस्थानींत ज्ञ-मधला 'ञ्' उपलब्ध नाही. गुजरातींत आणि मैसूर-कानडींत ज्ञ = ग्न. उत्तर-कानडींत ज्ञ = द्न्य. बंगालींत ज्ञ = ङ (जवळपास), किंवा गँ (जवळपास). तामीळमध्यें ज्ञ = ग्य. तात्पर्य असें की, ज्ञ-चा मूळचा उच्चार आपण भारतीय हरवून बसलों आहों, आणि तरी ज्ञ-च्या पृथक्करणांत आपण परंपरा मात्र सोडीत नाही. अशी ही असंगति आहे.

(१) मराठींत आणि उत्तर-कानडींत ज्ञ = द्न्य. म्हणजे 'ज्', 'ञ्' हरवले; 'द्', 'न्' पाहुणे आले.

(२) तामीळ-हिंदी-पंजाबींत ज्ञ = ग्य. म्हणजे 'ज्', 'ञ्' हरवले; 'ग्' पाहुणा आला.

(३) राजस्थानींत ज्ञ = ज्य. म्हणजे 'ञ्' हरवला.

(४) बंगालींत ज्ञ = ङ (गँ). म्हणजे 'ज्', 'ञ्' हरवले; 'ङ (गँ)' पाहुणा आला.

(५) गुजरातींत आणि मैसूर-कानडींत ज्ञ = ग्न. म्हणजे 'ज्', 'ञ्' हरवले; 'ग', 'न' पाहुणे आले.

ज्ञ-च्या या प्रचलित स्थितीचें तौलनिक कोष्ठकरूप पृथक्करण असें होईल :

भाषा	प्रचलित ध्वनि	हरवलेले ध्वनि	मूळचें टिकलेलें स्वरूप	नवागत ध्वनि
मराठी, उत्तर-कानडी	ग् न् य	ज्, ञ्	य-रूप तालव्यत्व न-रूप अनुनासिकत्व	ग्, न्, य्
तामीळ, हिंदी, पंजाबी	ग्य	ज्, ञ्	य-रूप तालव्यत्व	ग्, य्
राजस्थानी	ज्य	ञ्	य-रूप तालव्यत्व	य्
बंगाली	ङ (गँ)	ज्, ञ्	ङ-रूप अनुनासिकत्व	ङ् (गँ)
गुजराती, मैसूर-कानडी	ग्न	ज्, ञ्	न-रूप अनुनासिकत्व	ग्, न्

ळ-वर्ण मूर्धन्य आहे. अर्थात् त्याच्या उच्चाराच्या वेळीं जिव्हाग्र प्रतिवेष्टित होतें, आणि तें मूर्ध्याकडे उचलिलेंहि जातें; मात्र त्याचा मूर्ध्याला स्पर्श होत नाही, तर जिव्हाग्र पुढच्या अधरदंताकडे झुकून त्याचा फक्त अस्फुट असा ताडित उच्चार होतो. ळ-वर्ण शब्दाच्या आद्यस्थानीं येत नाही.[1]

'श', 'ष', 'स' या ऊष्मवर्णांपैकी तालव्य 'श' आणि दंत्य (वस्तुतः, दंतमूलीय) 'स' या वर्णांविषयी विशेष सांगण्यासारखें नाही. ष-वर्णाविषयी मात्र थोडें सांगितलें पाहिजे. ष-वर्ण हा शब्दाच्या आदि-मध्य-अवसानीं येतो. आपण लहानपणीं जो 'ष—ष—षट्कोणाचा' शिकलों, तो आद्यस्थानीय 'ष' आहे. पण याव्यतिरिक्त षोक, षट्पद, षडंगबल अशाहि कांही शब्दांत तो आद्यस्थानीं आहे. कांहींच्या मतें

१. पृ. ६९-वरील तळटीप १ पहा.

मराठींत मूर्धन्य ष-वर्ण अस्तित्वांतच नाही. पण मला तसें वाटत नाही. कारण पुष्कळ सुशिक्षितांच्या, कांही अल्पशिक्षितांच्या आणि थोड्या अल्पवयस्कांच्याहि भाषेंत तो यथास्थित ऐकूं येतो. तेव्हा त्याचा अपलाप करणें शक्य नाही, आणि योग्यहि नाही. ष-वर्ण मानण्याने हानि तर नाहीच, पण ज्यांच्या भाषेंत तो आहे, त्यांच्या भाषेच्या वर्णमालेची त्याने उपपत्ति लागते. तो न मानण्याने मात्र त्यांची ती वर्णमाला अनुपपन्न होते. यापूर्वी पृष्ठ ६०–६१-वर ऋ-वर्णासंबंधी जें विशदीकरण केलेलें आहे, तें ष-वर्णाच्याहि संबंधांत ग्राह्य मानणें योग्य होईल.

श, ष, स या ऊष्मवर्णांच्या अनुक्रमाविषयीहि थोडें सांगितलें पाहिजे. वर्गीय व्यंजनमालांच्या अनुक्रमासंबंधी यापूर्वी जो युक्तिवाद केला होता,[१] तो या ऊष्मवर्णांच्या क्रमालाहि ग्राह्य मानावा लागेल, आणि मग त्यांचा क्रम श, ष, स असा न राहतां **ष, श, स** असा होईल.

ष-चा उच्चार मूर्धन्य आहे, आणि ज़िव्हाग्र प्रतिवेष्टित करून, तें मूर्ध्याकडे नेऊन, त्याचा मूर्ध्याला स्पर्श न करितां हा उच्चार करितात. हा उच्चार कांहीसा शीळ घातल्याप्रमाणे होतो. ष-चा मूर्धन्य उच्चार करण्याविषयीची ही प्रक्रिया मला माहीत आहे, परंतु माझा स्वतःचा ष-चा उच्चार कांहीसा वेगळा आहे,[२] याची या प्रसंगाने नोंद करावीशी वाटते. माझ्या भाषेंतील ष-चा उच्चार हा ज़िव्हेचा पश्चार्ध तालुभागाच्या पश्चाद्भागाकडे शक्य तितका उचलून होतो. अर्थात् त्याचें स्थान मूर्धन्य नसून कांहीसें कंठ्य होण्याकडे झुकतें. मात्र माझा ष-चा उच्चार आणि पारंपरिक पद्धतीला अनुसरून केलेला प्रतिवेष्टितज़िव्हाग्र-युक्त मूर्धन्य ष-चा उच्चार यांत परिणामतः फरक जाणवणार नाही. मुद्दाम सांगितला, तरी तो जाणवणें कठीण होईल,[३] अशी माझी समजूत आहे. ऊष्मवर्ण अघोष आहेत.

'य', 'र', 'ल' आणि 'व' यांतल्या य-वर्णाची थोडी चर्चा यापूर्वी[४] केली आहे. उरलेले 'र', 'ल' आणि 'व' यांपैकी 'व'-चा उच्चार द्विविध आहे : केवल-ओष्ठ्य[५] आणि दंत्यौष्ठ्य.[६] हे दोन्ही उच्चार भाषेंत सरमिसळीने आढळून येतात. पूर्वोक्त अर्थात् केवल-ओष्ठ्य उच्चारांत ओठांचा केलेला चंबू झटकन मागे घेतला जातो, तर दंत्यौष्ठ्य उच्चारांत अधरोष्ठ आणि उत्तरदंत यांचा स्पर्श होतो. र-चा उच्चार कधीकधी मूर्धन्य म्हणून देतात, पण वस्तुतः तो दंतमूलीय तूर्णांदोलित आहे. ल-चाहि उच्चार दंतमूलीय आहे.

१. पृ. ७६, ७७ पहा.

२. आणि इतरहि अनेकांचा तसा आहे.

३. आजवरहि तो कोणाला भिन्न म्हणून जाणवलेला नाही.

४. पृ. ५५, ७० पहा.

५. दोन्ही ओठांचा चंबू करून केलेला.

६. अधरोष्ठ वरच्या पुढील दातांवर टेकून केलेला.

कधीकधी 'य', 'र', 'ल', 'व' असा अंतःस्थांचा क्रम देण्याऐवजी 'य', 'व', 'र', 'ल' असा क्रम देतात. हा क्रम देतांना स्वरमालेंतले 'इ', 'उ', 'ऋ', 'ऌ' यांचा क्रम मनांत अभिप्रेत असतो आणि 'इ', 'उ', 'ऋ', 'ऌ' यांचा अनुक्रमाने 'य', 'व', 'र', 'ल' यांच्याशीं असलेला संबंधहि गर्भित असतो. परंतु एक तर मराठी भाषेच्या दृष्टीनें पाहतां हा क्रम अनावश्यक आहे. दुसरें असें की, स्वरमालेच्या क्रमाचें आपण जें पुनर्मंडन केलेलें आहे,[1] त्या व्यवस्थेशीं 'य', 'व', 'र', 'ल' हा क्रम जुळत नाही. अर्थात् 'य', 'र', 'ल', 'व' हाहि अनुक्रम त्या व्यवस्थेशीं जुळत नाहीच. परंतु 'य', 'र', 'ल', 'व' या मांडणींत कंठाकडून (येथे — तालुपूर्वार्धाकडून) ओठाकडे जाण्याच्या स्पर्शस्थानांच्या ज्या जागा सूचित होतात, त्यांतील क्रम सयुक्तिक आणि प्रशस्त आहे.

स्वरमाला आणि व्यंजनमाला यांच्या क्रमाची पुनर्व्यवस्था करितांना आपण बरीच नवीन रचना सुचवून पाहिलेली आहे. सुचविलेल्या ह्या नवीन क्रमरचनेचा शब्दकोशांतल्या आद्याक्षररचनेवरहि परिणाम होईल, हें लक्षांत घेतलें पाहिजे. तर्कोपपन्न आणि सुसंगत भूमिका पतकरावयाची झाल्यास वर्णमालेच्या नवीन क्रमाला अनुसरून शब्दकोशाची नव्याने मांडणी करणें सयुक्तिक होईल.

फ ल नि ष्प त्ति

मराठीच्या प्रमाणभाषेच्या वर्णमालेविषयी आपण आत्तापर्यंत जो विचार केला, त्याची फलनिष्पत्ति अशी :

(१) स्वर आणि व्यंजनें अशी विभागणी कार्यकारी स्वरूपाची आणि उपयुक्त आहे.

(२) स्वरमालेंत एकूण ९ स्वर आहेत.

(३) स्वरमालेची रूढ क्रमरचना पालटली पाहिजे.

(४) अनुवर्ण धरून व्यंजनवर्गमालेंत वर्गीय व्यंजनें १८ आहेत.

(५) यांव्यतिरिक्त सघोष-अघोष 'ह', ४ अंतःस्थ व्यंजनें, ३ ऊष्मवर्ण आणि 'ळ' हा मूर्धन्य ताडित वर्ण अशीं अवर्गीय व्यंजनें १० आहेत.

(६) भारतीयांनी ज्ञ-चा मूळचा उच्चार गमावलेला आहे.

(७) ऊष्मवर्णांचा, अर्थात् श, ष, स यांचा, रूढ क्रम पालटला पाहिजे.

(८) मराठीच्या प्रमाणभाषेचा व्यवहार असा एकूण ३७ वर्णांच्या योगें आज चालू आहे.

(९) वर्णमालेची प्रवृत्ति सममान आणि व्यवस्थित होण्याकडे असते.

१. ६३–६५ पहा.

मित्र हो,

आत्तापर्यंत मराठीच्या वर्णमालेसंबंधी आपण कांहीशा तपशिलाने, विविध अंगांनी आणि युक्तिवादपूर्वक विचार केला. हा विचारविमर्श कांहीसा जटिल होता; पण विचार जटिल होतो, म्हणून वास्तवाचा अपलाप न करण्याकडे आपण लक्ष ठेविलें होतें. या विचारांत सर्व अंगांचा परामर्श झाला, असें नाही. उदाहरणार्थ, मराठींतल्या शब्दांचा अवयवविभाग, संधिप्रकरण, संयुक्त व्यंजनांचें स्वरूप इत्यादि अनेक विषय बुद्ध्या सोडून दिले आहेत; कारण या प्रसंगाने मराठीच्या संपूर्ण व्याकरणाची रचना करण्याचा मुळांत हेतु नाही. मराठीच्या प्रमाणभाषेचा आविष्कार लक्षांत घेऊन त्या भाषेच्या व्याकरणाची रचना करितांना ज्या कोणत्या दिशेने जावें लागेल, तिची पायवाट काढण्याचा हा अल्प प्रयत्न आहे; आणि त्या दृष्टीने आपण या प्रयत्नाकडे पहावें, अशी विनंती आहे.

चौथें

व्याख्यान

शब्दांचें वर्गीकरण, नामविमर्श

चौथें व्याख्यान

शब्दांचें वर्गीकरण, नामविमर्श

१. शब्दांचें वर्गीकरण

वर्गीकरणाचें तत्त्व. सव्यय-अव्यय-विभागणी (विकारसह, विकारासह). रूढ विभागणी परस्परसंक्रमात्मक (overlapping). सलिंग क्रियापदें हीं सव्ययें. रूढ अव्ययें हीं वस्तुतः सव्ययें. मराठींतलीं अनेक विशेषणें हीं रूपतः सव्ययें. मराठीचें व्याकरण प्राधान्याने सव्ययांच्या विचाराला वाहिलेलें. शब्दांच्या वर्गांतराने कार्यलोप नाही. शब्दांच्या वर्गीकरणाचा नवीन शाखावृक्ष.

२. नामविमर्श

नाम म्हणजे वस्तूचा वाचक असा सहजलिंगी शब्द. नामांचा धर्मधर्मिविवेचनात्मक भाग व्याकरणदृष्ट्या तटस्थ आणि असंबद्ध. सामान्यनाम-विशेषनाम ही विभागणी व्याकरणदृष्ट्या निरुपयोगी. नामाची चिरोपाधि : लिंग. नामाच्या बदलत्या उपाधि : वचन, विभक्ति. लिंग (gender) आणि प्रजाति (sex) परस्परांशीं असंबद्ध. ‘लिङ्गभेदेन शब्दभेदः’. वचनविचार. सर्वनामें हीं इष्टलिंगी : मी, आम्ही इत्यादि. निष्कर्ष.

शब्दांचें वर्गीकरण, नामविमर्श

मित्र हो,

यापूर्वीच्या व्याख्यानांत आपण मराठीची स्वरमाला आणि व्यंजनमाला यांची समग्र चिकित्सा केली, आणि त्यांची पुनर्घटना करणें कसें इष्ट आहे, तें पाहिलें. आता यापुढे आपल्याला मराठी भाषेच्या साक्षात् घडणीचा विचार करावयाचा आहे. हा विचार करितांना आपल्याला नाम, सर्वनाम, विशेषणें इत्यादिकांचा, त्यांना होणाऱ्या विकारांचा आणि त्या विकारांच्या स्वरूपाचा यथावत् परामर्श घ्यावा लागेल. हें करीत असतांना आपल्या बोलण्यांत असलेल्या दैनंदिन भाषेचें स्वरूप कसें कानाआड करितां येणार नाही, हें आतापर्यंत आपण पाहिलें. अर्थात् येथेहि आपल्याला तीच दृष्टि बाळगून रूढ कल्पनांचें परीक्षण करून आवश्यक असल्यास त्यांची नव्याने पुनर्घटना करावी लागेल. ही पुनर्घटना दैनंदिन व्यवहारांतल्या मराठी भाषेचें स्वरूप आणि त्या स्वरूपाचें निर्लेप परीक्षण या दोन ध्रुवांच्या आसाभोवती फिरत राहील, असा आपण प्रयत्न करूं.

१. शब्दांचें वर्गीकरण

भाषेंत जे शब्द येतात, त्यांची विभागणी नाम, सर्वनाम, विशेषण, अव्यय इत्यादि प्रकारांनी करण्याची रूढ पद्धति आहे. पद्धति कोणतीहि असो, तींत या विभागांचा परस्परसंक्रम (overlapping) होणार नाही, एवढें जरूर पाहिलें पाहिजे. हें लक्षांत घेतलें, म्हणजे भाषेंतल्या शब्दांची स्वाभाविकच प्रथमतः ‘ सव्यय (= विकारी) शब्द ’ आणि ‘ अव्यय (= अविकारी) शब्द ’ अशी विभागणी कोणालाहि सुचेल. शब्दांची सव्ययांत आणि अव्ययांत केलेली ही विभागणी नवीन नाही. ती परस्परव्यावृत्तहि आहे; आणि भाषेचें स्थूल स्वरूप या विभागणींत समग्रतया दिसतें, हेंहि खरें आहे. परंतु एकदा ही विभागणी केल्यावर ती काटेकोरपणें अवलंबिली पाहिजे. अर्थात् असें करितांना ज्यांना यत्किंचितहि विकार होतात, असे शब्द अव्ययांत अथवा अविकारी शब्दांत समाहून नेतांना आपण सबूर केली पाहिजे. त्याचप्रमाणे ज्यांना कांहीहि विकार सुतराम् होत नाहीत, त्यांना सव्ययांच्या गटांत कां लोटावयाचें, याचाहि विचार केला पाहिजे. क्वचित् प्रसंगीं भाषेंतल्या सव्यय-अव्यय शब्दांची विभागणी जरी आखबंद नसली, तरी ती तशी आखबंद कां नाही, हें आपण ध्यानीं बाळगिलें पाहिजे; आणि ती आपण कांही तत्त्वाला अनुसरून अथवा लाघवासाठी कशी करीत आहों, हेंहि दाखवून दिलें पाहिजे. असें केलें, म्हणजे या विभागणीच्या अथवा वर्गीकरणाच्या बाबतींतली आपली जागरूकता जशी

व्यक्त होईल, त्याचप्रमाणे भाषेचें स्वरूप निर्मळपणें लक्षांत येऊन तींतल्या मूळ समस्या कोणत्या, त्यांचा नीट बोध होईल.

अव्यय-सव्यय

येथे ‘ अव्यय ’ आणि ‘ सव्यय ’ यांचा प्रयोग करितांना जो अर्थ अभिप्रेत आहे, तो सांगितला पाहिजे. ज्या शब्दाला वाक्यामध्ये कोणताहि प्रत्यय लागणें शक्य नाही, अशा शब्दाला येथे ‘ अव्यय ’ म्हणावयाचें आहे. म्हणजे ‘ व ’, ‘ वा ’, ‘ की ’, ‘ अहाहा ’ इत्यादि शब्द अव्ययवर्गांतले आहेत; कारण त्यांना कोणतीहि विकृति मराठींत संभवतच नाही. परंतु मराठीमध्ये ‘ पासून ’, ‘ बाहेर ’ इत्यादि शब्दांनाहि अव्ययें म्हणतात, तें बरोबर नाही. कारण ‘ पासून ’ हा ‘ पास + ऊन ’ अशा प्रकारें साधित शब्द झालेला आहे. म्हणून हा विकारासह[1] शब्द नाही. अर्थातच त्याला येथे ‘ अ-व्यय ’ म्हणावयाचें नाही. ‘ बाहेर ’ हाहि शब्द अव्ययवर्गांत समाविष्ट करितां येणार नाही. कारण तो विकारसह[2] शब्द आहे. त्याला विकृति होते. जसें : बाहेर + चा = बाहेरचा, बाहेर + ऊन = बाहेरून, इत्यादि. यावरून हें लक्षांत येईल की, ज्याला ‘ अव्यय ’ अशी रूढ संज्ञा व्याकरणांत देतात, तें खरोखर विकारासह[1] आहे कीं नाही, तें प्रथम पाहिल्यावाचून ती संज्ञा देतां नये. निदान येथे तशी संज्ञा द्यावयाची नाही. पण ‘ व ’, ‘ वा ’, ‘ की ’ इत्यादि शब्द सर्वस्वीं विकारासह[1], म्हणून खऱ्या अर्थानें अव्ययें होत.

या विषयाचा उलगडा व्हावा, म्हणून आपण कांही उदाहरणें घेऊन पाहूं. ‘ रामचंद्र वनाला **गेला** ’, ‘ पांडवांनी द्यूतांत आपलें राज्य **घालविलें** ’, ‘ श्रीकृष्ण ही एक थोर विभूति **होती** ’, ‘ एक **होती** चिमणी ’, ‘ एक **होता** कावळा ’, ‘ कावळ्याचें घर **होतें** शेणाचें ’, ‘ चिमणीचें घर **होतें** मेणाचें ’, ‘ युद्धांत वानर शौर्यानें **लढले** ’, हीं वाक्यें आणि त्यांतलीं क्रियापदें यांकडे आपण लक्ष द्या, म्हणजे असें स्पष्ट दिसून येईल की, ज्यांना आपण येथे क्रियापदें म्हणतों, तीं सर्व विशेषणें आहेत. कारण त्यांना यथा-संभव लिंगवचनादि विकार होतात. तीं क्रियापदें आहेत, याचा अर्थ एवढाच की, तीं ‘ क्रियेचीं पदें ’ आहेत. अर्थात् क्रियापद ही त्यांची कार्यसंज्ञा आहे. पण रूपतः तीं विशेषणेंच आहेत.[3] मराठींत कांही क्रियापदांना केवळ वचनविकार होतात; लिंगविकार होत नाहींत. जसें : ‘ आहे — आहेत ’, नाही — नाहीत ’, ‘ जाईन — जाऊं ’, ‘ करील — करितील ’, इत्यादि. ज्यांना सर्वत्र केवळ लिंगविकार होतो, अशीं क्रियापदें मराठींत नाहीत. मराठींतल्या क्रियापदांचा अशा प्रकारचा व्यवहार लक्षांत घेऊनच त्यांचा

१. ‘ विकार सहन न करणारा, विकार न घेणारा ’.

२. ‘ विकार सहन करणारा, विकार घेणारा ’.

३. संस्कृत-प्राकृतांतहि अशीं क्रियावाचक पदें असलेलीं विशेषणें आहेत. जसें : ‘ रामः वनं **गतः** ’, ‘ रामो वणं **गओ** ’ इत्यादि.

यथास्थान, यथाविभाग समावेश केला पाहिजे. ' हसेल — हसतील ' यांसारखीं अलिंग क्रियापदें आणि ' हसला — हसले ' यांसारखीं सलिंग क्रियापदें यांची वर्गीकरणामध्ये एकच मोट बांधणें हें वर्गीकरणाच्या तत्त्वानुसार सयुक्तिक नाही. कांही क्रियापदांना प्रथम-पुरुषांत वचनविकृति होत नाहीत. जसें : मी **होतों** — आम्ही **होतों**. अशा स्थितींत सलिंग क्रियापदें हीं आपल्या स्वरूपानुसार विशेषणांच्या मेळाव्यांत जाऊन बसतील, आणि वर्गीकरणांत तीं सव्ययें ठरतील. तर अलिंग क्रियापदेंहि सव्ययेंच ठरतील, पण तीं वेगळ्या अशा वचनविकारी गटांत राहतील. तेव्हा क्रियापदांच्या वर्गीकरणाचा विचार करितांना असें दिसेल की, मराठींतील क्रियापदें हीं सव्ययांच्या विभागांत समाविष्ट होतात; मात्र त्यांतलीं कांही लिंगवचनविकारी, आणि म्हणूनच विशेषणें ठरणारीं; तर कांही वचनविकारी आणि म्हणून वचनदृष्ट्या मात्र विशेषणें ठरणारीं. अशा वचनविकारी क्रियापदांना विशेषणांच्या वर्गांत घालितांना त्यांचा पोटवर्ग करावयाचा कीं काय, तें आपण विशेषणाचें जें स्वरूप ठरवूं, त्यावर अवलंबून राहील.

वि शे ष ण वि चा र

या संदर्भांत आणखी एका विषयाचा विचार करूं. तो विचार ज्या शब्दांना आज आपण प्रायः विशेषणें म्हणून म्हणतों, त्यांचा. त्यासाठी हीं उदाहरणें पहा :

गोड आंबा	**गोड आंब्यांची पेटी**
गोड बासुंदी	**गोड बासुंदीची चव**
गोड औषधें	**गोड औषधांचा गुण**
कडू पाला	**कडू पाल्याची चव**
कडू काकड्या	**कडू काकड्यांची कोशिंबीर**
कडू कारलीं	**कडू कारल्यांची भाजी**
आनंदी रघू	**आनंदी रघूची बायको**

या उदाहरणांतलीं ' गोड ', ' कडू ' आणि ' आनंदी ' हीं तथाकथित विशेषणें आणि त्यांचें स्वरूप पहा. असें दिसेल की, तें सर्वत्र अबाधित अथवा अविकृत आहे. या बाबतींतली आजवरची रूढ कल्पना अशी आहे की, विशेष्याचें जें लिंग-विभक्ति-वचन, तेंच विशेषणाचेंहि. पण ही रूढि मराठींत आली आहे, ती संस्कृत व्याकरणबंधावरून. संस्कृतांत नामाप्रमाणे विशेषणांचींहि सर्व विभक्तींत स्वतंत्र रूपें असल्याने विशेषणाच्या उपाधि विशेष्यानुसारी असण्याचा नियम तेथे युक्तच आहे. जसें : श्वेतः अश्वः, श्वेतम् अश्वम्, श्वेतैः अश्वैः, इत्यादि. प्राचीन मराठी भाषेंतहि एका काळीं विशेष्य-विशेषण-

संबंधाची स्थिति अशीच होती.[1] आधुनिक पद्यांतहि कधी-कधी हीच स्थिति आढळते. परंतु दैनंदिन व्यवहारांतल्या आजच्या मराठी भाषेंत अशी स्थिति नाही. तींत प्रथमेहून अन्य विभक्तींत विशेषणांचीं स्वतंत्र रूपें होत नाहीत; त्यांचें केवळ सामान्यरूप होतें. आणि तेंहि केवळ आ-कारान्त विशेषणांच्या बाबतींत. अन्यस्वरान्त विशेषणें अविकृतच राहतात, आणि विभक्तिप्रत्यय केवळ विशेष्याला लागतात. जसें :

पांढरा घोडा	**पांढऱ्या घोड्याने सफर**
पांढरी गाय	**पांढऱ्या गाईचा कळप**
पांढरें मांजर	**पांढऱ्या मांजराचा मालक**

हें ध्यानांत घेतलें असतां असें दिसून येईल कीं, विशेषणाच्या उपाधि निरपवादपणें विशेष्यानुसारी आहेत, असें मानणें, किंबहुना विशेषणाला उपाधि आहेत असें मानणें, हें मराठी भाषेच्या दृष्टीने आवश्यक नाही. ह्याचा अधिक विचार आपण विशेषण-विमर्शाच्या वेळीं करूं. येथे या विचाराचा सूत्रपात शब्दांच्या वर्गीकरणाच्या भूमिकेने केला आहे; आणि त्याचें तात्पर्य म्हणून स्थूल मानाने असें सांगतां येईल कीं, मराठींतलीं कांही विशेषणें त्यांच्या रूपांचा विचार करितां सव्यय शब्दांच्या वर्गांत घालितां येणार नाहीत.

एतावता, ह्याचा मथितार्थ असा की, शब्दांची आपल्याला प्रथमतः ' सव्यय ' आणि ' अव्यय ' अशी दोन प्रकारांनी विभागणी करितां येईल. ' सव्यय ' म्हणजे ज्यांना लिंगवचनपुरुषानुसार प्रत्ययादि कार्यें होतात असे शब्द, अर्थात् विकारी अथवा विकार-सह[2] शब्द आणि ' अव्यय ' म्हणजे ज्यांना प्रत्ययादि कोणतींहि कार्यें होत नाहीत असे शब्द, अर्थात् अविकारी अथवा विकारासह[3] शब्द. हीं सिद्ध अव्ययें होत. अव्ययांचा गट हा प्रमाणतः फार लहान असतो. पण सव्ययांचा गट फार मोठा आणि संकीर्ण स्वरूपाचा असतो. भाषेच्या व्याकरणाचा फारच मोठा भाग या सव्ययांच्या विचाराला आणि त्यांच्या रचनेला वाहिलेला असतो. कारण शब्दांना होणारीं सर्व कार्यें येथेच होतात; आणि हीं कार्यें संमिश्र आणि संकुल स्वरूपाचीं असतात. सारांश, सव्यय-अव्यय असें शब्दांचें वर्गीकरण तादृश सरळ आहे, परंतु शब्दांचा प्रत्यक्ष विचार जेव्हा सुरू होतो,

१. उदाहरणार्थ, ज्ञानदेवकालीन मराठी भाषेंत विशेषण हें विशेष्याच्या लिंग-विभक्ति-वचनानुसार फिरत असे.

२. ' विकार सहन करणारे, विकार घेणारे '.

३. ' विकार सहन न करणारे, विकार न घेणारे '.

तेव्हा अमूक शब्द सव्ययांत घालावयाचे कीं अव्ययांत घालावयाचे, याचा निर्णय आपल्या विचारप्रक्रियेच्या निर्मळपणावर अवलंबून राहील; आणि ह्याच ठिकाणीं जागरूकतेची सर्वाधिक आवश्यकता असते.

अ व्य य वि चा र

लहान आणि साधा म्हणून जर अव्ययांचा गट आपण पाहूं गेलों, तर त्यामध्ये येणारे शब्द सर्वथा विकारासह असले पाहिजेत, हें सांगितलेंच. अव्ययांच्या या वर्गांत आणि, व, वा, अथवा, किंवा, काय, की, पण, परंतु, अहाहा, अरे, अहो, इत्यादि अव्ययें समाविष्ट होतील. ज्यांना मराठींत आज आपण शब्दयोगी अव्ययें म्हणतों, त्यांतल्या अनेकांना; मर्यादित स्वरूपाचें का असेना, विभक्तिकार्य होतें; त्यामुळे या तथाकथित शब्दयोगी अव्ययांमधील कांही अव्ययें तरी आपल्याला या अशा आत्ता सांगितलेल्या विकारासह शब्दांच्या गटांत दाखल करितां येणार नाहीत. उदाहरणार्थ, पुढे दिलेले, रूढ रीत्या अव्ययें म्हटले जाणारे, कांही शब्द पहा :


जेथून[1]	**जेथ**[1] – **ऊन,**	
वरून	**वर – ऊन,**	
खालून	**खाल – ऊन,**	
समोरून	**समोर – ऊन,**	
पुढून	**पूढ – ऊन,**	
दुरून	**दूर – ऊन,**	
बाहेरून	**बाहेर – ऊन,**	
पासून	**पास – ऊन,**	
कोठून[2]	**कोठ**[2] – **ऊन,**	
तिकडून	**तिकड – ऊन,**	इत्यादि.

ह्या यादींत जीं रूढितः अव्ययें दिलीं जाहेत, त्यांना सर्वत्र ‘ ऊन ’ हा प्रत्यय लागलेला आहे, हें स्पष्ट आहे. ह्या ‘ ऊन ’ प्रत्ययाचा अर्थहि एकविध आहे. या

१. उच्चारतः, जिथून — जीथ–ऊन.

२. उच्चारतः, कुठून — कुठ–ऊन.

यादींतल्या रूढ अव्ययांचे दोन गट पडतांना दिसतील : (१) भार्षेत स्वतंत्रपणें वापरलीं जाणारीं अव्ययें; जसें : वर, समोर, दूर, बाहेर, आत इत्यादि; आणि (२) भार्षेत स्वतंत्रपणें वापरलीं न जाणारीं अव्ययें; जसें : जेथ,[१] खाल, पूड, पास, कोठ,[२] तिकड, इत्यादि.[३] मराठीमध्ये अव्ययांचे म्हणून जे रूढ गट केलेले आहेत, त्यांचा अधिक विचार आपल्याला पुढे करावयाचा आहे. परंतु येथे एवढेंच दाखवावयाचें आहे की, वरवर अव्ययें म्हणून दिसणारे, अथवा वाटणारे किंवा सांगितले गेलेले असे सर्वच शब्द विकारासह नसतात.[४] अर्थात् अशीं हीं अव्ययें वस्तुतः सव्ययें ठरतात. म्हणजेच त्यांचें वर्गांतर करणें हें योग्य ठरेल. अशा दृष्टीने पाहतां रूढ असलेल्या अव्ययांचा गट संकोच पावून सव्ययांचा गट पुष्कळच मोठा होईल. मराठींतल्या शब्दांचें वर्गीकरण अशा रितीने स्थूल मानाने पुढील कोष्ठकांत मांडून दाखवितां येईल :



१. उच्चारतः, जीथ.

२. उच्चारतः, कूट.

३. येथे या शब्दांच्या मूळ प्रकृति 'जेथे', 'खाल', 'पूढ' इत्यादि दिल्या आहेत. त्यांना पुढे साधित प्रत्यय लागून आणखी साधित शब्द बनतात. जसें : जेथ + चा = जेथचा, जेथ + ए (= अं) = जेथे (उच्चारतः, जिथं), खाल + ऊन = खालून, खाल + ईल = खालील, खाल + चा = खालचा, कोठ + ए (= अं) = कोठे (उच्चारतः, कुठं), कोठ + ऊन = कोठून (उच्चारतः, कुठून), कोठ + ला = कोठला (उच्चारतः, कुठला), कोठ + चा = कोठचा (उच्चारतः, कुठचा), इत्यादि. रूढितः अव्ययें मानिलेल्या या शब्दांची रूढ व्यवस्था अर्थातच सुसंगत आणि शास्त्रशुद्ध नाही.

४. कधी-कधी त्यांना विशेषणकारक प्रत्यय लागून साधित शब्दहि बनतात. जसें : जे(जि)थ + चा = जे(जि)थचा, वर + चा = वरचा, वर + ला = वरला, को(कु)ठ + चा = को(कु)ठचा(ला), आता + शा = आताशा, मधा + शी = मधाशी, इत्यादि.

हें वर्गीकरण परिपूर्ण आहे, असें नव्हे. आत्तापर्यंत आपण जी चर्चा केली, ती लक्षांत घेऊन केवळ तिचा मथितार्थ मनांत बिंबावा, म्हणून हें वर्गीकरण केलेलें आहे. शिवाय, त्यांत आणखी उपशाखा आणि अनुशाखा काढून अधिक तपशीलहि भरावा लागेल. असें केल्यानंतर या वर्गीकरणाला समग्रता येईल.

एक मुद्दा येथे लक्षांत घेण्यास हरकत नाही. या वर्गीकरणांत रूढ अशा सर्वनामांचा, विशेषणांचा, क्रियाविशेषणांचा असे कांही वर्ग अंतर्धान पावलेले दिसतील. त्यांतल्या कांहींविषयी येथे दिग्दर्शन करण्यास हरकत नाही. सर्वनामांचा समावेश कार्यतः नामांमध्ये करावा.[१] फार तर त्यांची यादी देऊन त्यांचा एखादा स्वतंत्र पोटगण करावा. नामें आणि सर्वनामें यांना विभक्तिकार्य एकाच प्रकारचें होत असल्याकारणाने आणि त्यांचें कार्य सदृश असल्याकारणाने सर्वनामांचा स्वतंत्र असा वेगळा गट करण्याने लाभ नाही. विशेषणांसंबंधी कांही विवेचन आत्ताच केले.[२] तदनुसार कांही विशेषणें रूपतः अव्ययांत समाविष्ट होतील; आणि कांही साधितांच्या गटांत जातील. जसें : पांढऱ्या = पांढर + या, हसऱ्या = हसर + या, मोठ्या = मोठ + या इत्यादि.[३] नामादिकांचीं सामान्यरूपें हीं साधितांच्या वर्गांत दाखल होतील. क्रियाविशेषण म्हणून शब्दांचा स्वतंत्र वर्ग मानण्यापेक्षा ती कार्यसंज्ञा मानणें योग्य होय. अनेक क्रियाविशेषणें हीं साधित गटांत समाविष्ट होऊं शकतील. त्यांतलीं कांही सव्यय क्रियाविशेषणें आहेत.[४]

१. याचा विचार पुढील व्याख्यानाच्या वेळीं करूं.

२. याचें अधिक विवेचन पुढील व्याख्यानाच्या वेळीं करूं.

३. या विषयाचा अधिक विचार विशेषणविमर्शाच्या वेळीं करूं. पण येथे जातां-जातां हें सांगणें योग्य होईल की, काळा, पांढरी, हसरें इत्यादि रूपें हीं विशेषणांचीं मूळ रूपें मानणें बरोबर नाही. कारण त्यांत लिंगवचनवाचकहि प्रत्यय समाविष्ट झालेला आहे. तो प्रत्यय विभक्त केल्यानंतरच विशेषणाचें मूळ स्वरूप व्यक्त होईल. अर्थात् येथे काळ, पांढर, हसर अशीं या विशेषणशब्दांचीं मूळ रूपें मानिलीं पाहिजेत; आणि आ, ई, एं (खरें म्हणजे हा प्रत्यय 'एं' असा नसून 'अऽ' असा अनुकृष्ट 'अ' आहे. आजच्या लेखनांत जरी त्याचें लिपिचिन्ह नसलें, तरी त्याची उपेक्षा करून चालणार नाही. म्हणून तें चिन्ह शिरोरेषेवर काटकोणी उभी रेघ (ꣳ) काढून दाखवावेंसें वाटतें.) हे लिंगवचनादिकारक प्रत्यय मानिले पाहिजेत. हे लिंगवचनादिकारक प्रत्यय 'पांढर' इत्यादि विशेषणांचा विशिष्ट गण म्हणून कल्पिला, तर त्या गणांतल्या सर्व विशेषणांना लागतात, हें लक्षणीय आहे.

४. जसें : 'ती चांगली गाते', 'तो चांगला पोहतो' यांत 'चांगली', 'चांगला' हीं सव्यय क्रियाविशेषणें होत. तसेंच, 'तो आरामांत झोपला' 'सुखाने नांदा' यांत 'आरामांत', 'सुखाने' हींहि सव्यय क्रियाविशेषणें आहेत.

आतापर्यंत केलेल्या शब्दांच्या वर्गीकरणांत आणखी थोडा तपशील पुढीलप्रमाणे भरतां येईल :

- **शब्द**
  - **अव्यय** (विकारासह) (निरुपाधिक)
  - **सव्यय** (विकारसह) (लिंग-वचन-पुरुष-उपाधियुक्त)
    - **विभक्तियुक्त**
      - **स्वतंत्र** (नाम, सर्वनाम)
      - **परतंत्र** (विशेषण)
    - **कालार्थयुक्त**
      - **परतंत्र** (क्रियापद)
    - **साधित**
      - **धातुज**
      - **तदितर**

मराठी भाषेंतल्या शब्दांच्या वर्गीकरणाविषयी स्थूल मानाने एवढी चर्चा केल्यानंतर आता आपल्याला नामविचाराकडे वळण्यास हरकत नाही.

२. ना म वि म र्श

नाम म्हणजे वस्तूचा वाचक असा सहजलिंगी शब्द. वस्तु हा शब्द येथे व्यापक अर्थाने घेतला पाहिजे; कारण त्यांत वास्तव सृष्टींतल्या इंद्रियगम्य पदार्थांचा जसा समावेश होतो, तसा मानस सृष्टींतल्या अनुभवविषयभूत पदार्थांचा, मनोगम्य भावांचा, विकारादिकांचाहि समावेश होतो, असें म्हटलें पाहिजे. त्यामुळे फळा, खड्ड, कागद, नदी, गाय, घर, करणें, बोलणें हीं जशीं नामें होत, तशींच स्वर्ग, देव, इंद्र, हर्ष, सुख, दुःख, पांडित्य, शौर्य हींहि नामेंच होत. अर्थात् यांतल्या पहिल्या प्रकारांतल्या वस्तु ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने आपल्या अनुभवाचा विषय होतात. तर दुसऱ्या प्रकारांत सांगितलेल्या वस्तूंचें ज्ञान आपल्याला ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने होण्यासारखें नसतें. तथापि त्यांतल्या वस्तूंच्या कांही सांकेतिक प्रतिमा आपल्या मनांत वसत असतात. ते-ते शब्द ऐकतांच या सांकेतिक प्रतिमा आपल्या मनांत उद्बुद्ध होतात. स्वर्ग, देव, इंद्र या वस्तु अशा प्रकारच्या आहेत. संकेतजन्य अशा अनुभवांचे हे विषय आहेत. मनुष्याच्या अनुभवाला विषयभूत होत असल्याने त्या वस्तु ऐहिक आहेत, असें वाटल्यास म्हणावें. उलट, हर्ष, पांडित्य इत्यादि वस्तु वास्तव सृष्टींतल्या असल्या, तरी त्यांचा अनुभव ज्ञानेंद्रियांच्या योगें येत नाही, तर मनाच्या द्वारा येतो. अर्थात् मन हेंहि एक इंद्रियच मानितात. तें अंतःकरण, म्हणजे अंतर्गत करण, अर्थात् इंद्रिय आहे. म्हणजे तें अंतरिंद्रिय आहे. तेव्हा इंद्रियविषयभूत वस्तु ज्या सहजलिंग शब्दांनी बोधित होतात, ते शब्द नामें होत.

ही नामाची व्याख्या अथवा त्याचें लक्षण होय, असें म्हणणें कठीण आहे. हें नामाचें केवळ कामचलाऊ असें वर्णन आहे, शास्त्रीय व्याख्या नव्हे. कारण आपल्या अनुभवाच्या कक्षेंत येणारे असे अनेक विषय आहेत की, ज्यांना आपण व्याकरणाच्या दृष्टीने नामें म्हणूं शकणार नाही. 'म्हैस हळू चालते,' या वाक्यांत 'म्हैस' ही इंद्रियविषयभूत वस्तु आहे, हें ठीक. पण तिचें 'हळू चालणें' हाहि अनुभवाचाच विषय आहे. 'हळू चालणें' हेंहि या कारणाने नाम ठरूं लागेल. 'हळू' आणि 'चालणें' हेदेखील पृथक्तया अनुभवाचे विषय आहेत. अर्थात् तींहि पृथक्पणें नामें ठरूं लागतील. म्हणजे 'म्हैस हळू चालते,' या वाक्यांत सर्वत्र नामांचेंच राज्य होईल. किंबहुना, आत्ता सांगितलेलें वर्णन व्याख्येच्या अथवा लक्षणाच्या स्वरूपाचें जर मानूं लागलों, तर व्याकरणांत नामांवाचून प्रायः कांहीच उरणार नाही.

याला असें उत्तर देतां येण्यासारखें आहे की, 'हळू' आणि 'चालणें' अथवा 'हळू चालणें' या 'वस्तु' नव्हेत; आणि आपण तर इंद्रियविषयभूत वस्तु ज्या शब्दांनी बोधित होतात, त्यांना नामें म्हटलें आहे. तेव्हा तीं नामें नव्हत. पण हें उत्तर समाधान-कारक नाही. कारण मग 'वस्तु' कशाला म्हणणार, तें सांगावें लागेल; आणि तें सांगणें फारच कठीण आहे. परंतु हा विषय आपण येथेच सोडून देऊं. तात्त्विक चर्चेपलीकडे व्याकरणाला त्याचा व्यावहारिक दृष्ट्या लाभ नाही.

मराठीच्या व्याकरणांत नामांचे वेगवेगळे स्थूल प्रकार कल्पून त्यांत उपप्रकार सांगण्याची रूढि आहे. उदाहरणार्थ, नामें हीं धर्मिवाचक आणि धर्मवाचक अशीं दोन प्रकारचीं असतात, असें मानितात. धर्म म्हणजे गुण; तो ज्यावर राहतो तो धर्मी. धर्म हा धर्मीच्या आश्रयाने राहतो. जसें : लेखणी, कागद, देव, इंद्र हे धर्मिवाचक शब्द अथवा नामें होत; तर हर्ष, पांडित्य हे धर्मवाचक शब्द अथवा नामें आहेत. 'कर्णाचें औदार्य', 'रामाचें शौर्य', 'संतांची भक्ति' या जोड्यांत पहिले शब्द धर्मिवाचक, तर दुसरे धर्मवाचक नामें आहेत.

नामांच्या या द्विविध विभागणीचा व्याकरणाच्या दृष्टीने काय उपयोग आहे, तें सांगणें कठीण आहे. आत्ताच सांगितलेल्या धर्म-धर्मीच्या विवेचनांत फार तर कल्पनांचें न्यायशास्त्रीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न दिसून येईल. परंतु अशा विश्लेषणाचा व्याकरणाला साक्षात् लाभ कांही नाही. धर्मिवाचक असो, धर्मवाचक असो, नाम म्हणजे नाम. त्याला भाषेमध्ये सारखींच विभक्तिविषयक आणि इतर कार्यें होतात. धर्मधर्मि-विवेचनाने या कार्यांत फरकहि पडत नाही, अथवा त्याने त्या कार्यांचा कांही विशेष बोधहि होत नाही. 'कागद' हा शब्द असो, वा 'पांडित्य' हा शब्द असो. त्यांना व्याकरणदृष्ट्या होणारीं कार्यें एकविधच आहेत. त्यांना लागणाऱ्या विभक्ति, त्या लागतांना होणारीं कार्यें हीं समरूपच आहेत. अर्थात् पहिलें नाम धर्मिवाचक आणि दुसरें

धर्मवाचक आहे, या कारणास्तव त्यांत फरक असा कांहीच पडत नाही. व्याकरणकार्याच्या दृष्टीने धर्मधर्मिविवेचन हें केवळ तटस्थ आहे. तें विवेचन बरोबर असो, वा चुकीचें असो, त्याचा व्याकरणाशीं दुरूनदेखील संबंध नाही. त्यामुळे तें अथवा तत्सदृश विवेचनें असंबद्ध गणिलीं पाहिजेत.

धर्मिवाचक नामांचे पुन्हा दोन प्रकार करितात. कारण कर्ण, इंद्र यांसारखीं धर्मिवाचक नामें आणि संत, गाय, घर, कागद यांसारखीं धर्मिवाचक नामें यांत भेद दिसून येतो. संत हा शब्द ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम इत्यादि अनेक व्यक्तींना लागू होतो. अर्थात् कांही समान गुणांनी युक्त असलेल्या अनेक वस्तूंचा अथवा व्यक्तींचा निर्देश ' संत ' यासारख्या शब्दाने होतो. अशा शब्दांना सामान्यनामें म्हणतात. याच्या उलट ' राम ', ' कृष्ण ', ' शिवाजी ' यांसारखे शब्द त्या-त्या विशिष्ट व्यक्तीचाच बोध करून देतात; व्यक्तिसमूहाचा बोध करून देत नाहीत, अथवा कांही समानगुणसूत्राचाहि निर्देश करून देत नाहीत. अशा शब्दांना विशेषनामें म्हणतात. सारांश, धर्मिवाचक नामांचे दोन प्रकार होतात : सामान्यनाम आणि विशेषनाम.

कांहीसें चमत्कारिक वाटेल, परंतु या कंठाळी स्वरूपाच्या धर्मिवाचक नामभेदाचा व्याकरणाला कांही लाभ नाही. पूर्वीप्रमाणेच येथेहि असेंच म्हटलें पाहिजे की, नाम म्हणजे नाम;—मग तें सामान्यनाम असो, वा विशेषनाम असो. त्याला भाषेमध्ये सारखींच विभक्तिविषयक आणि इतर कार्यें होतात. धर्मिवाचक नामभेदाने त्यांत कांहीच फरक पडत नाही. त्यामुळे हा नामभेद व्याकरणकार्याच्या दृष्टीने केवळ तटस्थ आहे, असंबद्ध आहे.

नामाच्या उपाधि : लिंग

यापुढचा विचार नामांच्या उपाधींचा येतो. मनुष्याला ज्याप्रमाणे रूप-वयो-वेषांच्या उपाधि असतात, अथवा आकाशस्थ ग्रहगोलांना ज्याप्रमाणे वजन-आकार-अंतराच्या उपाधि असतात, त्याप्रमाणे नामांनाहि लिंग-वचन-विभक्तींच्या उपाधि असतात. मनुष्याला ज्याप्रमाणे रूपाची कायमची[१] उपाधि असते, अथवा आकाशस्थ ग्रहगोलांना ज्याप्रमाणे आकाराची कायमची[१] उपाधि असते, त्याप्रमाणे नामांना लिंगाची कायमची[१] उपाधि असते. याव्यतिरिक्त मनुष्याला जशी वयोवेषाची आणि ग्रहगोलांना जशी अंतराची बदलती उपाधि असते, तशी नामांनाहि वचन-विभक्तींची बदलती उपाधि असते. वचन आणि विभक्ति यांच्या बदलत्या उपाधि ह्या प्रयोजनापेक्ष असतात. माणसाला जसें अस्तित्व चिकटलेलें आहे, त्याप्रमाणे नामाच्या ठायीं लिंग हें अंतर्भूतच आहे. तें अयुतसिद्ध

१. तत्त्वतः पाहतां हें सापेक्ष आहे. कारण मनुष्याचें रूप बदलतें. ग्रहगोलांचे आकार अति-अति-दीर्घ कालानें का असेना, पालटतात. नामांचेंहि लिंगांतर क्वचित् होतांना दिसतें.

आहे. 'फूल' म्हटल्यानंतर त्याचें नपुंसकलिंग मराठी भाषा बोलणाऱ्याला कांही स्वतंत्रतया सांगावें लागत नाही. 'वृक्ष' म्हटल्यावर त्याचें पुंलिंग आणि 'झाड' म्हटल्यावर त्याचें नपुंसकलिंग मराठी माणसाला सहजच कळतें. 'व्याधि' हा शब्द उच्चारतांच केवळ संस्कृताचें ज्ञान असणाऱ्याला पुंलिंगाचा आपोआपच बोध होतो, पण मराठी जाणणाऱ्याला स्त्रीलिंगाचा आपसुखच बोध होतो. 'आत्मा' किंवा 'मृत्यु' हे शब्द उच्चारतांच हिंदी भाषकाला त्यांचें स्त्रीलिंग वेगळें सांगावें लागत नाही, तर मराठी भाषकाला त्यांचें पुंलिंग आवर्जून ध्यानीं आणून द्यावें लागत नाही. लिंग ही नामाची अशा प्रकारें चिरोपाधि आहे; आणि ती याहच्छिक आहे. एखाद्याचें संकेतानें ठेविलेलें विशिष्ट नांव हें जसें त्या व्यक्तीच्या बाबतींत रूढीनें कायम होतें, तसेंच नामलिंगाचेंहि आहे. लिंग (gender) हें भाषेंतच उपलब्ध असतें. वास्तव सृष्टींत प्रजाति (sex) असते. शब्दसृष्टींतील लिंगाचा (gender) वास्तव सृष्टींतील प्रजातीशीं (sex) संबंध नसल्याकारणानें एखाद्या नामाच्या लिंगाचा त्या नामाच्या अर्थाशीं संबंध नसतो.[1] त्याचप्रमाणे कधीकधी भाषेच्या कालिक भेदाबरोबर त्यांतील नामांचें लिंगांतरहि होतें. 'देह' हा शब्द संस्कृतांत आणि आजच्या मराठींत पुंलिंगी आहे. पण ज्ञानदेवकालीन भाषेंत — निदान 'ज्ञानदेवी'त खासच — निरपवादपणें तो नपुंसकलिंगी होता; आणि हिंदींत तो स्त्रीलिंगी आहे. त्यामुळें रूढि हें नामलिंगाचें एकमेव प्रमाण ठरतें. नाम हें सहजलिंग असतें. विशेषणाप्रमाणें तें आगंतुकलिंग, किंवा चललिंग नसतें.

'लिङ्गभेदेन शब्दभेदः'

प्रत्येक नामाला कमींत-कमी एक लिंग असतें; पण कांही नामें एकाहून अधिक लिंगांत रूढ आहेत. जसें : वेळ (पुं. , स्त्री.), हरीण (पुं. , नपुं.), ज़िन्नस (पुं. , स्त्री.), शिक्रण (स्त्री. , नपुं.), ढेकर (पुं. , स्त्री.), लसूण (पुं. , स्त्री.), मध (पुं., स्त्री.), इत्यादि. अशा प्रकारचीं नामें अशीं भिन्न लिंगांत योज़िलीं जात असलीं, तरी तीं प्रायः एकाच वस्तूचा बोध करून देतात. क्वचित् प्रसंगीं त्रिलिंगी नामेंहि मराठींत आढळतात. उदाहरणार्थ, 'पोर' हें नाम पुंलिंगांत, स्त्रीलिंगांत आणि नपुंसकलिंगांतहि रूढ आहे. पण अशीं नामें विरळ.

एखाद्या नामाच्या दोन अथवा तीन लिंगांनी एकाच वस्तूचा बोध करून दिला, तर तीं नामें किती आहेत, असें मानावयाचें? — या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी शब्दसृष्टि आणि वास्तव सृष्टि यांच्या संबंधाविषयी आपली भूमिका काय, तें स्पष्ट करणें आवश्यक आहे. यापूर्वी हें सांगितलें की, शब्दसृष्टींतील लिंग आणि वास्तव सृष्टींतील प्रजाति यांचा

१. उदाहरणार्थ, कुटुंब (नपुं.) = बायको, हें नाम पहा.

परस्परांशीं संबंध नसतो.[1] तीच भूमिका येथेहि स्वीकारावयाची काय, किंबहुना, शब्दसृष्टि आणि वास्तव सृष्टि यांचा संबंध कसा स्थापित करावयाचा, असा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या तात्त्विक चर्चेने येथे विशेष लाभ होणार नाही. परंतु त्याची व्यावहारिक आणि व्याकरणोपयोगी बाजू लक्षांत घेतली पाहिजे. त्यासाठी 'मध' हा पुंलिंगी-स्त्रीलिंगी शब्द आपण विचारांत घेऊं. लिंगभेदाने कधीकधी अर्थभेद होतो, हा प्रश्न सध्या दूर ठेवूं. पण 'मध' या शब्दाच्या बाबतींत लिंगभेदाचा अर्थभेदाशीं संबंध नाही, हें उघड आहे. आता येथे 'मध' हा ज़िन्नस (किंवा – ही ज़िन्नस) एकच असला (असली), तरी मराठी भाषेंतील या नामाच्या प्रयोगाच्या वेळीं भाषा ही लिंगभेदानुसार आपोआपच त्या नामाला दोन भिन्न गटांत टाकिते. हे दोन गट 'मध' या नामाच्या सामान्यरूपाच्या वेळीं व्यक्त होतात, असें दिसून येईल. जसें : मधांत (पुं.), मधेंत (स्त्री.); मधाचा (पुं.), मधेचा (स्त्री.); मधाने (पुं.), मधेने (स्त्री.). असेंच इतरहि नामांच्या बाबतींत आढळून येईल. जसें : जिनसाने (पुं.), ज़िनसेने (स्त्री.); शिकरणीचा (स्त्री.), शिकरणाचा (नपुं.); वेळाने (पुं.), वेळेने (स्त्री.); इत्यादि. या सामान्यरूपांवरून हें सिद्ध होतें की, भाषा या भिन्नलिंगी नामांना भिन्न प्रकारें वागविते. ही जर वस्तुस्थिति आहे, तर तिचा अपलाप करणें उचित नाही, आणि युक्तिसिद्धहि नाही. अर्थात् शब्दसृष्टींतल्या ह्या व्यवहाराचा मागोवा घेऊन 'मध' (पुं.) आणि 'मध' (स्त्री.) हे भिन्न शब्द (अथवा नामें) मानिले पाहिजेत. 'म-ध' या शब्दांतील वर्णांची आनुपूर्वी — अर्थात् प्रथम 'म' आणि तदनंतर 'ध' — समान आहे, हा एक योगायोग आहे. परंतु भाषा त्यांना दोन प्रकारांनी वागविते, ही वस्तुस्थिति आहे. म्हणून तीच प्रमाण मानणें हें तर्कसंगत आहे. शब्दकोशांत 'मध' हा शब्द एकाच ठिकाणीं देऊन त्याचीं दोन लिंगें त्याच्या पुढेच देतात, हा कोशकाराच्या निवळ सोयीचा (आणि पैशाचाहि!) भाग आहे. पण तेवढ्याने 'मध' याचें भाषेंतील द्विविध स्वरूप परास्त होऊं शकत नाही. म्हणून भिन्नलिंगी नामें भिन्न मानिलीं पाहिजेत. 'अर्थभेदेन शब्दभेदः', त्याप्रमाणे 'लिङ्गभेदेन शब्दभेदः'.

कधीकधी असें दिसेल की, भिन्नलिंगी नामांचीं सामान्यरूपें एकरूप होतात. जसें : हरिणाला (पुं.), हरिणाला (नपुं.). अशा वेळीं 'हरीण' या नामाचे इतरत्र येणारे भाषेंतले प्रयोग हे प्रमाण मानिले पाहिजेत. जसें : हरीण पळाला (पुं.), हरीण पळालें (नपुं.). एतावता, 'जर लिंगभेद, तर नामभेद,' हें भाषाव्यवहाराचें गमक मानिलें पाहिजे. तसें तें न मानिलें, तर भाषानियमांत असंगति उत्पन्न होईल. शिवाय असें की, अन्यत्र आपण जर शब्दसृष्टींतील नामाच्या लिंगाचा वास्तव सृष्टींतल्या प्रजातिसंबंधाशीं संगतिसाधनाच्या तत्त्वाधाराने विच्छेद करूं जातों, तर येथे तसें न करण्याला प्रमाण काय? किंबहुना, तसें करणें — अर्थात् भिन्नलिंगी नामें भिन्न मानणें, म्हणजेच शब्दसृष्टींतील लिंग आणि वास्तव सृष्टींतील प्रजाति (sex) यांचा संबंध न जोडणें -- हेंच सुसंगत

१. पहा : पृ. १७.

होय. शब्दसृष्टींतल्या व्यवहाराचें विवेचन हें शब्दसृष्टीच्याच आधारें ठरविलें पाहिजे; अन्यसृष्टीच्या आधारें नव्हे. ज्योतिर्गोलांचे खगोलांतले आकार आपल्या चर्मचक्षूंना जरी कितीहि बारीक दिसत असले, तरी ते तसे बारीक मानण्यास प्रमाण नाही. त्याला गणित हेंच प्रमाण होय; आणि म्हणून ग्रहमालेंतला गुरु हा ग्रह आपल्या चर्मचक्षूंना जरी एखाद्या छोट्याशा गोटीएवढाच दिसत असला, तरी वस्तुतः तो सर्व ग्रहमालेंतला मोठा ग्रह आहे, हें आपण जाणतों; आणि त्याचें कारणहि ओळखितों.

याच विवेचनाचा अनुसार करून 'पोर' हें जें त्रिलिंगी नाम यापूर्वी सांगितलें, तें एकच नाम नसून तीं लिंगानुसार तीन नामें आहेत, असेंच मानिलें पाहिजे. तसेंच, परकीय भाषांतून मराठींत जे शब्द रुळले आहेत, त्यांचींहि लिंगें मराठींत जशीं रूढ आहेत, तशींच तीं मानिलीं पाहिजेत. त्यांचा मूळ शब्दांच्या लिंगांशीं कांही संबंध नाही. अशा प्रकारें लिंग ही नामाची यादृच्छिक उपाधि असल्याकारणाने ती त्या-त्या भाषकांच्या भाषाप्रचारावरूनच समजून घेतली पाहिजे.[1]

व च न

यानंतर नामाच्या वचन या उपाधीचा विचार करावयाचा आहे. लिंग हें जसें नामाच्या बाबतींत स्वयंभू आहे, तसें वचन नाही. तें प्रयोजनसापेक्ष आहे. तसेंच, नामाच्या लिंगज्ञानावाचून वचनविकृतीचा व्यवहार भाषेंत करितां येणार नाही. एवढेंच नव्हे, तर ही वचनविकृति होण्यापूर्वी नामाच्या ज्या विशिष्ट गटांना अनुसरून त्यांच्या रूपांत यथासंभव बदल होतो, त्या विशिष्ट गटांचेंहि पूर्वज्ञान आवश्यक आहे. हे गट नामांच्या अंतीं ऐकूं येणाऱ्या स्वरांना अनुलक्षून केलेले आहेत. नामाचें लिंग आणि त्याचा अंतस्थित स्वर यांचें ज्ञान झालें, म्हणजे नामाचें रूप सिद्ध करणें सोपें आहे. अर्थात् वचनविषयक प्रत्यय लागतांना आणखी कांही बदल होतीलच. मराठी भाषेच्या व्याकरणाची संपूर्ण रचना करणें हा हेतु नसल्यामुळे वचनविकृतीपूर्वी नामांच्या रूपांत कसकसे बदल होतात, त्याचें संपूर्ण विवेचन अथवा वर्णन येथे अपेक्षित नाही. कारण या व्याख्यानमालेचा विस्तार त्यायोगें फारच वाढेल. मात्र मराठींतल्या वचनविकृतीचा विचार नव्याने करणें इष्ट होईल, असें म्हटल्यावाचून राहवत नाही. कारण येथेहि नवीन, लाघवयुक्त मांडणी करणें शक्य आहे; असें आजपर्यंतच्या एतद्विषयक विवेचनावरून म्हणतां येईल. मात्र एकाच लहानशा मुद्द्याचा येथे अल्प विचार करूं.

मराठींत वचनें दोनच आहेत : एकवचन आणि अनेकवचन.[2] प्रायः सर्व नामांना या दोन्ही वचनविकृति होतात. मात्र त्या यच्चयावत् सर्व नामांना होत नाहीत, हें लक्षांत

१. नामाचें लिंग हें कोशावरून समजून घ्यावें, असें म्हणणें म्हणजे आडगिऱ्हाइकी सौदा करण्यासारखें आहे. कारण कोशगत लिंग हें भाषेच्या रूढीवरूनच कोशांत आलेलें असतें. अर्के चेन्मधु विन्देत किमर्थं पर्वतं व्रजेत्? 'घराच्या कोनाड्यांतच मध असतांना डोंगर तुडविण्याची यातायात कशासाठी करावयाची?'

२. वि. का. राजवाडे यांच्या मतें मराठींत द्विवचनहि—निदान कांही शब्दांपुरतें—आहे.

घेतलें पाहिजे. या बाबतींत राम, कृष्ण, शिवाजी अशा नामांचा विचार स्वतंत्रतया करावा लागेल.[1] शौर्य, पांडित्य इत्यादि साधित नामांचाहि वेगळा विचार करणें योग्य होईल.[2] अशाच प्रकारें नामांचा भाषेंतील प्रयोग लक्षांत घेऊन वचनविकृतींनुसार त्यांचे वेगवेगळे गण सिद्ध करणें हें शक्य आणि योग्यहि आहे. त्याच्या तपशिलाचा भाग सोडून देऊं. परंतु कांही नामांना एकवचन नसतें, तर कांही नामांना अनेकवचन उपलब्ध असत नाही. जसें :

नाम	एकवचन	अनेकवचन[3]
१. लोक (पुं.)	—	लोक
२. लोक (नपुं.)	—	लोकें[4] (जसें : ‘ लोकें आलीं, म्हणजे दंगा करूं नयें.’) (जसें : ‘ आम्ही लोकें कां आहों ? ’)
३. बाजरी (स्त्री.)	बाजरी	—
४. दही (नपुं.)	दही	—
५. दूध (नपुं.)	दूध	दुधें[4]
६. तेल (नपुं.)	तेल	तेलें[4]
७. लोणी (नपुं.)	लोणी	—
८. पोर (पुं.)	पोर	—
९. पोर (स्त्री.)	पोर	पोरी
१०. पोर (नपुं.)	पोर	पोरें[4]
११. मंडळी (स्त्री.) ‘ संघ ’	मंडळी	— (जसें : ‘ महाराष्ट्रांत एके काळीं २५-३० नाटकमंडळ्या नाटकें करीत होत्या. ’)
१२. मंडळी (स्त्री.) ‘ मेळावा ’	मंडळी (जसें : ‘ आज चहाला मंडळी आली होती.’)	—
१३. मंडळी (स्त्री.) ‘ बायको ’	मंडळी	—
१४. मंडळ (नपुं.)	मंडळ	मंडळें[4]

१. याला आपण ‘ रामगण ’ म्हणूं.

२. याला आपण ‘ शौर्यगण ’ म्हणूं.

३. या शीर्षकानें दिलेलीं नामांचीं अनेकवचनें प्रथमान्त आहेत.

४. वस्तुतः, येथे ‘ एं ’ असा प्रत्यय नसून ‘ अऽ ’ असा अनुकृष्ट (= ओढला जाणारा) ‘ अ ’ आहे. मराठीच्या आजच्या रूढ लेखनांत त्याचें चिन्ह नाही. तथापि त्याची उपेक्षा करून

तौलनिक दृष्ट्या एकवचन-अनेकवचनांचें स्वरूप ध्यानीं यावें, म्हणून उदाहरणांसाठी हीं चौदा नामें घेतलीं आहेत. या विवेचनावरून हें ध्यानीं येईल की, एखाद्या नामाचें एकवचन आहे म्हणून त्याचें अनेकवचन झालेंच पाहिजे, अथवा अनेकवचन आहे म्हणून त्याचें एकवचन उपलब्ध असलेंच पाहिजे, असें नाही.[1] या बाबतींत भाषेंतले प्रयोग हेंच एकमेव आणि अखेरचें प्रमाण होय.

नामांना विशिष्ट प्रत्यय[2] जोडून त्यांपासून कधीकधी स्त्रीलिंगी नामें बनवितात. हीं साधित नामें होत; आणि मर्यादित अर्थानें तीं विशेषणें म्हणावीं लागतील.

सर्वनामविचार

विभक्तिविचाराला आरंभ करण्यापूर्वी एका विषयाचा परामर्श केला पाहिजे. तो विषय सर्वनामाचा होय. संस्कृताच्या व्याकरणांत सर्वनामाचा स्वतंत्र विचार करितात, तसा मराठीच्याहि व्याकरणांत सर्वनामाचा स्वतंत्र विचार करण्याची रूढि आहे. परंतु संस्कृतांत सर्वनामांचे पुष्कळ प्रत्यय वेगळे आहेत, त्यामुळे तेथे तो स्वतंत्र विचार योग्य असला, तरी मराठींत नामांचे आणि सर्वनामांचे विभक्तिप्रत्यय अभिन्न आहेत; त्यामुळे त्यांचा वेगळा विचार करण्याची आणि नामांपासून तीं पृथक् करण्याची तादृश आवश्यकता नाही. हे विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी त्यांचीं जीं सामान्यरूपें होतात, तीं मात्र भिन्नभिन्न होतात. त्यांकडे आवर्जून लक्ष देणें आणि त्यांची यथायोग्य नोंद करणें हें आवश्यक आहे. सर्वनामें हीं वारंवार योजिलीं जात असल्याकारणानें त्यांच्या भाषेंतील रूपांत कांहीसा स्वैरपणा आढळला, तर नवल नाही. तरीहि त्यांच्या रूपांविषयी कांही नियम बसविणें आणि ते कोष्ठकरूपानें दर्शविणें हें अशक्य नाही. परंतु त्यांत जरी कांही

चालणार नाही. म्हणून हा अनुकृष्ट 'अ' अक्षराच्या शिरोरेषेवर काटकोणी उभी रेघ (꠱) काढून दाखवावा, असें सुचवावयाचें आहे. जसें : लोकं, फुलं, दुधं, मंडळं, वासरं, इत्यादि. वस्तुतः, हें सुचविलेलें नवीन लेखचिन्ह यापुढे प्रस्तुत व्याख्यानांमध्ये योजावयास पाहिजे. परंतु समजूत पटण्याच्या कामीं विक्षेप येऊं नये, यासाठी लोकें, फुलें, दुधें, मंडळें, वासरें इत्यादि शब्दांचे अंत पारंपरिक लेखनसंकेतानुसारच ठेविलेले आहेत. मात्र क्वचित् जेथे कांही विशिष्ट नवीन मुद्दा सांगण्याची आवश्यकता वाटली, तेथे प्रस्तुत सूचित लेखचिन्हाचा आणि तें लेखचिन्ह ज्याचें प्रतिनिधित्व करीत आहे, त्या ध्वनीचा आवर्जून निर्देश केला आहे. इतरत्र त्याचा प्रयोग इष्ट असेल तेथे सहज लक्षांत येईल, म्हणून तो लक्षांत आणून देण्यासाठी मुद्दाम कांही योजना केलेली नाही.

१. ही स्थिति संस्कृतांतहि आहे.

२. जसें : आ, ई, ईण इत्यादि.

स्थळीं नावीन्य प्रतीत होण्यासारखें असलें, तरी एक तर मराठीच्या समग्र व्याकरणरचनेचा व्याप हा प्रस्तुत व्याख्यानांचा विषय नाही, आणि दुसरें म्हणजे त्यांतला मोठा भाग प्रधानतः तांत्रिक स्वरूपाचा असल्याने लक्षांत येण्यासारखा आहे; म्हणून हाहि विषय येथे अपरामृष्ट ठेवूं.

सर्वनामांच्या गटांतलीं कांही सर्वनामें अलिंग[1] आहेत. जसे : मी, आम्ही, तूं, तुम्ही इत्यादि. म्हणजे बोलणारी व्यक्ति स्त्री असो, पुरुष असो, या सर्वनामांचीं रूपें अभिन्न राहतात. उदाहरणार्थ, ' मी येईन ', ' तुम्ही जा ', अशांसारख्या वाक्यांत तिऱ्हाइताला लिंगबोध होणार नाही. मात्र बोलणारी व्यक्ति जर साक्षात् आपल्या पुढ्यांत असली, तर ' मी येईन, ' यांतल्या ' मी 'चें लिंग आपण जाणूं. तसेंच, ' तुम्ही जा, ' यांत ज्यांना उद्देशून ' तुम्ही ' हें उच्चारिलेलें असेल, त्यांच्या अनुरोधाने ' तुम्ही 'चेंहि लिंग ओळखितां येईल. परंतु स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजाला उद्देशून ' तुम्ही जा, ' हें वाक्य जर उच्चारिलेलें असेल, तर ' तुम्ही ' याचें लिंग सांगणें शक्य नाही. कधीकधी ' मी ' याचें लिंग संदर्भानें व्यक्त होतें. जसें : (१) ' मी येईन, असें ती म्हणाली ', (२) ' मी तीन दिवसांत तुला नेण्यासाठी दूत पाठवीन, असें दुष्यंताने शकुंतलेला अभिवचन दिलें, ' यांतल्या पहिल्या वाक्यांत ' मी ' याने ज़िचा निर्देश केला आहे, ती व्यक्ति स्त्री आहे, हें संदर्भानें सहज कळतें; तर दुसऱ्या वाक्यांत ती व्यक्ति पुरुष आहे, हेंहि सहज उमजतें. तेव्हा मी, आम्ही इत्यादि सर्वनामें ' इष्टलिंग ' आहेत. याचा अर्थ असा की, तें लिंग साक्षात् त्या शब्दाच्या ठिकाणीं व्यक्त होत नाही, तर तें पुढील वाक्याच्या संदर्भावरून अथवा त्याच वाक्यांतील क्रियापद इत्यादिकांवरून अनुमित होतें. जसें : ' मी मुंजीला येतें ', ' मी येतों ', ' आम्ही लग्नाला जाऊं, असें ते म्हणाले ', ' आम्ही आपले तसेच जाऊं ', ' आम्ही एकट्याच येणार आहों, तुम्ही व्हा पुढे, ' इत्यादि. अशा प्रकारच्या कितीतरी वाक्यांमध्ये ' मी ', ' आम्ही ' यांच्या लिंगाचा बोध वाक्यांतल्या अन्य घटकांवरून होतो. साक्षात् ' मी ', ' आम्ही ' यांच्या प्रयोगावरून होत नाही.

येथे एक प्रश्न उपस्थित करितां येण्यासारखा आहे. तो असा : मी, आम्ही या सर्वनामांचें लिंग तीं ज्या वाक्यांत योज़िलेलीं असतील, त्यांतल्या अन्य घटकांवरून कळतें म्हणून जर तीं इष्टलिंग मानावयाचीं, तर ' सूर्य उगवतो ', ' फूल उमलतें ' इत्यादिहि वाक्यांत सूर्य, फूल यांचीं लिंगें ' उगवतो ', ' उमलतें ' या क्रियापदांवरून अनुमित होत असल्याकारणाने तींहि नामें इष्टलिंग मानून निर्वाह कां करूं नये ? याचें उत्तर असें आहे की, सूर्य, फूल या नामांचें लिंग हें नित्य आहे. तें कधीच बदलणार नाही. तर ' मी येईन, ' हें वाक्य जशी मालती उच्चारूं शकेल, त्याचप्रमाणे माधवहि उच्चारूं शकेल;

१. यांना ' इष्टलिंग ' अशी संज्ञा द्यावी, असें पुढे सुचवावयाचें आहे.

आणि मग संदर्भतः 'मी' याचें लिंग ओळखून घ्यावें लागेल. हा भेद मूलगामी असल्याकारणानें मी, आम्ही यांसारखीं सर्वनामें आणि सूर्य, फूल यांसारखीं नामें हीं भिन्न मानणें योग्य आहे.

निष्कर्ष

आजच्या व्याख्यानांत आपण कांही विषयांचा विचार केला. या विचारमंथनामधून निघालेले निष्कर्ष असे सांगतां येतील :

(१) भाषेंतील शब्दांचें वर्गीकरण करितांना त्यांत परस्परसंक्रम होतां कामा नये.

(२) शब्दांचें अव्यय-सव्ययांमध्ये वर्गीकरण करितांना रूढितः अव्ययें मानिलेले कित्येक शब्द सव्ययें ठरतात. म्हणून अव्यय-सव्ययांची आखबंद व्यवस्था केली पाहिजे.

(३) कित्येक क्रियापदें हीं सलिंग ठरून विशेषणांत समाविष्ट होतील.

(४) मराठींतलीं कांही विशेषणें अव्ययांच्या वर्गांत दाखल करावीं लागतील.

(५) मराठीच्या व्याकरणाचा फारच मोठा भाग सव्ययांच्या विचाराला आणि रचनेला वाहिलेला असतो.

(६) शब्दांचें वर्गांतर झालें, म्हणून त्यांचें कार्य लुप्त होत नाही.

(७) शब्दांच्या वर्गीकरणाचा नवीन शाखावृक्ष सिद्ध करितां येण्यासारखा आहे.

(८) नाम म्हणजे वस्तूचा वाचक असा सहजलिंगी किंवा स्वभावगत लिंगाचा शब्द.

(९) धर्मिवाचक नामें आणि धर्मवाचक नामें, हें नामांचें द्विविध वर्गीकरण निरुपयोगी आहे; कारण व्याकरणकार्याच्या दृष्टीने धर्मधर्मिविवेचन हें केवळ तटस्थ आहे.

(१०) सामान्यनाम आणि विशेषनाम ही विभागणी निरुपयोगी आहे.

(११) लिंग ही नामाची सहज म्हणजे स्वभावगत उपाधि आहे. वचन आणि विभक्ति या प्रयोजनापेक्ष आणि बदलत्या उपाधि आहेत.

(१२) भाषासृष्टींतील लिंग (gender) आणि वास्तव सृष्टींतील प्रजाति (sex) यांचा परस्परांशीं संबंध नाही.

(१३) ' लिङ्गभेदेन शब्दभेदः '.

(१४) मराठींत कांही नामांना एकवचन नाही; कांहींना अनेकवचन नाही.

(१५) मी, आम्ही, तूं, तुम्ही इत्यादि सर्वनामें इष्टलिंगी असतात.

सर्वनामांविषयी आणि त्यांच्या स्वरूपासंबंधी आणखी विचार करणें हें शक्य असलें, तरी आज आपण त्याला येथेच अर्धविराम देऊं.

पांचवें

व्याख्यान

विशेषण, सर्वनाम, विभक्ति : विमर्श

पांचवें व्याख्यान

विशेषण, सर्वनाम, विभक्ति : विमर्श

१. विशेषणविमर्श

विशेषणांचे दोन प्रकार : विकारसह, विकारासह. पांढर-गण, गोड-गण. नामभूत विशेषणें.

२. सर्वनामविमर्श

सर्वनामांचें नवीन वर्गीकरण. सर्वनामांच्या स्वरूपाचें अवलोकन. इष्टलिंग सर्वनामें : मी-गण. सर्वनामांचा दुसरा एक प्रकार : त-गण.

३. विभक्तिविमर्श

विभक्तींचें स्वरूपावलोकन. निष्कर्ष : (१) अर्थैकत्व आणि एकविभक्तिकत्व. (२) अर्थैकत्व आणि वर्णभेद. (३) अर्थैकत्व आणि वचनभेद. विभक्तिविषयक समीकरणें. या समीकरणांची चिकित्सा. उदाहरणें. विभक्तिविषयक अर्थभेदाची चिकित्सा. मराठींतल्या विभक्तींचे नवीन अर्थ. विभक्तींचा कार्यभार.

४. विभक्तींच्या तपशिलाचा विमर्श

षष्ठी विभक्तीचा समग्र विचार. षष्ठीचा विभक्तींमध्ये समावेश ? त्याचीं अठरा कारणें : त्यांचे विमर्श.

मित्र हो,

गेल्या व्याख्यानांत शब्दांचें वर्गीकरण कसें करितां येईल, तें पाहतांना आपण मराठींतल्या विशेषणांच्या वर्गाचा थोडा विचार केला,[1] ज्यांना आज आपण विशेषणें म्हणतों, त्यांची फेरमांडणी करून त्यांतल्या कांहींचा समावेश अव्ययवर्गांत करणें कसें शक्य आहे, आणि त्यायोगें त्यांचें भाषेमध्ये प्रचलित असलेलें स्वरूप कसें यथावत् प्रतिबिंबित होईल, तेंहि लक्षांत घेतलें. अर्थात् विशेषणांचा वर्ग एखाद्या वर्गीकरणपद्धतीमधून अंतर्धान पावला, म्हणून तो कांही नष्ट अथवा नेस्तनाबूद झाला, असें नाही. त्याचें केवळ वर्गांतर झालें, इतकेंच. त्याचें भाषेंतलें कार्य शिल्लकच राहिलें. एवढेंच की, त्याचें वास्तव स्वरूप लक्षांत घेऊन एकंदर मांडणीमध्ये आपण मेळ आणि संगति साधण्याचा प्रयत्न केला. शाळेंतल्या एखाद्या मुलाची तुकडी कार्यपरत्वें बदलली म्हणून, किंवा शाळाहि बदलली म्हणून, त्या मुलाचें कांही अस्तित्व नाहीसें होत नाही, किंवा त्याचें कार्य अथवा त्याची इयत्ताहि जात नाही. तसेंच शब्दप्रकारांच्या वर्गीकरणाचेंहि आहे. वर्गीकरण करणें ही वैयाकरणाची दृष्टि आहे. ती अनेक प्रकारांची असूं शकेल; आणि ती जितकी चोख आणि भाषेच्या सर्व स्वरूपाला कवेंत घेऊं शकणारी असेल, तितकी ती ग्राह्य म्हणावी लागेल.

१. विशेषणविमर्श

विशेषणांच्या स्वरूपाची चिकित्सा करितांना प्रथमतः हें आवर्जून लक्षांत घेतलें पाहिजे की, सर्व विशेषणें विकारसह नसतात.[२] अर्थात् रूपतः कांही विशेषणें अव्यय-वर्गांत जातात.[२] मात्र कांही विशेषणांना विकार होतात. अर्थात् तीं विकारसह असतात. ' शुभ्र ' आणि ' पांढरा ' या दोहोंचाहि अर्थ अभिन्न असला, तरी त्यांचीं रूपें भाषेंत यथासंभव पालटतात. म्हणजेच भाषा त्यांना वेगवेगळ्या प्रकारांनी वागविते. जसें :

पांढरा शुभ्र घोडा	**पांढऱ्या शुभ्र घोड्याने**
शुभ्र प्रकाश	**शुभ्र प्रकाशांत**
पांढरी गाय	**पांढऱ्या गाईचें पांढरें दूध**
पांढरें मांजर	**पांढऱ्या मांजराचे डोळे**

१. पहा : पृ. ८९ – ९०.

२. पहा : पृ. ८९ – ९०.

असें स्पष्ट दिसतें की, ‘ शुभ्र ’ याचें रूप भाषत कोणत्याहि परिस्थितींत अविकृत राहतें. त्यांत कांही व्यय म्हणून होत नाही. अर्थात् तें अव्यय होय. उलट, ‘ पांढरा ’ या विशेषणाचें रूप पालटतें राहतें. जसें :

एकवचन	अनेकवचन	सामान्यरूप
पांढरा घोडा	पांढरे घोडे	पांढऱ्या घोड्याने
पांढरी घोडी	पांढऱ्या घोड्या	पांढऱ्या घोडीने
पांढरें[1] घोडें[1]	पांढरीं घोडीं	पांढऱ्या घोड्याने

म्हणजे ‘ पांढरा ’ याचीं सर्वांमिळून एकंदर पांच रूपें उपलब्ध होतात. तीं अशीं :

ए. व.	अ. व.	सामान्यरूप
पांढर + आ	पांढर + ए	पांढर + या
,, + ई	,, + या	पांढर + या
,, + एं (उच्चारतः अं)	,, + ई	पांढर + या

यांत एकवचनांतला स्त्रीलिंगी प्रत्यय (‘ ई ’) हा अनेकवचनांत नपुंसकलिंगी प्रत्ययाशीं समरूप आहे. त्याचप्रमाणे अनेकवचनांतला स्त्रीलिंगी प्रत्यय (‘ या ’) हा सामान्य-रूपांतल्या प्रत्ययाशीं सर्वत्र एकरूप आहे. यावरून लिंगानुसार, वचनानुसार आणि सामान्यरूपानुसार हीं विशेषणाचीं रूपें कशीं फिरतात, तें दिसेल. सामान्यरूप हें कांही ठराविक स्वरूपाने भाषेंत आढळतें. यासारखीं विशेषणें वगळलीं, तर इतर सर्व विशेषणें केवळ अविकृत राहतात. त्यांचें विशेष्य प्रथमान्त असो, अन्यविभक्त्यन्त असो, अथवा कोणत्याहि वचनांत असो, तीं विशेषणें नित्य अविकृत, अव्ययरूप असतात. जसें :

गोड आंबा	गोड आंब्याची चव
आनंदी रघू	आनंदी रघूचीं मुलें
हिकमती कुत्रा	हिकमती कुत्र्याचा मालक
कांही माणसें	कांही माणसांचा स्वभाव
दुहेरी दोरा	दुहेरी दोऱ्याची शिवण
वेळकाढू खेळ	वेळकाढू खेळांचा कंटाळा

१. पहा : पृ. ९३, टीप ३; पृ. १००, टीप ४.

चौदा चौकडे	चौदा चौकड्यांचें राज्य
चारशे ऐंशी धावा	चारशे ऐंशी धावांचा विक्रम
पांचशे रुपये	पांचशे रुपयांचें साठेखत

या उदाहरणांवरून सर्व अवस्थांमध्ये अविकृत राहणाऱ्या विशेषणांचें स्वरूप समजून येईल. येथे हें लक्षणीय आहे की, ज्यांना आपण संख्यावाचक विशेषणें म्हणतों, तींहि अविकृतच राहतात. अर्थात् विशेषणांचे दोन वर्ग केले पाहिजेत :

(१) विकारसह आणि (२) विकारासह.

या सर्व विवेचनाचा आणि पृथक्करणाचा निष्कर्ष असा की, ज्या विशेषणांना हे लिंगवचनकारक प्रत्यय लागतात, त्यांचा आपण एक वेगळा गट म्हणून कल्पिला, तर उरलेलीं सर्व विशेषणें दुसऱ्या गटांत घालितां येतील. सोयीसाठी पहिल्या गटाला — अर्थात् विकारसह विशेषणांना — ‘पांढर-गण’ असें नांव देतां येईल. या ‘पांढरगणां’त काळ (काळा-ळी-ळें), तांबड (तांबडा-डी-डें), मोठ (मोठा-ठी-ठें), अर्ध (अर्धा-र्धी-र्धें), पहिल (पहिला-ली-लें), रांगत (रांगता-ती-तें), उडणार (उडणारा-री-रें), फुललेल (फुललेला-ली-लें) इत्यादि कितीतरी विशेषणें समाविष्ट होतील. त्यांची यादी करणें शक्यहि नाही, आणि आवश्यकहि नाही. या पांढर-गणाव्यतिरिक्त इतर सर्व विशेषणें — कीं जीं नित्य अविकृत राहतात, — दुसऱ्या गणांत पडतील. अशा प्रकारें विकारसह व विकारासह विशेषणें मिळून मराठी भाषेंतल्या सर्व विशेषणांचें समग्र विवेचन फारच थोडे अपवाद नोंदविल्यानंतर समाप्त होईल. विशेषणांचें शाखादर्शन असें :

वि शे ष ण

पांढर-गण
(जसें : पांढर, काळ, तांबड इत्यादि)

तदितर (गोड-गण) : रूपतः अव्यय
(जसें : गोड, कडू, हिकमती इत्यादि)

विशेषणें कधीकधी नामकार्यें करितात. अशा वेळीं त्यांना नामांप्रमाणे वापरलेलीं विशेषणें म्हणणें हें युक्त नाही. कारण तीं खरोखर रूपांतरित नामेंच होतात. त्यांना नामांचीं सर्व कार्यें घडतात. देवदत्त हा ज्याप्रमाणे कोणाचा तरी पुत्र असतो आणि नंतर तो पिता होतो, त्याप्रमाणे. अर्थात् तो पिता झाल्यावरहि त्याचें पुत्रत्वच केवळ ध्यानीं घेऊन त्या पुत्रत्वाच्या बळावर त्याला पुत्र म्हणत राहणें हें जसें युक्त नाही, त्याप्रमाणे अशा नामभूत विशेषणांना विशेषणें म्हणत राहणें हें बरोबर नाही. ‘शहाण्याला

शब्दाचा मार ', ' जातीच्या सुंदराला कांहीही शोभतें ', ' जाग्याला जागें कसें करणार ?' इत्यादि वाक्यांत ' शहाणा ', ' सुंदर ', ' जागा ' हीं नामें होत. पूर्वाश्रमींचें ब्रह्मचर्य विसरून गृहस्थाश्रमाचे सर्व सोपस्कार घेणाऱ्या माणसाप्रमाणे अशा नामभूत विशेषणांचा भाषेंत व्यवहार असतो !

२. सर्वनामविमर्श

गेल्या व्याख्यानांत इष्टलिंग सर्वनामांचा निर्देश करून त्याची चर्चा केलेली होती.[१] अशा इष्टलिंग सर्वनामांच्या गणांत मी, आम्ही, तूं, तुम्ही, आपण, स्वतः, कोण हीं सर्वनामें समाविष्ट होतील. या सर्वनामांना नामाप्रमाणे विभक्तिकार्यें होतात, असें दिसेल. म्हणून त्यांचा समावेश कार्यतः नामांमध्ये करावा, असें गेल्या व्याख्यानांत म्हटलें.[२] या सर्वनामांतल्या कांही सर्वनामांना दोन्ही वचनविकृति होतात. जसें : मी, आम्ही; तूं, तुम्ही; माझा, आमचा; तुझ्यांत, तुमच्यांत; इत्यादि. कांहींना एकवचनाची उपाधि नाही. जसें : आपण, आपणांला, इत्यादि. तथापि ' आपण ' याचीं सर्व विभक्तींमध्ये रूपें होत नाहीत. उदाहरणार्थ, त्याचें तृतीयेचें रूप प्रथमेशीं समरूप होतें. तर अनेकवचनांतहि कांही विभक्तिप्रत्यय त्याला लागतच नाहीत. उदाहरणार्थ, ' आपण ' याला ' ना ' हा प्रत्यय लागत नाही. ' आपण ' याचीं षष्ठीचींहि रूपें होत नाहीत. त्या स्थानीं ' आपल ' याचीं रूपें होतात. जसें : आपला, आपली, आपलें(लं); आपले, आपल्या, आपलीं. हीं रूपें अर्थातच ' आपण ' या सर्वनामाचीं नव्हत; तर तत्संबद्ध अशा ' आपल ' या विशेषणाचीं होत. ' आपण ' याचीं इतर एकवचनी रूपें होत नसतांनाहि आपला, आपली, आपलें अशीं एकवचनी रूपें ज्या अर्थी येथे उपलब्ध होतात, त्या अर्थी हीं रूपें ' आपण ' याचीं नव्हेत, हें उघड आहे. ' कोण ' या सर्वनामाला अनेकवचनांतला प्रथमेचा ' ई ' प्रत्यय वगळतां वेगळे प्रत्यय नाहीत, हें आवर्जून सांगितलें पाहिजे. त्याचें तृतीया विभक्तींत ' कुणीं ' असें एकमेव रूप होतें. ' स्वतः ' याचींहि केवळ एकवचनाचींच रूपें होतात. ' स्वतः ' याचें वेगळें सामान्यरूप नाही. त्याचें तृतीयेचें रूप प्रथमेच्या रूपाशीं समरूप होतें.[३] ' काय ' हें जरी सर्वनामामध्ये समाविष्ट केलेलें असलें, तरी वस्तुतः तें अव्यय आहे. म्हणूनच त्याचा समावेश आपण गेल्या व्याख्यानाच्या वेळीं अव्ययांत केला.[४] अशा प्रकारें इष्टलिंग सर्वनामें हीं

१. पहा : पृ. १०१–१०३.

२. पहा : पृ. ९३.

३. मी, आम्ही, तूं, तुम्ही यांचींहि प्रथमा व तृतीया या विभक्तींचीं रूपें समरूप होतात.

४. पहा : पृ. ९१.

मराठींत रूपतः बरींच स्वैर आहेत. तथापि त्यांना होणारीं विभक्तिकार्यें लक्षांत घेतां त्यांचा नामांमध्ये समावेश करणें हें सयुक्तिक आहे. इष्टलिंग सर्वनामांच्या या गणाला आपण 'मी-गण' अशी संज्ञा देऊं.

सर्वनामांचा दुसराहि एक प्रकार आहे. या प्रकारांतलीं सर्वनामें सलिंग आहेत; आणि हें त्यांचें वैशिष्ट्य आहे. एरवी, त्यांनाहि 'मी-गणां'तल्याप्रमाणे विभक्तिकार्यें होतात. जसें : तो, हा, जो इत्यादि. तीं सलिंग आहेत, पण तीं सहजलिंग नाहीत. याचा अर्थ तीं विशेषणें आहेत. त्यांचें अधिक अवलोकन करितां असें दिसतें की, त्यांना दोन्ही वचनें, तिन्ही लिंगें आणि सामान्यरूप आहे. उदाहरणासाठी 'तो' हें सर्वनाम घेतलें, तर वस्तुतः त्याची फोड 'त + ओ' अशी करावयास पाहिजे. तींत 'त' हें सर्वनामाचें गर्भरूप असून 'ओ' हा लिंगकारक एकवचनाचा प्रत्यय आहे. त्याचें समग्र दर्शन असें होईल :

त

	एकवचन	अनेकवचन
पुं.	त + ओ	त + ए
स्त्री.	त + ई	त + या
नपुं.	त + एं	त + ई

(हे प्रत्यय पररूपसंधीनें लागतील.)

त

(सामान्यरूप)

	एकवचन	अनेकवचन
पुं.	त + या	त + या
स्त्री.	त + इ (त + ई)	त + या
नपुं.	त + या	त + या

(हे प्रत्यय पररूपसंधीनें लागतील.)

येथे स्त्रीलिंगाचें एकवचन वगळितां सामान्यरूप हें सर्वत्र एकविध आहे, असें दिसेल. स्त्रीलिंगाच्या एकवचनांत 'स' या द्वितीयेच्या विभक्तिप्रत्ययापूर्वी आणि 'त' या सप्तमीच्या विभक्तिप्रत्ययापूर्वी त्याचें ई-कारान्त रूप होतें. (जसें : तीस, तींत.[१])

• हीं रूपें बोलण्यांतल्या मराठींत प्रायः नाहीत.

इतरत्र इ-कारान्त रूप होतें. (जसें : तिला, तिच्यांत.) 'त' या सर्वनामावरून 'ह', 'ज' या सर्वनामांचीं रूपें सहज समजून येतील. त्यांचा वेगळा निर्देश करण्याची आवश्यकता नाही. त्यांचें स्वरूप आणि कार्य पाहतां तीं विशेषणें आहेत, असें दिसतें. सर्वनामांच्या या गणाला आपण 'त-गण' अशी संज्ञा देऊं. सर्वनामांचे अशा प्रकारें दोन गण करणें युक्त होईल.

सर्वनाम

मी-गण (इष्टलिंग; सहजलिंग नाही.) (विभक्तिकार्यतः नाम. जसें : मी, आम्ही, तुला इ.)	**त-गण** (सलिंग) (लिंगकार्यतः विशेषण. जसें : तो, हा, जिला इत्यादि.)

→ **कार्यवाची** ←

३. विभक्तिविमर्श

यापुढे आपल्याला विभक्तिप्रकरणाचा विचार करावयाचा आहे. नामाचा अथवा सर्वनामाचा वाक्यांतल्या अन्य पदांशीं संबंध जोडणारी उपाधि म्हणजे विभक्ति होय. 'विभक्ति' हा शब्द वि-भज् (= 'विभाग करणें, वांटणें') या धातूला 'ति' हा नामसाधक प्रत्यय लागून बनला आहे. नामां-सर्वनामांचीं भाषेंतल्या व्यवहारांत अनेकविध रूपें येतात; त्या रूपांचें बारकाईने अवलोकन केल्यानंतर त्यांच्या अंतीं कांही समान स्वरूपाचीं अक्षरें दिसतात. हीं अक्षरें विशिष्ट अर्थांनी आवृत्त होत असतात. हीं आवृत्त अक्षरें — म्हणजेच तत्पूर्वीच्या नामां-सर्वनामांना लागलेले प्रत्यय — त्यांचे साधारण अर्थ ध्यानीं घेऊन गटशः अथवा समूहशः पृथक् करितां येतात. अशी वांटणी ज्या प्रत्ययांनी सिद्ध होते, ते विभक्तिप्रत्यय होत. या विभक्तिप्रत्ययांचे अर्थ स्थूल मानाने लक्षांत घेऊन त्यांचे व्याकरणांत समूह केलेले असतात. या प्रत्ययांची वचनानुसारहि गटवारी केलेली असते. उदाहरणार्थ,

एकवचन	अनेकवचन
देवा – ला	देवां – ना
माळे – ला	माळां – ना
केळी – ला	केळीं – ना

अशांसारखीं रूपें पाहिलीं, तर हें उघड आहे की, यांत 'ला' या प्रत्ययाने एकवचनांत

जो विशिष्ट अर्थ बोधित होतो, तोच 'ना' या प्रत्ययानें अनेकवचनांत बोधित होतो. तेव्हा अर्थतः ही एकच विभक्ति होय. आता, पुढील उदाहरणें पहा :

एकवचन	**एकवचन**
देवा – स	**देवा – ला**
माळे – स	**माळे – ला**
केळी – स	**केळी – ला**

या रूपांवरून असें सिद्ध होतें की, 'स' या प्रत्ययानें जो अर्थ कळतो, तोच तंतोतंत अर्थ 'ला' याहि प्रत्ययानें कळतो. दोन्ही एकवचनाचेच अर्थ. तेव्हा 'देवा-स' आणि 'देवा-ला' हीं रूपें एकमेकांऐवजी जरी योजिलीं, तरी चालतें. म्हणजेच तीं परिवृत्तिसह (substitutable) रूपें आहेत. हें परिवृत्तिसहत्व (substitutability) 'स' आणि 'ला' या प्रत्ययांशीं संबद्ध आहे. तेव्हा 'स' आणि 'ला' हे एकाच विभक्तीचे एकवचनांतले दोन भिन्न प्रत्यय आहेत. ते प्रत्यय एकमेकांपासून भिन्न आहेत, याचें कारण त्या प्रत्ययांतले वर्ण भिन्न आहेत. म्हणजे या विवेचनाचे निष्कर्ष असे :

(१) अर्थैकत्व हें एकविभक्तिकत्वाचें कारण आहे.

(२) अर्थैकत्व असतां वर्णभेद हे प्रत्ययभेदाचें कारण आहे.

(३) अर्थैकत्व असतां वचनभेद हें एकविभक्तिकत्वाचें कारण आहे. म्हणजेच विभक्तिभिन्नतेच्या बाबतींत वचनभेद अकिंचित्कर आहे.

आता हीं पुढील रूपें पहा :

एकवचन	**अनेकवचन**
देवा – ने	**देवां – नी**
माळे – ने	**माळां – नी**
केळी – ने	**केळीं – नी**

या रूपांवरून हें स्पष्ट आहे की, 'देवा-स' (ए. व.) आणि 'देवां-ना' (अ. व.) हीं रूपें जेथे योजूं, तेथे अनुक्रमें 'देवा-ने' (ए. व.) आणि 'देवां-नी' (अ. व.) हीं रूपें आपण योज़िणार नाही. कारण अर्थतः हीं रूपें एकमेकांपासून सर्वस्वीं वेगळीं आहेत. तीं परिवृत्तिसह नाहीत. म्हणून

(४) अर्थभेद हें विभक्तिभेदाचें कारण आहे.

अर्थात् एकाच वचनामध्ये जेथे-जेथे अर्थभेद असेल, तेथे-तेथे स्वतंत्र विभक्ति समजावी; पण जेथे-जेथे अर्थभेद नसेल, तेथे-तेथे एकच विभक्ति आहे, असें मानिलें पाहिजे. कारण अशीं रूपें प्रत्ययांत वर्णभेद असतांहि परिवृत्तिसह असतात. तात्पर्य असें की, समान वचनांत अर्थभेद आणि वर्णभेद असतां विभक्तिभेद मानिला पाहिजे. आजवरच्या याविषयीच्या चर्चेचा निष्कर्ष असा की, वर्णभेद नसेल, पण अर्थभेद असेल, तर समान विभक्ति मानावी; अर्थातच एका विभक्तीला अनेक अर्थ मानावे. हें समीकरणाच्या स्वरूपाने असें दर्शवितां येईल :

समानवचनत्व असतां

(१) वर्णभेद + अर्थभेद = विभक्तिभेद;

(२) वर्णभेद + ० = समानविभक्ति (परिवृत्तिसहत्व);

(३) ० + अर्थभेद = समानविभक्ति.

यांतलें पहिलें समीकरण निरपवाद आहे. दुसरेंहि समीकरण तसेंच निरपवाद आहे. तिसरें समीकरण मात्र चर्चनीय आहे. त्यासाठी आपण एक उदादरण घेऊं.

‘रामानें बाणाने रावणाला मारिलें.’

या वाक्यांत ‘रामानें’ आणि ‘बाणानें’ या रूपांत प्रत्यय दिसतो, तो एकच. तो ‘ने’ असा प्रत्यय आहे. अर्थात् वर्णभेद नाही; पण अर्थभेद आहे. तसा तो नसता, तर ‘रामाने’ यावरून मारण्याच्या क्रियेचें कर्तृत्व आणि ‘बाणाने’ यावरून त्याच क्रियेचें साधनत्व हें आपल्या अनुभवाला येतें ना. अर्थात् समानवर्णरूप विभक्तीच्या गळीं दोन कार्यें पडलीं आहेत : (१) कर्ता दाखविण्याचें, (२) साधन दाखविण्याचें. एवढेंचसें काय, पण ‘मनानें कुढा’, ‘डोळ्याने अंधळा’, ‘वाटेनें काटे’ अशासारख्या उदाहरणांत ‘ने’ या प्रत्ययाच्या माथीं आणखीहि कांही कार्यें येऊन पडलीं आहेत, असें दिसेल. ‘रामानें’, ‘बाणाने’ या प्रयोगांतल्या ‘ने’ याच्या दोन कार्यांचें आपण आत्ता वर्णन करूं शकलों. पण

मनाने कुढा

डोळ्याने अंधळा

वाटेने काटे

या प्रयोगांतल्या ‘ने’ या प्रत्ययाच्या कार्यांचें नेमकें वर्णन चटकन् करितां येईल, असें वाटत नाही. उदाहरणार्थ, ‘मनानें कुढा’ यांत ‘ने’-प्रत्ययाचा अर्थ काय सांगणार? कर्ता? — खासच नाही. मग साधन? करण? — अंहं! मग काय अधिकरण? —

कांहीं लोक तसा सांगतील, पण — कुणास ठाऊक ? कारण 'तो मनांत कुढा आहे,' आणि 'तो मनाने कुढा आहे,' या दोन वाक्यांच्या अर्थांत सूक्ष्मदर्शी श्रोत्याला फरक जाणवल्यावाचून राहणार नाही. 'मनाने' यांत 'ने' याने अधिकरण दर्शविलें जातें, असें म्हणणें निव्वळ धोपटमार्गी झालें. 'मनाने कुढा' याचा 'मनांतल्या-मनांत कुढत बसण्याचा ज्यांचा स्वभाव आहे, अशा प्रकारच्या लोकांच्या वर्गांत नेहमी बसण्यासारखा,' असा कांहीसा अर्थ होईल. 'वाटेने काटे' यांतील 'ने' प्रत्यय अधिकरणवाचक आहे, हेंहि म्हणणें धोपटमार्गी ठरेल, असें वाटतें. कारण 'वाटेने काटे आहेत,' किंवा 'रस्त्याने झाडें आहेत,' हीं वाक्यें आणि 'वाटेंत काटे आहेत,' किंवा 'रस्त्यांत झाडें आहेत,' हीं वाक्यें एकरूप आहेत, असें ढोबळ दृष्टीचा मनुष्यच म्हणूं शकेल. खरें म्हणजे तीं वाक्यें परिवृत्तिसह (substitutable) नाहीत. किंबहुना, 'वाटेने काटे आहेत,' किंवा 'रस्त्याने झाडें आहेत,' हीं वाक्यें आणि 'वाटेला काटे आहेत,' किंवा 'रस्त्याला झाडें आहेत,' हीं वाक्यें यांच्याहि आपाततः सदृश दिसणाऱ्या अर्थांत फरक आहे. त्या अर्थांचें वर्णन करण्याचा प्रयत्न करणें शक्य आहे, पण त्याची येथे तादृश आवश्यकता नाही; अर्थभेद जाणवला, म्हणजे पुरे. 'रस्त्याने नीट जावें', 'रस्त्यांत नीट जावें', 'रस्त्याला नीट जावें', 'रस्त्याने जावें', 'रस्त्यांत जावें', 'रस्त्याला जावें', या सर्वच वाक्यांतल्या 'रस्त्याने', 'रस्त्यांत', 'रस्त्याला' या पदांच्या बाबतींत थोडा-थोडा अर्थभेद आहे, असें अनुभवाला येईल. ज्या ठिकाणीं विभक्तिप्रत्ययाच्या ठिकाणीं वर्णभेद नाही, तेथेहि सूक्ष्म फरक जाणवेल. अर्थात् एकाच विभक्तीच्या शिरावर अनेक कार्यें आलेलीं आहेत, हें निर्विवाद आहे. शाळेंत ज्याप्रमाणे वर्गांतला एखादा चुणचुणीत मुलगा अभ्यासांत हुषार असला, म्हणजे त्यालाच वर्गप्रमुखहि करितात, त्यालाच खेळांतहि घेतात, नाटकांतहि काम देतात, वक्तृत्वाच्या स्पर्धांनाहि पाठवितात, त्याप्रमाणे. वस्तुतः, वर्णतः भिन्न असलेल्या प्रत्येक प्रत्ययाला भाषेने जर वेगळा अर्थ काढून दिला असता, आणि जेथे-जेथे अर्थभेद आहे, तेथे-तेथे भाषेने जर भिन्न प्रत्यय नियोजून दिला असता, म्हणजेच विभक्तिप्रत्ययांत जेथे-जेथे वर्णभेद, तेथे-तेथे अर्थभेद, आणि जेथे-जेथे अर्थभेद, तेथे-तेथे वर्णभेद, असें जर भाषेने रोखठोक योजिलें असतें, म्हणजे एका विभक्ति-प्रत्ययाला भाषेने जर एकच कार्य नीटसपणाने सोपवून दिलें असतें, तर हा सारा मामला किती सुतासारखा सरळ झाला असता! — पण भाषेला असा जाबता कोण लावणार ? तिला पालाण कसें घालणार ? जगांतल्या सर्व नद्यांनी वेगवेगळ्या देशांच्या नेमक्या सीमांवरूनच वाहण्याचें ठरविलें असतें, तर कितीतरी राजकीय व अन्य उरस्फोडी, कटकटी मिटल्या असत्या; किंवा, अगोदर तारखा जाहीर करून जर पाऊस आला असता, तर हवामानखात्याची जी प्रतिवर्षी गोड फजिती किंवा फसगंमत आणि नाचक्की होते, ती टळली असती, असेंच म्हणण्यासारखें हें आहे !

या विषयाचा व्यापक दृष्टीने विचार करितां असें दिसतें की, मराठीने आपल्या दीर्घ वाहत्या कालौघांत विभक्तिप्रत्ययांना अनेक नवीन अर्थ मिळवून दिलेले आहेत.

या प्रत्ययार्थांचा कानोसा आपल्याला संस्कृत भाषेंत लागत नाही. प्राकृतांतहि त्यांच्या उद्गमांचा छडा लागेल कीं नाही, तें सांगवत नाही. आणि समजा, लागला, तरी मराठीचा अर्थ तो मराठीचा अर्थ. त्याच्या उद्गमशोधनानें फार तर त्या अर्थाचा कांही खुलासा लाभेल, वा बळकटी येईल, पण तो मिळाला वा न मिळाला, तरी मराठींतल्या खास प्रत्ययार्थांचा वैयाकरणाला विचार करावाच लागेल.

एका प्रत्ययावर अनेक कार्यांचा भार कसा पडतो, तें आपण पाहिलें. फलतः, या कार्यांचा पाठलाग करून, म्हणजे अर्थाचा विचार करून, विभक्तिप्रत्ययांचा भेद ठरविणें, हें काम दुर्घट होऊन बसतें. एकतर अर्थाची चिकित्सा करणें आणि त्याच्या भेदावर हा संसार उभा करणें हें जिकिरीचें आणि जवळजवळ अशक्य काम आहे. अर्थाच्या छटांची नोंद करणें म्हणजे इंद्रधनुष्य उचलण्यासारखें आहे. शिवाय, या छटा व्यक्तीगणीक पालटतात. कालानुसार बदलतात. वर्षावर्षांनी रूपांतरें करितात. देशोदेशीं, प्रांतोप्रांतीं, गावोगावीं वेगळेंच इंद्रजाल पसरितात. खरोखर, अर्थ हा आंब्याच्या कोयींतून पाहतां-पाहतां वृक्ष तयार करून दाखविणारा एक अजब गारुडखाना आहे. त्याच्या मृगजलाच्या पाठीमागे धावण्याने वैयाकरणाला विशेष लाभ नाही. तें काम प्राधान्यानें काव्यशास्त्र-काराचें होय. म्हणून अशा गूढरूपी अर्थाच्या अपेक्षेने शाश्वत, स्थिर अशा ध्वनीकडे वैयाकरणाची धाव असते; आणि तेंच योग्य होय. शिवाय असें की, प्रत्येक कार्यागणीक विभक्ति वेगळ्या मानूं लागलों, तर विभक्तींची संख्या अनिवार वाढेल; आणि कार्यनिश्चय करणें हें आत्ता वर्णिल्याप्रमाणे दुर्घट असल्यामुळे ही संख्या नित्य बदलतीहि राहील. संख्येचें आधिक्य असण्यालाहि मोठीशी हरकत आहे असें नाही, पण ती संख्या अर्थावलंबी, कार्यपरत्वें बदलती राहणें हें मात्र इष्ट नाही. तसेंच, तें लाघवाचें तर खास नाही. ही विचारसरणी एकदा पक्की झाली, म्हणजे कामापुरता अर्थभेद लक्षांत घेऊन एका विभक्तिप्रत्ययाला अनेक कार्यें सोपवून देणें हें ओघानेच निष्पन्न होतें.

४. विभक्तींच्या तपशिलाचा विमर्श

आता विभक्तींच्या तपशिलाचा आपण विचार करूं. रूढ पद्धतीला अनुसरतां मराठीच्या विभक्ति ह्या प्रथमेपासून संबोधनापर्यंत आठ मानिल्या जातात. या विभक्तींना दोन वचनें आहेत : एकवचन आणि अनेकवचन. या वचनांच्या पोटांत विभक्ति दाखल आहेत.[1]

एकवचन आणि अनेकवचन यांचा विचार करितां असें दिसेल की, षष्ठी विभक्ति वगळली, तर केवळ अनेकवचनवाचक भिन्नवर्णी प्रत्यय चारच विभक्तींमध्ये दिसतात.

१. पहा : 'मराठीचें अंतरंगदर्शन' : गोविंद कृष्ण मोडक : पृ. २०७–२०८.

ते प्रथमा, द्वितीया ('ना'), तृतीया ('नी') आणि संबोधन ('नो') यांत दिसतात. इतरत्र एकवचन आणि अनेकवचन यांत विभक्ति समरूप असून अनेकवचनाचा बोध प्रत्ययापूर्वीच्या सामान्यरूपा अंतींच्या अनुस्वाराने होतो. अशी परिस्थिति असल्याने एकवचनाच्या विचाराने अनेकवचनाचा विचार गतार्थ होतो.

षष्ठी

षष्ठीचा विभक्तींमध्ये समावेश करणें हें समर्थनीय नाही, याविषयी आता फारसा विवाद उरलेला नाही. कारण षष्ठीविभक्ति ही उघडच विशेषणात्मक आहे. ज्यूल ब्लोक यांनी आपल्या 'मराठी भाषेचा विकास' या ग्रंथांत चा, ची, चें इत्यादिकांना संबंधदर्शक विशेषणेंच म्हटलेलें आहे. (पहा : पृ. २४६-२४९). येथे वर 'फारसा विवाद उरलेला नाही,' असे जें म्हटलें, त्याचें कारण असें की, षष्ठीचा अंतर्भाव विभक्तींमध्ये करावा, याविषयी बरींच कारणें कांहींनी दाखविलेलीं आहेत. त्यांचें परीक्षण करून निर्णय करणें हें या प्रसंगीं योग्य होईल.

षष्ठीविभक्ति ही विशेषणात्मक असल्याने तिचें स्वरूप अन्य विभक्तींच्या स्वरूपाहून सर्वथा वेगळें आहे. चा, ची, चें[1]; चे, च्या, चीं हे रूढ षष्ठीचे प्रत्यय लिंगवचनविकृति घेणारे आहेत. त्यांना पुढे सामान्यरूपाचीहि आणखी विकृति होते, हें विशेष. शिवाय, या प्रत्ययांपुढे कधीकधी यथासंभव विभक्तिप्रत्यय लागतांना दिसतात. जसे : रामाच्यानें, माझ्याच्याने[2], इत्यादि. षष्ठीचे प्रत्यय लागून अव्ययांपासून विशेषणें बनतात. जसें : तेथचा, वरचा, इत्यादि. रूढ षष्ठीचा हा सर्वच व्यवहार इतर विभक्तींहून[3] विलक्षण आहे. या कारणास्तव षष्ठीविभक्ति ही व्याकरणव्यवस्थेंत विभक्तिप्रकरणांतून गाळावी, आणि तिचा समावेश विशेषणांत पांढर-गणांत करावा,[4] हें युक्त होय. तथापि तिचा अंतर्भाव विभक्तिप्रकरणांतच करावा, याला पुढील कारणें सर्वसाधारणपणें देतात :

(१) 'षष्ठीस कारक नसल्यामुळे कारकद्वारा केलेलें विभक्तीचें लक्षण तिजला लागत नाही; म्हणून ती विभक्ति नव्हे, या मुद्द्यांत अर्थ नाही. या आक्षेपानें फार तर इतकेंच सिद्ध होईल की, कारकद्वारा केलेलें विभक्तीचें लक्षण त्याज्य होय. कारण की, मराठीमध्ये चा-प्रत्ययास षष्ठी विभक्ति म्हणावें कीं नाही, हा जरी वादग्रस्त मुद्दा

१. पहा : पृ. १००, टीप ४.

२. हें रूप तर विशेषच लक्षणीय आहे.

३. हेंहि विधान सापवाद आहे. त्याचा अधिक विचार पुढे करूं.

४. पहा : पृ. १११.

असला, तरी संस्कृतादि अन्य भाषांत षष्ठी ही निःसंशय विभक्ति असल्यामुळे ती विभक्ति नाही, असें सिद्ध करणारें अनुमान चुकीचें होय, हें उघड आहे....कारकद्वारा विभक्तीचें लक्षण चुकीचें होय. म्हणून या आक्षेपांत कांही अर्थ नाही, हें सिद्ध आहे. '[1]

विमर्श : संस्कृत व्याकरणांत कारकसंबंध हें विभक्तीचें गमक मानितात हें खरें, पण मर्यादित अर्थानें. तेंच गमक मराठींतहि मानावयाचें काय, हा प्रश्न अलाहिदा. पण 'कारकद्वारा केलेलें विभक्तीचें लक्षण त्याज्य होय,' असें म्हणून पुन्हा लगेच 'संस्कृतादि अन्य भाषांत षष्ठी ही निःसंशय विभक्ति असल्यामुळे...' असें म्हणणें विसंगत आहे. येथे प्रश्न आहे, तो असा की, पूर्वोक्त विवेचनानुसार षष्ठीविभक्ति आणि अन्य विभक्ति यांच्या स्वरूपांत जो फरक आहे, त्याचा निर्वाह कसा करणार? कोणत्या संबंधाने करणार? आणि सर्व विभक्तींना एका सूत्रांत कसें गोवणार?

(२) डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकरांनी दिलेल्या व्युत्पत्तीचा[2] विचार करितां 'असें दिसतें की, **स्य** या मूळ विभक्तिप्रत्ययापासून **त्य** हा लिंगभेदानें बदलणारा तद्धित विशेषणप्रत्यय आला, **त्य**-चा **च्च** व त्यापासून **चा** झाला. याप्रमाणे '**चा**' हा मूळ विभक्तिप्रत्ययच कां, व तो विशेषणाप्रमाणे लिंगभेदानें कां बदलतो, ह्या दोन्ही गोष्टी मोठ्या समाधानकारकपणें सिद्ध होत आहेत. तेव्हा षष्ठीस विभक्ति न मानण्याला व्युत्पत्तीचें जें कारण पुढें करण्यांत येतें, तें फारसें सबल नाही, हें उघड आहे. '[3]

विमर्श : भाषेच्या वास्तव स्वरूपावरून तिची घडण ठरवून तिचे नियम सांगण्याचा प्रसंग असतांना व्युत्पत्तीचा प्रश्न नुसता गौणच नव्हे, तर भ्रांतिमूलक, भ्रांतिजनक, निरुपयोगी, गैरलागू आणि प्रामादिक आहे. ज्या भाषेचें व्याकरण रचावयाचें, त्याच भाषेंतली स्थिति पाहिली पाहिजे, आणि नियमसंगति साधिली पाहिजे. अशी वास्तव स्थिति दुर्लक्षून भाषेच्या प्राक्कालीन स्थितीचें समर्थन वा कारण या विषयांत पुढे करणें हें युक्तिहीन आहे. नाहीपेक्षा 'घरामध्ये' हें मराठींत सप्तम्यन्त रूप मानण्याचा प्रसंग येईल; कारण 'मध्ये' हें संस्कृतांत सप्तमीचें रूप आहे. पूर्वजन्मीं एखादा माणूस वानरयोनींत होता, म्हणून आजहि तो वानरच मानावयास हवा, असें म्हणण्यासारखें हें आहे!

(३) 'तद्धितप्रत्ययांनी नामाचें सामान्यरूप होत नाही. ... जरी 'घरचा', 'नागपूरचा' इत्यादि कांही ठिकाणीं चा-चे पूर्वी सामान्यरूप झालेलें दिसलें नाही, तरी

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४५.

२. Bombay Royal Asiatic Society's Journal : Vol. XXI : No. 58, P. 39.

३. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४६-३४७.

हीं उदाहरणें अपवादक असून असे अपवाद 'नागपूरला,' 'इंदूरहून' इत्यादि स्थळीं अन्य प्रत्ययासंबंधानेहि आढळतात. म्हणून विभक्तिप्रत्ययांप्रमाणे **चा** ह्याच्यापूर्वी नामाचें सामान्यरूप होतें, असें म्हणण्यास हरकत नाही. परंतु तद्धितप्रत्ययांपूर्वी नामाचें सामान्यरूप कधीच होत नाही.'[1]

विमर्श : येथे सामान्यरूपाचें अस्तित्व अथवा त्याचा अभाव हें विभक्तीचें गमक म्हणून अभिप्रेत दिसतें. परंतु तेंच सापवादहि आहे. सामान्यरूप झालें, अथवा न झालें, तरी त्यायोगें विभक्तिस्वरूपांत फरक कसा पडतो, तें कळत नाही. विभक्तिप्रत्ययापूर्वी होणाऱ्या अथवा न होणाऱ्या सामान्यरूपाची व्यवस्था वा परिगणन करणें शक्य आहे. ती व्यवस्था वा तें परिगणन करणें हा खरोखर योग्य मार्ग होय. तो न अवलंबितां षष्ठीचें इतर विभक्तींहूनचें वैलक्षण्य कसें जाणार? आणि तें जोवर शिल्लक आहे, तोवर अवांतर परिस्थितीचा विचार गौण होय, हें उघड आहे.

(४) 'आता **चा** हा चरमप्रत्यय नाही, आणि त्याजवरून अन्य विभक्तिप्रत्यय होतात, हें खरें. तथापि अशी गोष्ट सप्तमीच्या प्रत्ययासंबंधानेहि आढळते. प्रांतींचा, दक्षिणेंतला, ... या उदाहरणांत सप्तमीच्या ई व ँ त (ंत) यांस जर विभक्तिप्रत्यय म्हणण्यास हरकत नाही, तर **चा** ह्यास विभक्तिप्रत्यय म्हणण्यास काय हरकत आहे? शिवाय, ही गोष्टहि विसरतां कामा नये की, मूळ संस्कृतांतहि अहम्, मम इत्यादि विभक्त्यन्त रूपांस प्रत्यय लागून अहंकार, ममत्व इत्यादि शब्द साधतात. यावरून, विभक्तिप्रत्यय हे चरमप्रत्यय होत, हा नियम मूळ संस्कृतांतहि निरपवाद नाही, हें उघड आहे.'[1]

विमर्श : विभक्तिप्रत्ययांच्या चरमत्वाची कल्पना ही त्यांच्या स्थानांच्या अवलोकनावरून प्राधान्यव्यपदेशाने काढिलेली आहे. त्याला षष्ठीचा अपवाद आहे. तथापि सप्तमीच्या तुलनेने जर षष्ठीला विभक्तिपद द्यावयाचें असलें, तर प्रथमतः हें लक्षांत घेतलें पाहिजे की, सप्तमीचे प्रत्यय हे कांही षष्ठीप्रमाणे विशेषणकारक प्रत्यय नाहीत. शिवाय, असें की, सप्तमीचेहि प्रत्यय हे विभक्तिप्रत्यय नाहीत, असें म्हणणें शक्य आणि सयुक्तिक आहे. 'शेषप्रत्यय' नांवाचें प्रत्ययांचें एक वेगळें वर्गीकरण करून त्यांत सप्तमीच्या प्रत्ययांना दाखल करितां येईल. ह्या 'शेषप्रत्ययां'त कांही विशेषणकारक प्रत्यय असतील, कांही साधितें बनविणारे प्रत्यय असतील, कांही धातूंपासून साधितें बनविणारे आणि आणखी इतरहि प्रत्यय असतील. तात्पर्य, विभक्तींचे प्रत्यय आणि क्रियापदांना लागणारे प्रत्यय हे वगळतां जे प्रत्यय उरतील, त्यांना 'शेषप्रत्यय' म्हणावें, असें सुचवावयाचें आहे. सप्तमीच्या प्रत्ययांची सामग्र्याने चिकित्सा आपण पुढें करूंच, आणि त्या वेळीं

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४७.

या प्रत्ययांची रूढ पद्धतीपेक्षा अधिक सुसंगतपणें कशी व्यवस्था करितां येईल, त्याचाहि विचार आणि निर्णय करूं.

(५) 'येथचा तेथचा,... या विशेषणांतील **चा**-प्रत्यय आणि षष्ठीचा **चा**-प्रत्यय हे सर्वस्वीं एकच होत, असें समजण्याचें कारण नाही. ... येथला, तेथला यांतील ... ला-प्रत्ययास कोणी विभक्तिप्रत्यय म्हणत नाहीत.'[1]

विमर्श : यायोगें षष्ठीचें विभक्तित्व तर सिद्ध होत नाहीच, उलट चा-आदि-प्रत्यय तद्धितप्रत्यय आहेत, असें मात्र सिद्ध होतें. तुलनेसाठी 'ला' (द्वितीया-विभक्ति-प्रत्यय) आणि 'ला', 'ईल' (इत्यादि तद्धितप्रत्यय) यांचीं उदाहरणें येथे देतां येतील. रूढ सप्तमी विभक्ति आणि रूढ पंचमी विभक्ति यांचे प्रत्यय हे शेषप्रत्यय आहेत, असें म्हणणें शक्य आहे,—नव्हे, युक्त आहे. 'मागाहूनचा', 'आकाशांतूनदेखील', 'विभक्तिप्रत्ययाहूनसुद्धा' इत्यादि रूपें पाहिलीं, म्हणजे याविषयी कांही नवीन व्यवस्था करणें इष्ट आहे, हें पटेल.

(६) 'तसेंच, कोणत्याहि तद्धितप्रत्ययाने वचनाचा बोध होत नाही, परंतु 'घराचा' हें एकवचन आणि 'घरांचा' हें अनेकवचन; असा चा-प्रत्यय दोन्ही वचनीं लागून चा-प्रत्ययान्त शब्दापासून वचनाचा बोध होतो, हें निर्विवाद आहे.'[1]

विमर्श : ही अडचण लक्षांत घेण्यासारखी आहे, हें मान्य केलें पाहिजे. चा-आदि-प्रत्यय हे साधे विशेषणकारक प्रत्यय मानिल्यास ही अडचण येईल. म्हणून भाषा ही अनेक प्रकारांनी आपल्या अर्थाची अभिव्यक्ति साधीत असते, हें पूर्वोक्त विवेचन[2] ध्यानीं बाळगून चा-आदि विशेषणकारक प्रत्ययांचा स्वतंत्र असा शेषप्रत्ययान्तर्गतगण करावा, आणि त्या गणांत या वैशिष्ट्याची नोंद करावी. परंतु विभक्तींचें जें साधारण स्वरूप आपल्या प्रत्ययाला येतें, तें एवढ्या कारणास्तव संकुल करण्याचें कारण नाही; आणि त्याने लाभहि नाही.

येथे कोणी असें विचारील की, याने विशेष असें काय साधलें ? षष्ठीच्या ठिकाणीं विशेषणकार्य मानणें काय, किंवा चा-आदि विशेषणकारक साधित प्रत्ययांचा स्वतंत्र **गट** करणें काय, दोन्ही एकच. मग रूढ व्यवस्थेला अनुसरून षष्ठी ही विभक्तिसमूहांतच राहिली, तर काय हरकत आहे ? आणि त्यांत पुन्हा या दोन व्यवस्थांचें बलाबल कसें जोखणार ? लाघवगौरव कसें तपासणार ?

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४७.

२. पहा : पृ. ११७–११८.

या विषयांत असें सांगतां येईल की, षष्ठीचा अपवाद वगळतां[1] मराठीनें विभक्तींच्या स्वरूपाच्या ठिकाणीं कांही एकविधता संभाळलेली आहे. ही एकविधता षष्ठीच्या स्वरूपामुळे जर विचलणार असेल, तर तें टाळून दुसरी व्यवस्था शोधूं जाणें इष्ट होय. तसेंच, अशी व्यवस्था सापडल्यानें एकंदर विभक्तिव्यवस्था अव्याकुलपणें टिकणार असेल, तर ती व्यवस्था स्वीकार्य मानावी. मराठींत साधितांचा आणि विशेषणात्मक साधितांचा समूह फार मोठा असून त्या समूहांत अनेक लहान-लहान गट आपापल्या ठिकाणीं नीटपणानें बसलेले आहेत. षष्ठीच्या सुचविलेल्या नवीन गटाचें स्थान याच विशेषणात्मक साधितांच्या समूहामध्ये अन्य साधितगटांसमवेत राहील. मात्र षष्ठीच्या या नवीन साधितांच्या गटाचीं वैशिष्ट्यें तेथे समग्रतया नोंदविलीं जातील. यायोगें त्याचें असलेलें स्वरूप लुप्त होणार नाही; आणि तिकडे विभक्तींचीहि एकविधता अव्याकुलपणें राखिली जाईल. एखाद्या गटानें व्याकरणाच्या व्यवस्थेंत अमूकच ठिकाणीं बसलें पाहिजे, असा आग्रह बाळगण्याचें खरोखर कारण नाही. सोयवारपणानें, अर्थातच लाघव संभाळून, पंक्तींत पानावर बसतां आलें, म्हणजे झालें.

(७) 'षष्ठी विभक्तीच्या अभावीं 'केळफूल', 'देवघर' इत्यादि जे षष्ठीतत्पुरुष समास ह्यांना काय म्हणावयाचें ? कर्मधारय जर मानाल, तर त्यांचा विग्रह कसा करावयाचा ? 'केळीचें फूल', 'देवाचें घर' असा विग्रह करून त्यांस ... कर्मधारय म्हटल्यानें वास्तविक अडचण दुप्पट वाढते. समासामध्ये 'केळ', 'देव' हीं संक्षिप्त रूपें किंवा मूळ नामेंच कां रहावीं ? नामावरून साधलेल्या कोणत्याहि विशेषणाचा समासांत असा संक्षेप होऊन फक्त मूळ नामच त्या विशेषणाच्या जागीं आलेलें अन्यत्र दिसत नाही. शिवाय उलटपक्षीं, चा-प्रत्ययान्त नाम विशेषण झाल्यानें त्या प्रत्ययानें संबद्ध नामांचा नेहमीच कर्मधारय समास होऊन असल्या कर्मधारय समासांची गर्दीच होऊन जाईल. बरें, ह्या केवळ मराठी अडचणी बाजूस ठेविल्या, तरी जे निवळ संस्कृत षष्ठीतत्पुरुष समास मराठींत येतात, त्यांचा योग्य विग्रह मराठींत केवळ अशक्य होऊन जाईल.'[2]

विमर्श : हा मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. त्याच्या पेचाची सोडवणूक करण्यासाठी असें सुचवितां येईल की, अशा प्रकारच्या कर्मधारय समासांचा एक वेगळा गण करावा. 'नामाला चा-आदि-प्रत्यय लागून त्याचें विशेषण झाल्यावर असें विशेषण पूर्वपदीं असतांना त्याच्या कर्मधारय समासांत मूळचें नाम पूर्वपदीं येतें,' अशासारखा कांही नियम करून निर्वाह होण्यासारखा आहे. संस्कृतांतहि समासांमध्ये अनियमित, सापवाद स्वरूपाच्या समासांचे समूह थोडेथोडके नाहीत. मराठी

१. आणि पंचमी-सप्तमीचेहि अपवाद वगळतां. तथापि त्यांचा समग्र विचार पुढे करू.

२. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४७ – ३४८.

भाषेने आपल्या कालौघांत जे अनेक नवीन अर्थ मिळविले आणि वळणें संपादिलीं, त्यांतीलच हें एक होय. मराठींतहि समासप्रकरणीं सर्वच समास कांही एका दावणीला बांधितां येत नाहीत, हे आपल्याला माहीत आहेच.

कोणाला असें वाटण्याचा संभव आहे की, षष्ठीच्या विवाद्य रूपांच्या साधकबाधक प्रमाणांची गणना केल्यास, आणि षष्ठीला साधक असलेल्या प्रमाणांची संख्या अधिक भरल्यास निर्णय कसा करणार ? आणि अशा प्रश्नांच्या स्वरूपासंबंधीचा दृष्टिकोण कोणता स्वीकारणार ? पहिली गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही की, षष्ठीचीं जीं वेगवेगळीं समर्थनपर कारणें आत्तापर्यंत नोंदविलेलीं आहेत, त्यांतलीं अनेक आनुषंगिक आहेत. मुख्य असें की, षष्ठीचे प्रत्यय विशेषणात्मक आहेत, आणि अशा प्रकारची विशेषणात्मकता इतर विभक्तिप्रत्ययांच्या बाबतींत नाही. तेव्हा विभक्तिप्रत्ययांचें सर्वसाधारण स्वरूप अव्याकुल आणि रेखीव ठेविण्यासाठी षष्ठीचे प्रत्यय हे शेषप्रत्ययांच्या समूहांत घालावे,[1] आणि त्यांच्या वैशिष्ट्यांची तेथे नोंद करावी. बरें, या शेषप्रत्ययांच्या समूहांत अशा प्रकारचे विशेषणकारक इतर प्रत्यय अनेक आहेत. तेव्हा जे समानधर्मे नाहीत, अशा विभक्तिप्रत्ययांतून रूढ षष्ठीचे प्रत्यय काढून जे जातभाई आहेत, अशा शेषप्रत्ययांच्या समूहांत त्यांना घातलें, तर तें सयुक्तिक आहे. असें करितांना साधकबाधक प्रमाणांच्या निवळ संख्यागणनेपेक्षा आपण मूलगामी एकविधता संभाळीत आहों, इकडे ध्यान दिलें पाहिजे. त्यायोगें कार्यहानि नाही, पण एकविधता मात्र आहे. अशा प्रकारच्या प्रश्नाच्या वेळीं मूलगामी काय आणि शाखागामी कोणतें, त्याचा तारतम्याने विचार करणें हें योग्य होईल, हें उघड आहे. पुढे पंचमी, सप्तमी याहि विभक्तींच्या बाबतींत हेंच धोरणाचें सूत्र संभाळण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वनामांचा विचार करितांनाहि याच सूत्रानुसार निर्णय केला आहे.

(८) '...हाताचें', 'घराचें', 'मुलाचा' हीं जर विशेषणें होत, तर त्यांजपासून भाववाचक नाम कोणतें व कसें साधतें ? कारण की, सर्व विशेषणांपासून मराठींत व इतर भाषांतहि भाववाचक नामें साधतात.'[2]

विमर्श : दिलेल्या उदाहरणांपासून आणि अशा चान्त विशेषणांपासून भाववाचक नामें होत नाहीत, हें खरें. पण त्यांचा पूर्वोक्त पद्धतीने स्वतंत्र वेगळा गट करून हें त्याचें वैशिष्ट्य नोंदवितां येण्यासारखें आहे. तात्पर्य, या साधितांच्या गटांत ज्यांचीं कांही खास वैशिष्ट्यें आहेत, अशा प्रत्ययांची — अर्थात् चा-आदि-प्रत्ययांची — समग्र नोंद होईल. त्यायोगें नवीन लाघवयुक्त व्यवस्था साधेल.

१. पहा : पृ. १२१.

२. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४८.

(९) 'चतुर्थीच्या विभक्तिप्रत्ययांचा लोप होऊन त्या विभक्तीबद्दल ज्याप्रमाणे सामान्यरूप योजितात, त्याचप्रमाणे चा-प्रत्ययाचा लोप होऊन नुसतें सामान्यरूप चा-प्रत्ययान्त नामाच्या जागीं येतें. "पलंगी बसवूनियां राणी, माते हातीं आणवी पाणी" या ठिकाणीं 'माते' म्हणजे 'मातेच्या' हें उघड आहे. असा प्रत्ययरहित विशेषणाचा उपयोग मराठींत कोठेच आढळत नाही.'[1]

विमर्श : एक तर असा बहुल प्रयोग पद्यांत आढळतो, बोलण्यांतल्या मराठींत आढळत नाही; आणि आपण विचार करीत आहों, तो दैनंदिन व्यवहारांतल्या मराठीचा. दुसरें असें की, दैनंदिन व्यवहारांतल्या मराठींत जे अशा प्रकारचे प्रयोग आढळतात, ते फारच थोडे असून शिलीभूत झालेले आणि जुन्या मराठीचे अवशेषात्मक प्रकारचे आहेत. जसें : देवा घरीं, चाकरा हातीं, विदुरा घरच्या, गरिबा घरची, सामान्यरूपा अंतीं, रूपा अन्वयें, इत्यादि. तेव्हा अशा प्रयोगांची वेगळी नोंद करावी, हें उजू आहे. खरें म्हणजे 'देवा', 'चाकरा',... हीं जुनीं केवल षष्ठ्यन्त पदें होत. तींच पुढे सामान्यरूपांत उत्क्रान्त झालीं; आणि त्यांपासून चान्त विशेषणें बनलीं. जसें : देवा-चें घर, इत्यादि. चतुर्थीच्या तुलनेने षष्ठीचा विचार करणें बरोबर नाही. शिवाय, चतुर्थीला जें विभक्तींमध्ये स्थान आहे,[2] तें कांही अशा प्रकारच्या तिच्या प्रयोगांवरून तिला मिळालेलें नाही.

(१०) ''पांढऱ्या घराचें दार' या ठिकाणीं 'घराचें' हें जर दाराचें विशेषण तर 'पांढऱ्या' हें 'घराचें' ह्या विशेषणाचें विशेषण म्हणजे क्रियाविशेषण होईल. ...या ठिकाणीं एक अडचण उत्पन्न होते. विशेषणापुढे जेव्हा सविभक्तिक किंवा सशब्दयोगिक शब्द येतो, तेव्हा त्या विशेषणाचें सामान्यरूप होतें. परंतु विशेषणापुढे विशेषण आल्याने सामान्यरूप होत असलेलें कोठेच ऐकिवांत नाही. म्हणून ज्या अर्थी पुढील सविभक्तिक किंवा सशब्दयोगिक शब्दानेच मागल्या विशेषणाचें सामान्यरूप होतें, आणि 'घराचें दार' या ठिकाणीं 'पांढऱ्या' हें सामान्यरूप ज्या अर्थी 'घराचें' या शब्दाच्या योगाने झालें आहे, आणि ज्या अर्थी 'घराचें' यास सशब्दयोगिक शब्द असें म्हणण्यास अद्याप कोणी तयार नाही, त्या अर्थी 'घराचें' हा सविभक्तिक शब्द नव्हे काय?'[1]

विमर्श : येथे षष्ठीसमर्थकांची कांहीतरी गफलत झालेली आहे, असें वाटतें. 'विशेषणापुढे ('-पुढे' म्हणजे तरी काय?) विशेषण आल्याने सामान्यरूप होत

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ० ३४८.

२. हेंहि विवाद्य आहे. कारण कांही वैयाकरण चतुर्थी विभक्ति मानीत नाहीत. या पक्षीं 'द्वितीया' असा बदल करावा लागेल, एवढेंच. तथापि तो भाग वेगळा, म्हणून येथे सोडून देऊं.

असल्याचें कोठेच ऐकिवांत नाहीं,' हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाही. 'फिक्या हिरव्या रंगाची साडी' या वाक्यांशांत 'फिक्या' हें सामान्यरूप 'हिरव्या' या विशेषणाशीं संबद्ध आहे, आणि हिरव्या हें सामान्यरूप 'रंगाची' या विशेषणाशीं संबद्ध आहे. 'रंगाची' हें 'साडी' याचें विशेषण. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें नित्याच्या व्यवहारांत उपलब्ध आहेत. तेव्हा वरील आक्षेपामधील अवलोकनांत कांही संभ्रम झालेला आहे, हें उघड आहे. त्यामुळे तो यथार्थ नाही.

(११) 'सर्व विशेषणांचा नामांप्रमाणे उपयोग होतो....परंतु .चा-प्रत्ययान्त नामाचा ('विशेषणाचा' असें म्हणावयाचें असावें,) असा नामाप्रमाणे उपयोग होतोसें वाटत नाही.'[1]

विमर्श : खरें म्हणजे चा-आदि-प्रत्ययान्त विशेषणांचा असाहि उपयोग होतो. जसें : 'घरच्यांना लाथा; दारच्यांचे लाड', 'घरचीचं तें मिठवणी, आणि बाहेरचीचं तें मिष्ठाऽपाणी' (संशयकल्लोळ) अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें मराठींत आहेत. तेव्हा षष्ठीसमर्थकांचें भाषेविषयीचें अवलोकन येथेहि यथावत् नाही. किंबहुना, षष्ठी विभक्ति ही विशेषणवर्गांत बसण्याला त्यायोगें अधिकच पात्र होते.

(१२) '"सोन्याचे (=सोन्यापासून) दागिने करितात," या ठिकाणीं 'सोन्याचे' हें दागिने ह्या शब्दाचें विशेषण होय, असें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें केवळ कसेंसेंच दिसतें.'[2]

विमर्श : चा-आदि-प्रत्ययांचा 'पासून' हाहि अर्थ पूर्वी सुचविल्याप्रमाणे स्वतंत्र शेषप्रत्ययगणांत नोंदवावा.

(१३) '...'रात्रीचा चालतो' इत्यादि ठिकाणीं...रात्रीचा हीं चा-प्रत्ययान्त विशेषणें होत, असें जर समजलें, तर त्यांस विधिविशेषणें समजून या अधिकरणार्थी विधि-विशेषणांचा अधिविशेषणांप्रमाणे कधीच उपयोग होत नाही, म्हणजे कांही चा-प्रत्ययान्त विशेषणांचा नेहमी विधिविशेषणांप्रमाणे किंवा क्रियाविशेषणांप्रमाणे उपयोग होतो, असें म्हणणें भाग आहे.'[3]

विमर्श : मराठींत सव्यय क्रियाविशेषणाचें अस्तित्व मान्य केलें पाहिजे.[4] ती चांगली गाते, ती चांगलें गाते; तो रात्रीचा जागतो, ती रात्रीची जागते, इत्यादि

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४८.

२. पूर्ववत् : पृ. ३४८-३४९.

३. पूर्ववत् : पृ. ३४९.

४. पहा : 'मराठी : घटना, रचना, परंपरा' : मंगरूळकर-अर्जुनवाडकर : पृ. ८६.

कितीतरी ठिकाणीं ‘ चांगली ’, ‘ चांगलें ’, ‘ रात्रीचा ’, ‘ रात्रीची ’ हीं रूपतः विशेषणें होत, यांत शंका नाही. वाक्यांत त्यांचा प्रयोग अधिविशेषण अथवा विधिविशेषण म्हणून करणें प्रयोजनापेक्ष आहे. ...

(१४) ‘ “ त्याच्या बोलण्याचा मला फार राग आला,” या वाक्यांत ‘ बोलण्याचा ’ हें राग या नामाचें विशेषणच होय, असें म्हणण्यास मराठी षष्ठी विभक्तीचे हाडवैरी तरी धजावतील कीं नाही, ह्याची शंकाच आहे. ’[१]

विमर्श : खरोखर ‘ बोलण्याचा ’ हें ‘ राग ’ याचें विशेषण नव्हे, तर काय आहे ? फार तर येथल्या चा-प्रत्ययाचा अर्थ स्वतंत्रपणें नोंदवावा, म्हणजे झालें.

(१५) ‘ “ ह्या घोड्याचा लगाम तुटला आहे, ” या वाक्यांत ‘ घोड्याचा ’ हें जर ‘ लगामा’चें विशेषण असेल, तर ‘ ह्या’-शब्दाचें व्याकरण कसें करणार ? ‘ ह्या ’ हें ‘ घोड्या’चें विशेषण होय, असें निमूटपणें बेधडक म्हटलें, म्हणजे होत नाही. कारण की, हें व्याकरण ‘ घोड्याचें(चा ?) ’ हा शब्द विभक्त्यन्त मानिला, तरच शक्य आहे. एक तर ‘ ह्या ’ या सामान्यरूपावरूनच ‘ घोड्याचा ’ हा सविभक्तिक किंवा सशब्दयोगिक शब्द ठरतो; आणि **चा** ह्यास अद्याप कोणी केवळ शब्दयोगी अव्यय म्हणत नसल्यामुळे तो वर सांगितल्याप्रमाणे सविभक्तिक शब्दच ठरतो. आणि दुसरें, कोणतेंहि सार्वनामिक विशेषण विशेषणाचें विशेषण होऊं शकत नाही. ’[१]

विमर्श : विशेषणाचें विशेषण होणारें पद क्रियाविशेषण या वर्गांतलें असतें, ही गृहीत समजूत बरोबर नाही. कारण ती वस्तुस्थितीला सोडून आहे. ‘ फिकें निळें फूल ’ या वाक्यांशांत ‘ फिकें ’ हें ‘ निळें ’ या विशेषणाचें विशेषण आहें, पण तें उघडच क्रियाविशेषण नाही. ‘ ह्या हिरव्या किंवा त्या हिरव्या रंगाचें पातळ ’ यांत सार्वनामिक विशेषणें हीं अधिविशेषणाचीं विशेषणें झालेलीं दिसतात. तसेंच, ‘ ह्या घोड्याचा लगाम ’ यांत ‘ ह्या ’ हें ‘ घोड्याचा ’ या विशेषणाचें विशेषण होय.

(१६) ‘ “ दोन घोड्यांची गाडी ” या ठिकाणीं ... ‘ दोन ’ हें ‘ घोड्यांची ’ या शब्दाचें विशेषण होय. परंतु ‘ घोड्यांची ’ हें जर विशेषण, आणि ‘ दोन ’ हें ‘ घोड्यांची ’ ह्या विशेषणाचें विशेषण, तर त्यास क्रियाविशेषण म्हटलें पाहिजे. पण ‘ दोन ’ हा शब्द क्रियाविशेषणाप्रमाणे मराठींत कधीच उपयोगांत येत नाही. ... ’[१]

विमर्श : क्रियाविशेषणाविषयीची येथे सांगितलेली कल्पना भ्रान्त दिसते. ‘ दोन ’ हें ‘ घोड्यांची ’ या विशेषणाचें विशेषण होय.

१. ‘ शास्त्रीय व्याकरण ’ : मोरो केशव दामले : पृ. ३४९.

(१७) 'शिवाय 'एका घोड्याची गाडी' या ठिकाणीं तर 'एका' ... ह्यास षष्ठी विभक्तीच्या प्रतिपक्ष्यांनी 'घोड्याची' ह्याचेंच विशेषण मानिलें पाहिजे. परंतु ... संख्यावाचक विशेषण ... नामांच्या पाठीमागे येतें. ... पण विशेषणाची संख्या दाखविणें हा शब्दप्रयोग केवळ अर्थहीन होय. ... '[1]

विमर्श : रूपतः, 'एका' हें 'घोड्याची' ह्याचेंच विशेषण आहे. 'घोड्याची' हें पद वगळिलें, तर 'एका' रूप राहणार नाही; तें 'एक' होईल. शिवाय, यांत असें म्हणतां येईल की, संख्यावाचक विशेषण हें नामाशीं अन्वित असतें, तेव्हा तें सबंध रूपाला विशेषित न करितां त्यांतल्या केवळ प्रकृतीलाच विशेषित करीत असतें. जसें : चार घोड्यांनी ओढिलेला रथ' यांत 'चार' हें विशेषण 'घोडे' याला विशेषित करितें. तसेंच, 'चार घोड्यांची गाडी' यांत 'चार' हें 'घोडे' या प्रकृतीला विशेषित करितें. संख्याविशेषणें हीं नामाशीं अर्थतः अन्वित झाल्यावाचून तीं प्रयोगार्हच नाहीत, हें म्हणणें वृथा आहे. 'सशाचें शिंग', 'वांझेचा मुलगा' हे प्रयोग व्यवहारांत अनन्वित असोत भले, पण व्याकरणांत ते स्वीकार्यच आहेत.[2] अर्थाचा संबंध व्याकरणाच्या रचनेंत गौण असून रूपाच्या अन्वयेंच व्याकरणरचना चिकित्सावी, हें युक्त होय.

(१८) 'ज्या रूपाला षष्ठी म्हणतात, ... त्या रूपामध्ये जर विभक्तीचे वास्तविक धर्म आहेत, तर विशेषणाचे धर्मही त्यामध्ये आणखी असले, म्हणून काय झालें? ... तृतीयादि विभक्ति अर्थतः क्रियापदाचीं विशेषणेंच आहेत, तरी त्यांचें विभक्तितत्व काढून टाकावें, असें कोणी म्हणत नाही, ... असें असतां, षष्ठीविभक्ति हें नामपदाचें विशेषण आहे, हें कारण दाखवून त्याचें मात्र विभक्तितत्व काढून घेण्याचा यत्न करणें हें कांही प्रशस्त नव्हे...'[3]

विमर्श : षष्ठीविभक्तीच्या वैलक्षण्ययुक्त स्वरूपानें इतर विभक्तींची एकविधता डहुळूं नये, यासाठी जर प्रयत्न करावयाचा असेल, तर षष्ठीच्या ठिकाणीं **विभक्तीचें म्हणून** आणखी विशेषणकार्य मानणें खचीत युक्तियुक्त नाही. चा-आदि-प्रत्ययांच्या ठिकाणीं विशेषणकार्य आहेच; तेव्हा तें विशेषणकार्य ज्या प्रत्ययांना आहे, ते प्रत्यय सदृश विशेषणादि कार्यें असलेल्या साधितांच्या गटांत बसविणें हें उजू आहे. म्हणून चा-आदि-प्रत्ययांचा गण साधितांच्या गटांत दाखल करावा. 'तृतीयादि विभक्ति'

१. 'शास्त्रीय व्याकरण' : मोरो केशव दामले : पृ. ३४९.

२. पहा : पहिलें व्याख्यान : पृ. १८–१९.

३. 'कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख' : प्रथम भाग (१९४२) : व्याकरण-विचार : निबंध ५ : पृ. ३००.

अर्थतः क्रियापदाचीं विशेषणेंच आहेत,' हें म्हणणें तर प्रामादिक आहे. कारण मग त्याचा अर्थ क्रियापदें हीं त्यांचीं विशेष्यें आहेत, असा करावयाचा काय? म्हणजे काय विशेष्यांनुसार (= क्रियापदांनुसार) तृतीयान्तादि पदांचे धर्म पालटतात? आणि अनेक क्रियाविशेषणांचीं रूपें क्रियापदें पालटलीं असतांहि मुळीच पालटत नाही, त्यांचें काय? जसें:

तो	हळू	चालतो.
म्हैस	हळू	चालते.
बायका	हळू	चालतात.
पारडूं	हळू	उभें राहतें.
गाणारे	हळू	गातात.

इत्यादि.

येथे हळू हें 'क्रियापदाचें विशेषण' आहे. तरी विशेष्य जें क्रियापद त्याच्या अनुसाराने तें कांही बदललेलें नाही; अविकृतच राहिलें आहे. षष्ठीसमर्थकांच्या वरील विवेचनांत 'अर्थतः' असें जें पद आहे, ती त्यांतली बोटचेपी जागा आहे. त्यामुळेच खरोखर तृतीयादि विभक्ति आणि षष्ठी यांची अशी तुलना करण्याचा संभ्रम वा मोह समर्थकाला झालेला दिसतो. आधी घोडा आणि बैल हे एका दावणीला बांधावयाचे, त्यांना एकच वैरण टाकावयाची, आणि मग घोडा हा बैलाच्या दावणींत दिसत असल्यामुळे आणि त्याचीच वैरण खात असल्यामुळे त्याला बैल म्हणावयाचें, असा हा प्रकार आहे!

एकाच विषयाचा निर्देश करून षष्ठीचें हें महत्त्वाचें, पण लांबलेलें विवेचन आणि आजचें व्याख्यान आपण संपवूं या. षष्ठीचे प्रत्यय येथे चा, ची, चें (एकवचनी), आणि चे, च्या, चीं (अनेकवचनी) असे दिलेले आहेत. यांत वस्तुतः

	एकवचन	अनेकवचन
च +	आ (पुं.)	च + ए (पुं.)
	ई (स्त्री.)	च + या (स्त्री.)
	एं (अं)[1] (नपुं.)	च + ई (नपुं.)

अशी फोड करावयास पाहिजे. म्हणजे येथे मूळ प्रत्यय 'च' असा आहे, आणि 'आ', 'ई', 'एं (अं)' इत्यादि हे त्याला लागणारे लिंगकारक प्रत्यय आहेत. यापूर्वी आपण पांढर-गणांतल्या विशेषणांच्याहि बाबतींत अशीच व्यवस्था केली होती.[1]

१. पहा : पृ. १००, टीप ४.

येथे ' च ' हा षष्ठीचा अलिंग प्रत्यय सुचविल्याबरोबर त्याची विभक्तींतल्या अन्य अलिंग प्रत्ययांशीं तुलना करण्याचा मोह होईल. पण हा प्रत्यय विकारसह आहे, हें विसरून चालणार नाही. अर्थात् त्याच्या समवेत विशेष्यानुसार ' आ ', ' ई ', ' एं (अं) ' इत्यादि हे लिंगकारक प्रत्यय अथवा सामान्यरूपाचा ' या ' हा प्रत्यय हे यथासंभव आल्यावाचून त्याचा प्रयोगच होऊं शकणार नाही. हें ध्यानीं ठेविलें, म्हणजे षष्ठी-विभक्तीच्या या च-प्रत्ययाचें इतर विभक्तींहून असलेलें वैलक्षण्य पुन्हा प्रस्थापित होईल.

मित्र हो,

विभक्तिविमर्शाचा एक मोठा टप्पा आपण संपविला. पुढील शेवटच्या व्याख्यानांत विभक्तिविमर्शाचा अवशिष्ट भाग आणि धातु यांचा आपण विचार करूं.

सहायें

व्याख्यान

विभक्ति, धातु : विमर्श

स हा वें व्या ख्या न

वि भ क्ति, धा तु : वि म र्श

१. वि भ क्ति वि म र्श

संबोधनविचार. संबोधनाचा विभक्तीमध्ये समावेश : चिकित्सा व निष्कर्ष. संबोधनाविषयी दोन पर्याय. पंचमीचा विचार : 'हून' आणि 'पेक्षा' हीं अनुयोगी अव्ययें. 'ऊन' याचा अत्यल्प प्रयोग. 'ऊन'-प्रत्ययाचें वैलक्षण्य. पंचमीविभक्तीची नवीन व्यवस्था. सप्तमीचा विचार : 'ईं' आणि 'आं' या प्रत्ययांचें वैलक्षण्य. त-प्रत्ययाचें वैलक्षण्य. सप्तमीविभक्तीची नवीन व्यवस्था. द्वितीया आणि चतुर्थी यांचा विचार. कोणती गाळावी ? – द्वितीया कीं चतुर्थी ? उत्तर – चतुर्थी. प्रथमाविभक्तीचे प्रत्यय. मराठींतल्या शब्दांचें प्रकृतिगत स्वरूप. विभक्तिविचाराची समाप्ति आणि निष्कर्ष. मराठींतील विभक्तींची नवीन व्यवस्था. चार विभक्तींनी मराठीचा संसार. नवीन विभक्तिव्यवस्थेचे आठ विशेष.

२. धा तु वि म र्श

कर्ता आणि क्रियापद हा भाषेचा आंस. पुरुष-संज्ञेचें विवेचन. धातूंच्या त्रिविध जाति. क्रियापदांवरून जाति कीं जातींवरून क्रियापदें ? 'जातिभेदेन धातुभेदः'. अकर्मक-सकर्मक धातूंचें वर्णन. द्विकर्मक धातु. वंध्य, जनक आणि धातुज धातु. जनक आणि धातुज धातूंचे प्रयोग. प्रयोजकाची नवीन व्यवस्था. काल-अर्थ. संयुक्त क्रियापद. शब्दविभाग, पदविभाग : दोन कोष्ठकें. समारोप.

१. वि भ क्ति वि म र्श

मित्र हो,

मागील व्याख्यानांत आपण प्राधान्याने मराठींतल्या विभक्तिप्रकरणाचा प्रथम सामान्यत्वाने आणि नंतर षष्ठीविभक्तीच्या संदर्भांत विशेषत्वाने विचार केला. इतर विभक्तींचें जें स्वरूप दिसतें, त्याशीं वैलक्षण्य पावणाऱ्या षष्ठीविभक्तीचा समग्र विचार केला, आणि षष्ठीविभक्तीचा नवीन बिन्हाडबादला आपण थाटून दिला. त्यायोगें विभक्तिविषयांतली संकुलता कमी व्हावी, आणि त्याचें स्वरूप अधिक निकोप व्हावें, याकडे आपण आवर्जून लक्ष ठेविलें होतें. हेंच धोरण ठेवून आता विभक्तिप्रकरणांतल्या अवशिष्ट भागाचा आपण विचार करूं.

सं बो ध न

कांही वैयाकरणांचा कल षष्ठीविभक्तीचें रूढ स्थान यथास्थित ठेवण्याकडे कसा आहे, हें आपण पाहिलें. उलटपक्षीं, संबोधन ही विभक्ति गाळण्याकडे वैयाकरणांचा सर्वसाधारण कल आढळून येतो. तो समर्थनीय आहे काय ? मराठींत एकवचनांत आणि अनेकवचनांत संबोधनाचे स्वतंत्र प्रत्यय आहेत. ते एकवचनांत ' ० ', ' आ ', ' या ', इत्यादि, आणि अनेकवचनांत ' नो ', असे आहेत. या संबोधनप्रत्ययांना इतर विभक्ति-प्रत्ययांचीं प्रायः सर्व लक्षणें उपपन्न होतात. ते चरमप्रत्यय आहेत.[१] म्हणजे त्यांच्यापुढे आणखी प्रत्यय लागत नाहीत.[१] असें असतांहि त्यांचा समावेश विभक्तिप्रत्ययांत कां करूं नये, तें समजत नाही. संस्कृत व्याकरणांत संबोधनाचा अंतर्भाव प्रथमेंत केलेला आहे, हें मराठीच्या व्याकरणांत संबोधनविभक्ति गाळण्याचें समर्थन होऊं शकत नाही. तेव्हा संबोधनाचें स्वतंत्रतया परीक्षण केलें पाहिजे, आणि मग त्याचें स्थान ठरविलें पाहिजे.

वरवर असें वाटतें की, संबोधनान्त पदाचा वाक्यांतल्या दुसऱ्या कोणत्याहि पदाशीं संबंध नसतो. ही परिस्थिति त्याचा विभक्तिप्रकरणामध्ये समावेश करण्याच्या

१. ' चरमप्रत्यय ' म्हणजे नामादिकांना सर्व यथासंभव विकृति झाल्यानंतर लागणारे प्रत्यय. या प्रत्ययांनंतर पुन्हा सविभक्तिक पदाला प्रत्यय लागत नाहीत. याचा अर्थ असा की, अशीं सविभक्तिक पदें एका दृष्टीने अव्ययें होतात. कारण त्यांना त्यापुढे कोणत्याच भाषिक विकृतीची अपेक्षा राहात नाही. तसें पाहिलें, तर हें वर्णन वाक्यगत अशा कोणत्याहि पदाला लागू पडेल.

बाबतींत मुळावर येते. अन्य सविभक्तिक पदें हीं वाक्यांतल्या कोणत्या तरी नामा-सर्वनामाशीं संबंध राखतात. पण संबोधनाचें तसें नाही. यासाठी पुढील कांही उदाहरणें पहा :

(१) देवा रे देवा ! तुलाच डोळे !

(२) नारायणराव, किती मनापासून गातां तुम्ही !

(३) सुधा, तुला पहायला मंडळी आली आहेत.

(४) मुलांनो, तुम्हीं आज अभ्यास केला नाही हं !

(५) ब्राम्हणांनो, तुम्हांला दक्षिणा मिळाली का ?

(६) मिलिंदा, तुझ्याहून वामन उंच आहे.

(७) माधव, तुझें पुस्तक येथे आहे.

(८) मुलांनो, तुमच्यांत आणि माकडांत काय फरक ? शेपटीचा ?

वाक्य (१) यांत ‘ देवा ’ हीं द्विरुक्त पदें केवलप्रयोगी अव्ययवत् आहेत. तो भावोद्गार आहे. अर्थात् तेथे संबोधन स्वतंत्र आहे. वाक्य (२) यांत ‘ नारायणराव ’ या संबोधनाचा ‘ तुम्ही ’ या प्रथमान्त पदाशीं संबंध आहे. वाक्य (३) यांत ‘ सुधा ’ या संबोधनान्त पदाचा ‘ तुला ’ या द्वितीयान्त पदाशीं संबंध आहे.[1] वाक्य (४) यांत संबोधनपदाचा ‘ तुम्हीं ’ या तृतीयान्त पदाशी संबंध आहे. वाक्य (५) यांत संबोधनाचा ‘ तुम्हांला ’ या चतुर्थ्यन्त पदाशीं संबंध आहे.[2] वाक्य (६) यांतील संबोधनाचा ‘ तुझ्याहून ’ या पंचम्यन्त पदाशीं अन्वय आहे.[3] वाक्य (७) यांतील संबोधनाचा षष्ठयन्त पदाशीं अन्वय आहे; आणि वाक्य (८) यांत सप्तम्यन्त पदाशीं.

यावरून असें दिसतें की, संबोधनाचा वाक्यगत घटकपदाशीं अन्वय होतांना तें पद कोणत्याहि विभक्तींत येऊं शकतें. संबोधन ही विभक्ति अशा प्रकारें निर्लिप्त आहे. परंतु संबोधनाच्या प्रत्ययांना कोणत्याहि विकृति यानंतर होत नाहीत. नुसतें रूढ शुद्ध

१. जे द्वितीयाविभक्ति मानीत नाहीत, त्यांच्या बाबतींत ‘ चतुर्थ्यन्त पदाशीं ’ असें म्हटलें पाहिजे.

२. जे चतुर्थीविभक्ति मानीत नाहीत, त्यांच्या बाबतींत ‘ द्वितीयान्त पदाशीं ’ असें म्हटलें पाहिजे. पहा : पृ. १४०–१४१.

३. कांही वैयाकरण पंचमीविभक्ति मानीत नाहीत. त्यांच्या मतें ‘ -हून ’ हें शब्दयोगी अव्यय आहे. पहा : ‘ मराठीचें अंतरंगदर्शन ’ : गोविंद कृष्ण मोडक : पृ. १९३.

शब्दयोगी अव्ययहि लागत नाही. परंतु निरनिराळ्या गटांतल्या नामांना संबोधनाचे निरनिराळे प्रत्यय लागतात. कांही वैयाकरण हे प्रत्यय देत नाहीत. इतकेंच नव्हे, तर एकवचनांत ' प्रत्यय नाही, ' असें आवर्जून सांगतात.[१]

अशा स्थितींत संबोधनाविषयी ठाम निर्णय करणें सोपें नाही. संबोधनाला प्रत्यय नाहीत, हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाही. या विषयांत दोन पर्याय सांगतां येतील :

(१) कोणत्याहि सविभक्तिक पदाशीं संबोधनाचा अन्वय होत असल्याने, अथवा तें केवलप्रयोगी अव्ययवत् दिसत असल्यानें, त्याचा विभक्तींत समावेश करूं नये; कारण कोणत्याहि सविभक्तिक पदाशीं अन्वय होणें हें विभक्तीचें स्वरूप नाही.

किंवा

(२) संबोधनाला स्वतंत्र प्रत्यय आहेत. त्यांना पुढे विकृति होत नाही. कसाहि असो, त्यांचा वाक्यगत घटकाशीं अन्वय होतो. त्याचे प्रत्यय नामांना लागतात. या कारणांस्तव त्याचा विभक्तींमध्ये अंतर्भाव करावा.

माझा स्वतःचा कल दुसरा पर्याय स्वीकारण्याकडे आहे. कारण विभक्तीवाचून अन्यत्र संबोधनाचा समावेश सदृश अशा कोणत्या गटांत, कोठे आणि कसा करणार ?

पंचमी आणि सप्तमी

आता पंचमी आणि सप्तमी विभक्ति. पंचमीविभक्तीचे प्रत्यय ' ऊन ', ' हून ', ' पेक्षा ' असे देतात. प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे की, मराठीच्या विभक्तींमध्ये द्व्यक्षरी प्रत्यय फक्त पंचमीच्याच बाबतींत दिसतात. त्यामुळे तिच्या विभक्तित्वाविषयी प्रथम संशय उत्पन्न होतो. ' पेक्षा ' हें ' अपेक्षा ' याचें झडून राहिलेलें अथवा विच्छिन्न रूप आहे. किंबहुना, हिंदीमध्ये ' अपेक्षा ' शब्द आजहि तुलनावाचक अर्थानें योजितात. मराठींतील ' अपेक्षा ' हें जुन्या मराठींतलें एकवचनी स्त्रीलिंगी तृतीयेचें रूप आहे. त्यांतला आद्य ' अ ' अल्पश्रुत होतां-होतां अश्रुत होऊन गेला. अर्थात् तें विभक्तिप्रतिरूपक अव्यय बनलें; आणि नामा-सर्वनामाशीं त्याचा योग होऊन तें पूर्वी सामान्यरूपहि घेऊं लागलें. अशा रितीनें ' पेक्षा ' याचें स्वरूप ' प्रमाणे ' (मुळांत तृतीयान्त पद), ' मुळे ' (मुळांत तृतीयान्त पद) इत्यादिकांप्रमाणे आहे. ' नाहीपेक्षा ' येथे तें ' नाही ' या क्रियापदाशीं अन्वित झालेलें आहे. म्हणून तें शब्दयोगी अव्यय मानणें हें युक्त होय. शिवाय, त्याला वैयाकरण सहसा विभक्तिस्थान देत नाहीत.

१. पहा : ' रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचे संकलित लेख ' : प्रथम खंड : निबंध ५ : पृ. २९४; तसेंच, ' शास्त्रीय व्याकरण ' : मोरो केशव दामले : पृ. ३५३.

'हून' हा पंचमीचा प्रत्यय सगळ्या नामां-सर्वनामांना लागतो. पण तोहि द्व्यक्षरी आहे, हें एक. दुसरें, 'नहून' येथे हून-प्रत्यय 'न' या नकारार्थी अव्ययाला लागतो. आणि तिसरें असें की, विभक्तिप्रत्ययांच्या बाबतींत जें लक्षण कधी दिसत नाही, असें एक लक्षण त्याच्या बाबतींत दिसतें. तें असें : विभक्तिप्रत्यय हा तत्पूर्वीच्या लगतच्या सामान्यरूपाला नेहमी केवळ घट्ट चिकटून असतो. सामान्यरूप आणि प्रत्यय यांमध्ये कधी विश्लेष वा विभाग संभवत नाही. अर्थात् त्या दोहोंमध्ये एखादें अव्यय कधीहि येऊं शकत नाही. परंतु 'माझ्याहिहून', 'त्याहिहून', 'त्याच्याहिहून', 'रामाहिहून' इत्यादि प्रयोग आढळून येतात. म्हणजेच नामा-सर्वनामाचें सामान्यरूप आणि पंचमीचा 'हून' हा प्रत्यय यांमध्ये अव्ययाचें व्यवधान संभवतें. हें लक्षण उघडच (रूढ) शब्दयोगी अव्ययाचें[1] आहे. असेंच व्यवधान 'पेक्षा' याहि रूढ पंचमीप्रत्ययाबाबत संभवतें. जसें : माझ्याहिपेक्षा, रामाहिपेक्षा, हिमालयाहिपेक्षा. म्हणून 'हून' आणि 'पेक्षा' हे पंचमीचे प्रत्यय न मानितां तीं अनुयोगी अव्ययें[1] मानावीं.

'ऊन' या पंचमीप्रत्ययाची स्थिति आणखी वेगळी आहे. 'ऊन' हा प्रत्यय केवळ एकवचनांतच येतो. तोहि फक्त 'हात', 'घर', 'दार', 'माहेर', 'तोंड' अशा अत्यल्पसंख्य नामांना लागतो. सर्वनामांना तर तो लागतच नाही. तेव्हा इतक्या थोड्या नामांना लागणाऱ्या— आणि केवळ नामांनाच लागणाऱ्या अशा दोन-अक्षरी एकवचनी, संशयास्पद, वैलक्षण्ययुक्त प्रत्ययासाठी स्वतंत्र विभक्ति मानणें म्हणजे पूर्वी एकदा म्हटल्याप्रमाणे नाल सापडला, म्हणून घोडा घेण्यासारखें आहे! या कारणांस्तव 'ऊन' हा विभक्तिप्रत्यय आहे, असें मानण्याचें कारण नाही.

ऊन-प्रत्ययाविषयी आणखीहि कांही विचार लक्षणीय वाटतो. तो असा : हा ऊन-प्रत्यय अत्यल्पसंख्य नामांना लागतो हें सांगितलेंच, पण तो अव्ययांनाहि लागतो. हा त्याचा व्यवहार विशेषच वैलक्षण्ययुक्त आहे. जसें :

मध + ऊन = मधून
वर + ऊन = वरून
पूढ + ऊन = पुढून
खाल + ऊन = खालून
इकड + ऊन = इकडून

१. 'शब्दयोगी अव्यय' ही संज्ञा विशेष इष्ट नाही. त्याला 'शब्दयोगी' म्हणण्यापेक्षा 'अनुयोगी अव्यय' म्हणणें अधिक चांगलें. हीं अव्ययें क्रियापदांनाहि लागतात. 'अनुयोगी अव्यय' ही संज्ञा रेखीव आहे.

आंत + ऊन = आंतून

माग + ऊन = मागून

पास + ऊन = पासून

समोर + ऊन = समोरून इत्यादि.[१]

यांतलीं कांही अव्ययें स्वतंत्रतया वापरलींहि जात नाहीत. जसें : मध, पास. पण ऊन-प्रत्यय अशा प्रकारें अनेक अव्ययांना लागतो. 'ऊन' याला विभक्तिप्रत्यय म्हणूं लागलों, तर दर्शविल्याप्रमाणे अव्ययांना विभक्तिप्रत्यय लागणें हें विलक्षण आहे. याचा अर्थ असा की, हीं पदें रूढितः अव्ययें म्हणतों, तशीं नाहीत. ते सव्ययवर्गांतले शब्द आहेत.[२] त्यांना आपण नामें तर म्हणूं शकत नाहीं; सर्वनामेंहि नाहीं. तेव्हा ऊन-प्रत्यय हाहि त्यामुळे विभक्तिप्रत्यय ठरत नाही. कारण त्याचा प्रयोग नामांपेक्षा अशा (रूढ) अव्ययांच्याच ठिकाणीं फारकरून होतो. 'बाहेरून' (अव्यय + 'ऊन') आणि 'घरून' (नाम + 'ऊन') या दोन्ही ठिकाणीं ऊन-प्रत्ययाचा अर्थ समान आहे. अशा स्थितींत त्याचा प्रायिक प्रयोग लक्षांत घेऊन ऊन-प्रत्यय हा अव्ययकारक साधितप्रत्यय मानणें हेंच युक्तियुक्त आहे. फलतः, पंचमीविभक्ति ही विभक्तिसमूहामधून गळते.

सप्तमीविभक्तीचाहि विचार अशाच प्रकारें स्वतंत्रपणें केला पाहिजे. सप्तमीचे प्रत्यय 'त', 'ई', 'आं' असे देतात. यांतला आं-प्रत्यय तर बोटांवर मोजण्याइतक्याच नामांना लागतो. जसें : माथां, गळां, पायां. आणि तोहि शैलीदार ढंगाचा एक नमुना म्हणून. ऊन-प्रत्यय जसा सर्वनामांना लागत नाही, तसाच आं-प्रत्ययहि सर्वनामांना लागत नाही. 'ई' हाहि प्रत्यय केवळ नामांनाच लागतो. त्यांतहि केवळ अ-कारान्तच नामांना तो लागतो; आणि त्यांतहि सर्व अ-कारान्त नामांना लागत नाही. किंबहुना, थोड्याच अ-कारान्त नामांना तो लागतो.[३] शिवाय, 'ई' यापुढे 'चा',... इत्यादि शेषप्रत्यय[४] लागतात. जसें : दिवशींचा, मनींचा, रात्रींचा. अशा प्रकारें सप्तमीच्या 'ई' आणि 'आं' या प्रत्ययांच्या ठिकाणीं इतर विभक्तिप्रत्ययांपेक्षा वैलक्षण्य आहे. त्यामुळे हें वैलक्षण्य

१. पहा : चौथें व्याख्यान : पृ. ९१.

२. अर्थात् हें वर्गांतर आहे. चौथ्या व्याख्यानांतील शब्दांच्या वर्गीकरणाचें विवेचन पहा.

३. जसें : हातीं, घरीं, दारीं, देवळीं, बिऱ्हाडीं, गांवीं, माहेरीं, सासरीं, तोंडीं, दिवशीं, रात्रीं, इत्यादि. पण वाघीं, सिंहीं, लोकीं, बैलीं, चंद्रीं, गायीं, माणसीं, मुलीं, इत्यादि ई-कारान्त रूपें होणार नाहीत. त्यांना 'त' हाच प्रत्यय लागेल.

४. पहा : पृ. १२१.

ध्यानीं घेऊन आणि जमेस धरून सप्तमीच्या ' ई ' आणि ' आं ' या प्रत्ययांची नोंद वेगळ्या प्रकारें शेषप्रत्ययांत करणें हें युक्त आहे.

सप्तमीच्या ' त ' या प्रत्ययाची गोष्ट याहून आणखी वेगळी आहे. त्याच्याहि ठिकाणीं वैलक्षण्य आहेच. तो चरमप्रत्यय नाही. कारण त्याला ' ऊन ', ' ला ' इत्यादि शेषप्रत्यय लागतात;[1] आणि त्यांपासून विशेषणें तयार होतात. अशा स्थितींत त-प्रत्यय हाहि शेषप्रत्ययांत घालणें योग्य आहे. एवंच, ' त ' आणि ' ई ' हे प्रत्यय शेषप्रत्ययांत समाविष्ट करावे; आणि ' आं ' हा अत्यल्पप्रयुक्त प्रत्यय स्वतंत्रपणें नोंदवावा.

द्वितीया आणि चतुर्थी

द्वितीया आणि चतुर्थी यांच्या रूढीने दिलेल्या प्रत्ययांत[2] अर्थभेदहि नाही, आणि वर्णभेदहि नाही. अर्थात् या दोन विभक्तींपैकी कोणती तरी एक ठेवावी, हें ओघाने निष्पन्न होतें. पण मग कोणती ठेवावयाची आणि कोणती गाळावयाची ? कांही वैयाकरणांच्या मतें द्वितीया ठेवावी; तर अनेकांच्या मतें चतुर्थी ठेवावी. ' संस्कृतांतून मराठी भाषा निघाली, ती सामान्यतः प्राकृताच्या द्वारें. प्राकृतांत षष्ठीने चतुर्थीला खाऊन टाकिलें आहे. अर्थात् त्या षष्ठीच्या पोटांतून (व्याघ्रस्य) ' वाघास ' यासारखीं मराठींत आलेलीं रूपें व्युत्पत्तितः चतुर्थीचीं ठरतील, तरीपण त्यांचा सांप्रत मराठींतील उपयोग पाहून तदनुसारच त्यांस संज्ञा दिली पाहिजे. रूपांच्या व्युत्पत्तीकडे न पाहतां, त्यांच्या मराठींतील कार्यालाच महत्त्व दिलें पाहिजे. ' किं जन्मना ? ' ही उक्ति प्रसिद्धच आहे. ' शिकारी वाघ सोडितो,' किंवा ' वाघास सोडितो,' इत्यादि ठिकाणीं ' वाघास ' हें रूप जर प्रथमेच्या ' वाघ ' या रूपाशीं अर्थदृष्ट्या समान आहे, तर तें जवळच्या द्वितीयेचेंच, दूरच्या चतुर्थीचें नव्हे, मानणें योग्य होईल. शिवाय कर्त्याच्या खालोखाल कर्माचें महत्त्व असल्याने त्यांच्या विभक्तिहि क्रमाने जवळजवळ असाव्या, हें ओघानेच येतें. ' वाघास ' हें प्रस्तुत वाक्यांत कर्मच आहे. संस्कृतांतील विभक्तींचा क्रम त्यांच्या अर्थाच्या महत्त्वास अनुसरून लाविला आहे, हें सहज अनुमेय आहे. करितां लोपली मानावयाचीच तर ती चतुर्थी, द्वितीया नव्हे. कर्म हा अर्थ व्यक्त करण्याचा मान द्वितीयेचाच आहे. सारांश, व्युत्पत्तीने परवान् बनून, पदोपदीं तिचा परवाना मागत बसूं नये.'[3] हा मोडकांचा युक्तिवाद लक्षांत घेऊन द्वितीया ठेवावी, आणि चतुर्थी गाळावी. अप्रत्ययी द्वितीया नांवाचा जो प्रकार आहे, (जसें : ' बाळ पुस्तक वाचतो,' यांत ' पुस्तक ',)

१. अर्थात् आपल्या नवीन व्यवस्थेनुसार.

२. ला, स, (तें) (एकवचन); ला, स, ना, (तें) (अनेकवचन).

३. ' मराठीचें अंतरंगदर्शन ' : गोविंद कृष्ण मोडक : पृ. २०५-२०६.

तो मानण्याचें कारण नाही. अशा स्थळीं कर्मत्वाचें कार्य प्रथमा करील. म्हणजेच 'पुस्तक' ही प्रथमा मानावी, आणि ती ज्याप्रमाणे कर्ता, त्याप्रमाणेच कर्महि दर्शविते, असें समजावें.

तृतीया

एकवचनांत तृतीयेचे प्रत्यय 'ने [1]', 'शीं' आणि 'एं' असे आहेत. अनेकवचनांत 'नी' असा प्रत्यय आहे, 'नी' हा प्रत्यय केवळ स्वतंत्रतया, म्हणजे आपल्या पूर्वीच्या सामान्यरूपा अन्तींच्या अनुस्वारावाचूनच अनेकवचन दर्शवितो. (असेंच द्वितीयेचा ना-प्रत्यय आणि संबोधनाचा नो-प्रत्यय हे स्वतंत्रतया अनेकवचन दर्शवितात.)

प्रथमा

एकवचनांत प्रथमेला प्रत्यय नाहीत. एकविधतेसाठी तेथे '०' प्रत्यय मानणें युक्त होय. अनेकवचनांतहि प्रथमेला '०'-प्रत्यय मानिला पाहिजे. अनेकवचनांत पुष्कळ नामांना 'आ', 'ई' इत्यादि प्रत्यय लागतात. जसें माळ → माळा, केळ → केळी, नदी → नद्या, लेकरूं → लेकरें, इत्यादि. परंतु हे प्रत्यय एक तर लिंगभेदानुसार त्या-त्या नामांना लागतात; आणि त्यांतहि नामांचे जे वेगवेगळे गट करावे लागतात, त्या गटांना अनुसरून हे भिन्नभिन्न प्रत्यय लागतात. जसें : माळ (स्त्री.) → माळ + आ; पण केळ (स्त्री.) → केळ + ई. येथे विभक्ति प्रत्यय '०' हा आहे; आणि वचनवाचक प्रत्यय नामगणानुसारी आणि लिंगानुलक्षी आहे. अर्थात् विभक्तिप्रत्यय आणि वचनप्रत्यय हे येथे एक रुळावरून चालल्याप्रमाणे दिसतात. अशीच परिस्थिति 'ना' (द्वितीया अनेकवचन), 'नी' (तृतीया अनेकवचन) आणि 'नो' (संबोधन अनेकवचन) यांतहि दिसून येते. उपर्युक्त ना, नी, नो या प्रत्ययांपूर्वीचीं सामान्यरूपें त्या-त्या परिस्थित्यनुसार वेगवेगळीं होतात. बहुतेक वैयाकरण प्रथमेला प्रत्यय देत नाहीत, पण तिचें विभक्तिस्थान ठेवितात. अशा प्रकारचें वैलक्षण्य दाखविण्याने लाभ नाही.

प्रकृतिगत रूप

मराठींतल्या शब्दांचें प्रकृतिगत अर्थात् मूळ स्वरूप काय दाखवावें, असा एक महत्त्वाचा प्रश्न येथे विचारांत घेण्यासारखा आहे. कांही शब्दांच्या बाबतींत तरी त्याची नवीन, वेगळी व्यवस्था करावी, असें सुचवावयाचें आहे. ज्या शब्दांमध्ये

१. वस्तुतः, हा 'ने' बोलण्यांत ए-कारान्त नसून अनुक्रुष्ट-अ-कारान्त आहे. म्हणून तो 'नं' असाच द्यावयाला पाहिजे.

समानवर्णी अवस्थेंत लिंगभेद दिसतो, अशा शब्दांच्या बाबतींत ही व्यवस्था लागू करावी. जसें :

एकवचन	अनेकवचन
घोड + आ	घोड + ए
घोड + ई	घोड + या
घोड + एं (= अं)	घोड + ई
कुत्र + आ	कुत्र + ए
कुत्र + ई	कुत्र + या
कुत्र + एं (= अं)	कुत्र + ई
कोंबड + आ	कोंबड + ए
कोंबड + ई	कोंबड + या
कोंबड + एं (= अं)	कोंबड + ई
—	—
झोपड + ई	झोपड + या
झोपड + एं (= अं)	झोपड + ई
—	—
खोपट + ई	खोपट + या
खोपट + एं (= अं)	खोपट + ई

यावरून असें दिसेल की, 'घोड', 'कुत्र', 'कोंबड',...या प्रकृति असून त्यांचे एकवचनांत 'आ', 'ई', 'एं (= अं)' हे आणि अनेकवचनांत 'ए', 'या', 'ई' हे लिंगकारक प्रत्यय आहेत. शिवाय, या शब्दांची सामान्यरूपाची विकृति वेगळीच. मात्र 'डोळा' यासारख्या शब्दाच्या बाबतींत असें मानण्याचें कारण नाही. कारण त्यांना अशी लिंगवाचक विकृति होत नाही. म्हणून 'डोळा' हीच त्या ठिकाणीं प्रकृति होय. त्याचें एकवचन डोळा + ० = डोळा, आणि अनेकवचन डोळा + ए = डोळे. नामां-सर्वनामांचीं, तसेंच विशेषणांचीं सामान्यरूपें लक्षांत घेऊन या सर्वांचा बराच तपशील आत्ता सुचविलेल्या पद्धतीने भरतां येण्यासारखा आहे. तथापि तो विषय आपण येथे सोडून

देऊं. तसेंच, विभक्तिप्रत्ययापूर्वी (आणि अनुयोगी अव्ययापूर्वी[1]) जें सामान्यरूप होतें, त्याचेंहि अवलोकन करून त्याच्या वेगवेगळ्या नामां-सर्वनामांच्या आणि 'पांढर'-गणांतल्या विशेषणांच्या बाबतींत कसकशीं रूपें होतात, तें सांगणें कठीण नाही. त्याचा तपशील भरण्याचेंच काय-तें काम आहे.

एक उद्बोधक तुलना

नामांना लागणाऱ्या विभक्तिप्रत्ययांची जर सर्वनामांतल्या मी-गणाला लागणाऱ्या विभक्तिप्रत्ययांशीं तुलना केली, तर मी-गण कसा स्वैरपणें वागतो, तें दिसून येईल. उदाहरणासाठी आपण येथे फक्त 'मी', 'आम्ही' यांचीं रूढ विभक्त्यनुसारी रूपें पाहूं :

	मी	आम्ही
	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	मी	आम्ही
द्वितीया	मला	आम्हांला, आम्हांस
तृतीया	मीं	आम्हीं
चतुर्थी	मला	आम्हांला, आम्हांस
पंचमी	माझ्याहून	आमच्याहून
षष्ठी	माझा-झी-झें माझे-झ्या-झीं	आमचा-ची-चें आमचे-च्या-चीं
सप्तमी	माझ्यांत	आमच्यांत

'मी' या सर्वनामाचीं हीं रूपें आणि मी-गणांतल्या इतर सर्वनामांचीं सदृश रूपें उद्बोधक आहेत. त्यांचें अधिक पृथक्करण हें लाभदायक होण्यासारखें आहे. असें आढळून येईल की, पंचमी, षष्ठी आणि सप्तमी या विभक्तींचे प्रत्यय लागतांना तत्पूर्वी होणारे फरक आणि प्रथमा, द्वितीया, तृतीया आणि चतुर्थी यांच्या प्रत्ययांपूर्वीचे फरक यांचे दोन गट होतात. षष्ठी ही उघडच विशेषणात्मक आहे, आणि पंचमी आणि सप्तमी यांच्या प्रत्ययापूर्वी षष्ठीचें सामान्यरूप होतें. शिवाय, पंचमीला ऊन-प्रत्यय लागत नाही; आणि सप्तमीला केवळ त-प्रत्यय लागतो. यांच्या व्यतिरिक्त द्वितीया-चतुर्थीचे प्रत्यय हे नामांना लागणारे प्रत्यय आहेत; आणि प्रथमा-तृतीयांचे प्रत्यय एकरूप आहेत. मी-गणांतलीं

१. म्हणजे रूढ शब्दयोगी अव्ययापूर्वी.

सर्वनामें नामवर्गांत समाविष्ट करण्याला हरकत नाही, असें जें यापूर्वी म्हटलें,[1] त्यांचें उपोद्बलन प्रस्तुत पृथक्करणावरून होईल. रूढ चतुर्थीपासून सप्तमीपर्यंतच्या विभक्ति या विभक्तिप्रकरणांतून गाळाव्या, असें आतापर्यंत सुचविलें आहे, आणि त्याची इष्टता पुढेहि प्रतिपादिली आहे.[2] या प्रतिपादनाचें समर्थन मी-गणाला लागणाऱ्या प्रत्ययांच्या या वैशिष्ट्यपूर्ण व्यवहारावरून पटेल.

सर्वनामांतल्या त-गणाचीहि गोष्ट अशीच कांहीशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु त-गण हा विशेषणात्मक आहे. त्यामुळे त्याचा समावेश विशेषणांत करावा, हेंहि पटेल.[3] किंबहुना, मी-गण आणि त-गण असे सर्वनामांचे दोन गण करणें कसें इष्ट, योग्य आणि समर्थनीय आहे, हें याने प्रस्थापित होईल.[3] याचें अधिक विवेचन सुबोध असल्याकारणानें हा विषय येथे आवरता घेऊं.

नवीन विभक्तिव्यवस्थेचे विशेष

विभक्तिविचाराचें कार्य येथे प्रायः समाप्त होतें. आपण येथे जो विचार केला, तो द्रुतविलंबित रितीनें केला. अर्थात् तो कांही ठिकाणीं बऱ्याच तपशिलानें आणि कांही ठिकाणीं केवळ दिग्दर्शनाच्या रितीनें केला. आता ज्या सरणीनें हा विचार केला, ती जमेस धरून मराठी भाषेंतले विभक्तिप्रत्यय असे सांगतां येतील :

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	०[4]	०, आ, ई, ए, ...[4]
द्वितीया	०, ला, स	०, ना, ला, स
तृतीया	ने, शीं, एं	नी, शीं
संबोधन	०, आ, या, ई, ए,...	नो

या नवीन व्यवस्थेचे विशेष असे सांगता येतील :

(१) बोलण्यांतल्या भाषेच्या वास्तव स्थितीचा हींत प्रामुख्याने विचार आहे.

(२) संबोधनाचा विभक्तींमध्ये अंतर्भाव केलेला आहे; आणि प्रथमा विभक्तीचे प्रत्यय दिले आहेत.

१. पहा : पृ. ११२–११३.

२. पहा : पृ. १४४–१४५.

३. पहा : पृ. ११३–११४.

४. पहा : पृ. १४१.

(३) चतुर्थी विभक्ति गाळिल्याने विभक्तींच्या क्रमांत उलथापालथ झालेली नाही. फलतः, रूढ नांवें कायम ठेवितां आलीं.

(४) द्वितीयेचा ' तें ' हा प्रत्यय दैनंदिन व्यवहाराच्या भाषेंत उपलब्ध नसल्याने तो वगळिला आहे.

(५) प्रत्यय देतांना बहुप्रयुक्त प्रत्यय अगोदर दिलेले आहेत.

(६) विभक्तींचीं सर्व कार्यें हिशेबांत घेतलेलीं आहेत.

(७) रूढितः परिचित असलेल्या ज्या विभक्ति येथे दिलेल्या नाहीत, (उदाहरणार्थ : चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी) त्यांचीं कार्यें साधितांच्या गटांत आखून दिलीं आहेत.

(८) असें केल्याने विभक्तींचें सर्वसाधारण स्वरूप संकुल न होतां एकविध आणि निकोप राहिलें आहे.

२. धातु विमर्श

मराठी भाषेच्या व्याकरणांत विभक्तिविचार हा एक मध्यवर्ती विषय मानिला जात असल्याने आणि त्याची चर्चा वारंवार होत असल्यामुळे आपण ती चिकित्सा कांहीशा सामग्र्याने केली. या चिकित्सेच्या आधाराने कांही नवीन मांडणी करून निष्कर्षहि काढिले. आता, या व्याख्यानाच्या उरलेल्या भागांत राहिलेल्या सर्व भागांचा ओझरताहि परामर्श घेणें शक्य नसल्याने महत्त्वाच्या कांही विषयांना स्पर्श करून प्रस्तुत व्याख्यान आणि ही व्याख्यानमाला आपण पूर्ण करूं.

उरलेल्या विषयांपैकी मोठा भाग म्हणजे मराठी भाषेंत येणाऱ्या क्रियापदांचा. कोणत्याहि भाषेंत क्रियापदांनी चलनाचा फार मोठा व्यवहार होत असतो. भीति, विस्मय इत्यादि भावनांचे बोधक उद्गार कांही स्थळीं अपवाद म्हणून वगळिले, तर क्रियापदांवाचून भाषेची देवघेव ही कुंठित होईल, निदान बोलणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला अडचणीची खासच होईल. कर्ता आणि क्रियापद हा भाषेचा एक प्रकारें आंस किंवा कणाच आहे, म्हटलें तरी चालेल. ' कर्ता ' आणि ' क्रियापद ' या वाक्यांतल्या कार्यसंज्ञा आहेत. मराठींतले कांही अपवाद सोडिले, तर कर्त्याचा नामाशीं आणि क्रियापदाचा धातूशीं संबंध आहे. म्हणूनच ' नाम ' आणि ' धातु ' या प्रकृति व्याकरणाच्या चर्चेंत अत्यावश्यक, नव्हे, अपरिहार्य आहेत. नामांवर ज्याप्रमाणे विभक्तींचे

वेगवेगळाले संस्कार होतात, त्याप्रमाणे धातूंवरहि भिन्नभिन्न संस्कार होतात, आणि मग धातूंपासून बनलेल्या अशा वस्तूंना क्रियापद अशी संज्ञा होते. अशा प्रकारें नामापासून बनलेलें पद आणि क्रियावाचक पद हीं भाषेचीं चाकें बनतात, आणि तिचा प्रवास चालू होतो. तेव्हा धातु + प्रत्यय = क्रियापद. जसें : गा + तो = गातो, कर + तील = करतील, इत्यादि.

प्रत्येक क्रियेला कर्ता हा असतोच, मग तो उक्त असो, वा आक्षिप्त असो. कर्ता आणि क्रियापद हे वाक्याचे किमान घटक आहेत. या घटकांचा परस्परांशीं जो संबंध असतो, तो वचन, लिंग आणि पुरुष यांच्या द्वारा. नामाला ज्याप्रमाणे वचन, लिंग आणि विभक्ति, त्याप्रमाणे क्रियापदाला वचन, लिंग आणि पुरुष या उपाधि असतात. 'वचन' ही संज्ञा स्पष्टार्थक आहे. 'लिंग' याचें विवेचन यापूर्वी केलें आहे.[1] 'पुरुष' या कल्पनेविषयी अगदी थोडक्यांत विवेचन करणें हें युक्त होईल.

पुरुषविचार

'पुरुष' ही खास व्याकरणांतील संज्ञा आहे. तिचा लौकिक जीवनांतल्या पुरुष या व्यक्तीशीं कांही संबंध नाही. अशा संबंधाच्या बाबतींत लिंग आणि पुरुष यांत अंतर्भूत असलेल्या कल्पना तत्त्वतः साधारणपणें समान पातळीच्या आहेत. 'पुरुष' याचा लौकिक जीवनांतल्या पुरुष व्यक्तीशीं कसा संबंध नाही, हें 'मी येतें,' यासारख्या वाक्यावरुन सहज पटेल. तसा संबंध असता, तर 'मी' हें इष्टलिंग सर्वनाम — येथे उघडच स्त्रीलिंगी — 'पुरुष'-व्यक्तीशीं कसें अन्वित होईल? तेव्हा 'पुरुष' ही व्याकरणांतली संज्ञा आणि कल्पना व्याकरणाच्या सीमेंतच वागविली पाहिजे.

नामाचें लिंग हें ज्याप्रमाणे कांही विशेषणांच्या रूपांमध्ये बिंबित होतें, त्याप्रमाणे पुरुष क्रियापदांच्या रूपांमध्ये व्यक्त होतो, आणि तो लिंगानुसार व्यक्त होतो. 'मी', 'आम्ही', 'तूं', 'तुम्ही' इत्यादि सर्वनामें इष्टलिंगी असतात, याचा निर्देश यापूर्वी केला आहे.[2] अर्थात् त्यांना तिन्ही लिंगें संभवतात. पण हें तत्त्वतः ठीक आहे. मराठींतील प्रायिक प्रयोगांचें अनुसंधान ठेविलें असतां असें दिसून येतें की, त्यांच्या बाबतींत पुंलिंग आणि स्त्रीलिंग हीं दोनच लिंगें फारकरून येतात. तेव्हा प्रथम आणि द्वितीय पुरुषाच्या बाबतींत दोन लिंगें, तर तृतीयपुरुषाच्या बाबतींत तिन्ही लिंगें येतात. याच कारणास्तव तृतीयपुरुषी त-गणाचा समावेश पूर्वी विशेषणांत केला. हें अशा प्रकारें दर्शवितां येईल :

१. पहा : पृ. ९६–९७.

२. पहा : पृ. १०२–१०३.

	एकवचन		अनेकवचन	
तत्त्वतः इष्टलिंगी; प्रायिक पुं. स्त्री.	मी	← प्रथमपुरुष →	आम्ही	तत्त्वतः इष्टलिंगी; प्रायिक पुं. स्त्री.
	तूं	← द्वितीयपुरुष →	तुम्ही	
विशेषण त्रिलिंगी ←	**त-गण**	← तृतीयपुरुष →	**त-गण**	विशेषण त्रिलिंगी.

धातूंच्या जाति

धातूंपासून भाषेंत क्रियापदें सिद्ध होतात. या क्रियापदांचा जो प्रयोग होतो, त्यावरून कांही वैयाकरण धातूंच्या जाति ठरवितात. जसें : 'तो झोपतो,' या वाक्यांतील 'झोपतो' या क्रियापदाला कर्माची अपेक्षा नाही, म्हणून 'झोप' हा धातु अकर्मक आहे. उलट, 'हेमा चित्र पाहते,' या वाक्यांतील 'पाहते' या क्रियापदाला कर्माची अपेक्षा आहे, म्हणून 'पाह' हा धातु सकर्मक आहे. परंतु असा युक्तिवाद तर्कसंगत नाही. वाक्यगत क्रियापदाला कर्माची अपेक्षा आहे अथवा नाही, यावरून धातूंच्या जाति ठरविणें हें बरोबर नाही. कारण असें म्हणणें हें वळचणीचें पाणी आढ्याला गेलें, असें म्हटल्याप्रमाणे होतें. वस्तुतः असें आहे की, धातूंच्या दोनच जाति आहेत : अकर्मक आणि सकर्मक. हे धातूंचे दोन गणच आहेत, असें म्हणण्यास हरकत नाही. 'झोप' हा धातु अकर्मक जातींतला आहे, त्यामुळे त्यापासूनच्या क्रियापदाचा वाक्यांत प्रयोग करितांना त्यांत कर्म येणार नाही. 'पाह' हा धातु सकर्मक जातींतला आहे, त्यामुळे त्यापासूनच्या क्रियापदाचा वाक्यांत प्रयोग करितांना त्यांत कर्म येणार. कांही धातु असे आहेत की, त्यांच्यापासूनच्या क्रियापदांचा वाक्यांत प्रयोग करितांना वाक्यांत प्रयोजनाच्या अपेक्षेनुसार कर्म येईल, किंवा येणार नाही. जसें : 'मोडेन, पण वांकणार नाहीं,' यांत 'मोड' हा धातु अकर्मक आहे, म्हणून या वाक्यांत कर्म नाही. पण येथे 'वाक्यांतल्या 'मोडेन' या क्रियापदाला कर्म नाही, म्हणून 'मोड' हा धातु अकर्मक आहे,' असें म्हणणें बरोबर नाही. 'रामाने धनुष्य मोडलें,' या वाक्यांत 'मोड' हा धातु सकर्मक आहे, म्हणून त्यांत कर्म आहे. पण येथे 'वाक्यांतल्या 'मोडलें' या क्रियापदाला कर्म आहे, म्हणून 'मोड' हा धातु सकर्मक आहे,' असें म्हणणें योग्य नाही. बोलणाऱ्याच्या अपेक्षेला अनुसरून थोडीच भाषेंतल्या धातूंची जाति ठरणार ? धातु हे भाषेंत ठिकच्या-ठिकाणीं आपापले धर्म घेऊन असतात. बोलणारा मनुष्य आपल्या मनोगताच्या अभिव्यक्तीसाठी ते-ते धातु उचलितो, आणि त्यांवर यथापेक्ष संस्कार करितो. नामाला ज्याप्रमाणे त्रिविध लिंग, त्याप्रमाणे धातूला द्विविध जाति.

आत्ताच दोन वाक्यें आपण उदाहरणासाठी घेतलीं :

(१) मोडेन, पण वांकणार नाहीं;

आणि **(२) रामाने धनुष्य मोडलें.**

' या वाक्यांमध्ये ' मोड ' हा एकच धातु असून तो पहिल्या वाक्यांत अकर्मक आणि दुसऱ्या वाक्यांत सकर्मक आहे,' असें आपण म्हटलें, तर तें बरोबर होईल काय, असा प्रश्न विचारण्यासारखा आहे. ' असें म्हणणें हें बरोबर होणार नाही,' हें त्या प्रश्नाचें उत्तर आहे. — कां ? — कारण असें की, एकच धातु दोन जातींत जातो, असें म्हणणें बरोबर नाही. वस्तुतः, ते दोन स्वतंत्र धातु आहेत : एक एका, म्हणजे अकर्मक जातींतला, तर दुसरा दुसऱ्या, म्हणजे सकर्मक जातींतला. नामाचें लिंग ज्याप्रमाणे वक्ता बदलूं शकत नाही, त्याप्रमाणे धातूची जातिहि तो बदलूं शकत नाही. वक्ता करितो, तें असें की, आपल्या मनोगतानुसार तो ' मोड ' (अकर्मक) हा एका जातींतला अथवा ' मोड ' (सकर्मक) हा दुसऱ्या जातींतला धातु निवडितो, आणि त्याचा अपेक्षेनुसार प्रयोग करितो. यापूर्वी आपण नामलिंगाच्या बाबतींत असाच यथायोग्य दृष्टिकोण स्वीकारिला होता,[१] आणि त्या वेळीं असें म्हटलें होतें की, ' लिङ्गभेदेन शब्दभेदः '.[१] त्याशीं सुसंगत असाच दृष्टिकोण येथेहि सयुक्तिक असल्यामुळे स्वीकारिला पाहिजे. जातिभेदेन धातुभेदः .

अकर्मक-सकर्मक धातूंचें वर्णन

या संदर्भांत अकर्मक-सकर्मक धातूंचें थोडें अधिक वर्णन करितां येण्यासारखें आहे. ज्या धातूचा अर्थ[२] एखाद्या वस्तूच्या ठिकाणीं उगम पावतो, आणि त्याच वस्तूला विषय करितो, तो धातु अकर्मक; आणि ज्या धातूचा अर्थ[२] एखाद्या वस्तूच्या ठिकाणीं उगम पावून दुसऱ्या वस्तूला विषय करितो, तो धातु सकर्मक. म्हणजेच असें की, धातूच्या अर्थाचा[२] आश्रय आणि विषय हे अभिन्न असतील, तर तो धातु अकर्मक; आणि धातूच्या अर्थाचा[२] आश्रय आणि विषय हे भिन्न असतील, तर तो धातु सकर्मक. ' तो झोपतो,' या वाक्यांत ' झोप ' या धातूच्या अर्थाचा आश्रय ' तो ' हा, आणि विषयहि ' तो ' हाच. कारण या ठिकाणीं ' तो ' हा केवळ साक्षिभूत अथवा क्षेत्रभूत आहे; तर ' हेमा चित्र पाहते,' या वाक्यांत ' पाह ' या धातूच्या अर्थाचा आश्रय ' हेमा ' आणि विषय ' चित्र ' हें आहे. या विवेचनानें वाक्यगत कर्ता आणि कर्म यांचा उलगडा होईल.[३]

द्विकर्मक धातु

कांही धातूंना दोन कर्में असतात. ' दोन कर्में ' म्हणजे कर्मांची दोन ही संख्या नव्हे, तर दोन वेगवेगळ्या प्रकारचीं कर्में असण्याची कल्पना. अर्थात्

१. पहा : पृ. ९७–९९.

२. अर्थात् स्थिति अथवा कृति.

३. पहा : ' मराठी : घटना, रचना, परंपरा ' : मंगरूळकर-अर्जुनवाडकर : पृ. ६३–६४.

' मीं सतार आणि सनई ऐकिली. '

या वाक्यांत कर्में हीं संख्येने जरी दोन असलीं, (अशीं वाटेल तितकीं कर्में असूं शकतील,) तरी ' ऐक ' हा धातु येथे द्विकर्मक नाही. असें मानिलें नाही, तर धातु हे कर्मांच्या संख्येनुसार द्विकर्मक, त्रिकर्मक...दशकर्मक, इत्यादि मानावे लागतील. असें मानणें हें उघडच अयुक्तिक आहे. पण

' शिक्षक विद्यार्थ्याला प्रश्न विचारितो. '

या वाक्यांत दोन कर्मांची कल्पना ' विचार ' या धातूंत अंतर्भूत असल्याने तो धातु द्विकर्मक होय. या वाक्यांत ' विद्यार्थ्याला ' आणि ' प्रश्न ' हीं दोन कर्मपदें आहेत. आता,

(१) रावण सीतेला भिक्षा मागतो;

आणि **(२) रावण सीतेपाशी भिक्षा मागतो;**

या वाक्यांमधील ' मागतो ' या क्रियापदांतला ' माग ' हा धातु दोन्ही वाक्यांत द्विकर्मक मानावयाचा काय ? म्हणजेच, ' सीतेला ' आणि ' सीतेपाशी ' हीं पदें रूपतः समान मानावयाचीं काय ? म्हणजे ला = पाशी, हें समीकरण स्वीकारावयाचें काय ?

आत्तापर्यंत मराठी भाषेच्या व्याकरणाची चर्चा आपण कांही एका सूत्राला अनुसरून केली. तें सूत्र जर बिनचूक असेल, आणि तें सूत्र जर अविच्छिन्न ठेवावयाचें असेल, तर ' सीतेला = सीतेपाशी ' हें समीकरण स्वीकारितां येणार नाही. अर्थातच पहिल्या वाक्यांतील धातु द्विकर्मक आहे, तर दुसऱ्या वाक्यांतील धातु केवळ सकर्मक (एककर्मक) आहे, असें म्हटलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर पृ. १४७ – १४८-वर केलेल्या चर्चेला आणि तींतून निघणाऱ्या निर्णयाला अनुलक्षून ' माग ' (द्विकर्मक) आणि " माग ' (सकर्मक) असे दोन धातुहि मानिले पाहिजेत. आपण द्वितीया ठेवून चतुर्थी गाळिलेली आहे, त्याचें मर्म आता ध्यानीं येईल. जे वैयाकरण चतुर्थीच्याऐवजी द्वितीया गाळितात, आणि संस्कृताच्या व्याकरणानुसार चतुर्थीचा अर्थ संप्रदान मानितात, त्यांना ' सीतेला ' या पदाला कर्मपद देतांना अडचणी येतील. किंवा, त्यांना पहिल्या वाक्यांतील धातु द्विकर्मक मानितां तरी येणार नाही. आपल्या व्यवस्थेनुसार ' सीतेला ' हें सरळ कर्मपद होतें; तर ' सीतेपाशी ' हें अनुयोगी अव्यय लागून बनलेलें रूप आहे. जसें : सीते (सामान्यरूप) + पाशी (अनुयोगी अव्यय). यांतहि ' पाशी ' हें ' पास + ई ' अशा प्रकारें बनलेलें साधित रूप आहे.

यावरून हें लक्षांत येईल की, मराठींतील अशा प्रकारच्या द्विकर्मक धातूंची व्यवस्था ही येथल्या चर्चेनुसार प्रायः संस्कृतानुसारी होईल. संस्कृतांत

'रावणः सीतां भिक्षां याचते।'

यांत 'याच्'-धातु द्विकर्मक आहे. पण

'रावणः सीतायाः भिक्षां याचते।'

यांत तो केवळ सकर्मक आहे.

जनक आणि धातुज धातु

सिद्ध आणि साधित असे मराठींत धातूंचे दोन प्रकार करितात. दूर ⟶ दुराव, डोकें ⟶ डोकाव, ढग ⟶ ढगाळ, माणूस ⟶ माणसाळ, ओणव ⟶ ओणव, काळ ⟶ काळवंड, कर ⟶ करव, इत्यादि. यांत नाम, विशेषण, धातु यांपासून धातु बनलेले दिसतात. हे साधित धातु साधण्याच्या प्रक्रियाहि वेगवेगळ्या आहेत. अशा प्रकारचे साधित धातु साधण्याची प्रक्रिया आणि साधित धातु यांची सर्वांगीण चर्चा येथे करावयाची नाही; परंतु धातूंपासून साधिलेल्या धातूंच्याविषयी, म्हणजे धातुज धातूंविषयी, कांही विचार करूं.

सिद्ध आणि साधित असे धातूंचे दोन वर्ग करितात. सिद्ध धातूंपासून नवीन धातु बनतात, हें खरें असलें, तरी कांही सिद्ध धातु नवीन धातूंना जन्म देण्याला असमर्थ आहेत. मात्र इतर पुष्कळ धातूंपासून नवीन धातु तयार होतात. उदाहरणार्थ, हो, गा, नीघ, विसर, पाहिजे, आह, नको, असे कितीतरी धातु नवीन धातूंना जन्म देत नाहीत. हे वंध्य धातु होत. पण 'पड'-पासून 'पाड', 'मर'-पासून 'मार' 'झोप'-पासून 'झोपव' अशा प्रकारें मूळ धातूंपासून नवीन धातु तयार होतात. यांत 'पड', 'मर', 'झोप' हे जनक धातु आहेत, आणि 'पाड', 'मार', 'झोपव' हे धातुज धातु आहेत. अर्थात् 'पड', 'मर', 'झोप' इत्यादि मूळ धातु (सिद्ध धातु) कांही विकार घेतात. म्हणजेच ते विकारसह धातु आहेत. जनक धातु आणि धातुज धातु यांच्या जातींचें अधिक अवलोकन करितां असें दिसतें की,

	जनक धातु (विकारसह)		धातुज धातु
	पड (अकर्मक)	⟶	पाड (सकर्मक)
	मर (अकर्मक)	⟶	मार (सकर्मक)
	झोप (अकर्मक)	⟶	झोपव (सकर्मक)
परंतु	कर (सकर्मक)	⟶	करव (सकर्मक)

अर्थात् या आतापर्यंतच्या कांही उदाहरणांवरून असें दिसतें की, धातुज धातु हे सकर्मक

असून ते जनक अशा अकर्मक-सकर्मक धातुजातींपासून निघतात. परंतु या संदर्भात पुढील उदाहरण पहा :

‘बाळाला झोपवतें (= झोपतां येतें, झोपणें शक्य होतें).’

अर्थात् ‘झोपव’ या धातुज धातूचा दोन प्रकारांनी प्रयोग होतो :

(१) आई बाळाला झोपवते. (सकर्मक)
(२) बाळाला झोपवतें. (अकर्मक)

म्हणजे अकर्मक जनक धातूंपासून अकर्मकहि धातु तयार होतात.

जनक धातु		धातुज धातु
अकर्मक धातु	⟶	अकर्मक धातु सकर्मक धातु
सकर्मक धातु	⟶	अकर्मक धातु सकर्मक धातु

जनक आणि धातुज धातूंचे प्रयोग

यावरून असा नियम सांगतां येईल की, ‘हो’-आदि वंध्य धातु सोडिले, तर सर्व जनक धातूंपासून उभयविध जातींचे धातु तयार होतात. या धातुज धातूंमधले कांही धातु द्विकर्मक असतात.

आता, अशा जनक धातूंचे आणि धातुज धातूंचे प्रयोग कसे होतात, तें संक्षेपाने पाहूं.

(१) (अ) बाळ झोपतो. (अकर्मक)
(आ) आई बाळाला झोपवते. (सकर्मक)

(२) (अ) आंबे पडतात. (अकर्मक)
(आ) मुलें आंबे पाडतात. (सकर्मक)

(३) (अ) विद्यार्थी अभ्यास करितात. (सकर्मक)
(आ) गुरुजी विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवितात. (सकर्मक)

(४) (अ) प्रवासी मुक्कामाला पोहोचतो. (सकर्मक)
(आ) वाटाडी प्रवाशाला मुक्कामाला पोहोचवितो. (सकर्मक)

या चार प्रयोगांचें आपण पृथक्करणपूर्वक अधिक अवलोकन केलें, तर आपल्या दृष्टीस असें येईल की,

	(अ)		(आ)
१.	कर्ता	⟶	कर्म
२.	कर्ता	⟶	कर्म
३.	कर्ता	⟶	अनुयोगी अव्ययान्त
४.	कर्ता	⟶	कर्म

वर जे प्रयोग दिलेले आहेत, त्यांमधल्या (अ)-प्रयोगांना प्रकृतार्थक प्रयोग आणि (आ)-प्रयोगांना प्रयोजक प्रयोग म्हणतात. म्हणजे (अ)-प्रयोगांतले कर्तें जी क्रिया करितात, ती क्रिया (आ)-प्रयोगांत मूळच्या कर्त्याकडून दुसराच कर्ता करवून घेतो, असा याचा अभिप्राय आहे. पण हा अभिप्राय वरील चारहि प्रयोगांच्या बाबतींत उपपन्न होतो काय, तें आपण पाहूं.

१ (अ)-मध्ये झोपण्याची क्रिया बाळ करितो, हें सरळ आहे. पण (आ)-मध्ये झोपण्याची क्रिया जरी बाळच करीत असला, तरी ती क्रिया 'आई' त्याच्याकडून करवून घेते, असें म्हणावयाचें आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे काय ? — अशी नाही, असें वाटतें. तशी ती असती, तर 'आई बाळाला झोपावयाला लाविते,' किंवा 'आई बाळाला झोपावयाला भाग पाडते,' असा (आ)-मधल्या 'झोपवते' या क्रियेच्या द्वारा अर्थ निष्पन्न झाला असता. पण तसा तो होत नाही. ह्याची सोडवणूक करण्यासाठी असें सुचवितां येण्यासारखें आहे की, 'झोपव' हा धातुज धातु केवळ सकर्मक मानावा. त्याच्या क्रियेचा कर्ता 'आई' हा, आणि विषय 'बाळ' हा. १ (आ) हें वाक्य प्रयोजक मानण्याने लाभ नाही. प्रयोजकाचा सांगितला जाणारा अर्थ त्यांत उमटत नाही. उलट, तें सकर्मक मानिल्याने या अडचणीचा परिहार होतो.

२ (आ) याहि वाक्यामध्ये १ (आ)-प्रमाणेच स्थिति आहे. 'पाड' हा धातुज धातु केवळ सकर्मक मानावा. त्याच्या क्रियेचा कर्ता 'मुलें' हा, आणि विषय 'आंबे' हा. 'मुलें आंबे पाडतात,' म्हणजे 'मुलें आंब्यांना पडायला लावितात,' अथवा '...पडायला भाग पाडतात,' असा अर्थ नाही. तेव्हा 'पाड' हा सकर्मक धातु मानिल्याने अर्थाची संगति बरोबर साधेल.

३ (आ) यांत मात्र प्रयोजक म्हणतात, तो अर्थ बरोबर आहे. यांत 'अभ्यास करण्याची क्रिया गुरुजी करीत नसून विद्यार्थी करितात, पण ती क्रिया करण्याची प्रेरणा गुरुजी देतात,' असा अर्थ आहे. परंतु अशा वाक्यांत मूळ कर्ता प्रायः अनुयोगी अव्ययान्त असतो, विभक्तिप्रत्ययान्त नसतो, हें लक्षणीय आहे.

४ (आ) यांत मूळ प्रथमान्त कर्ता हा द्वितीयान्त झालेला आहे, अनुयोगी अव्ययान्त झालेला नाही, हें खरें. पण प्रयोजकाचा म्हणतात, तो अर्थ तंतोतंत नाही. 'वाटाडी प्रवाशाला असें साहाय्य करितो की, त्यायोगें प्रवाशाला मुक्कामाला पोहोचण्याचें फळ मिळतें,' असा कांहीसा येथे अर्थ आहे. 'तो प्रवाशाला पोहोचविण्याला भाग पाडतो,' किंवा '...पोहोचावयाला प्रवृत्त करितो,' असा अर्थ नाही. तेव्हा ४ (आ) यांत रचना-दृष्ट्या प्रयोजकाची परिस्थिति वाटते, पण प्रयोजकाचा अर्थ मात्र तंतोतंत नाही. ३ (आ) यांत प्रयोजकाचा अर्थ आहे, पण रचनादृष्ट्या ३ (आ) आणि ४ (आ) यांच्या प्रयोज्य म्हटल्या जाणाऱ्या कर्त्यांमध्ये फरक आहे. त्याची निभावणी कशी करावयाची, हा प्रश्न आहे. २ (आ) यामध्ये प्रयोजकाचा अर्थ नाही. १ (आ) यांतहि तो नाही. तेव्हा या वाक्यांचें प्रयोजकाच्या संदर्भांत कोष्ठकरूप पृथक्करण असें होईल :

	रचना	अर्थ
१ (आ)	—	नाही
२ (आ)	—	नाही
३ (आ)	नाही	आहे
४ (आ)	आहे	नाही

प्रयोजकाची नवीन व्यवस्था

असें असल्यामुळे अर्थ आणि रचना यांची सांगड नीट बसत नाही. अर्थ आणि रचना चपखल बसणें हें सर्वांत इष्ट होय. म्हणून असें सुचवावयाचें आहे की, हीं सर्व वाक्यें स्वतंत्र मानावीं. म्हणजे १ – ४ (आ) यांमधलीं सर्व वाक्यें १ – ४ (अ) यांपासून स्वतंत्र, एकविध, सकर्मक होतील; आणि त्यांचा नेमका अर्थ त्या-त्या धातूंच्या क्रियांच्या द्वारा आपापल्या परी व्यक्त होईल. मराठी भाषेने आपल्या कालौघांत कसे आणि किती नवनवीन अर्थ पैदा केलेले आहेत, तें आपण यापूर्वी विभक्ति-विचारांत पाहिलें. मराठीने केलेल्या या नवीन कमाईच्या अर्थांची योग्य कदर करून त्यांची जर व्याकरणामध्ये संपूर्ण दखल घेतां आली, तर तें सर्वांत इष्ट होय. रूढ प्रयोजक प्रयोग स्वीकारिल्याने ही दखल कशी घेतां येत नाही, तें आत्ताच दाखविलें. ती घ्यावयाची

झाली, तर रचना आणि अर्थ यांमध्ये संध्या जी फट पडते, ती लिंपिली पाहिजे. ती लिंपण्यासाठी असें सुचवावयाचें आहे की, १ – ४ (आ) हे प्रयोग केवळ सकर्मक मानावे. ते प्रयोजक मानून त्यांचा १ – ४ (अ) यांशीं संबंध जोडण्याची आवश्यकता नाही. वस्तुतः, असें सुचविण्यांत नवीनता कांही नाही. सकर्मक आणि अकर्मक असे दोन्ही प्रकारचे प्रयोग मराठींत आहेतच. फक्त प्रयोजक प्रयोग न मानतां सकर्मकाने निर्वाह करावयाचा. प्रयोजक मानण्याने लाभ नाही. कारण प्रयोजक प्रयोग चालू अर्थ कवेंत घेऊं शकत नाही. त्याच्या प्रयोगाच्या रचनेंत स्वैरता असते, हें पाहिलें. जनक धातूंपासून धातुज धातु (यांत तथाकथित प्रयोजक अव-प्रत्ययान्त धातु आले,) कसे स्वैरपणें बनतात, हेंहि पाहिलें. जनक-धातुजांमध्ये असा इतका स्वैरपणा नांदत असेल, तर त्यांतला संबंध मानण्यापेक्षा न मानणें बरें. कारण

(१) कांही धातु सर्वथा वंध्य आहेत;
(२) कांही जनक धातु अकर्मक धातूंना जन्म देतात;
(३) कांही जनक धातु सकर्मक धातूंना जन्म देतात;
(४) धातुज धातूंच्या प्रयोगांत स्वैरता आहे.

एकविधतेचा असा अभाव दिसत असल्यामुळे आणि विद्यमान अकर्मक-सकर्मक प्रयोगांनी सर्व निर्वाह होण्यासारखा असल्याकारणाने प्रयोजक न मानितां

(१) बाळ झोपतो. (अकर्मक)

(२) बाळाला झोपवतें. (अकर्मक)

(३) आई बाळाला झोपवते. (सकर्मक)

(४) आंबे पडतात. (अकर्मक)

(५) मुलें आंबे पाडतात. (सकर्मक)

(६) विद्यार्थी अभ्यास करितात. (सकर्मक)

(७) गुरुजी विद्यार्थ्यांकडून अभ्यास करवितात. (सकर्मक)

(८) प्रवासी मुक्कामाला पोहोचतो. (सकर्मक)

(९) वाटाडी प्रवाशाला मुक्कामाला पोहोचवितो. (सकर्मक)

हे सर्व प्रयोग दर्शविल्याप्रमाणे स्वतंत्रतया अकर्मक अथवा सकर्मक मानावे. त्यायोगें त्यांचे सर्व अर्थ व्यक्त होऊन लाघव साधेल.

काल – अर्थ

वचन, लिंग आणि विभक्ति या जशा नामां-सर्वनामांच्या, त्याप्रमाणे वचन, पुरुष, लिंग आणि कालार्थ या धातूंच्या उपाधि आहेत. या उपाधींमधली पुरुष ही चिरोपाधि आहे. प्रत्येक धातूला वाक्यगत पदाचें पद देतांना जे संस्कार करावयाचे, त्यांत पुरुष-विषयक संस्कार हा असतोच. व्यक्तीच्या, वस्तूच्या अथवा घटनेच्या जीविताला मर्यादित करणारा पदार्थ म्हणजे ' काल '. अर्थात् व्यक्ति, वस्तु अथवा घटना यांचें जीवित म्हणजे अस्तित्व चालू आहे, संपलें आहे, चालू होणें अपेक्षित आहे,—अशा विविध स्वरूपांनी तो आपल्या जीवितमर्यादेचा बोध करून देण्याचें आपलें कार्य करीत असतो. या त्याच्या त्रिविध कार्यावरून त्याचे भूत, वर्तमान आणि भविष्य असे मुख्य तीन प्रकार होतात. ' अर्थ ' म्हणजे धातूंच्या कालाहून वेगळ्या उपाधि. धातूंना उपाधिभूत होणारे अर्थ तीन : आज्ञा, विधि आणि संकेत (किंवा, क्रियातिपत्ति).

' कांही व्याकरणकारांनी कालार्थांना ' आख्यात ' असें साधारण नांव देऊन, त्या-त्या. आख्याताचा एकेक प्रतीकात्मक प्रत्यय घेऊन त्यावरून प्रथम-ताख्यात (= वर्तमान), लाख्यात (= भूत), ई-आख्यात (= रीतिभूत), ईलाख्यात (= भविष्य), ऊ-आख्यात (आज्ञार्थ), वाख्यात (= विध्यर्थ), द्वितीय-ताख्यात (= संकेतार्थ किंवा क्रियातिपत्त्यर्थ) अशीं सात आख्यातें मानिलीं आहेत. ' आख्यात ' ही जुनी संस्कृतांतील क्रियापदार्थक संज्ञा आहे. आणि वर्तमानकाल, भूतकाल इत्यादि संज्ञांच्या अपेक्षेने ताख्यात, लाख्यात इत्यादि संज्ञा निःसंशय चांगल्या आहेत. कारण त्या निर्लेप आहेत. ज्यांना परंपरेनुसार ' वर्तमानकालाचीं रूपें ' असें म्हणण्यांत येतें, त्या रूपांतून विवक्षे-नुसार भविष्यकालाचाहि अभिप्राय व्यक्त होतो; जसें : ' तूं पुढे हो, मी येतोंच '; ' तूं जाऊं लाग, मी आलोंच,' अशा वाक्यांत भूतकालाच्याहि रूपांतून भविष्यकालाचा आशय व्यक्त होतो; अशीं व्याघातात्मक विधानें करण्याचा प्रसंग ' वर्तमानकाल, भूतकाल,...' इत्यादि संज्ञा स्वीकारिल्याने येतो. तो ' ताख्यात, लाख्यात,...' इत्यादि संज्ञांच्या बाबतींत उद्भवत नाही. '[1]

संयुक्त क्रियापद

मराठीच्या व्याकरणांत संयुक्त क्रियापदांचा प्रश्न हा एक वादग्रस्त प्रश्न होऊन राहिला आहे. आता हेंच पहिलें वाक्य पहा. या वाक्यांत ' प्रश्न ' हें उद्देश्य आहे. पण

१. ' मराठी : घटना, रचना, परंपरा ' : मंगरूळकर-अर्जुनवाडकर : पृ. ६८ : तळटीप १.

त्याविषयीची क्रिया कोणत्या क्रियापदाने सांगितली आहे? 'होऊन' याने? कीं 'राहिला' याने? कीं 'आहे' याने? कीं 'होऊन राहिला आहे' याने? त्यांतल्या प्रत्येक पदाचा अर्थ हा पदांच्या समुच्चित अर्थाहून वेगळा तर आहेच, पण त्यांतल्या एकेका पदाने दुसऱ्या पदाच्या अर्थात थोडी-थोडी भर टाकिली आहे, आणि 'प्रश्न' या उद्देश्यासंबंधीचें विधान तीन वेगवेगळ्या क्रियावाचक पदांनी केलेलें आहे. तेव्हा हें संयुक्त क्रियापद मानावें, असा या विषयांत पक्ष आहे. तात्पर्य, ज्या वाक्यांत क्रिया ही एकाहून अधिक धातूंनी व्यक्त होते, त्या वाक्यांत क्रियापद हें संयुक्त क्रियापद मानावें, असें या पक्षाचें स्वरूप ठरतें.

'संयुक्त क्रियापद' ही संज्ञा कांहीशी चमत्कारिक आहे. तींत क्रियापदांचा विशिष्ट समास आहे, असें नाही. तिने क्रियापदांचा निवळ संयोगहि दर्शविला जात नाही. तर ज्या पदांनी क्रिया उक्त होते, त्या पदांच्या अर्थांची उत्तरोत्तर वाढ किंवा त्यांचा समुच्चय सांगितला जातो. 'होऊन राहिला आहे' = होऊन + राहिला + आहे. यांतल्या कोणत्याहि व्यस्त पदाने समुच्चित तीन पदांचा अर्थ व्यक्त होत नाही. एवढेंच नव्हे. 'होऊन' याच्या अर्थाची वाढ 'राहिला आहे' याने झाली, असेंहि नाही; किंवा 'राहिला' याची वाढ 'आहे' याने झाली, असेंहि नाही. फार काय, अर्थतः पाहतां 'होऊन राहिला आहे' हा एक नवाच अर्थ बनला आहे. बरें, 'होऊन', 'राहिला' आणि 'आहे' यांतील 'होऊन' हें पूर्वकालवाचक, 'राहिला' हें भूतकालवाचक आणि 'आहे' हें वर्तमानकालवाचक पद आहे. अशा ठिकाणीं भिन्नभिन्न कालांचा योग व्याकरणसंबंधाच्या दृष्टीने कसा घालणार, असाहि प्रश्न आहे. सारांश, येथे 'होऊन राहिला आहे' या वाक्यांशाच्या अर्थाची चर्चा करण्याचें काम व्याकरणावर येऊन पडतें, आणि अशा चर्चेनंतर व्याकरणाचा निर्णय अपेक्षित आहे.

आता, अर्थाच्या चर्चेची असली जबाबदारी खरोखर व्याकरणाला घेतां येणार नाही. व्याकरण हें शब्दरूपांच्या रचनेची जबाबदारी घेईल, अथवा घेऊं शकेल. पण अर्थाची जबाबदारी तें घेऊं लागलें, तर त्याला काव्यशास्त्राच्या अथवा अर्थविमर्शशास्त्राच्या गुंतागुंतीच्या आडवाटेने धावावें लागेल. तसें धावण्यालाहि कांही हरकत नाही. पण रूपरचना करण्याच्या कामीं वाहिलेलें शास्त्र अर्थाच्या गुंतवळ्यांत केवळ गुंतून पडेल, आणि फार तर त्याला मराठींत हरघडीं येत असलेल्या अशा प्रकारच्या तथाकथित संयुक्त क्रियापदांच्या याद्याच्या-याद्या देत बसावें लागेल. पलीकडे त्याने लाभ नाही. गणित सोडविण्याची ज्या मुलाला कुवत नाही, त्याला शून्यलब्धीचीं गणितें घालून निवळ आकडेमोड करायला लावण्यासारखें हें होणार आहे!


'जाऊं देणें', 'होऊन पडणें', 'करूं जाणें', 'करून टाकणें', 'पोहूं लागणें', 'मारीत सुटत बसणें', 'लिहून चुकून बसणें' अशा प्रकारचे अगणित प्रयोग मराठींत

अहर्निश येतात. अशा प्रयोगांत जीं दोन पदें असतात, त्यांच्या अर्थांमध्ये अंतर असतें. कधीकधी पूर्वपदाचा अर्थ पुढील पदाच्या अनुरोधानें अर्थांतर पावतो. पण कसेंहि असलें, तरी त्यांचें व्याकरण विभक्त पदाच्या रूपा अन्वयें ठरविणें हेंच प्रशस्त आणि सयुक्तिक होय. अगणित अर्थ-अर्थांतरांची नोंद करण्यानें कांही व्यवस्था साधत नाही, आणि त्यामुळे तें व्याकरणाचें कार्य होत नाही. सारांश, संयुक्त क्रियापदाची रूढ कल्पना मराठीच्या व्याकरणांत अकिंचित्कर आहे.

'विस्तार फार होतो', अशा प्रकारचा अंकुश जर नसता, तर कालार्थप्रत्ययांविषयी कांही विवेचन करणें हें शक्य झालें असतें. परंतु येथे तें सोडून देणें प्राप्त आहे. त्याचप्रमाणे धातुविमर्शाशीं नातें सांगणारे इतरहि अनेक विषय अनिच्छेने ठेवून द्यावे लागणार आहेत. एवढेंच नव्हे, तर प्रयोगविचार, वाक्यविग्रहविचार इत्यादिहि विषय अपरामृष्ट राहणार आहेत. मात्र असें असलें, तरी आत्तापर्यंतच्या विवेचनाचें स्वरूप पुन्हा एकवार साररूपानें ध्यानीं यावें, म्हणून शाखानुशाखांच्या द्वारा पुढील दोन कोष्ठकें दिलीं आहेत. त्यांतल्या पहिल्या कोष्ठकांत 'प्रकृतीं'चें स्वरूप मुख्यतः मनांत ठेविलेलें आहे, तर दुसऱ्या कोष्ठकांत त्यांचें वाक्यगत कार्य प्राधान्यानें ध्यानीं घेतलें आहे.


कोष्ठक १

शब्दविभाग



कोष्टक २

पद विभाग



समारोप

मित्र हो,

ज्या भूमिकेने मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार करण्याचें काम मीं स्वीकारिलें होतें, ती भूमिका भाषेच्या वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भानें आत्तापर्यंतच्या सहा व्याख्यानांच्या विवेचनांत स्पष्ट करण्याचा मीं यथामति प्रयत्न केला. या नवीन भूमिकेने मराठीचें समग्र व्याकरण रचणें शक्य आहे, — नव्हे, इष्ट आहे. मराठीचेंचसें काय, पण मराठीचे जे अन्य भाषाभेद आहेत, त्यांच्याहि घडणीचें अवलोकन आणि परीक्षण करणें हें फार अगत्याचें आहे. अशा परीक्षणांच्या कार्याने या सर्व भाषाभेदांमधलीं नातींगोतीं

दिसूं लागतील, तीं निश्चित होतील, आणि त्यांच्या जवळिकीचा मधुर प्रत्ययहि येण्याला साहाय्य होईल. हा झाला पुढचा भाग. पण या व्याख्यानांच्या निमित्तानें आपल्या बोलण्यांत असलेल्या मराठी भाषेचें स्वरूप न्याहळिण्याची जी संधि मला मिळाली, ती मी खरोखर अमोल समजतों. हें स्वरूप समग्रतया न्याहळिण्याचें आणि त्याची चिकित्सा-पूर्वक संपूर्ण नोंद आणि अखेरपर्यंतची रचना करण्याचें काम तपशिलाचें आहे. तें कार्य मीं या ठिकाणीं घेतलेलें नव्हतें. त्यामुळे एखाद्या इमारतीच्या कागदावरच्या वास्तु-योजनेने – म्हणजे प्लॅनने – त्या इमारतीची कल्पना करण्यासारखें हें विवेचन झालें, याची मला जाणीव आहे. पण असा कांही नकाशा आखल्यावाचून इमारतीचें बांधकाम होणारहि नाही, म्हणून हा व्याप केला. त्याचें परीक्षण करण्याचें काम आपल्यासारख्या चिकित्सकांचें आहे. हें परीक्षण करितांना वास्तुकाराला, म्हणजे आर्किटेक्टला, आपण ज्याप्रमाणे 'ही खिडकी इथे बसवा', 'ही खोली जरा मोठी करा', 'हें दार मोठें असावें', 'अमूक-एक नवी सोय करा', अशा प्रकारच्या अनेक सूचना करितों, त्याप्रमाणे आपण सूचना केल्यास मी अतिशय आभारी होईन. कारण आत्तापर्यंतचें विवेचन म्हणजे निर्णय नव्हेत; चिकित्सेचे विषय आहेत, असें मी समजतों.

व्याकरण, भूगोल हे विषय साधारणपणें रूक्ष मानिले जातात. मला ते तसे कधीच वाटले नाहीत; आणि व्याकरण तर नाहीच नाही. एखादा ज्योतिर्विद् ज्याप्रमाणे आकाशाकडे किंवा खगोलाकडे डोळे लावून रात्रीच्या-रात्री काढितो, आणि तरी कंटाळत तर नाहीच, उलट स्वतःलाच हरवून बसतो; किंवा एखादा कलावंत ज्याप्रमाणे नवीन रागरचना करितांना त्या रचनेच्या स्वरलयात्मक वेधक आकृतिबंधांनी स्वतःच मोहून जातो, त्याप्रमाणे भाषेचें स्वरूप पाहतांना मला कंटाळा तर आला नाहीच, उलट नेहमीच आनंद वाटत आला आहे. असा हा आनंद व्यक्त करितांना कलावंताच्या राग-रचनेंत ज्याप्रमाणे कांही उणिवा, दोष, खोडी राहून जाणें शक्य असतें, त्याप्रमाणेच माझ्याहि पुनर्विचारांत कांही अपूर्णता, दोष, न्यूनें, व्यंगें असण्याची शक्यता आहे. त्याला माझें अनवधान अथवा असामर्थ्य कारण आहे. पण हंसाचें चालणें हें अत्यंत सुंदर असतें, म्हणून दुसऱ्यांनी अडखळतहि चालूंच नये, असें जसें होत नाही, त्याप्रमाणे यापूर्वी व्याकरणाच्या रचनेचे अनेक प्रयत्न झालेले असूनहि मी या कार्याला प्रवृत्त झालों आहें. या प्रवृत्तीची प्रेरणा ज्या गूढ, अनामिक, कुटीरस्थ शक्तीने मला दिली, तिचें लौकिक स्मरण करणें हें मी या समाप्तिसमयीं आपलें कर्तव्य समजतों.

श्री कृ ष्णा र्प ण म स्तु

सूची

ही सूची साधारणपणें वर्णमालेच्या आजच्या उच्चारांनुसार सूत्रित केलेली आहे. जसें : क्ष = क्‌ष; ज्ञ = द्‌न्‌य. स्वरमालेमध्ये ऋ, ए-नंतर ॲ, ओ-नंतर ऑ हेहि स्वर दिलेले आहेत. तसेंच, व्यंजनमालेमध्ये ऩ हें दंतमूलीय अनुनासिकहि दिलेलें आहे. च-वर्गीय दंत्य-तालव्य उच्चारांचा भेद सूत्रणांत दुर्लक्षिला आहे. पूर्णोच्चारित अनुस्वार = वर्गीय अनुनासिक. जसें : आंगिक = आङ्गिक; संकेत = सङ्केत. मात्र पूर्णोच्चारित अनुस्वारापुढे य, र, ल, व इत्यादि अवर्गीय व्यंजनें आल्यास त्या अवर्गीय व्यंजनांचा वर्णमालेंतील क्रम ध्यानीं घेऊन सूत्रणाचा क्रम ठरविला आहे. जसें : संयुक्त, संस्कृत.

आकडे पृष्ठांचे आहेत.

परिशुद्धि

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५७	खालून २	ᴾ लुत्व	प्लुत
६८	६	घेणारीं	देणारीं
६८	७	घेणारीं	देणारीं
६८	१५	**घेणारीं**	**देणारीं**
६८	१५	**घेणारीं**	**देणारीं**
६८	खालून ६	घेणारीं	देणारीं
६८	खालून ७	घेणारीं	देणारीं
११२	खालून २	हातात.	होतात.
११३	खालून १	. हीं	१. हीं
१२०	खालून २	. Bombay	२. Bombay